श्रीनामदेवरायांची
सार्थ गाथा

भाग चौथा

(श्री नामदेवरायांचे चरित्र, श्री रामजन्म माहात्म्य, शिवरात्र माहात्म्य, श्री विठ्ठल माहात्म्य, श्री विठ्ठलाची भक्त वत्सलता, पंढरी माहात्म्य, नाम महिमा)

संग्राहक व प्रकाशक
श्री संतवाङ्मयविशारद ह. भ. प. प्रल्हाद सिताराम सुबंध
११६३ महात्मा गांधी रोड, पुणें १

पौष शुद्ध एकादशी १८७९]   [दि १-१-५८ बुधवार

किंमत ६ रुपये

प्रकाशक :—
संतवाङ्मयविशारद ह. भ. प. प्र. सी. सुबंध
११६३ महात्मा गांधी रोड पुणें १

मुद्रक :—
श्री न. वि. सरदेसाई, पद्मा प्रिंटिंग प्रेस, पुणें २ : प्रथम ९ फर्मे
श्री. गो. भा. जोशी, भास्कर प्रिंटिंग प्रेस, वर्धा : अवशेष छपाई

विषयानुक्रमणिका

प्रस्तावना

(i) श्रीसंतवाङमयविशारद ह. भ. प. श्री. प्रल्हादबुवा सुबंध यांनी, आठ दहा वर्षे होऊन गेलीं, श्री. नामदेवरायांच्या अभंगांचे प्रकाशन चालू ठेविलें आहे. शके १८७१ त पहिला, शके १८७३त खंड दुसरा आणि शके १८७६ त खंड तिसरा, याप्रमाणें तीन खंड प्रसिद्ध झाल्यावर आज शके १८७९ त प्रस्तुतचा चौथा खंड प्रसिद्ध होत आहे हें पाहून मराठी संतवाङमयाच्या सर्व भक्तांस मनापासून आनंद झाल्याशिवाय राहणार नाही. श्री. ह. भ. प. प्रल्हादबुवा हे मुरलेले सांप्रदायिक आहेत आणि त्यांचा सततचा व्यासंग 'संतवाणी हाच आहे. त्यामुळें त्यांचा पारंपरिक अधिकार मोठा आहे. तथापि या संतवाङमयाकडे आधुनिक पद्धतीच्या विद्वानांचें लक्ष्य अधिक लागावें ही तळमळ हि बुवांच्या ठायीं कशी दिसून येते हे त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या तिन्ही भागांत जीं अनेक विद्वानांचीं संमतें वा अभिप्राय त्यांनी प्रसिद्ध केले आहेत त्यांवरून कोणाच्याहि ध्यानांत येईल. या प्रकरणीं ते मोठी नम्रता स्वीकारून अर्वाचीन विद्वानांचा सहकार इच्छितात हें विशेष खरें. या इच्छेचाच एक परिणाम म्हणून या लेखाचा निर्देश करतां येईल

(ii) ह. भ. प. प्रल्हादबुवा नुसता नामदेव गाथा प्रसिद्ध करीत नाहींत तर नामदेव-वाणीवर आपलें मराठी भाष्य रचून त्या वाणीचा अर्थ विशद करून सांगण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. यामुळें उपलब्ध नामदेव-वाणीच्या संग्रहापेक्षा या प्रकारानें किती तरी अधिक जागा व्यापली जावी व किती तरी अधिक खंड कामी यावे ते सहज आकळितां येण्यासारखें आहे. हा उद्योग ते यथामति तडीस नेण्यासाठीं झटत असतांना त्यांना अनेक अडचणीना तोंड द्यावें लागत असेल तर तें हि सहज समजण्यासारखें आहे. पैकीं व्यवहाराची, प्रकाशनाची आर्थिक बाजू घटकाभर बाजूस ठेवूं आणि ग्रंथाच्या अंतरंगाबाबतच येथें विचार करूं.

(iii) नामदेवाची खरी वाणी कोणती ? हा पहिला प्रश्न आरंभीच आडवा येतो. आपल्या देशांत लोक परंपरेचे एवढे भक्त आहेत कीं वेद-पाठकांकडे बोट दाखवून, वेदांची प्राचीन संहिता आज हजारों वर्षे अयंकर

संकटांना न जुमानतां आम्ही कशी बिनचूक टिकवून धरली आहे, त्याचें कोणासहि आश्चर्य वाटतें. नुसत्या पाठांतराच्या बलावर हें कार्य साधलें नाही. प्रथम त्या वाणीला वा अक्षराला अपौरुषेय ठरवून तींत एक केसाचाहि बदल करणें मोठे पाप ठरविलें आणि बिनचूक पठण हे पुण्यकर्म ठरविलें. मग अर्थ समजो वा न समजो. वेदपाठकांची जागा वेदार्थवेत्त्यांच्या वरची ठरवून दिली. एवढा बंदोबस्तहि पुरेसा होण्यासारखा नव्हता, म्हणून पसंत केलेली संहिता अक्षराअक्षरांनी पठणांत विविध रीतीनें बांधून पठणाच्या अनेक विकृति निर्माण केल्या. त्यामुळें पदें, जटा, घन, रथ, दंड इत्यादि प्रकारांनी वेदसंहिता, अक्षराअक्षराचें स्थान, ऱ्हस्व, दीर्घ उच्चारण या विषयींच्या तपशिलांनी अशी पक्की करून टाकली कीं त्यांत बोट शिरकावण्याला वावच ठेवला नाही. लिखितांवर आणि त्यांत होणाऱ्या पाठभेदांवर फार अवलंबून राहण्याचें कारणच ठेविलें नाही. हा एक चमत्कारच भारतांत घडून आला. परंतु ही अपूर्वाई वेदवाणी व्यतिरिक्त इतर कोणत्याहि शब्दसमुच्चयाच्या वांट्याला आली नाही. संतवाणी पाठ करणारे आजहि पट्टीचे पाठक आढळतात. पण वेदांप्रमाणें क्रिया या प्रकरणीं घडलीच नाही त्यामुळें पठणमार्गानें संतवाणी शुद्ध किंवा मूळस्वरूपांत आपल्यापर्यंत पोचलीच नाही आपापल्या गुरुसंप्रदायाच्या बळावर कांही वाणीपरंपरा मानण्यांत येतात; परंतु या परंपराहि थेट ज्ञानदेव, नामदेव किंवा तुकाराम यांच्या पावेतों निःशंकपणें पोचलेल्या अशा आढळत नाहीत.

(iv) हें झालें एक. दुसरें असें कीं संतवाणीचा अभ्यास मोक्षसाधनेसाठीं करावयाचा, या कार्यांत गुरुकृपा प्रधान, मग गुरुमुखांतून येईल तीच वाणी, तीच परंपरा, तेच मूळ ज्ञानदेवांचे वा नामदेवांचे शब्द ! गुरुमुखाची चिकित्सा संभवतच नाही. वर सांगितलेंच कीं भक्तांचें वा साधकांचें ईप्सित काय ! तें ईप्सित शब्दावरील अनुस्वार, ऱ्हस्व, दीर्घ यांची चिकित्सा किंवा चीरफाड करण्यानें त्याच्या जवळ येईल कां दूर जाईल ? आजचें रूप त्याचें, त्यापूर्वी दोनशे वर्षे तें होतें त्याचें आणि त्यापूर्वी नामदेवज्ञानदेवांच्या काळी म्हणजे पांच सातशे वर्षांपूर्वी तें होतें 'तेयाचें'. ही परंपरा चिकित्सेवरून बळकट स्थापित करता येते. अर्थात्

मूळ नामदेव वाणींत 'तेयाची' असेंच रूप असावयास पाहिजे, या अनुमानाला सिद्धांताचें बळ प्राप्त होतें. आज आपण अर्जुन, भीम, कृष्ण म्हणतों पण हे शब्द ज्ञानदेवनामदेवांच्या काळीं अर्जुनु, भीमु, कृष्णु असे उकारांत होते म्हणून ते स्वीकारले पाहिजेत. आज आपण सांग लिहितो पण नामदेव काळी सांघ असें लिहीत. या गोष्टी आतां बऱ्याचशा बळकटपणें सिद्ध झाल्या आहेत आणि एखादा अर्धा विद्वान त्यांच्या विरुद्ध कुरकुरतांना आढळला तरी तो अपवाद पोकळ भूषण समजून आपण पुढें जावें हेच योग्य. पण संतवाणीच्या द्वारा ज्या अपूर्व सुखाचा, शांतीचा वा समाधानाचा अनुभव साध्यासुध्या माणसाला देखील येतो त्यांत सांग चा घ झाल्यानें काडीची तरी भर पडते काय ? किंवा उलट झाल्यानें तूट येते काय ? कांहीच नाही मग या खटाटोपांत पडा कशाला ? जेथें 'शब्दाआधी' प्रमेयालाच आम्हाला झोबावयाचें आहे तेथें शब्दाशीं डोकेंफोड कराच कशाला ? 'अर्थरि तात्पर्य न तु शब्दरि' हा न्याय व्यवहारी माणसें पत्करतात आणि संहिता-चिकित्सेला शुष्क काथ्याकूट म्हणून फाटा देतात. याचा परिणाम किती विपरित होतो त्याचें एक उदाहरण पाहू. दासबोधात एक चरण छापला होता—'परनारी पाहोनि उचले।'. आतां पारमार्थिक गुरू असले तरी त्यांनाहि शिष्याचें समाधान करावे लागतें. व्यावहारिक गुरूंना हि शंकांची उत्तरे द्यावीं लागतात ! अलीकडे मूळ पाठ सांपडला तो असा 'पर्णाळि पाहोनि उचले' (दास. १२।१।११) म्हणजे पानावरची अळी (रानांतील गवताच्या बारीक पातीवरची आळी-किडा) ही पुढल्या पानावर आपले पाय पक्के रोवले म्हणजे मगच मागच्या पानावरून पाय काढते, तसें न करील तर खालीं खड्डयात पडून मरेल. याप्रमाणें 'दीर्घ सूचना' शिकवित असावी असें समर्थांचें म्हणणें, 'पर्णाळी' ऐवजी 'परनारी' पाठ पुढें आल्यावर कसें लक्ष्यांत येणार ?. तेव्हां अर्थवाद्यांचें घोडें येथें पेंड खाणारच ! असदीं संतांनी प्रत्यक्ष 'वि' चा केला 'ठोबा' अशी 'विठोबा' शब्दाची फोड केली तरी विष्णु-विठ्ठु-विठु ही सरळ शास्त्रीय सांखळीच प्रमाण धरावी लागते आणि संतवाणी अर्थवादांत किंवा कोटींत ढकलावी लागते. कृष्णाचें किटु होतें आणि विष्णुचे विठु हें आतां कोणासहि कबूल करावें लागेल. येथें दुसरी धडपड व्यर्थ होय. चिकित्सेला शरण गेलेंच पाहिजे.' तार्किकांचा टाका

संग । ०००० नुमगें खरें बुडाल ।' या म्हणण्या इतकेंच निश्चयानें 'अज्ञानाचा टाका संग । नुमगें खरें बुडाल' हा सिद्धान्त हि निरपवादपणें लागू होतो.

(v) ह. भ. प. सुबंधबुवा यांची इच्छा चिकित्सेला अनुकूल दिसते. तिसऱ्या खंडाचे वेळीं मला त्याचा अनुभव आला. त्यांनी नामदेव गाथ्यांतून तीन अभंग पुढें टाकले.

नामयानें बंदर घेतले । विठ्ठल जितचि धरिला ।।

येथें माझ्या हाती जुन्या संहिता चिकित्सेसाठीं नव्हत्या. मुद्रित पाठ वर दिल्याप्रमाणेंच होता. अडचण ही कीं 'बंदरेचा' येथें संबंध काय? जुनी भाषा परिचित असल्यानें मला सहज सुचलें कीं येथें जिवंत धरण्याची गोष्ट नामदेव बोलत आहे आणि असे जेव्हां पूर्वीं दुसऱ्या पक्षाचे लोक जिवंत धरून आणीत त्यावेळी जुन्या कागदपत्रांत 'बंद' धरून आणले असा प्रयोग सर्वत्र आढळतो. 'बंद' म्हणजे बांधून आणलेले कैदी—अर्थात् बंदर = येथें अक्षरें बंदर (म्हणजे रे, अरे याअर्थी) अशींच मुळांत असलीं पाहिजेत. नामयानें बंद घेतले म्हणजे (विठ्ठल) जिवंत धरून आणला—हाच सरळ अर्थ निघतो आणि जुळतो. बुवांनी हा अर्थ दिग्दर्शित केला आहे. पण आपल्या विवरणांत बंदर रे घेतले = आटोकाट प्रयत्न केला असें म्हटलें आहे त्याला पायाच नाही! बंदर याचा अर्थ देह—हा हि अर्थ बुवा संग्राह्य म्हणून नोंदतात (पृ. २७१ खंड ३). जेथें निश्चय समोर उभा असून त्याच्या खांद्यावर निःशंकपणें हात ठेवावयाला बुद्धि कच खाते तेथें तिनें स्वधर्म सोडिला असेंच म्हणणें भाग पडतें. दुसरा अभंग बुवांनी मजसमोर ठेविला होता तो याच खंडांत पृ. ३४८ वर छापलेला 'करीन म्हणसी व्यापार ?' हा होय. उघड आहे या अभंगांत सारी व्यापारी परिभाषा वापरली आहे. तसें मी लावून दाखविलें. यांत शेवटच्या चरणांत 'नामयाने मोह जबाब दिला' ही अक्षरें आहेत. व्यापारी परिभाषेंत याचा अर्थ अगदीं सरळ व स्वच्छ आहे. मात्र मोह जबाब ही अक्षरांची रचना चूक आहे, तीं 'मोहजबा' अशी जोडून पाहिजे आणि शेवटी 'ब' अज्ञानानें चिकटविला आहे तो बिलकूल काढून टाकला पाहिजे. कारण जुन्य हिशेबी परिभाषेंत 'मोहजबा' म्हणजे 'हिशेब' असा स्वच्छ अर्थ आहे. नामदेवानें हिशेब चुकता केला असा

चरणाचा सरळ अर्थ आहे. तो मांडून व 'सह्याद्रि' मासिकांत श्री छापूनहि दिला असतां बुवांनी मोहजबाब = मुखानें जबाब, असें विवरण केलें आहे यांत त्यांचा सारा हिशेब चुकला हें उघड आहे. यासाठी चिकित्सेचा तुलनात्मक, भाषाशास्त्रीय आधुनिक अभ्यास फार उपकारक ठरतो. करणारानें चतुरपणानें त्याचा लाभ करून घेतला पाहिजे म्हणजे संतांच्या दिव्य वाणीचें तेज अधिकच खुलुन दिसेल !

(vi) बुवांनी आपल्या खंडांत नामदेव वाणीची विषयवार वाटणी आपल्या मतानें केली आहे. मागील खंड तीन यांत त्यांनी नामदेवरायाचें चरित्र म्हणून बहुतेक सर्व खंड अथवा तीन साडेतीनशें पानें खर्ची घातलीं आहेत आणि आतां पुन: या चौथ्या खंडांत नामदेव चरित्र म्हणून सुमारें पाऊणशें पृष्ठें मजकूर आहे. हा मजकूर मागील भागांतच कां जोडतां आला नाही याचें समर्पक समाधान आम्हांला करितां येणार नाही. पण एवढी चारशें पानें खर्चून प्रत्यक्ष लौकिक चरित्र म्हणून जें आपण साधारण वाचक समजतो ते यांत किती हातीं लागेल ? असलेंच तर यांत नामदेवाचें पारमार्थिक चरित्र सामावलें आहे असें म्हणतां येईल.

(vii) असो. तर जेव्हां केव्हां घडेल तें घडो पण पहिला शास्त्र-शुद्ध प्रयत्न नामदेवांची मूळची वाणी हस्तगत करण्याचा आहे. श्री. बारटक्के प्रभृति अभ्यासकांनी या प्रकरणी प्रयत्न चालविलेले सर्वश्रुत आहेत; त्यांत कांही खोटया रचनेच्या लीला ही उघडकीला आलेल्या पाहून खेद वाटतो. आपली पहिली गरज नामदेवांच्या शुद्ध संहितेची आहे. आणि ती उपलब्ध होण्याचा आतां मार्ग चिकित्सेचा आहे. चिकित्सेचा मार्ग संशयाने व्याप्त असतो. मतभेदांची येथें गर्दी असते. तरीहि या मंथनांतून कांही नवनीत खचित हातीं लागतें. तो प्रयत्न झालाच पाहिजे.

(viii) संहिता हाती आली म्हणजे आज आणखी हि एक गरज उद्भवली आहे कीं सरळ गद्यांत तिचें विवरण व्हावें ही. प्रल्हादबुवांनी याच हेतूनें ही नामदेवाची सार्थ गाथा खंडीखंडांनी प्रकाशित करण्याचा अभिनंदनीय उद्योग चालविला आहे तिकडे आतां थोडे वळूं.

(viii) नामदेवांची मूळ वाणी जशी आज उपलब्ध आहे त्या स्वरूपांतही ती अत्यंत सोपी, सरळ आणि मधुर वाटते. म्हणून गद्यांत तिची फोड करितांना एक विशिष्ट पद्धति काटेकोरपणानें अमलांत आणण्यानें वाचकाचा चोखंदळपणा, अचूकपणा, सर्वच वाढेल आणि तो त्या वाणीचा बारीक दृष्टीनें अभ्यास करण्यास प्रवृत्त होईल. श्री. नामदेवांच्या अंतरंगांत शिरण्याची शक्ति मग त्यास प्राप्त होईल. हा इष्ट प्रयत्न बांधेसूद झाला तर अधिक उपयोगी. नामदेवांच्या मुखांतून जेवढे शब्द बाहेर पडले त्यांचा सरळ अर्थ प्रथम द्यावयाचा. त्यांत हि कठिण किंवा अपरिचित शब्द आणि त्यांचे अर्थ हे समान अंकनानें म्हणजे आंकडे देऊन दिग्दर्शित करावयाचे. अवश्य तर स्पष्टीकरणास साहाय्यभूत होण्याजोगी सामग्री सूचित करणे शक्य असल्यास करावयाचे. शंकित, दुर्बोध स्थळें तशीं निर्देशावयाची; पूर्वीच्या निश्चित चुका वाटल्यास त्या दाखवावयाच्या; अन्य उपयुक्त संदर्भ द्यावयाचे; समानार्थक वचनें (नामदेवांची वा इतरांची) दर्शित करावयाचीं; वाच्यार्थ, लक्ष्यार्थ, ध्वन्यर्थ दाखवून द्यावयाचे किंवा बाह्यार्थ आणि गूढार्थ उकलून दाखवावयाचे. कांही पाठभेद पूर्वीचे आढळले असल्यास त्यांचा परामर्श घ्यावयाचा. क्वचित नवाच पाठ सुचविण्याचें धारिष्ट करून पाहावयाचें. असें कांही धोरण व क्रम निश्चित करून अर्थाची मांडणी केल्यानें घोटाळा कमी होईल, अभ्यासाला वळण लागेल, गोळाबेरीज अर्थ करण्याच्या प्रवृत्तीला आळा बसेल, अडचणीचीं स्थळें नेमकीं पुढें येतील आणि सर्वच वाचकांना सर्वांगीण प्रगति करण्यास साधन सांपडेल.

(ix) वरील विवेचनाच्या स्पष्टीकरणार्थ थोडा सोदाहरण प्रपंच करूं. ग्रंथातील 'नाममहिमा' प्रकरण प्रारंभ पृ. १—पहा.

पृ १ (i) केशव हेंचि 'वर्म सांगितलें ॥२॥

केशव' (परमेश्वराचें' नाम) हेंच वर्म' (मुख्याची' गोष्ट) असें सांगितलें.

—हा सरळ अर्थ

—अर्थासाठी अंकांकन

आतां स्पष्टीकरण :— या चरणांत 'कोणीं सांगितलें तें स्पष्ट नाहीं.

—थोरांनीं, संतांनी, गुरूंनी सांगितलें असे घ्यावें (अध्याहार) :

केशवरायानें सांगिलें (प्रल्हादबुवा संपादक) हें बसतच नाहीं.

(आ) नाम शुद्ध स्नान-नाम शुद्ध संध्या। नामाविणें वेद आणिक नाहीं. ॥ ३ ॥

सूचना :—वेद याशी संध्या हीं अक्षरें जुळत नाहीत पण शुद्ध यांतील शी द जुळेल यास्तव चरण मुळांत असा असावा:—

नाम स्नान शुध्द नाम संध्या शुद्ध। नामाविणें वेद आणिक नाहीं ॥३॥.

(इ) लग्नाचिये काळीं. ॥ ५ ॥

टीका :-लक्ष्मीनारायणाचा जोडा शोभतो अशी म्हण लक्ष्यांत घ्यावी शुभ मंगल 'सावधान'-ही घोषणा आठवावी.

(उ) एको विष्णु० ॥ ८ ॥

टीका :-एको विष्णुर्महद्भूतं पृथग्भूतान्यनेकशः। त्रीन्लोकान् व्याप्य भूतात्मा भुक्ते विश्वभुगव्ययः। श्राद्धप्रसंगी, भोजनप्रसंगी म्हणावयाचा मंत्र

पृ.२ (अ) चरण ३ = 'तुझी' कीर्ति-(संपादक 'त्याची'-तें अयुक्त),

(आ) ,, ४ = 'क्षिति' चा अर्थ ?

(इ) ,, ५ = ऐसा हो = अहो किंवा होता परंतु होण्यानें. हा संपादकीय अर्थ कसा संभवतो ?

पृ ३ (अ) संपादकीय अर्थ-ओळ २-'कारण'-याचें कारण दिसत नाहीं.

(आ) चरण १ सरता-परता-यांचें स्पष्टीकरण पाहिजे.

(इ) चरण २-नामतुझें

संपा० अर्थ 'तुला' ? चरण ४ मध्यें 'तुम्ही' आहे तिकडे लक्ष देऊन अर्थ बसवावा. पाठसुद्धा.

(उ) चरण ३-नामेंचि निधान चांगया झाला ॥ ३ ॥

संपादक-चांगदेवाला नाम हेंच निधान प्राप्त झालें

शंका :–चरणांतील शब्दांचा संपादकांना पाठिंबा नाही. ते शब्द सांगतात कीं नामानेंच बांधया हा निधान (ठेवा) झाला खरा पाठ शोधला पाहिजे.

(ऋ) चरण ६–ऐसा–असा (अशा–नव्हे)

पृ. ४ चरण ॥ १ ॥–चिंतातुर देहीं न साहे काजळी । संपादकीय अर्थ पाठांतून निघत नाही. आमच्या मतें येथें चिंता चिता समानास्ति । बिन्दुमात्र विशेषतः । सजीवं दहते चिंता । निर्जीवं दहते चिता ॥ १ ॥

हें वचन लागू होते. देहीं–दाही असाहि संशय येतो तो, पाठ शंकेंत जमा ठेवून आहे तेंच धरून चालू. चिंतातुर पुरुषाला देहांत (चितेच्या आगीमुळें लागणारी) काजळी–धूर सोसत नाही. ती काजळी–काळेपण (धूर–अंधार, पक्षीं अज्ञान) फेडण्यासाठीं नामाची दिवटी (दिवी–दिवा–दिवली) पाजळा, उभी करा. 'मनाची' पाठ नामाची ऐवजीं घेतल्यास मनाचा पोत उंच करून चिंतेची मनालाच लागलेली काजळी फेडून टाक असा अर्थ बसेल.

पृ. ५ संपा० अर्थ ओळ पहिली. येथें आंधळ्याच्या हाताचा संबंध काय ? खरा अर्थ सरळ आहे. आंधळ्याच्या तोंडात गाईचें दूध लावलें (घातलें) असतां त्या ठिकाणची (चव) परीक्षा जीभच जाणील.

चरण १–नाहीं दुजा भाव देखावया । १ ॥' मुळांत 'भाव' शब्द आहे मग अर्थात 'स्थळ' कोठून आणलें ?

चरण २–यांत 'नामाग्नि'–असें मुळांत असतां अर्थात नुसताच अग्नि ठेविला आहे ! या अभंगाचा रहस्य–उलगडा नीट व्हावयास पाहिजे. इतकेंच म्हणतों.

पृ. ७ (अ) चरण ३–श्रीधरी टीकाकार येथें श्रीधराची ओळख करून द्यावयास हवी. निर्धारी याचा अर्थ निर्धारानें–निश्चयानें असा होतो. त्याचा 'निर्णय'शीं काही संबंध नाही.

(आ) चरण ॥४॥ निधान–ठेवा. साधन नव्हे हे स्पष्ट आहे. निधान शब्द मागें पृ. ३ वर व पुढें पृ. १२ वर आलाहि आहे

पृ. ८ १२ । अर्थ—(अ) भाव—लंपट-निकट-हे मुळांतले शद्ब पक्के मराठी, किती सोपे ? पण यांना त्यांच्या तोलाचे प्रतिशद्बच सांपडणें कठिण. संपादकांनी मात्र आकर्षित, नित्यशः, रममाण अशा शद्बाची धोंड व्यर्थ गळयांत बांधून घेतली आहे !

"(आ) १३ चरण—२ । शंकर वरिष्ठ. तर्क—पाठ शंकर 'वसिष्ठ' असेल कां ? कारण वसिष्ठांच्या (योगवासिष्ठ) जोडीची इतर बरीच गर्दी अभंगांत आहे.

(इ) चरण ४—नामा म्हणे येरे काय जाणे स्तुति । सरळ अर्थ होतो—नामा म्हणतो "इतरांनी स्तुति (करणें) काय जाणावें ? (इतरांचा काय पाड—ही संपादकाची मांडणी उत्तम आहे पण यांत 'स्तुति' हा मुख्याचा शद्ब तेवढा गळाला !'

(ई) १४—चरण २, तर्क किंवा तरंग म्हणा मनांत उठतो कीं 'चांगदेवाचा तत्त्वसार' येथे आठवावा काय ?

(उ) चरण १—'ब्रम्ह' वीणा असतां नुसता वीणा कां ठेवला ?

पृ. ९ चरण ११—अटळ केला—यांतलें मर्म 'मिळालें' या मिळमिळीत शद्बांत येत नाही.

पृ. ११ (अ) १७—चरण—३—इंद्रियाची हाव राहे तरी ॥ ३ ॥ आमच्या मनें तप केलें तरी इंद्रियांचें बळ (लोभ—हांव इत्यादि धर्म) राहतातच (निघून जात नाहीत) असा होतो. संपादकांचा अर्थ चरणांतून निघत नाही.

(आ) १७-चरण ५ । संपादकांनी नामदेवाच्या म्हणण्यांचें मर्म वाचकाच्या हातीं दिलें नाही असें वाटतें. नाम ही माता, जैसे तैसे घेतां, यांतील घेतां पदाचा अर्थ आई मुलाला कडेवर घेते किंवा पाठीशी घेते या प्रकारचाच सरळ होतो आणि त्याची गोडी केवढी वाटते ? तें सोडून 'भक्तीत जमा होते' असा रोडका रडका भाव संपादकांनी मांडला आहे. नाममातेने एकदा कडेवर घेतल्यावर भक्ति सहज जोडेल यांत काय संशय ?

(ई) १८—चरण १ अंश असा: संसार नामाविण जाईजणा ॥ जाईजणा हा जुना ओळखीचा शद्ब; याचा अर्थ नश्वर; म्हणून सरळ अर्थ असा कीं नामावाचून संसार नश्वर असतो म्हणजे नामाशिवाय त्याला

नाम व नामी यांचें अद्वैत अनेक तऱ्हेनें प्रकट होत असतें, अनेक तऱ्हेनें अनुभवावयाचें असतें.

नामाकडून नामीकडे- असा प्रवास सहज सिद्ध आहे. "नाम"-वंत व भगवंत यांचे मधलें अंतर खरोखर काल्पनिकच आहे. नाम-वंत क्षणार्धात भगवंत होतो. "नाम" एकदांच व क्षण-मात्र घेतां आलें कीं ती व्यक्ति "देव" रूप होते, देवत्व पावते. "नाम" कोटयवधि वेळां घ्यावयाचें नसतें. नाम खरोखरच एकदांच घ्यावयाचें असतें. अगदीं एकदांच; दोनदां नव्हे; व पुनश्च कधींही नव्हे. नाम एकदां घेतलें, घेतां आलें, कीं दुसरें कांहींच घेतां, देतां येत नाहीं. कारण, नंतर "नाम" आपणांस घेतें; आपण "नामाला" घेत नाहीं, आपण शिल्लकच उरत नाही.

नाम म्हणजेच नामी असल्यामुळें नाम घेणें म्हणजे "नामी" घेणें, देव घेणें, देवत्व पावणें, असें नव्हे काय? देवत्व पावणें ही क्रिया, हा अनुभव एकदांच यावयाचा असतो. हजारों वेळां देवत्व कसें पावतां येईल?

एकदां नामी म्हणजे देव मिळाल्यावर त्याला पुनः कसें मिळवतां येईल ? एकदां देव मिळाल्यावर तो देव हरवावा लागेल व तरच त्या देवाला पुनः मिळवतां येईल. दोन वेळां 'नाम', घेणें दोन वेळां नामी मिळवणें शक्यच नाहीं.

न्यायदर्शनाप्रमाणें प्राक् अ-भाव असेल तरच 'भाव' शक्य होतो.

'देव मिळण्यापूर्वी, न मिळालेला, असला पाहिजे. मिळालेली वस्तु पुनः मिळवितां येणार नाहीं. ती हरवली तर मात्र पुनः मिळविणें शक्य होतें.

एकदां देव मिळाल्यावर तो हरवतां येत नाहीं.

एकदां देव मिळाल्यावर, फक्त स्वतःला हरवतां येतें. स्वतःला शिल्लक रहातां येत नाहीं. जें कांहीं रहातें तें देवच. असे नसलें तर देवाकडे अल्पत्व येईल व भक्ताकडे बृहत्+त्व जाईल. देव हा अंश व भक्त "पूर्ण" असा व्यत्यास होईल.

देव मिळवणें म्हणजे एखादी "वस्तु" मिळविणें नव्हे. स्वतःची देवांत मिळवणी करणें म्हणजे देव मिळविणें.

माझ्यांत देव मिळवावयाचा नाहीं -मीं देवांत मिळवून व मिळून जावयाचें. नाम-योगाची प्रक्रिया अशी विलक्षण आहे !

नाम-योग म्हणजे ज्ञानयोग, भक्तियोग, व कर्मयोग यांचा व यावत् शक्य सर्व योगांचा, समन्वय-योग आहे. कारण, सर्व योगांचीं मूलतत्वें नामयोगांत अंतर्भूत व अनुस्यूत असून शिवाय त्या सर्व योगांचा तो लघुतम विभाग आहे.

नामयोग ही बीज-विद्या आहे. शाखा शास्त्र नव्हे. नामयोग साधला किंवा नामाचा एकदांच योग झाला कीं विश्वाभास मावळलीच. नवलचंडांशूचा उदयच तो !

एकदां, अगदीं एकदांच नाम घेतल्यावर, "नाम" आपणांस घेऊन, ग्रासून टाकतें. आपण "नाम" घेण्यास शिल्लकच उरत नाहीं. हा माझा प्रत्यक्ष अनुभव आहे; साहित्य शास्त्रांतला अलंकार नव्हे-शाब्दिक कोटि नव्हे व अर्थ-चमत्कृति नव्हे.

श्रीसंत तुलसीदास यांनीं एका मातेला हाच उपदेश केला होता. तिचें बालक मृत झालें होतें. तुळसीदास म्हणाले "एकदांच रामनाम घे म्हणजे तें मूल जिवन्त होईल."

बिचारीनें रामनामाचा लक्ष-घोष केला. मूल जिवन्त झालें नाहीं तुळसीदासांनीं एकदांच रामनाम घेतलें व त्या बाईचें मृत मूल एकदम हंसू खेळू लागलें !

श्रीनामदेवांनीं निर्व्याज, निरागस, व "अखंडार्थ–वृत्तीनें" दुधाबरोबर, स्वतःच्या सर्वस्वाचा "नैवेद्य" दाखवून एकदांच पांडुरंगांचें नांव घेतलें याचा अर्थः–

पांडुरंगानें हा नैवेद्य स्वीकारला व नामदेव अंतर्धान पावून त्यांचे ठायीं पांडुरंग जिवन्त झाला.

नाम्याचा श्वास सरला त्यानंतर, देवाचा सुरू झाला.

नाम–नामी एक झाले.

नाम म्हणजेच देव हा सिद्धान्त महाराष्ट्रांत मानव देहानें वावरूं लागला. ज्ञानाची, ज्ञानराजाची साथ करीत करीत सहवास घेत घेत, उत्तर-भारतांत हा नरदेह सिद्धांत, संचार करून परत पांडुरंगाचे पायीं आला. नामदेव हे नाम-देह होते. त्यांचा देह हें साक्षात् व साकारलेले नाम होतें.

नामदेवाची देववाणी म्हणजे प्रत्यक्ष श्रुति-बाला आहे. साक्षात बाल-सरस्वती आहे.

नामदेवाच्या देववाणीला, बालसरस्वतीला, सरल-सुंदर शब्द-साज भक्तराज बाल प्रल्हादानें चढविला आहे. ही कलाकृति इतक्या हळुवारपणें, दुसरें कोण करूं शकेल ?

प्रकर्षानें 'ल्हाद' म्हणजे आनंद देणारें, हें प्रल्हादबालक, महाराष्ट्र-संतांच्या शब्द शारदेचे एक लाडकें लेणें आहे.

प्रल्हादबुवा हे आंतर-बाह्य शुद्ध आणि म्हणून धाचेचे 'साळ' आहेत. त्यांनी केलेलें नामदेवांच्या अभंगांचें सहज सुंदर शब्दांतर

व रूपांतर इतकें यथार्थ—व भावार्थ—दीपक आहे कीं मूळ अभंगांची अवीट गोडी त्यांत अ-विरतपणें झिरपून राहिली आहे.

श्री नामदेवावरील त्यांचें हें चार खंडांत प्रसिद्ध झालेलें सायण भाष्य महाराष्ट्र संतवाङमयांत अमर होईल अशी माझी निष्ठा आहे.

बाल-ब्रम्हचारी प्रल्हादबुवा. सुबंध यांचें जीवन हें एक हरिदासकुळाचें भाग्य-भूषण आहे. त्यांना म्हणजे त्यांच्या लेखन-रूप वाग्वंशाला "आकल्प आयुष्य" श्रीनामदेवांनीच प्रार्थिलें आहे.

आकल्प आयुष्य व्हावें तया कुळा ।
माझिया सकळां हरिच्या दासा ॥

श्री प्रल्हादबुवांचे अंतःकरण पूर्वक अभिनंदन करून हे मंगलाचरण संपवितो.

पंच पंच उषःकाल,
अनंत चतुर्दशी, शनिवार
भाद्रपद, शके, १८७९
ता. ७ सप्टेंबर १९५७

— धुं. गो. विनोद

(माझ्या सर्व ग्रंथांना परमपूज्य न्यायरत्नांचें दैवी आशीर्वाद लाभले आहेत. कांहीं आशीर्वाद, मूक-निःशब्द व कांही, प्रत्यक्ष त्यांच्या लेखणींतून उतरलेले, आहेत. खालील आशीर्वादानें नामयोगातलें मूळ रहस्यच त्यांनीं प्रकट करून ठेवलें आहे. श्री नामदेवां प्रमाणें व त्यांच्याच आशिर्वादें करून, श्री जगद्गुरु विनोद यांनींही पृथ्वी प्रदक्षिणा करून जगांतल्या बहुतेक देशांत अध्यात्म-विद्येचा प्रचार केला आहे. प्रल्हादबुवा सुबंध)

अभिप्राय

॥ श्री ॥

ह. भ. प. सुबंध हे सन्तवाङ्मय याचे वारकरी व अभ्यासी व वारकरी संप्रदायाचे निष्ठावन्त व अधिकारी अनुयायी आहेत. त्यांनी संत शिरोमणी नामदेव यांचे अभंग सार्थ प्रकाशित करण्याचे महत्कार्य अंगावर घेतले असून आतांपर्यंत नामदेवाच्या सार्थ अभंगाचे तीन खण्ड प्रसिद्ध केले आहेत. नामदेव हे भक्ति संप्रदायांतील 'एक अत्यंत श्रेष्ठ सन्त म्हणून सर्वत्र वंद्य असले तरी त्यांच्या अभंगाचें अध्ययन व अभ्यास फार अल्प प्रमाणांतच होता. ही उणीव नाहींशी करून नामदेवांनीं सर्व भरत खण्डभर संचार करून भागवत धर्म प्रचाराचे महत्कार्य हिंदुस्थानच्या इतिहासांतील मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगीं कसे केले याची योग्य जाणीव लोकांत उत्पन्न व्हावी व त्यांच्या अभंगाची शक्य तितकी अधिकृत प्रत काढून त्यांतील ज्ञान सर्व जनतेस सुलभ करून द्यावे म्हणून प्रल्हादजी सुबंध फार परिश्रम करीत आहेत. प्रकाशित झालेल्या तीन भागांवर महाराष्ट्रीय विद्वन्मणींनी जें अभिप्राय दिलेले आहेत त्यावरून त्यानीं चालविलेल्या कार्याचे महत्व व त्यांत संपादन केलेल्या यशाची कल्पना वाचकास येईल. त्यांच्या या प्रयत्नास मीं पूर्ण यश चिंतितो, व सर्व सन्तप्रेमी महाराष्ट्रीय जनतेनें त्यांना सर्वतोपरी या कार्यास साहच करावे अशी प्रार्थना करतों.

ता. १०-६-५७ }
पुणें }

मा. श्री. अणे

ह. भ. प. प्र. सि. सुबंध हे सार्थ नामदेव महाराजांची गाथा प्रसिद्ध करीत आहेत. त्याचा चवथा भाग आतां प्रसिद्ध होत आहे. त्यांत नामदेव चरित्र, श्रीराम माहात्म्य, श्री विठ्ठल माहात्म्य, शिवरात्र माहात्म्य, श्री विठ्ठलाची भक्तवत्सलता, नाम महिमा अशी प्रकरणें आलेलीं आहेत, हीं

सर्व प्रकरणें श्री नामदेवमहाराजांनीं अभंग वृत्तांत गायलेलीं हीं प्रकरणें त्यांनीं निरूपणाकरितां रचलेलीं असावीत असें त्याच्या पद्धतीवरून दिसून येते. कांहीं ठिकाणीं आपण हीं प्रकरणें कोणच्या मूळ ग्रंथाच्या आधारानें निवेदन करतो आहोंत हेहि त्यानी सांगितलेलें आहे. तथापि त्यांची प्रतिभा स्वतंत्र आहे आणि कोणत्याहि निवेदनांतील मुख्य सूत्र ज्ञान आणि भक्ति यांचा सर्व समाजांत प्रसार करणें हे आहे. कोठल्याहि अभंगांत त्यांच्या बहुजन समाजाविषयींचा कळवळा स्पष्ट दिसून येतो. तसेंच समाजाला सामान्य नीतितत्त्वाचें शिक्षण देण्याचें महत्कार्यहि त्यांना करावयाचें होतें. तें काम हें अभंग आज शेकडो वर्षें करीत आहेत म्हणून लोकांना शिरोधार्य वाटतात. ह. भ. प. सुबंध यांनीं त्या अभंगाची आतां सुलभ मराठी गद्यांत मांडणी करून आपल्यापुढें ठेवल्यानें ते अभंग कळण्याची चांगली सोय झाली आहे. बऱ्याच ठिकाणी पाठशोधन व अर्थाची चिकित्सा करून टीपाहि देण्याचा प्रयत्न केलेला आहे, तोहि अर्थ कळण्यास उपकारक झालेला आहे. श्री. नामदेव महाराज हे आपल्या राष्ट्रीय संस्कृतीचे संस्थापक थोर सन्त आहेत त्यांची ओळख यथार्थपणे करून देण्याचा ह. भ. प. सुबंध यांच्या प्रयत्नाला कोणीहि यशच चिन्तील.

१-९-५७, पुणें. सिध्देश्वरशास्त्री चित्राव.

ह. भ. प. संतवाङ्मयप्रचारक प्रल्हादबोवा सुबंध यांनीं तयार केलेला प्रस्तुतचा हा श्री नामदेवांच्या गाथाचा (चौथा) भाग आहे. ह. भ. प. प्रल्हादबोवा हे अध्यात्मविषयाचे कळकळीचे प्रचारक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा या विषयाचा तीन तपांवरचा व्यासंग आहे व त्यानीं अनुभवामृत, चांगदेवपासष्टी सारख्या ग्रंथावर टीका व वृत्तिप्रभाकरसारख्या ग्रंथांचा अनुवाद प्रसिद्ध करून मराठी जाणणाऱ्या जिज्ञासूंची केलेली सेवा महाराष्ट्रासमोर आहेच. येवढेंच नव्हे तर श्रीनामदेवांचे अभंग सार्थ करून लोकांत त्यांचा प्रसार करावा याबाबतचाहि त्यांचा प्रयत्न महाराष्ट्रासमोर आहे. या कामाकरतां लागणारा त्याग करून ते हे काम करीत आहेत.

अभंगांचा अर्थ शक्य तितका योग्य देतां यावा म्हणून याविषयांतील मुंबई, नागपूर, वर्धा, पुणें इत्यादि ठिकाणीं असणाऱ्या अधिकारी व्यक्तींच्या गांठी घेऊन अभंगांचा अर्थ निश्चित करण्याचा ते प्रयत्न करतात. हे त्यांचे प्रयत्न निःसंशय अभिनंदनीय असेच आहेत.

इतके सांगण्याचा हेतु असा कीं हें वाचल्यानंतर सार्थ गाथ्याचा जो हा भाग ते प्रसिद्ध करीत आहेत त्याबाबत वेगळे लिहण्याचें कारण नाहीं.

या भागांत नामदेव-चरित्र, श्रीराम-महात्म्य, शिवरात्र-महात्म्य, श्रीविठ्ठल-महात्म्य, श्री विठ्ठलाची भक्तवत्सलता, पंढरी माहात्म्य नाममहिमा इत्यादि प्रकरणें आहेत. यांत खुद्द नामदेवांचे चरित्र व श्रीविठ्ठल-महात्म्य हीं दोन प्रकरणें असल्यानें या भागाचें महत्व आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं.

ह.भ.प. प्रल्हादबोवा यांच्याकडूनच नामदेवाचा गाथा, सार्थ काम करण्याचें. हें काम पूर्ण होणें अवश्य आहे. कारण याकामीं श्रम केले आहेत अशीं त्यांच्यासारखी माणसें थोडींच आहेत. पण हल्लीं ज्यापद्धतीनें काम होतें त्यापद्धतीनेंच चालल्यास त्यांच्या वयोवाढीमुळें त्यांनाहि हें काम पुढें चालवणें कठीण होणार आहे. कारण याकामाकरतां करावा लागणारा प्रवास, पैशाची जुळवाजुळव इत्यादि गोष्टी वयोमानाप्रमाणे करणें कठिण जातें. तेव्हां धनिक धार्मिकांनीं त्यांनां सढळहातानें मदत करणें अवश्य आहे. आशा आहे की असे धनिक धार्मिक पुढे येऊन ह. भ. प. प्रल्हाद-बोवांना मदत करतील व त्यांच्याकडून श्रीनामदेवांची ही सेवा लवकर पुरी होऊन महाराष्ट्रास संपूर्ण गाथ्याचा अर्थ वाचण्याची सुसंधि येईल.

आळंदी
अनंत चतुर्दशी
१८७९

शं. वा. दांडेकर

१

अद्वैत वेदान्तालंकार–आचार्य भक्त

—श्री. द. वा. जोग, उपनिषत्तीर्थ S. T. C.

ज्ञानमूर्ति ज्ञानदेवं, साक्षात्प्रेमस्वरूपिणम्
नामदेवं, दयामूर्ति नाथं, वन्दे पुनः पुनः ।
वैराग्यस्य परां मूर्ति देहूक्षेत्रनिवासिनम्
तुकारामम्, तथा चैतद् भगवद्भक्त चतुष्टयम् ॥

सन्तानुगृहीत सन्तसेवक सुबंध यांनीं लिहिलेली श्री नामदेवरायांची सार्थ गाथा ('भाग तिसरा) संपूर्ण वाचली. त्यांत श्री ज्ञानेश्वरांची आदि व नामदेवरायांचें चरित्र वाचून मनाला फार समाधान वाटलें. चवथ्या भागांत नामदेवांचें अवशिष्ट चरित्र, निरनिराळीं महात्म्यें आणि नाममहिमा असा विषय आलेला आहे. श्री ज्ञानेश्वर, श्री एकनाथ, श्री तुकाराम यांच्या वाङमयावर विपुल लेखन झालें आहे. परंतु श्री नामदेवांच्या वाङमयावर जेवढे परिश्रम व्हावयास पाहिजेत तेवढे मुळींच झाले नाहींत–असें दुःखानें म्हणावें लागतें. नामदेवांना दीर्घायुष्य लाभलें व त्यांनीं आयुष्यभर श्री ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाचा म्हणजेच अद्वैतान्तर्गत भक्तीचा प्रचार केला. त्यामुळें तत्कालीन बहुजन समाजाच्या कानीं भक्तीचा आणि अद्वैताचा डांगोरा पडला आणि त्यांनीं तो भागवत धर्म मस्तकावर उचलून धरिला. ही बहुमोल कामगिरी ज्या संतांमुळें होऊं शकली तो संत एका बाजूला पडावा आणि त्याच्या वाङमयाचा अभ्यास करावयास आणि संशोधन करावयास कोणी लाभूं नये हें आश्चर्य नव्हे काय ?

ही दुरवस्था नाहींशी करण्यासाठीं केवळ ईशप्रेरणेनें ह. भ. प. प्रल्हाद बोवा सुबंध हे मोठ्या कळकळीनें आणि हिरीरीनें हें काम करावयास प्रवृत्त झाले आहेत हें पाहून कोणाला आनंद होणार नाहीं. अशा विषयाकडे समाजधुरीणांची, पहाण्याची उपेक्षाबुद्धि, असे ग्रंथ विकत घेणाऱ्या मध्यमवर्गीयांची क्षीण झालेली क्रयशक्ति आणि असे ग्रंथ छापून काढण्यासाठीं लागणाऱ्या धनाची अभाव ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन श्री. सुबंध यांनीं चार भाग काढून व इतरहि संत वाङ्मय छापून काढलें आहे, तें पाहिलें

॥ श्री ॥

ह. भ. प. प्रल्हादबुवा सुबंध यांनी श्री नामदेव महाराजांच्या अभंगांचा सार्थ गाथा छापण्याचें काम अनेक वर्षांपासून चालविलेलें असल्याचें या विषयाच्या भोक्त्यांना माहीत आहे. त्यांच्या गाथ्याच्या नव्या भागातील नाम महिमा व श्रीराम माहात्म्य हीं प्रकरणें ह. भ. प. सुबंधांनी केलेल्या अर्थासह वाचून पाहिलीं. ह भ. प. सुबंध हे केवळ समोर एखादी पूर्वी प्रकाशित केलेली गाथा ठेवून दिसणाऱ्या शब्दांचा अर्थ लावणारे भाविक नसून पोथ्या पुस्तकांतून पाठभेद पहाणें, त्यांची चर्चा करणें व मग एकंदर विषय संदर्भात जो अर्थ योग्य वाटेल तो सांगणें अशा साक्षेपाने ते अर्थ प्रतिपादन करतात, याची ओळख पूर्वीचें त्यांचें काम ज्यांच्या अवलोकनांत आहे, त्यांना नव्यानें करून द्यायला नको. त्याचप्रमाणें यावेळीहि त्यांनीं आपलें काम केलेलें आहे. श्री नामदेवांचे म्हणून जे अभंग सध्यां उपलब्ध आहेत त्यांची भाषा मुळातच बहुधा सोपी असल्यामुळें पाठभेदाच्या चर्चेचा प्रसंग विशेष उद्भवत नाहीं. तरी त्यामध्यें परमार्थासंबंधानें क्वचित् जीं दुर्बोध वाटणारीं स्थळें येतील ती सामान्य वाचकाला अर्थदृष्टचा व्हावी, असा प्रयत्न ह. भ. प. सुबंध करतात. यापेक्षां जास्त कौतुकाची गोष्ट म्हणजे, श्री नामदेवांच्या वाङमयाचा प्रसार ते ज्या श्रद्धेनें नानाविध अडचणींशीं झगडून त्यांनीं चालविला आहे ही होय. वस्तुतः नामदेव महाराज एका विशिष्ट ज्ञातीचे किंवा वारकरी मंडळी सारख्या विशिष्ट वर्गाचे राहिलेले नसून साऱ्या महाराष्ट्राचे आहेत. यासाठीं ह. भ. प. सुबंधाच्या कार्याला अखिल महाराष्ट्रानें साह्य करायला पाहिजे.

न. र. फाटक.

घे रे घे रे नाम्या ! दिलें माझें प्रेम
घोकीं माझें नाम सर्वकाळ ॥ १ ॥ नाम०



सन्तवाङ्मयविशारद ह. भ. प.
प्रल्हाद सीताराम सुबंध, पुणें १.

प्रकाशकाचें हृद्गत

तुझिया सत्तेनें वेदासीं बोलणें । सूर्यासीं चालणे तुझिया बळें ॥१॥
ऐसा तूं समर्थ ब्रम्हाडांचा धनी । वर्म जाणोनीं शरण आलों ॥२॥
मेघांनीं वर्षावें पर्वती बैसावें । वायूनें विचरावें सत्ते तुझे ॥३॥
नामा म्हणे कांहीं न हाले साचार । प्रभू तूं निर्धार पांडुरंग ॥४॥

नामदेवरायांचीं अभंग संख्या अथांग जळ संचया सारखी आहे. त्यांतील अनुपलब्ध भाग बराच आहे. उपलब्ध छापिल गाथेंत व कांहीं हस्त लिखिते पाहून सार्थ अभंगाचे हे चोथे पुष्प प्रकाशित करतांना अत्यानंद होत आहे प्रस्तुतचे पुष्प श्री नामदेव माहाराजांच्या कृपा प्रसादानें पूर्ण झालें त्यांचेच चरणी भक्तिभावानें अर्पण करीत आहे.

संतवाङ्मय हे अक्षर वाङ्मय आहे म्हणूनच त्यांत समरस होतांना जो अविरत आनंद होतो तो हृदयगम्य असाच असतो. अशाप्रकारचें वाङ्मय प्रसिद्ध करतांना सत्प्रवृत अशा विद्वत जनांसी विचार विनिमय करतांना व्यतित होणारा काळ अपूर्व असाच असतो.

महर्षी वाल्मिकमुनी नंतर प्रतिज्ञा पूर्वक वाङ्मय निर्माण कोणी केले असेल तर श्री संत नामदेवराय यांनी होय. श्री पांडुरंगराया जवळ त्यांनी प्रतिज्ञा केली—शतकोटी तुझे करीन अभंग तो प्रतिज्ञा पूर्ण व्हावी म्हणून श्री विठ्ठलानीं त्यांचे जीभेवर अक्षरें कोरली. व श्री पांडुरंगराय हे नामदेवमहाराजांस लेखन सहाय्य करते झाले. इतर संतांच्या मानानी नामदेवरायांना आयुष्यही पुष्कळ लाभले होते. बालवयापासून तो वृद्धावस्थेतील ८० व्या वर्षापर्यंत अव्याहत श्री नामदेवरायांनीं या वाङ्मयाचा प्रचार केला त्यांना दुसरा विषयच नव्हता. विठ्ठलाच्या भक्तित रंगून जावे, व कवित्व करावें हाच त्यांचा छंद पांडुरंगाचे सान्निद्ध त्यांच्याशी होणारा सुख संवाद, प्रसंगीं प्रेमाचे भांडण, संतांचा सहवास, त्यांचे गुण वर्णन, संवाद इत्यादि, विविध विषयावर नामदेवरायानीं अभंग रचना.

केली. शतकोटी अभंग करण्याची प्रतिज्ञा केली होती खरी परंतु प्रतिज्ञा पूर्ति झाली नाही म्हणूनच श्री तुकाराम महाराजांनीं ते कार्य पूर्ण करण्याचा निर्वाळा दिला आहे. एका अभंगांत ते म्हणतात "प्रमाणांची संख्या सांगे शत कोटी । उरले शेवटी लावी तुका "

नामदेवरायाची अभंग संख्या

त्यांचे समकालीन कांहीं संतांनीं व त्यांच्या मुलांनी व नंतर झालेल्या संतांनी त्यांच्या अभंग संख्ये बद्दल पुढील वचनें आहेत.

"साठीं लक्ष चौऱ्याशीकोटी । त्यांतुन एक कवडी न सोडी मी ॥ ३ ॥ विठा ॥

" साठीं लक्ष चौऱ्याशीकोटी । बापाचेही जोडी देई देवा ॥१॥ गोंदा॥

'जन्मतां पांडुरंगे जिव्हेवरी लिहीले । शत कोटी अभंग प्रमाण कवित्व रचिले ॥ परसा ॥ आज छापिल गाथ्यावरून पाहिले असतां अभंग संख्या खालील प्रमाणे मिळतात. जोग महाराज गाथा २५८८

श्री. साखरे महाराज गाथा.	२३७३	श्री. गोंधळेकर	१५००
श्री. तुकाराम तात्या	४५००	श्री. रानडे	५००
श्री. विनोबाजी भावे	२००	श्री. जोशी (हिंदी)	७१

यावरून उपलब्ध अभंग संख्या किती तोकडी आहे हे दिसून येईल. यावरून नामदेवरायाच्या वाङ्मयाविषयीं वारकरी संप्रदायी आणि तद अनुयायी जनतेची औदासीनता प्रतित होत नाही काय ?

भरत खंडांत ठायी ठायीं या संताची हस्त लिखित बाडे मिळूं शकली आहेत. थेट पंजाबपर्यंत त्यांनीं आपल्या पंथाचा जो फैलाव केलेला दिसून येतो तेथेंही कांहीं हस्त लिखिते असण्याचा संभव आहे. शिखांच्या पवित्र ग्रंथात (ग्रंथसाहेब) या संत श्रेष्ठाचे कांहीं पदे संग्रहित केलेली दिसून येतात. जी काळाच्या उदरांत गडप झाली, त्यांना प्रकाशांत आणणें व त्यांची सुसंगत मांडणी करणें हे एकट्याचें काम नाहीं, त्याकरिता संशोधक मंडळ व निःस्वार्थ बुद्धीने काम करणारे व निष्ठावंत वारकरी हवे आहेत. ग्रंथवाङ्मय ही

राष्ट्राची खरी संपत्ति होय. राष्ट्राचे मोठेंपण त्यावर मापले जाते. दुर्दैवानें आज तरी जनतेचे अगर सरकारचे नामदेवरायांच्या कार्याकडे लक्ष गेलेले दिसत नाही. कोणी सांगावे भावी कालांत एकादे असे मंडळ स्थापन होऊन कार्य करीलही, परंतु तोंपर्यंत स्वस्थ बसणें योग्य नाहीं म्हणून आम्ही हे कार्य हातीं घेतले आहे. संशोधनात्मक दृष्टी ठेऊ शक्य तो हस्तलिखिते वगैरे पाहून आजपर्यंत १ ते ३ भाग प्रकाशित झाले आहेत व आतां हा चवथा भाग प्रकाशित होत आहे.

नामदेवरायांची अभंग वाणी अबाल सुबोध खरी परंतु त्याचे खरें हृद्गत स्पष्ट होण्याकरितां त्याच्याशीं तादात्म्य पावणें, त्याच्याशीं समरस होणें अगत्याचे होय हे कोणीही सुज्ञ वाचक मान्य करतील. त्यामध्यें प्रथम प्रवेश होण्याकरिता अभंगाचा भावार्थ स्पष्ट व्हावा लागतो त्यामध्येंही अधिकारपरत्वे भिन्न भिन्न दृष्टीकोन दिसून येतात. कांही अभंगा संबंधी निरनिराळया विद्वानाचा कसा निरनिराळा दृष्टीकोन आहे ते कळण्याकरितां परिशिष्टांत संग्रह केले आहे.

साखरेचा पाक झाला असतां त्यांतून बहुविध प्रकाराचें चित्र निर्माण करितां येतात. तद्वत ज्यांची प्रज्ञा जाग्रत झाली आहे त्यांच्याकडून एकाद्या वाक्याचा अथवा शब्दाचा अपूर्व अर्थ निर्माण होतो खरा तथापि आचार, उच्चार, विचार या त्रिवेणी संगमाच्या जलानें सुस्नात होणारे महात्मे दुर्लभ होत आणि म्हणून 'नामा म्हणे श्रेष्ट ज्ञानदेवो ॥ एक तरि ओवी अनुभवावी' या अभंग वाणी प्रमाणें संत नामदेवरायांच्या एकाद्या तरी अभंगवाणीची स्वप्रतिती होणें व क्रिया करणें अगत्य नव्हें काय ?

माझ्या या कार्याला ज्या माझ्या सुमित्रांनी वैचारिक, आर्थिक आदि मदत केली त्यांचे आभार मानणें मी माझे कर्तव्य समजतो.

(१) श्रीमद् शंकराचार्य यांचा प्रेमळ शुभाशिर्वाद या ग्रंथाला संग्रह करण्यास मिळाला हे माझे भाग्य समजतो व पुढील संत वाङ्मय सेवा सुलभपणें घडेल असा आत्मविश्वास वाटतो. श्री नी दिलेल्या आशिर्वादाबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहे.

आपला अमोलीक वेळ खर्च करून श्री. म. म. पोद्दार M. A. यांनीं लिहून दिलेल्या प्रस्तावनेविषयीं मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

विद्वद्वर्य, श्री म. म. द. वा. पोद्दार यांची चिकित्सात्मक व संशोधन पूर्वक दिलेली प्रस्तावना ही लेखक व वाचक वर्गांना जणू काय दीप स्तंभच होय. शुद्ध संहिता कशी व्हावी यांचे केलेले मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त व उद्बोधक असे आहे. नदीचा प्रवाह वहात असतां मध्यंतरी असलेल्या खडयांना पूर्ण करून आपल्या ध्येयाकडे जात असते व त्या बंधाऱ्याचे पाणी इतस्तथा वहात असतांना स्थापत्य शास्त्रज्ञ (Engineer) हा त्यास योग्य मार्गी करितो. तद्वत या ग्रंथाचें परिक्षण करित असतां अपूर्णतेची पूर्तता व अशुद्धतेचे शुद्धीकरण किती हळूवारपणें केले हे त्यांची प्रस्तावना पाहिली असता लक्षांत येईल.

पाठभेद झाला असतां अर्थामध्यें कसा घोटाळा होतो [illegible] न री पाहुनि उचले' या ठिकाणीं 'पर्णाळी पाहोनि उचले' अगा [illegible] पाठ म. म. दत्तोपंत पोद्दार यांनीं दिग्दर्शित केला त्याचप्रमाणे 'ना[illegible] रे घेतले या ठिकाणी 'नामयानें वाघुर घातले । विठ्ठलासी सहकुटुंब [illegible] गा पाठ ह. भ. प. चतुर्मासे महाराजांच्या मठांतील हस्तलि[illegible] त आढळला यावरून शुद्ध संहिता होणें हे किती जिकीरीचें व चि[illegible] काम आहे याची कल्पना येईल.

घेरे घेरे नाम्या दिले माझे प्रेम । घोको माझे प्रेम सर्व [illegible] १ ॥ या अभंगाकडे अनुसंधान केले असतां केशव हे वर्म [illegible] ॥ ॥ —$\frac{2}{1}$ ॥ ना. म. ॥

केशवरायानें हे वर्म सांगितलें असा अर्थबोध होऊं शकतो. [illegible] मध्यें समन्वयता दर्शक कुशलता साधल्यास ग्रंथाला उजाळा येतो. त्या करितां संतवाङ्मय चर्चा मंडळ होणे अगत्य नव्हे काय ?

श्री प. पु. न्यायरत्न धुं. गो. विनोद M. A. यांच्या विद्वत्तेला लुब्ध होऊन बहुतेक ग्रंथकार त्यांच्या लेखाकरितां आतूर असतात. त्यांनी या ग्रंथांत संग्रह करण्याविषयीं दिलेल्या आशीर्वाद लेखाविषयीं त्यांचा मी अत्यंत आभारी आहे.

तसेच संत वाङमयाचें मार्गदर्शक आणि माझे सुहृद सन्मित्र लोकनायक माजी राजपाल बिहार श्री. मा. श्री. अणे, श्री. म. म. सिद्धेश्वर शास्त्री चित्राव, श्री. ह. भ. प. शं. वा दांडेकर M. A., वेदान्त अलंकार आचार्यभक्त श्री द. वा. जोग उपनिषदतिर्थ S. T. E, श्री. र. ह. भाळूणकर B. A. LL. B., श्री. हेरंबराज बाळशास्त्री शर्मा केसकर (संपादक अंकुश मासिक), प्रा. न. र. फाटक M. A. यांनीं दिलेल्या प्रेमळ अभिप्रायाबद्दल त्यांचा अत्यंत आभारी आहे.

तसेच ज्यांनीं या ग्रंथांतील कठीण स्थळाबद्दल जे योग्य मार्गदर्शन केले. श्री [illegible]. ग जोशी, श्री. य. ग. फफे, श्री. म. म. द. वा. पोद्दार, ह. भ. प. [illegible] [illegible]. दांडेकर M. A वे. शा. सं. पंढरपुरेशास्त्री यांचाहि अत्यंत आ[illegible] [illegible] लेखन सहाय्यक तळेकर शास्त्री, श्री. भा. अ. काळे, ह. भ. [illegible] केसरी, श्री ह. द. नगरकर यांचा व अन्य अनुल्लिखीत [illegible] अत्यंत आभारी आहे.

[illegible] ग्रंथाचे नऊ फर्मे श्री. न. वि. सरदेशपांडे पद्मा प्रेस, पुणें २ मध्यें मुद्रण [illegible] अवशिष्ट मुद्रण श्री. गो. भा. जोशी भास्कर प्रिंटींग प्रेस वर्धा येथें [illegible] संतवाङ्मयास दोन्हीं मुद्रकांनीं सवलतीच्या भावानें व आपुलकीने छापून दिले त्याबद्दल दोघा मुद्रकांचा आभारी आहे.

[illegible] ज्या बन्धु भगिनींनी या प्रकाशन कार्यास साहाय्यता केली त्यांचा अत्यंत आभारी असून नम्रतापूर्वक त्यांच्या नामाचा निर्देष या ग्रंथांत संग्रह करण्यांत अत्यंत संतोष वाटतो.

सहाय्यकांची नांवे

श्री. सौ. राधाबाई माधवराव भागवत अकोला
श्री. सौ. नलीनिबाई नारायणराव मुळे मुंबई
श्री. सौ. लक्ष्मीबाई शंकरराव खांडके ,,
श्रीमती सखुबाई, उर्फ मोठ्यामाई नरहर खांडके मुंबई
श्रीमती गंगाबाई उर्फ जीजो कोंडाजीशेट खांडके मुंबई
श्रीमती पार्वतीबाई जयराम काळे सांगळूद
श्रीमती कृष्णाबाई श्रीधर भांबुरे पुणें १
श्रीमती भागिर्थीबाई नारायणराव हेंद्रे पुणें
श्रीमती लक्ष्मीबाई बाबुराव हिरवे पुणें
श्रीमती पार्वतीबाई शंकरराव मेघे वर्धा
श्रीमती सरस्वतीबाई गणपतराव भोयर
श्रीमती गीताबाई भगवंतराव राऊत जामनेर
श्रीमती जीजीबाई गोंविदराव सुखदाणे नागपूर
श्री. सौ. भागिरथीबाई रामचंद्र सातपुते मुंबई
श्रीमती लक्ष्मीबाई जाधव कोल्हापूर
श्री. दत्ताजी उर्फ दादासा० रामजी धनवटे, नागपूर

श्री. बिदीचंदजी शेट पोद्दार नागपूर
श्री. लक्ष्मीनारायण जैस्वाल ,,
श्री. डॉ. इंदुभूषण भिंगारे ,,
श्री. मा. रा. राऊत ,,
श्री. दत्तात्रय उर्फ बाबासाहेब नरहरशेट खांडके यांच्या हस्ते मुंबई
अध्यक्ष श्रीसंत नामदेवरायाचे ग्रंथ संशोधन कमिटी
श्री. जादरमलजी धोलिया ,,
श्री. द्वारकानाथ मुकुंदशेट खांडके ,,
श्री. रामचंद्र मुकुंदशेट बोंगाळे दादर
श्री. नारायणराव गोराजीराव घायफुले, दादर
श्री. मधुसुदन व चिंतामण निळकंठराव सुबंध (वै. निळकंठराव सुबंध यांच्या स्मृति निमित्त) दादर
श्री. नारायणराव कोंडोजीराव गुजर ,,
श्री. गणपतराव वामनराव खराटे मुंबई
श्री. गट्टूलाल चमडिया, मंबई
श्री. गजानन म. बोरकर दादर
श्री. मनोहर कोंडाजीशेट खांडके मुंबई
श्री. श्रीराम मोहनलालजी शेट वर्धा
श्री. हिरालाल रामलालजी शेट ,,
श्री. द्वारकादास सराफ ,,
श्री. उमाकान्त दत्तात्रय खांडके मुंबई
श्री. सुकदेव नारायणराव गणेश पाटील शेगांव

श्री. श्यामराव उर्फ आण्णाजी
पाटील, नीगांव

श्री. विनायकराव महादेवराव समाने
निबगांव

श्री. कृष्णाजी बळवंतशेट पेटकर कोल्हापूर

श्री. मोरेश्वर पांडुरंग शेट हनुमंते चौक

श्री. गुलाबराव मारोती काळे सांगळूद

श्री. पुणाजी सदाशीव काळे पाटील ,,

श्री. हरिभाऊ गोविंदराव लांडे ,,

श्री. मन्नालाल जीवनजी शेट ,,

श्री. गणपतराव आकारामजी पाटील
कवठा बहादूर

श्री. बन्डुनाना दिगंम्बर अकोला

श्री. रामराव गायकवाड पाटील
बाळापूर

श्री. किसन मनोहर फुटाणे वासिम

श्री. वसंत शिवाजी सदावर्ते येवले

श्री. सखाराम माळी ,,

श्री. सुदाम दामोधरशेट माळे ,,

श्री. वामनराव नारायणराव
सारूळकर पुणें

श्री. बाळकृष्ण नारायणराव केदारी पुणे

श्री. गणपतराव नारायणराव केदारी ,,

श्री. श्रीपाद कृष्ण बिलवलकर ,,

श्री. न्या. धुं. गो, विनोद ,,

श्री. माधवराव श्रीपति निखळ ,,

श्री. रतिकांत रावोबा भावकर ,,

श्री. रंगनाथ हरि भाळूणकर ,,

श्री. दामोदरपंत गणेश नगरकर ,,

श्री. सदाशीव शंकरराव लचके नगर

श्री. नामदेवराव ग्यानुजी पाटूर ,,

श्री. दत्तात्रय रामश्चंद्र लचके
श्रीरामपूर

श्री अनंत हरि भांबारे ,,

ह.भ.प. यादवराव थोडगे देवळी

,, श्यामा सावजी नारायण
सावजी भावसार देवळी

ह. भ. प. श्री. कृष्णदास लोहिया पंढरपूर

ह. भ. प. नारायणराव गोविंद पाटील
(आजीबाईंच्या स्मरणार्थ) नांदुरा

वै. शा. सं. ज्योतिषाचार्य श्री गोविंद जनार्धन बोरकर उर्फ गजानन महाराज बोरकर यांचे

जीवन चरित्र

सानंदं सदनं सुताश्च सुधियः कान्ता मृदुभाषिणी
सन्मित्रं सधनं स्व योषिति रतिश्चाज्ञा परा सेवका
आतिथ्यं शिव पूजनं प्रतिदिनं मिष्टान्न पानं गृहे
साधो संग मुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥

"माझ्या जन्मटिपणावरून लिहिण्यांत आलेला माझ्या जीवन-वृत्तांताचा तपशील इतका आश्चर्यचकित करून सोडण्याइतका अचूक आहे की तो लिहिणाऱ्या होराभूषण शास्त्रज्ञाचें कोणत्या शब्दांनी कौतुक करावें, हेंच मला समजत नाही" असे उद्गार एका इंग्रज गृहस्थानें मरहूम महालक्ष्मीवाला यांना पाठविलेल्या आपल्या पत्रांत काढले आहेत. ब्रिटिश राजवटीचा तो अखेरचा काळ होता. ह्यावेळीं श्री. महालक्ष्मीवाला हे बॉंबे इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रॅम्वे कंपनीच्या 'जनरल सेक्रेटरी' पदावर होते.

सुविख्यात ज्योतिषी व हस्तसामुद्रिक श्री. गोविंद जनार्दन बोरकर तथा श्री गजानन महाराज यांनींच जन्मटिपणाच्या आधारें सदरील इंग्रज गृहस्थांचा जीवनवृत्तांत लिहून पाठविला होता. हे इंग्रज गृहस्थ भारतांत एक्झीक्यूटिव्ह इंजिनीयर या हुद्यावरून सेवानिवृत्त झाल्यानंतर लंडनला गेल्यावर त्यांनी श्री. महालक्ष्मीवाला यांना पाठविलेल्या पत्रांतील उताराच या मजकुराच्या प्रारंभीं अनुवादित रूपांत उदधृत केला आहे.

मरहूम श्री. महालक्ष्मीवाला यांनी या इंग्रज गृहस्थाप्रमाणेंच अनेक यूरोपियन व इंग्रज गृहस्थांची जन्मटिपणें श्री. गजानन महाराजांकडे दिली आणि त्या सर्वांचे जीवनवृत्तांत त्या त्या टिपणांच्या आधारें लिहून पाठविल्यावर त्या सर्वांनीच श्री. गजानन महाराजांच्या या शास्त्रावरील

5172 dt 20.2.60

श्री ज्योतिशात्रार्य गजानन महाराज बोरकर (दादर)



सानंदं सदनं सुताश्च सुधियः कान्ता मृदु भाषिणी ।
सन्मित्रं सधनं स्व योषिनि रतिश्चाज्ञा परा सेवका ।
आतिथ्यं शिवपूजने प्रतिदिनं मिष्टान्न पानं गृहे ।
साधो संगमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥

अचूक प्रभुत्वाबद्दल अशाच प्रकारचे गौरवोद्गार काढल्याच्या नोंदी मरहूम महालक्ष्मीवाला यांना पाठविलेल्या पत्रांतून आहेत. केवळ ज्योतिषशास्त्रज्ञ म्हणूनच नव्हे तर, श्री महालक्ष्मीवाला यांनी विशेष परिचय करून दिल्या-नंतर 'एक भूतदयाशील सत्प्रवृत्त उदार दाता' म्हणूनहि या सर्व परदेशीय गृहस्थांनी श्री गजानन महाराजांना धन्यवाद दिले आहेत.

केवळ पाश्चिमात्य व पौर्वात्य परदेशीय थोर गृहस्थांनींच नव्हे तर मुंबई शहरांतील आणि अखिल भारतांतील थोर थोर नागरिकांनीहि श्री गजानन महाराजांच्या या ज्योतिषविषयक अचूक शास्त्रज्ञतेचा आणि सत्प्रवृत्त साधुवृत्तीचा वेळोवेळीं गौरव केला आहे. आमच्या वाचकांकरितां अशा थोर पुरुषाचा जीवन वृत्तांत सारांश रूपानें पुढें देत आहों.

जन्म बालपण व शिक्षण

श्री. गोविंद जनार्दन बोरकर–आतां श्री गजानन महाराज यांचा जन्म रत्नागिरी नजीक चिंचखरी येथें १० मार्च १९०३ रोजीं झाला. लहानपणा-पासूनच महाराष्ट्रांतील थोर थोर संतांच्या कविता व पदें मुखोद्गत करून त्यांतील भक्तिरसानें भरलेल्या अर्थाचें चिंतन मनन करण्याचा हव्यास श्री-गजानन महाराजांना होता. तारुण्यांत संस्कृत सुभाषितेंहि पाठ करून त्यांच्याहि अर्थाचें चिंतन मनन त्यांनी चालू ठेविलें. आपल्या व्यवसायांत पदार्पण केल्यावर श्री गजानन महाराजांनी गुजराथी, हिंदी आणि इंग्रजींचेंहि ज्ञान प्रयत्नपूर्वक संपादन केलें. या तिन्हीहि भाषांचा त्यांना आपल्या व्यव-सायांत फार उपयोग झाला व होत आहे.

दुय्यम शिक्षणाचे क्षेत्रांत आल्यावर श्री गजानन महाराजांनीं मुंबईच्या 'स्कूल ऑफ आर्टस' मध्यें नांव दाखल करून, ड्रॉईंग (चित्रकला), कार्व्हिंग (कोरीव काम) आणि पेंटिंग (रंग चित्रांचें काम) इत्यादि कलांतूनहि बरेंच प्राविण्य संपादन केलें. मात्र अगदीं बालपणापासूनच त्यांच्या मनाची आवड व ओढ ज्योतिष विद्येकडेच होती. 'लहान मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात' या म्हणी प्रमाणें त्यांनीं बालवयांतच गमतीनें सांगितलेल्या भवि-ष्याचे मडताळे अचूक पटल्यामुळें, अनेक वृद्ध स्त्रीपुरुष आश्चर्यचकित

झाल्याचे उल्लेख त्यांच्या विस्तृत जीवन चरित्रात आढळतात ! त्यांनी ज्योतिष शास्त्राबरोबरच मंत्र विद्या आणि आयुर्वेदीय औषधींचाहि अभ्यास केला आणि अनेक गरीब गुरीबांना ते विनामूल्य या ज्ञानाचा व औषधींचा फायदा देऊन बरे करीत असतात.

श्रीदत्तमहाराजांचे निस्सीम भक्त

श्रीगजानन महाराज हे श्रीदत्तमहाराजांचे निष्ठावंत उपासक व निस्सीम भक्त आहेत. **वयाच्या १४ व्या वर्षीच ते स्वानंदवासी श्री सद्गुरुसमर्थ पदमनाभ** स्वामींचें शिष्यत्व पत्करुन 'मार्गस्थ' झाले. **श्री समर्थपदमनाभ स्वामी हे नाशीकच्या सुप्रसिद्ध देव-मामलेदार या सत्पुरुषांचे शिष्य होत.** ठाणे जिल्ह्यांतील असंख्य गिरणी कामगार आणि आगरी शेतकरी, त्याच प्रमाणें मुंबईच्या गिरणगांव विभागांतील हजारों गिरणी कामगार यांना मद्यादि दुष्ट व्यसनांपासून परावृत्त करण्याचें आद्य श्रेय श्रीसमर्थपदमनाभ स्वामींजींनी मिळविलें. गरीब कामगार व शेतकरी यांच्या सुखदु:खांशीं जिव्हाळ्याच्या व्यवहार पद्धतीने समरस होऊनच त्यांनीं या श्रमजीवी लोकांना मद्यादि व्यसनांपासून दूर व्हाण्याचें महत्व पटवून दिलें आणि अल्पावधींतच अशा ३६ हजारांवर अनुयायांना व्यसन निवृत्त करून सत्कार्याच्या आणि सद्भक्तीच्या भजनीं लाविलें. हे सर्व ३६ हजारांवरील लोक आज चांगल्या दर्जाचीं जीवनें उपभोगीत असून निर्मळ वृत्तीनें राहून प्रगतीच्या मार्गावर आहेत. '**श्रीपदमनाभ सांप्रदायी**' म्हणवून घेण्यात त्याना आज भूषण वाटत आहे ! -श्रीपदमनाभ सांप्रदायाचे अनुयायी आज मुंबई ते कऱ्हाड, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, खानदेश, जळगांव, भुसावळ, नागपूर, जबलपूर आणि कोकणरत्नागिरी ते थेट गोंव्या पर्यंत पसरले आहेत. कराचींतहि श्रीपद्मनाभ सांप्रदायाचें कांहीं लोक गेले होते ते भारत खंडित होऊन पाकिस्थान निर्माण झाल्यावर परत:भारतांत आले आहेत.

श्रीपद्मनाभ सांप्रदायाचे प्रमुख आणि मुख्य विश्वस्त म्हणून या सांप्रदायाचे हजारों अनुयायी आज श्रीगजानन महाराजांविषयीं मोठा आदर व विश्वास व्यक्त करतांना दिसतात. श्रीसमर्थ पद्मनाभ स्वामींच्या

व्यसनमुक्त पवित्र आणि भक्ति श्रद्धायुक्त जीवनावर्णाची दीपज्योत स्वीका-हरणानें श्रीगजानन महाराजांनीं श्रीपदमनाम सांप्रदायिकां करितां प्रदीप्त असल्यामुळें या सांप्रदायाकडे सांप्रदाया बाहेरीलहि अनेक सुविचारी सज्जनांचें लक्ष्य आदरपूर्वक खेंचलें जात आहे. **श्रीसमर्थ पद्मनाभ स्वामी** हे मद्यपानादि दुष्ट व्यसनापासून श्रीमजीवी वर्गाला मुक्त करण्याचें थोर कार्य पद्धतशीर करणारे आद्य पुरुष तर होतेच; पण महात्मा गांधींनीं त्या नंतर पुरस्कारिलेल्या 'अंतःकरणांत पालट घडवून' आणण्याच्या भूतदयाशील विधायक कार्यांचेहि ते आद्यप्रवर्तक होते. मद्यपान बंदीच्या कायद्याची मदत नसतांहि त्यांनी मद्यपानादि दुष्ट व्यसनांपासून हजारों श्रमजीवीना मुक्त करण्याचें कार्य एकोणिसाव्या शतकाचे अखेरीस व विसाव्या शतकाच्या प्रारंभी करून ठेवून आजच्या स्वातंत्र्य-स्वराज्य सरकारांपुढे मद्यपान बंदीचा एक उत्कृष्ट असा कित्ताच ठेवला आहे. पण या आदर्श कित्याकडे आजच्या आमच्या मद्यपान बंदीच्या कायद्यांचीं कफ चढून भांबावलेल्या सरकाराचें लक्ष्य आहे कोठें ?

ऐन तारुण्यांतच व्यवसायास प्रारंभ व कीर्ति

विशिष्ट परिस्थितीच्या अडचणींमुळें श्री० गजानन महाराजांना ऐन तारुण्यांतच--वयाच्या १५-१६ व्या वर्षीं आपल्या ज्योतिष व्यवसायाला सुरवात करावी लागली. पण या शास्त्राकडील बालवयापासूनचा विशेष कल, अंकूक ज्ञान व व्यवहार चतुर निरीक्षण, त्याचप्रमाणें सखोल आत्म-विश्वास यांच्या जोर वर ते अल्प मुदतींत यशस्वी ठरून त्यांची कीर्ति हां हां म्हणता सर्वत्र पसरत चालली. आतां 'मुंबईशहरापुरतीच त्यांच्या या कीर्तिची मर्यादा राहिली नसून ती आतां अति पूर्वेकडील देशांत आणि अति पश्चिमेकडील देशांपर्यंतहि पोचल्याचे दाखले आहेत. चीन--जेपान, इंग्लंड--अमेरिका इत्यादि देशांतील लोकहि त्यांना ज्योतिष विषयक सल्ला--मसलत विचारीत असतात. आज 'एक अव्वल दर्जाचे ज्योतिष शास्त्रज्ञ' म्हणून श्री गजानन महाराज यांना सर्वत्र मान असलेला दिसतो.

'होरा रत्न' पदवी

अमरावतीच्या विदर्भ मध्य प्रांतीय ज्यौतिर्विद मंडळानें १९३९ च्या जानेवारी-फेब्रुवारींत श्री गजानन महाराजांना 'होरा रत्न' अशी पदवी

दिली. पण श्री गजानन महाराजांच्या ज्योतिष कथनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेले लोक म्हणतात कीं "वास्तविक या पदवीच्या किती तरी पुढे त्यांच्या या शास्त्रावरील प्रभुत्वाची मजल गेलेली आहे. या पदवीनें श्री गजानन महाराजांचा मान वाढला असें म्हणण्यापेक्षां ज्यांनीं ती दिली त्यांनीं मात्र स्वतःचा मान वाढवून घेतला आहे" !

श्री गजानन महाराजांचे व्यक्तिमत्व

अत्यंत निगर्वी वृत्ति, साधी राहणी, स्वभावाचा गोडवा आणि दयाशील वृत्ति हे श्री गजानन महाराजांचे अंगीं सहज गुण आहेत. कळकळीचें प्रामाणिक अंतःकरण, वचनाचा पक्कपणा औदार्य, गोडव्या वागणीची आकर्षक चालचलणूक आणि या सर्व सद्गुण मालिकेचा मेरुमणि म्हणजे श्री दत्तमहाराजांवरील नितांत श्रद्धा-भक्ति यामुळें श्री गजानन महाराजांचा मेंदू व हृदय (Head and Heart) सुशोभित झालेलीं आहेत. इतक्या असंख्य लोकांना ते आवडतात आणि असंख्य लोक त्यांचा गुणगौरव करतात याचें वर्म त्यांच्या या विशिष्ट व्यक्तिमत्वांतच आहे.

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें ।
उदास विचारें वेंच करी ॥ तुका० ॥

आपल्या व्यवसायांत श्री गजानन महाराजांना खूप पैसा मिळाला. पण गरजू व दुःखित यांचीं दुःखें दूर करण्यासाठींच त्यांनीं आपल्या या मिळकतीचा बहुतांशीं व्यय केल्याचे दाखले अद्यावत् कालपर्यंत आहेत. त्यांच्याशीं परिचय झालेल्या प्रत्येक व्यक्तिच्या मनावर त्यांच्या या उदार वर्तनाचा ठसा उमटल्यावांचून रहात नाहीं.

चिंचखरींत श्री दत्तमंदिराची स्थापना

१९३३ सालीं श्री गजानन महाराजांनी रत्नागिरी नजीक आपल्या चिंचखरी या जन्मस्थानीं सुंदर व प्रशस्त अशा श्री दत्तमंदिराची उभारणी केली. या कामीं त्यांनीं सत्तर हजारांवर रुपये खर्च केले आणि ते त्यांना स्वतःच्या व्यवसायांतच मिळाले. त्याकरितां त्यांनी कोणाकडेहि याचना

केली नाही की दान घेतलें नाही ! १९४७ सालीं या मंदिराच्या अति प्रशस्त अशा आवाराकरितां २१ हजार रु. खर्चून त्यांनी (महाद्वार) बांधविलें आणि तेहि अशा 'अयाचित' पद्धतीनें. या मंदिराचा व महाद्वाराचा उदघाटन समारंभ अत्यंत थाटानें औंध संस्थानचे स्वानंदवासी राजेसाहेब भवानराव श्रीनिवास उर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांचे हस्ते पार पाडला.

ज्ञान व शिक्षण यांचे चहाते

ज्ञान, विद्या आणि सुशिक्षणाचें महत्व याविषयीं श्री गजानन महाराजांच्या अंतःकरणांत नितांत प्रेम व आदर आहे. आपल्या चिचखरी या जन्मगांवीं श्री गजानन महाराजांनीं एक शाळेची इमारत बांधून दिली असून रस्ते व विहिरी बांधण्यासाठीं उदार हस्ते द्रव्याची मदत केली आहे.

आपल्या श्री दत्तमंदिरानजीकच एका टेकडीवर श्री गजानन महाराजानी एक प्रशस्त पांथस्थगृह रामकृष्ण निवास अगदीं अद्यावत् पद्धतीचें आणि सुखसोयींनी युक्त असें बांधलें आहे.

'सर्वाभूतीं भगवद्भाव । हीच उपदेशाचि ठेव'
'भूताचि दया हे भांडवल संता
आपपर ममता नाहीं चित्ती ॥'

ज्ञानदान व शिक्षण या बाबतींत श्री गजानन महाराज पंक्तिप्रपंच व भेदभाव मानीत नाहींत. रत्नागिरी नजीकच्या नवखोल गांवीं मुसलमान मुलांकरितां एक उर्दू शाळा बांधण्यासाठींहि श्री गजानन महाराजांनी उदार रकमेची मोठी देणगी दिली आहे.

श्री पद्मनाभस्वामी सांप्रदायाच्यां 'बोर्ड ऑफ ट्रस्टीज' चे (विश्वस्त मंडळाचे) श्री गजानन महाराज हे आज कित्येक वर्षे अध्यक्ष निवडून येत असून करीखेड येथीलें श्री पद्मनाभ दत्तमंदिर आणि पालघर नजीक टेंभवडे येथील श्री पद्मनाभ समाधि मंदिर यांचेहि ते अध्यक्ष व मुख्य पंच (सरपंच) आहेत. वर उल्लेख केल्याप्रमाणें मुंबई राज्यांतील अखिल महाराष्ट्रांत व गोवा अपूत, त्याचप्रमाणें मध्यप्रदेश व गुजराथ या सर्व

प्रदेशांत विखुरलेल्या श्री पद्मनाभ सांप्रदायाचे श्री गजानन महाराज हे प्रमुख आहेत. करीरोड येथील श्री दत्तमंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे बाबतींत श्री गजानन महाराजांनी त्यागपूर्वक धडाडीनें पुढाकार घेऊन त्या मंदिराच्या जीर्णोद्धाराचें काम पुरें केलें. स्वानंदवासी श्री पद्मनाभ महाराजांनीच मंदिर प्रथम बांधलें. या जीर्णोद्धारित मंदिराचा उद्‌घाटन समारंभ १९४३ सालीं श्रीमंत राजेसाहेब औंध यांचेच हस्तें झाला.

श्री चिंचखरी क्षेत्रच ठरलें

श्री गजानन महाराजांच्या चिंचखरी या जन्मस्थानाला आतां असंख्य लोकांच्या भक्ति-श्रद्धामुळें क्षेत्रस्थानाची थोरवी प्राप्त झाली आहे. वर्षांतून दोनदां या क्षेत्रांत हजारों भक्तगणांचे मेळावे जमतात. मार्गशीर्ष महिन्यांत श्री दत्त जन्माचा आणि श्रावण महिन्यांत दत्तनाम सप्ताहाचा उत्सव, असे दोन उत्सव या क्षेत्रांत मोठ्या थाटामाटानें साजरे होत असतात. श्री दत्त मंदिरांनजीकच्या 'श्री रामकृष्ण निवासांत' बऱ्याच पाहुण्यांची सोय लागते.

ता. ५ डिसेंबर १९४१ रोजीं त्यावेळेचे रत्नागिरीचे डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज श्री. डी. आर. प्रधान आय सी. एस. यांच्या हस्ते 'श्री रामकृष्ण निवास' पांथस्थगृहाचा थाटानें उद्‌घाटन समारंभ झाला. गरीब विद्यार्थ्यांना त्याच्या विद्यार्जनाचे बाबतींत आणि जीवनांत आपत्ती भोगणाऱ्या विद्वान् लोकांना मदत करण्याचा श्री गजानन महाराजांचा स्वभावधर्मच बनलेला आहे.

अनुकूल स्वभाव धर्माच्या गृहिणी व पुत्र

श्रीचंद्रशेखर स्वामी महाराजांच्या कन्या सौ. सरस्वतीबाई यांच्याशीं १९२२ सालीं श्रीगजानन महाराजांचा विवाह झाला. चि. रामकृष्ण हे श्रीगजानन महाराजांचे एकुलते एक चिरंजीव आतां एस. एस. सी. परीक्षेत उत्तीर्ण होऊन कॉलेजांत पहिल्या वर्षाचें विश्व-विद्यालयानें उच्च शिक्षण घेत आहेत. 'आदर्श गृहस्थाश्रमी' पतीच्या 'आदर्श गृहिणी' ह्या नाम सौ. सरस्वतीबाईनीं श्रीगजानन महाराजांना अत्यंत अनुकूलतेनें

आपलें गृहिणीपद चालवून मिळविला आहे कु. रामकृष्णहि 'एका थोर पित्याचा थोर पुत्र' अशी मनानें, चारित्र्यानें आणि अभ्यासू वृत्तीनें तयारी करीत आहे.

पंढरपूरच्या किरते भंडारी धर्मशाळेला श्रीगजानन महाराजांनीं एक मोठी उदार देणगी दिलेली असून त्या संस्थेचेहि ते मॅनेजिंग ट्रस्टी आहेत.

उल्लेखनीय समारंभ

१९४३ सालीं श्रीगजानन महाराजांच्या ज्योतिष व्यवसायाचा रौप्य-महोत्सव झाला आणि १९४९ सालीं त्यानींच जमवून आणलेला श्रीपदमनाभ स्वामींचा शत सांवत्सरिक जन्ममहोत्सव श्रीमंत स्वानंदवासी राजेसाहेब औंध यांच्या अध्यक्षते खालींच साजरा झाला. याच महोत्सव प्रसंगीं श्रीगजानन महाराजांच्याच प्रेरणे वरून आणि सूचनांवरून श्री. का. म ताम्हनकर बी. ए यांनीं लिहिलेल्या स्वानंदवासी श्रीसमर्थ पदमनाभ-स्वामींच्या चरित्र ग्रंथाचा प्रकाशन समारंभहि श्रीमंत राजेसाहेबांच्या हस्तेंच झाला.

श्रीगजानन महाराजांचें चरित्र वाङ्मय

छत्रपती श्रीशिवाजी महाराजांचे सुप्रसिद्ध चरित्रकार कै. के. ए. केळुस्कर गुरुजी यानी श्रीगजानन महाराजांचें चरित्र मराठींत लिहून प्रकाशित केलें असून कै. प्रो. तल्यारखान यांनी इंग्रजींत त्याचा अनुवाद केला आहे. श्री. श्रीपाद नारायण सातघर एम. ए. एल एल. बी, यांनीं श्रीगजानन महाराजांचें चरित्र इंग्लिश कवितेंत (सेन्टली सोल) लिहून प्रसिद्ध केलें आहे. पण श्रीगजानन महाराजांच्या वयाच्या २९–३० वर्षांतच हीं चरित्रें प्रकाशित झालीं असल्यामुळें त्यांचें अद्यावत् चरित्र अद्यापहि लिहून प्रकाशांत यावयाचें आहे. २९–३० वयाच्या वर्षानंतरच्या श्रीगजानन महाराजांच्या चरित्रांत पंधरावर्षांतील घडलेल्या घडामोडींचा वृत्तांत एकत्र करून स्वानंदवासी अरविंद महर्षींचें एक मराठींतील चरित्र लेखक श्री. पु. बा. कुलकर्णी संपादक 'विश्वकर्मा' यांनींहि दोन ग्रंथ प्रकाशित केले आहेत.

जीवन चारित्र्यांतील प्रकाशित पैलू

एक ख्यातनाम ज्योतिषी म्हणून श्री गजानन महाराजांची बरीच प्रसिद्धी झाली असली तरी त्यांच्या जीवनांतील अनेक दीप्तिमान् सद्गुणांचा अनेकांना यथार्थ स्वरूपांत अद्याप परिचय झालेला नाहीं. उदाहरणार्थ त्यांचें पवित्र आणि खऱ्या साधुपुरुषाला साजेसें नित्य जीवनांतील आचरण, रंजल्या गांजलेल्यांचें बरें करण्याविषयीं त्यांच्या हृदयांत सदैव जागृत असलेली आणि नित्याचरणांत सदैव व्यक्त होत असलेली तळमळ व कळकळ, त्याचप्रमाणें उपासना आणि सुयोग्य शिक्षण-संघटनाचा प्रचार व्हावा या विषयींची त्यांच्या ठिकाणीं दिसून येणारी आस्था व आदर व्यक्त करणाऱ्या अशा किती तरी घटना श्री गजानन महाराजांच्या वयाच्या २९–३० नंतरच्या काळांतहि घडलेल्या आहेत. अशा रीतीनें त्यांचें जीवन चरित्र २९–३० नंतरहि अनेक सत्कृत्यांनी फुलून गेलेलें असल्यामुळे त्यांचें विस्तृत व अद्यावत् चरित्र लिहिण्याठी साधन संभाराची विपुलता आहे.

'सुजनतेचा मानव धर्माच्या प्रचार

सध्यां श्रीगजानन महाराजांनी सुजनतेच्या मानवधर्माचा प्रचार उदार व व्यापक धोरणांनीं चालविलेला आहे. या त्यांच्या सत्कार्याला नभोवाणी व बातमी खात्याचे केंद्रीय मंत्रि डॉ. बाळकृष्ण वि. केसकर यांचे पिताश्री **श्रीविश्वनाथ महाराज केसकर** यांच्या बंधुभावनापूर्ण सहकार्याची जोड गेल्या एक तपावरील काळांत मिळाली आहे. शिवाय **श्री. मो. बा. लिमये** बी. ए. तथा श्रीअवधूतस्वामी यांच्या सारखे, सुविद्य पट्टशिष्य आणि श्री. **पांडुरंग रामचंद्र नागवेकर** तथा-**सत्येंद्रनाथ स्वामी** व श्री. **मुकुंदराव उर्फ मुरलीधरस्वामी** यांच्या सारखे निष्ठावंत व अत्यंत प्रेमळ भक्तहि श्रीगजानन महाराजांच्या या सुजनतेच्या सत्यमानव-धर्माच्या प्रचाराला आस्थेवाईक कळकळीनें हातभार लावीत आहेत. अखिल भारतांत व भारताबाहेर या सत्य मानवधर्माचा प्रचार होऊन तो मानवांच्या आचरणांत व्यापक रूपांनीं उतरला तर विश्वशांतीला आणि जगांतील अखिल मानवांच्या सुखाला या उदारधर्माचा फार उपयोग

होणार आहे अशी या सर्वांची आणि त्यांच्या भक्त स्नेह्यांची नितांत श्रद्धा आहे. इति सत्यं शिवं सुन्दरम्.

टीप :— सगुण व निर्गुण या दोन्हीं स्वरुपाचा प्रेमभक्ती व ज्ञान याचे गुरुप्रसादानें त्यांना लाभ होण्यानें कोणत्याहि भूमिकेचा साधक असो त्यांना तें अचूक मार्गदर्शन करितात.

संत वाङ्मयावर श्री. गजानन स्वामींचे अविरत प्रेम होण्यानें महाभगवद्भक्त नामदेवरायाची सार्थ गाथा ४ थ्या भागाला उदार देणगी हे ठळक उदाहरण असून इतरांना मार्ग दर्शक नव्हे काय ?

॥ ॐ तत्सत् ब्रम्हार्पणमस्तु ॥

—: अभंग सूची :—

नामदेव-चरित्र

श्रीराम माहात्म्य

शिवरात्र-माहात्म्य


श्री विठ्ठल माहात्म्य

श्री विठ्ठलाची भक्तवत्सलता

नामाचे माहात्म्य "

‘ पंढरी माहात्म्य ’

श्री. नामदेवराय



नाचूं किर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावूं जगीं ॥ १ ॥

नामदेवरायाची सार्थ गाथा

नामदेव–चरित्र :

माझीया मनाचें बैसणें जे जे ठायीं। तेथें तेथें तूं राही पांडुरंगा ॥ १ ॥ भीमा चंद्रभागा वैकुंठ पंढरी। दावींदृष्टीभरी निरंतर ॥ २ ॥ पुंडलिकासमोर लक्षनिरंतरी। तैसाची अंतरी येउनि राहें ॥ ३ ॥ कटीं-कर विटे समचरण गोमटें। पाहतां अति नेटकें हेचि ध्यान ॥ ४ ॥ पुरवी माझी आस तूं बाप माऊली। करीं मज साऊली पद्मकरें ॥ ५ ॥ नामा म्हणे झणीं करिसी उदास। होती कासावीस प्राण माझे ॥६॥

(४५२) हे पांडुरंगा, ज्या ज्या ठिकाणीं माझ्या मनाची बैठक होईल तेथें तेथें आपण वास्तव्य करावें ॥ १ ॥ वैकुंठ भुवन जी पंढरी आणि तेथील असलेली पावन तीर्थे जो भीमा आणि चंद्रभागा ह्यांचें नित्यशः दर्शन माझ्या दृष्टीस होवो ॥ २ ॥ पुंडलीक रायाचे समोर आपण सतत तिष्ठत उभे असल्यानें परस्परामध्यें जसें निरंतर लक्ष आहे. तद्वत् आपण माझ्या अंतःकरणामध्यें नित्यशः वास्तव्य करावें ॥ ३ ॥ कमरेवर ज्यांचें हात आहेत व विटेवर दोन्हीं पाय स्थिर आहेत असें सुंदर ध्यान पहातांना दिसो ॥ ४ ॥ तूंच माझा आई बाप असल्यानें माझी ही इच्छा पूर्ण करा आणि आपल्या पद्मरूप हाताची छाया माझ्या मस्तकावर धरा ॥ ५ ॥ जर कां मला आपण निराश केलेत तर माझा प्राण कासावीस होईल असे नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

विष पाजावया पुतना ते आली। ते तूंवा तारिली काय म्हणोनि ? ॥१॥ पुसाया म्हणोनि वेश्या वोभाईली। ती तुंवा तारिली काय म्हणोनि ? ॥२॥ पिंगळेचि आख्या पुराणीं ऐकीलीं। तें तूंवां तारिली काय म्हणोंनी ॥ ३ ॥ गौतमाचे शापें अहल्याशिळा झाली।

तें तूंवा तारिली काय म्हणोनि? ॥ ४ ॥ नामा म्हणे केशवा अकळ तुझी करणी । विसंबसी झणी तूंचि मज ॥ ५ ॥

(४५३) तुम्हाला विष पाजून मारण्याकरितां पुतना. मावशी आली असतांना तुम्ही तिला सद्गती कां बरे दिलीत ? ॥ १ ॥ पोपटाला शिकविण्याकरितां वेश्येनें रामराम म्हटले असतां तिचा उद्धार कां बरें केला ? ॥ २ ॥ पिंगळा हिचें संपूर्ण चरित्र पुराणामध्यें वर्णिलें आहे. आम्हीं तें श्रवण केलें आहे. अशा या अनाचार स्त्रीला कां बरें आपण तारलें? ॥३॥ गौतम ऋषीच्या शापानें अहिल्या दगड झाली असतां तिचा हो उद्धार तुम्ही कां केला ? ॥ ४ ॥ हे केशवा, अशी ही तुमची अलौकिक क्रिया अगम्य आहे. माझा विसर तुम्हाला होऊं देऊ नका असे नामदेवराय म्हणतात॥५।

तुझें गुणनाम ऐकतां श्रवण नाराध्यें । अवलोकन करितां नयन नाराध्यें । पूजन करितां कर नाराध्यें । ऐसी नाराणूक द्यावी कमळापती ॥ १ ॥ नरहरी या नामें उदंड । केव्हांही नसावें रिकामें तोंड । खांदी सतत करंडा वाहे । मस्तकीं अखंड निर्माल्य राहे । नेत्रीं आनंदजळवाहे । यामध्यें देवा झणें कांहीं उणेंन होय ॥ २ ॥ तुझेनी प्रसादें जठर पोसिलें । चरणोदकें तृष्णाहरण केलें । नामें नृत्यकरितां मन हे निवालें । दंडवत घालितां श्रम हरले ॥३॥ गतशयनीं विसर न द्यावा श्रीरामा । या परी निश्चित परमात्मा । तूं आलिया निवारिसीश्रमा । ऐसें केशिराजा विनवितो नामा ॥ ४ ॥

(४५४) हे कमळापती, माझ्या कानानें तुमचे गुणानुवाद ऐकतांना अतृप्त असावें. तुमचे मुखसौंदर्य पहात असतां माझे डोळें लालचावेत. तुमचें पूजन होत असतां माझ्या हातांना स्फुरण यावें असी माझी स्थिति करावी ॥ १ ॥ मुखानें नरहरी हें नाम उच्चारित असतां त्यांत खंड न पडावा ॥२॥ तुमच्या अंगावर पाण्याची धार सतत रहावी म्हणुन मी माझ्या खांद्यावर पाण्याची कावड नित्य आणावी; नेत्रांतून सतत प्रेमाश्रु स्रवावें यामध्यें केव्हांही

न्यून पडूं देऊं नका ॥ २ ॥ तुमच्या प्रसादानें माझें पोट भरलें असून तुमच्या पायांच्या तीर्थानें माझी तृषा हरण झाली आहे. मुखानें नाम घेत तुमच्या सन्मुख नाचत असतां माझें मन शांत झालें. तुम्हाला नमस्कार घालीत असतां माझ्या सर्व कष्टांचा परीहार झाला ॥ ३ ॥ स्वप्नामध्येंहि तुमचा विसर न व्हावा. हे परमात्मन् असा माझा निश्चय आहे. तूं मला एकदां कां प्राप्त झाला कीं सर्व श्रम दूर होतील असी कोंधिराजांना नामदेवराय विनंति करीत आहेत. ॥ ४ ॥

तुझें नाम म्हणतां सुलभ अनंता । दुर्लभ म्हणतां अंतकाळीं ॥ १ ॥ तैसें तुवां मज केशवा करावें। हृदयीं भेदावें नाम तुझें ॥ २ ॥ मुके पशु पक्षी वृक्ष आणि पाषाण। तया नारायणा गति कैसी? ॥३॥ नामा म्हणे कैसें केशवा सांगणें । अज्ञानीं ते नेणें कवणें परी ॥४॥

(४५५) हे केशवराया, तुमचें नाम घेतां अति सोपें आहे हें खरें परंतु ते अंतकाली मुखानें येण्यास कठीण असतें ॥ १ ॥ तुमच्या नामाचा मला इतका छंद लागावा कीं तें माझ्या हृदयांत भेदून तेथें सांठून असावें ॥ २ ॥ हे नारायणा पशू, पक्षी, वृक्ष आणि पाषाण, हे मुके व अज्ञानी असल्यानें ते तुमच्या नामाचा उच्चार करीत नाहींत. त्यांना ही कोणती गती मिळणार ? ॥ ३ ॥ हे केशवराया ! तुम्ही सुज्ञ आणि मी अज्ञ तेव्हां यासंबंधीं कोणत्या प्रकारें विचारणा करावी असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

देवा निढळावरी हात दोनीं । पाहें चक्रपाणी वाट तुझी ॥ १ ॥ धांव गे धांव सख्या पांडुरंगा । जीवीं जीवलगा मायबापा ॥ २ ॥ तुजविण ओस दिसती दाही दिशा । धांव जगदिशा मजसाठीं ॥३॥ नामा म्हणे काय बैसलों निवांत । धांवतों अनंत भक्तासाठीं ॥ ४ ॥

(४५६) हे चक्रपाणी देवराया ! मी माझ्या भाळावर दोन्ही हात ठेवून तुमची मार्गप्रतीक्षा करित आहे ॥ १ ॥ हे पांडुरंगराया, हे जिवांच्या जिवलगा व आई बापा असा हिरकणीनें मी तुमचा धांवा करित आहे ॥२॥

हे जगदीशा, तुमच्या शिवाय सर्व दिशा मला शून्य वाटतात आणि म्हणून माझ्याकरितां धांवत या ॥ ३ ॥ ज्याचा अंत होत नाहीं असा हा अनंत जी भक्ताकरितां धांव घेतो तो असा कसा स्तब्ध राहिला हो? असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

भागलासि देवा धांव धांवणिया । दाखविसी पायां पांडुरंगा ॥ १ ॥ गजेंद्र गणिका तुम्हा श्रमविले । मी काय उगलें परदेशीं ॥ २ ॥ सोळा सहस्र गोपी त्या उद्धरती । माझी कींव चित्तीं कां वा नये ॥ ३ ॥ नामा म्हणे आम्हां पुरे तुझा संग । वारंवार मग वारि कोण ! ॥ ४ ॥

(४५७) हे देवराया, भक्ताच्या कार्यार्थ सतत धांवा केल्यानें तुमची दमछाट झाली आहे काय ? पण आपण सर्वशक्तीमान अहांत ना ? तेव्हां हे पांडुरंगा, धांवत येऊन आपल्या पायाचें दर्शन द्या ॥ १ ॥ तुम्हाला गजेंद्र आणि गणिकेनें श्रमविलें नाहीं काय ? आणि मलाच कां परदेशामध्यें असा निराधाराचा प्रसंग यावा ! ॥ २ ॥ सोळा सहस्र असलेल्या तुमच्या अर्धांगी स्त्रिया यांचा तुम्ही उद्धार केला ना ? मग हे केशवा, माझी दया तुम्हाला कां बरें येऊं नये ? ॥ ३ ॥ आम्हांला तुमची संगत पूर्ण झालीं आतां कोण हो तुमच्याकडे वारंवार येणार ? असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

केशव चरणीं मनें दिली बुडी । इंद्रियें बापुडीं धांवती पाठीं ॥ १ ॥ संसार संभ्रम नको सुखलेश । भातुकें सरीसें पाठवीसीं ॥ २ ॥ जन्म जन्मांतरी जाणावें कवणें । नेणोनि भोगणें कोणे स्वामी ॥ ३ ॥ नामा म्हणे तूं भक्तवत्सला केशवा । आम्हासाठीं धांवा घाली हरी ॥ ४ ॥

(४५८) केशवरायाचे पायीं एकदां कां मन रममाण झालें कीं तेथें गरीब बापडीं इंद्रियें सहज आकर्षिलीं जातात ॥ १ ॥ संसाराच्या ठिकाणीं किंचीतही सुख नसल्यानें आम्हांला त्याची गोडी नाहीं तीं आम्हांला भुलांच्या खाऊसारखी कां देत आहेस ? ॥ २ ॥ हे स्वामीराया, जन्मो-

जन्मीं तुम्हाला कोणीही जाणावें ? आणि तुम्हांला न जाणून या संसाराचा भोग कोणीही घ्यावा ? ॥ ३ ॥ हे केशवा, तुम्हीं भक्तवत्सल अहांत ना ? तेव्हां हे हरि आमच्याकरितां थांबत या असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

ऐशा विचारें समाधान करीं । गोविंद श्रीहरी नारायण ॥१॥ सर्वकाळ ऐसी वदो ही वैखरी । आणीक अंतरीं नाठवावें ॥ २ ॥ आणीकासी गुज न बोले वदन । वदो नारायण सर्वकाळ ॥३॥ रामकृष्ण माझ्या शेषाचें स्तवन । शास्त्रेंही पुराणें भाट ज्याचीं ॥ ४ ॥ नामा म्हणे आंतां ऐसें करीं देवा । हृदयीं केशवा राहें माझ्या ॥ ५ ॥

(४५९) हे गोविंदा, नारायणा, व श्रीहरि अशा या विचारानें समाधान करा ॥ १ ॥ माझ्या वाणीनें नित्यशः तुमच्या नामाचा उच्चार व्हावा त्याच्याशिवाय दुसरी कोणतीच आठवण होऊं नये ॥ २ ॥ माझ्या मुखांतून दुसऱ्या कोणत्याहि शद्वाचा स्फोट न व्हावा. फक्त नारायण या नांवाचा सतत उच्चार व्हावा ॥३॥ रामकृष्ण हाच माझ्या शेषाच्या प्रार्थनेचा विषय असून शास्त्रें व पुराणें ही ज्याचे भाट होऊन गुण गातात ॥ ४ ॥ हे देवराया माझ्या अंतःकरणामध्यें आपलें सतत वास्तव्य रहावें असें करा असें नामदेवराय म्हणतात ॥ ५ ॥

नामदेवरायाचें मागणें

पैल पिकली पंढरी । विठ्ठलरायाची नगरी ॥ १ ॥ पहा पहा एंकले निरुतें । विश्व केलें हें मागुतें ॥ २ ॥ केशव खळेदान देतां । नामा झालासें मागतां ॥ ३ ॥

(४६०) पलीकडे पहा कशी हो ही विठ्ठलरायाची नगरी जी पंढरी नांमाच्या गजरानें दुमदुमून गेली आहे ॥ १ ॥ पहा पहा काय हो हें आश्चर्य प्रथम पंढरीक्षेत्र होतें नंतर विश्वरचना झाली ॥ २ ॥ केशवराय हे खेळ दान देत असतां तें घेण्याकरितां नामदेवराय सन्मुख उभा राहिला ॥ ३ ॥

विटेवरी नीट उभा कटीं ठेवुनीं कर । तो पुंडलिकाचे द्वारीं देखियेला ॥१॥ बहुली बहुली देहुडा पाउली । गुंजाहार गळा देखियेला ॥ २ ॥ पुष्पवंतीच्या संगमीं गोपाळ आश्रमीं । काला करितां आम्ही

देखियेला ॥ ३ ॥ वेणु वाहतां चहूंकरीं नाद उठला अंबरीं । वासुरें तटस्थ हुंबरी होऊनि देखियला ॥ ४ ॥ अंगीं चंदनाची उटी मयुर पत्रांची दाटी । चेंडू खेळतां यमुनेतटीं देखियेला ॥ ५ ॥ नामा म्हणे केशवा देखियेलें ह्रुदयीं । जन्मवरी राही हेंचि मागें ॥ ६ ॥

(४६१) जो कमरेवर हात ठेऊन बिटेवर सरळ उभा आहे तोच हा पुंडलीक रायाच्या द्वारामध्यें पाहिला ॥ १ ॥ लहान लहान असा सुकुमार दीड पायावर हा उभा असून ज्याच्या गळ्यांमध्यें रत्नाचा हार आहे असा मी त्यास डोळे भरून पाहिला ॥ २ ॥ पुष्पवती क्षेत्राच्या संगमावर असलेला जो गोपाळाचा आश्रम तेथें त्यास काला करितांना आम्ही पाहिला ॥ ३ ॥ ज्याच्या चारी हातांमध्यें वेणू असून त्याच्या मधुरध्वनीनें अकाश दुमदुमलें आहे त्याच्या समोवती वासरेंहि तटस्थ होऊन हुंबरत आहेत; असा हा देव पाहिला ॥ ४ ॥ ज्याच्या सर्वांगाला चंदनाची उटी असून त्याच्या मस्तकावरील मुकूट हा मोराच्या पिसाऱ्यानें सुशोभित आहे व जो यमुनेच्या कांठीं चेंडूफळी खेळत आहे असा हा आम्ही पाहिला ॥ ५ ॥ हे केशवा जन्मभर माझ्या ह्रुदयांत आपलें वास्तव्य असलेले मी आपणास पहावे अशी आपणाजवळ माझी मागणी आहे असें नामदेवराय म्हणतात् ॥ ६ ॥

बाहेरीं भीतरीं तुजचि मी देखें । चित्त तेणें सुखें वेडावलें ॥ १ ॥ संत संगें मज पालट हा झाला । पाहतां विठ्ठला रूप तुझें ॥ २ ॥ वृत्तिसहित मन आनंदी बुडालें । न निघे कांहीं केलें चित्त माझें ॥ ३ ॥ नामा म्हणे एक उरलीसे वासना । स्वामिसेवकपणा देई देवा ॥ ४ ॥

(४६२) अंतर्बाह्य असलेल्या तुमच्या स्वरूपाला पाहून त्या आनंदानें माझें मन वेडे झाले आहे ॥ १ ॥ सत्संगतीच्या योगें तुमच्या स्वरूपाचा मला बोध झाला असल्यानें ह्रुदयांत परिवर्तन झालें ॥ २ ॥ माझें हें मन वृत्तीसहित स्वात्मानंदांत समरस झाल्यानें तेथून कांहीं केल्या उत्थापन होत नाहीं ॥ ३ ॥ तुमच्या माझ्यामध्यें सेवक स्वामी भाव असांवा अशी माझी

एक वासना राहिली आहे त्याइच्छेची पूर्तता आपण करा असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

मन माझें आंधळे कपटाचे कवाड । भक्ता केंवि उघडे ज्ञानेविण ॥ १ ॥ काय करूं देवा माझिया मी दैवा । अभक्तांसी भाव केविं होय ॥ २ ॥ हे माझें म्हणती कुबुद्धि लेंकुर । मागें काळ वैर पाहतसे ॥ ३ ॥ नामा म्हणे केशवा सांडी दुजाभाव । तुझे पायीं ठाव देई देवा ॥ ४ ॥

(४६३) माझें हें मन अंध झालें जणू काय तें कपटनीतीचें द्वारच झाले आहे. भक्तांना ते ज्ञानाशिवाय कसें उघडणार ? ॥ १ ॥ हे देवराया माझ्या अशा या दैवाला काय हो करावे ? अभक्तांच्या ठिकाणीं भावाची निर्मिती कशी हो व्हावी ? ॥ २ ॥ काळ हा मागील वैर साधीत असतो. माझी ही बळावत असलेली कुबुद्धी माझें माझें म्हणत आहे ॥ ३ ॥ भेद नष्ट करून तुमच्या पायीं मला स्थळ द्या असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

काळ देहासी आला खाऊं । आम्ही आनंदे नाचूं गाऊं ॥१॥ कोणें वेळे काय गाणें । हें तों भगवंता मी नेणें ॥ २ ॥ टाळमृदंग दक्षिणेकडे । माझें गाणें पश्चिमेकडे ॥ ३ ॥ नामा म्हणे बा केशवा । जन्मोंजन्मीं द्यावीं सेवा ॥ ४ ॥

(४६४) देहाला खाण्याकरितां काळ हा टपून बसला, खरा परंतु आम्ही तुमचें नाम आनंदानें नाचत गान करूं ॥ १ ॥ हे भगवंता, कोणत्या वेळेस कोणता राग गावा ह्यासंबंधी मी अनभिज्ञ आहे ॥ २ ॥ दक्षिण बाजूला टाळ, मृदुंग वाजत असतांना माझें गाणें पश्चिमेकडे होत आहे॥ ३॥ हे केशवराया जन्मोजन्मीं मला तुमची सेवा द्या असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

'मनें ध्यान करणें वाचें नाम उच्चारणें । नयनें तुज पाहणें होंचि देईं ॥ १ ॥ करें पूजा करणें माथां चरणीं ठेवणें । श्रवणी गुण ऐकणें हेंचि देईं ॥ २ ॥ षट् चक्रावरी मार्ग आवृत्त अक्षरीं । निरो-

लंब निरंतरी भेटी देई ॥ ३ ॥ मनसा वाचा कर्म आणि दश इंद्रियें । तुझ्या चरणीं दृढ होय ऐसें करीं ॥ ४ ॥ डावी उजवीकडे आणि मार्गे पुढें । अंती चरण जोडे ऐसें करीं ॥ ५ ॥ नामा म्हणे केशवा तुझी मजगोडी। जन्मोजन्मीं जोडी हेंचि देई ॥ ६ ॥

(४६५) हे देवराया ! माझ्या मनानें तुमचें ध्यान करावें; मुखानें तुमच्या नांवाचा उच्चार व्हावा; डोळयानें तुमच्या रूपाला पहावें हेच वरदान द्या ॥ १ ॥ माझ्या हातानें तुमची सेवा घडावी; तुमच्या पायावर माझं मस्तक असावे; माझ्या कानानें तुमचे गुणानुवाद ऐकावें हेंच वरदान द्या॥२॥ षड्चक्राच्याहि पलीकडे आणि बावन अक्षरांमध्यें ज्याचा समन्वय आहे अशा तुमच्या निराकार स्वरूपी नित्यशः मला भेटी द्या ॥ ३ ॥ माझे मन, वाणी आणि दहाही इंद्रियें तुमच्या पायीं अखंड राहतील असे करा ॥ ४ ॥ डाव्या भागाला असो अगर उजव्या भागाला असो अथवा मागें पुढें असो कसाहि असो शेवटी तुमच्याच चरणाची प्राप्ती व्हावी असें करा ॥ ५ ॥ हे केशवा, तुमचेंच प्रेम माझ्या ठिकाणी आहे तेव्हां मी मागितलेले वरदान तुमच्याकडून मला जन्मोजन्मीं मिळावें असें नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

तूं एक सज्ञान मी एक अज्ञान । तुझें नाम जाण विस्तारीलें ॥ १ ॥ आतां करिसी काय आतां करिसी काय । सांपडली सोय रामचंद्रा ॥ २ ॥ चरणीं जे आहे ती माझी माय । ईश्वरु तो वाहे शिरकमळीं ॥ ३ ॥ नामा म्हणे देवा न सोडी मी भावा । जन्मो जन्मीं सेवा घावी तुम्हीं ॥ ४ ॥

(४६६) तुम्हीं पहातां ज्ञानी आणि मी आहे अज्ञान असा हा प्रकार असला तरी तुमच्या नामाचा मी विस्तार–प्रचार केला ॥ १ ॥ हे श्रीरामचंद्रा, तुमचें वर्म मला सांपडलें. आतां तुम्ही हो काय करणार आहांत, असें द्विरुक्तीनें विचारणा करीत आहे ॥ २ ॥ तुमच्या चरणापासून निघालेली आणि जिला शंकरानें आपल्या मस्तकावर धारण केली आहे अशी गंगा ही माझी आई होय ॥ ३ ॥ हे देवराया, तमच्या संबंधी असलेली माझी भ

श्रद्धा आहे तिचा केव्हांहि त्याग करणार नाहीं. जन्मोजन्मीं तुमच्या सेवेचा मला अधिकारी करा असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

स्वामी एक व्हावा तुजचि सारखा । करी निज सेवका जगद्वंद्य ॥ १ ॥ देऊनी प्रेमातें पाळिसी तूं बाळें । न करिसी जीवा वेगळें क्षणभरी ॥ २ ॥ बळी भिष्म नारद उद्धव रुक्मांगद । हनुमंत प्रल्हाद अंबऋषि ॥ ३ ॥ नामा म्हणे हेचि देई जन्मोजन्मीं । मी दास तूं स्वामी केशिराजा ॥ ४ ॥

(४६७) आपल्या सेवकांना जगमान्यता देणारा असा तुमच्यासारखा स्वामी असावा ॥ १ ॥ जो आपल्या बाळकांना अवर्णनीय प्रेम देऊन त्याचें पालन करितो आणि त्यांना क्षणभरहि आपणांहून भिन्न करीत नाहीं ॥ २ ॥ बळीराजा, भीष्माचार्य, नारदऋषी, उद्धव, रुक्मांगद, हनुमंत प्रल्हाद, अंबऋषी असे हे तुमचे आवडते भक्त होत ॥ ३ ॥ हे केशिराजा, तुम्ही माझे स्वामी असावे आणि मी तुमचा दास असावा असा संबंध जन्मोजन्मीं व्हावा हेंच मला वरदान द्या असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

हेचि माझी संध्या हेचि माझें स्नान । तुझ्या पायीं मन लागो देवा ॥ १ ॥ हेचि माझी ऋद्धि हेचि माझी सिद्धि । अखंड समाधी पाय तुझे ॥ २ ॥ नामा म्हणे हेंचि देईंगा श्रीपती । कथेची विश्रांति जन्मोजन्मीं ॥ ३ ॥

(४६८) हे देवराया, तुमच्या चरणाचे ठायीं माझें मनस्थिर होणें तेंच माझें संध्या स्नान होय ॥ १ ॥ माझी रिद्धी सिद्धी किंवा नित्य समाधी म्हणजे केवळ तुमच्या चरणाचें अनुसंधान होय ॥ २ ॥ हे श्रीपती, माझी विश्रांती म्हणजे तुमचें कथा कीर्तन करणें हेंच होय, त्याचा मला जन्मोजन्मीं लाभ होवो तेव्हां हेंच मला द्या असें नामदेवराय म्हणतात ॥ ३ ॥

पंढरीचा वास चंद्रभागे स्नान । आणिक दर्शन विठोबाचें ॥ १ ॥ हेंचि घडो मज जन्मजन्मांतरीं । मागणें श्रीहरी नाहीं दुजें

॥ २ ॥ मुखीं नाम सदा संतांचें दर्शन । जनीं जनार्दन ऐसा भाव ॥ ३ ॥ नामा म्हणे तुझें नित्य महाद्वारीं । कीर्तन गजरीं सप्रेमाचें ॥४॥

(४६९) श्रीक्षेत्र पंढरीमध्यें वास्तव्य व्हावें. चंद्रभागा तिर्थीचें स्नान घडावे आणि विठ्ठलरायाचें नित्य दर्शन व्हावें ॥ १ ॥ हे श्रीपती, असा हा नित्य नियम सतत माझ्याकडून आचरला जावा; ह्यापेक्षां मी दुसरी कोणतीच मागणी तुमच्या जवळ करीत नाहीं ॥ २ ॥ मुखामध्ये तुमच्या नामाचा अखंड जप आणि संतांचें दर्शन व्हांवे आणि हे जग जनार्दन रूपानें अविष्कृत झालें आहे असा साम्य भाव व्हावा ॥ ३ ॥ हे देवराया, मी महाद्वारामध्यें उभा राहून कीर्तनाचा जयघोष प्रेमानें करीन असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

माता तेचि तात सोयरे हरिजन । यम नेम नेणें दोन गोष्टी ॥ १ ॥ गोष्ट तें कोणती म्हणाल तुम्ही जरीं । वाचे हरिहरि म्हणतसें ॥ २ ॥ नामा म्हणे आम्ही मागतों देवासी । कीर्तनीं उपवासी करावें देवा ॥ ३ ॥

(४७०) माझे सर्व जे हरिभक्त तेच आई बाप होत. यापेक्षां दुसरे दोन्हीं यम नियम जाणत नाहीं; मात्र एक गोष्ट जाणत आहे ॥ १ ॥ कोणती हो गोष्ट तुम्ही जाणत आहांत ? असा प्रश्न विचारीत असाल तर हरिहरि म्हणणें व हरिजनाची संगत करणे हे त्याचे सरळ उत्तर होय ॥ २ ॥ हे देवराया, अनाशंन राहून कीर्तन व्हावे व देवरायाचे गुणानुवाद गावे. देवरायापाशीं याचीच मागणी आम्ही करितो असें नामदेवराय म्हणतात ॥ ३ ॥

आम्हीं दिला जीव तुझिया किर्तनें । पांगुळली मनें योगियांची ॥ १ ॥ न बोलवे वाचा न बोलवे कांहीं । आपोआप पाहीं ठाकलोंसे ॥ २ ॥ ऐसें तुझें नाम दे गोड गा देवा । घाली बा केशवा हृदयामाजीं ॥ ३ ॥ नामा म्हणे आम्हां सांपडलें वर्म । नित्य वाचे नाम रामकृष्ण ॥ ४ ॥

(४७१) ज्या वस्तूच्या प्राप्तीकरितां प्रवृत्त झालेले योगी त्यांच्या मनाची धांव थांबते अशा स्वरूपाच्या ठायीं सप्रेम कीर्तनानें आम्ही आपला जीव अर्पण केला ॥ १ ॥ अशा स्वरूपाच्या ठिकाणीं वाणीनें कोणत्याच शब्दाचा उच्चार न करितांहि ती स्थिती आम्हाला सहज प्राप्त झाली ॥२॥ हे केशवराया ! असें हें तुमचे मधुर नाम आमच्या हृदयांत सांठवून वाणी द्वारा त्याचा उच्चार होवो ॥ ३ ॥ तुमच्या प्राप्तीचें वर्म म्हणजे रामकृष्ण या तुमच्या मधुर नामाचा वाणीनें सप्रेम उच्चार करणें हे वर्म आम्हाला अवगत झाले असे नामदेवराय म्हणतात. ॥ ४ ॥

हेंचि मागतसे तुज । वनीं जन्म देई मज ॥ १ ॥ सुखें करोनि राहेन । तुझे पाहीन चरण ॥ २ ॥ शीण बहुत पावलों । आतां तुज-पाशीं आलों ॥ ३ ॥ न करीं अव्हेर । दास तुझा मीं किंकर ॥४॥ येतो काकुळती । नामा म्हणे देवाप्रती ॥ ५ ॥

(४७२) अरण्यांत जन्म द्या हीच माझी आपणाजवळ याचना आहे ॥ १ ॥ तेथें मी आनंदानें राहून तुमच्या पायाचें दर्शन घेईन ॥ २ ॥ या संसारामध्यें अति कष्ट झाले म्हणून तुम्हाला शरण आलो ॥ ३ ॥ मी तुझा गरिब सेवक आहें म्हणून आपण माझा त्याग करूं नका ॥ ४ ॥ अशी ही विनंती मी देवरायांना कळवळयानें करीत आहे असे नामदेवराय म्हण-तात ॥ ५ ॥

सगुण निर्गुण श्रुति ज्या बोलती । तो तूं माझे चित्तीं पंढरि-राया ॥ १ ॥ आहेसि तितुकें तूंचि सर्वांगत । मी काय अनाथ वर्णूं तुज ॥ २ ॥ चरणींची आवडी न संडावी मनें । यापरि पोसणें माय-बापां ॥ ३ ॥ सांक्ष भीमरथी संत पुंडलीक । नाम्यातें आणीक नलगे कांहीं ॥ ४ ॥

(४७३) सगुण आणि निर्गुण अशा या स्वरूपानें ज्याचें वर्णन श्रुति करितात असा हा पांडुरंगराय माझ्या चित्तामध्यें स्थित आहे ॥ १ ॥ जें कांहीं दृश्य प्रतीत होतें त्या सर्वांमध्यें तूंच आहेस. अशा या व्यापक स्वरू-

होईल संताचा बोळगंणा । दास डिंगर पोसणा ॥ १ ॥ प्रेम देई नारायणा । भूतदया परिपूर्णा ॥ २ ॥ संतचरणींचे रज । हेंचि सर्व तीर्थ बीज ॥ ३ ॥ सेवीन सत उष्टावळी । तेणें पवित्र आमुची कुळी ॥ ४ ॥ राखेन संताचें मी द्वार । तें मज वैकुंठाहुनि थोर ॥ ५ ॥ नामा म्हणे पंढरीनाथा । आणीक न मागें सर्वथा ॥ ६ ॥

(४७८) मी संतांचा दास आणि त्यांच्याकडून पोसला जाणारा असा बालक होऊन त्यांना शरण जाईन ॥ १ ॥ हे नारायणा, प्राणिमात्रा-संबंधी पूर्ण दया असावी असें शुद्ध प्रेम द्या ॥ २ ॥ तें सर्व तिर्थांचें मूळ जर कांहीं असेल तर संतांच्या चरणाचे रज:कण हे होय ॥ ३ ॥ संतांच्या उष्टया पत्रावळींत अन्न सेवन केल्यानें आमचीं सर्व कुळें पवित्र होतील ॥ ४ ॥ संतांच्या द्वाराचें मी रक्षण करीन. कारण ती सेवा मला वैकुंठ सुखापेक्षांहि श्रेष्ठ वाटते ॥ ५ ॥ हे पंढरीनाथा, आतां मी जी आपणापाशीं याचना केली आहे त्यापेक्षां अधिक कोणत्याच गोष्टीची हांव नसल्यानें त्याची मागणी आपल्याजवळ मी केव्हांच करणार नाहीं असें नामदेवराय म्हणतात॥ ६ ॥

ऐकें मोक्षाची मी कथा । तेणें भयवाटे चित्ता ॥ १ ॥ देवा कांहीं न मागें न मागें । मौन असे संतसंगे ॥ २ ॥ ऐकें मुक्तिचिया गोष्टी । तेणें होतसें हिंपुटी ॥ ३ ॥ ऐकें समाधिची गोडी । मन माझें पायां ओढी ॥ ४ ॥ ऐकें स्वर्गसूख थोरी । भेणें कांप येतो भारी ॥ ५ ॥ नामा म्हणे अभयदान । देऊनि सांगें प्रेमखूण ॥ ६ ॥

(४७९) मोक्ष हा अत्यंत श्रेष्ठ आहे म्हणून तो चौथा पुरुषार्थ होय असें वर्णन केले जातें तथापि असा हा मोक्षाचा गौरव ऐकतांना माझ्या चित्ताला त्याची भीति वाटते ॥ १ ॥ ऐहीक आणि परमार्थिक अशा मोक्षादिकांची मला किंचितहि अपेक्षा नाहीं. सत्संगतींमध्यें मौन धारण करून मी आनंदानें राहिन ॥ २ ॥ मोक्षसुखाच्या गोष्टीचें वर्णन ऐकतांच चित्त कष्टी होते ॥ ३ ॥ समाधीसुखाच्या गोष्टीचें वर्णन ऐकतांच माझें मन

पराङ्मुख होऊन तुमच्या चरणाकडे ते आकर्षिले जाते ॥ ४ ॥ स्वर्गसुखाचें वर्णन ऐकतांच अंगाला कंप वात होतो ॥ ५ ॥ हे देवराया, मला अभयदान देऊन तुम्ही आपल्या प्रेमाचें वर्म मला सांगा असें नामदेवराय म्हणतात॥६॥

प्रपंचीं का मातें करिसी उदासीन । तरी तुझे ध्यान लागो मना ॥ १ ॥ हेंचि तुज मागणें जन्मजन्मांतरीं । न मागतां अंतरीं प्रगट होसी ॥ २ ॥ इंद्रियांचे व्यापार अवघेचि तोडीं । प्रेमरसगोडी देई मातें ॥ ३ ॥ नामा म्हणे शरण आलों मी केशवा । हाचि तूं पुरवावा मनोरथ ॥ ४ ॥

(४८०) तूं जरी मला या प्रपंचामध्यें उदासीन केलें तरी त्याबद्दल मला किंचितहि खेद वाटत नाहीं मात्र माझ्या मनाला तुमचे ध्यान सतत असावे ॥ १ ॥ जन्मोजन्मीं हीच तुमच्याजवळ याचना आहे. वास्तविक पहातां तुम्ही भक्तवत्सल असल्यानें याचना न करितांहि भक्ताच्या हृदया-मध्यें प्रगट होतां ॥ २ ॥ इंद्रिय विषयांची होणारी सर्व खळबळ शांत करून तुमच्या प्रेमरसाची गोडी मला द्या ॥ ३ ॥ हे केशवराया, हीच माझी मनोकामना तुम्हीं पूर्ण करावी म्हणून मी आपणास शरण आलो आहे असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

शरीर प्राणाचें देऊनी बळीदान । साधावें निधान प्रेमभक्ति ॥ १ ॥ हेंचि नित्य मागें तया श्रीवल्लभा । याहुनि दुर्लभा आन नाहीं ॥ २ ॥ हरिदासाचा संग हरिकथा अनुराग । हेंचि परमभाग्य पुण्य-रूप ॥ ३ ॥ सर्वभावें करुनि सर्वभूतीं करुणा । सर्वत्र देखणा विठ्ठल-रूप ॥ ४ ॥ विषयीं विरक्ति नामीं नित्य तृप्ति । हृदयीं कृष्णमूर्ति वसे सदा ॥ ५ ॥ नामा म्हणे मग तो केशव कृपासिंधु । देईन भक्ति-बोधु प्रेमसुखें ॥ ६ ॥

(४८१) शरीर व प्राण यांचा होम करून प्रेमभक्तीसारखा ठेवा हस्तगत करावा ॥ १ ॥ हे श्रीवल्लभा, या भक्तीप्रेमसुखास रखी अमोलिक

अशी कोणतीच वस्तु नाहीं असा माझा पूर्ण निश्चय असल्यानें आपल्याजवळ मी त्याची नित्यश: मागणी करीत असतों ॥ २ ॥ हरिदासाची संगती आणि हरिकथेविषयींचें प्रेम हींच दोन्ही या विश्वामध्यें परमभाग्यशील आणि पुण्यरूप साधनें होत ॥ ३ ॥ सर्व रूपानें पवित्ररूप असा विठ्ठलराय विलासलेला आहे. अशी सर्वत्र समभावना करून भूतमात्रीं दया करावी. ॥ ४ ॥ विषयाचे ठायीं विरक्तता होऊन तुमच्या नामचिंतनाच्या योगें तृप्ती असावी आणि हृदयामध्यें कृष्णमूर्तीचें नित्य वास्तव्य असावें ॥ ५ ॥ एकदां कां अशी स्थिति झाली म्हणजे तो कृपासागर केशवराय ह्या भक्तिप्रेम-सुखाचा बोध सहज देतील असें नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

आठावितां मनीं तुझी बीद्रावळी । येऊनि जवळी उभा ठाके ॥ १ ॥ लाज धरोनियां होतोसि माघारा । तुजंची दातारा दिसे शोभा ॥ २ ॥ नामरूपासाठीं घेसी नाना सोंगें । भक्त जीवलगे अंतकाळीं ॥३॥ नामा म्हणे मज नको हा संसार । मज निरंतर देईं संग ॥४॥

(१४८२) हे देवराया, मनामध्यें तुमचें स्मरण होतांच तुम्ही सन्मुख उभे रहातां अशी तुमची किर्ती आहे ना ? ॥ १ ॥ असें असतां आतां लाज धरून तूं माझ्याशी पाठमोरे कां होत आहेस ? अशी ही विरोधाभासात्मक कृति तुम्हांलाच शोभा देत आहे ? ॥ २ ॥ आपल्या नामारूपाकरितां बहुविध रूपानें नटणारा जो तूं अशा तुला तुझे जिवलग भक्त हे अंतकाळामध्यें स्मरण करितात ॥३॥ हे देवराया, मला हा दु:खमय संसार नको; फक्त तुमचा सहवास सतत घडो असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

वेणु वाहोनि सांवळा । गाई चारिसी गोवळा ॥ १ ॥ कां बा न येसि धांवत । विठ्ठल माझें कुळदैवत ॥ २ ॥ अंगीं चंदनाची उटी । पदक मिरवले कंठीं ॥ ३ ॥ गळां माळ वैजयंती । सुदर्शन घेऊन हातीं ॥ ४ ॥ कांसे पितांबर शेला । विटेवरलिया विठ्ठला ॥ ५ ॥ नामा म्हणे पीडिलों भुकें । देई प्रेमाचें भातुकें ॥ ६ ॥

(४८३) वेणू वाजविणारा हा श्यामसुंदर (श्रीकृष्ण) गाया राखीत आहे ।। १ ।। माझ्या कुळदेवता विठ्ठलराया, तुम्हीं कांहो माझ्या धांवेकरितां धावत येत नाहीं ? ।। २ ।। ज्याच्या अंगाला चंदनाची उटी लावलेली असून ज्यांनीं गळ्यामध्यें सुवर्णपदक धारण केलें आहे ।। ३ ।। ज्यांनीं आपल्या गळ्यांत वैजयंतीमाळा धारण केल्या असून ज्यांच्या हातांत सुदर्शन चक्र आहे ।। ४ ।। ज्यांनीं आपल्या कमरेला पीतांबर कसलेला आहे असा हा विटेवर उभा राहिलेला विठ्ठलराय होय ।। ५ ।। मी प्रेमभुकेनें अत्यंत व्याकूळ झालों आहे तेव्हां हे विठ्ठलराया, मला प्रेमाचें पक्वान्न द्या असें नामदेवराय म्हणतात ।। ६ ।।

पुलक धर्म रोमांच नाहीं जंव उठले । सजळ नाहीं झाले नयन जंव ।। १ ।। हरिभक्तिचें सुख कळलें जे म्हणती । लटिकें बोलिजेति उभयलोकीं ।।२।। ऐसा भक्तीप्रेमा देई जी देवा । सर्वभावें सेवा घडे तुझी ।। ३ ।। श्रवणीं ऐकतां नाम वाचे मव बोले । नाहीं सुखावलें मन त्याचें ।। ४ ।। श्रीहरीचें नाम म्हणवितां न म्हणे । सहज उच्चारणें कैचें त्यासी ।। ५ ।। दुर्दराचे परी जिव्हा वटवटी । नाम सांडोनी गोष्टी राजाची करी ।। ६ ।। देवाच्या मूर्ती संतमहंत देखोनी । न वचे लोटांगणीं भावें त्यासी ।। ७ ।। न लावी त्यांचे रज टकमका पाहात । बुजवग जैसें सेत राखे तैसें । ८ ।। ऐसे एक प्राणी आहेति मूढमती । हीत सांगतां चित्तीं दुःख वाटे ।। ९ ।। नामा म्हणे केशवा मी तुझें दीन । तेणें तुजवाचोन आन दुजें ।।१०।।

(४८४) ज्याच्या अंगावर अष्ट सात्त्विक भावाचे रोमांच उभे राहिले नाहींत आणि प्रेमानें डोळे सजल झाले नाहींत ।। १ ।। अशा स्थितींत मला हरिभक्तीसुखाचा अनुभव झाला आहे अशी वल्गना करणारे दांभिक भक्त. हे शुद्ध इहपरलोकीं असत्यवादी होत ।। २ ।। हे देवराया, माझ्याकडून तुमची सर्व भावानें सेवा घडेल असें भक्तीप्रेमसुख द्या ।। ३ ।। कानानें

तुमच्या नामाचें श्रवण होत असतांहि मुखानें जो संसाराच्या वल्गना करीत असेल अशांना तुमच्या प्रेमसुखाची गोडी लागली नाहीं हें निश्चित समजावें. ॥ ४ ॥ मुखानें नामोच्चार करा असें त्यास सांगत असतांहि जो तुमच्या नामासी बहिर्मुख झाला आहे असा इरसाल माणूस स्वत: होऊन तुमचें नाम कसा घेईल ? ॥ ५ ॥ डबक्यांतील बेड कुळचा आपल्या जिव्हेनें डराव डराव करितात तद्वत् हा मूर्ख मनुष्य तुमच्या पवित्र नामाचा त्याग करून राजादिकांच्या गोष्टी करितो ॥ ६ ॥ एकाद्या देवतेची मूर्ति असो कां संत महंत असो यांना सन्मुख पहात असतांहि त्यांना प्रेमानें साष्टांग नमस्कार करण्याची त्यांच्या ठिकाणीं प्रवृत्ती नसते ॥ ७ ॥ त्यांच्या पायाची माती आपल्या मस्तकाला न लावतां फक्त त्यांच्याकडे टकमक पहात असतो जसा कां तो शेतांतील बुजगावणेंच होय ॥८॥ जगामध्यें अशींहि कांहीं मूर्ख माणसें आहेत कीं त्यांच्या हिताकरितां उपदेश केला असतां तो त्यांना तापदायक वाटतो ॥ ९ ॥ हे केशवराया, मी तुझ्याशिवाय दुसऱ्यांना न जाणणारा असा तुझा दीन गरीब भक्त आहें असें नामदेवराय म्हणतात ॥ १० ॥

पतीतपावन ब्रीद सोडवीन आतां । तरीच पंढरीनाथा दास तुझा ॥ १ ॥ माझे गुणदोष न धरावे मनीं । तारिले मजहुनि वंद्य कोण ॥ २ ॥ पितीया पतन स्वामिची करणी । गणीका विमानीं कीर्ति कोण ॥ ३ ॥ अजामेळा अधिकार जावया वैकुंठा । माझीया अदृष्टा काय झालें ॥ ४ ॥ शिशुपालें शिव्या दिधल्या सभे आंत । त्यांहुनि पतित थोर झालों ॥ ५ ॥ नामा म्हणे पुढती न बोलें मी वर्म । अनुभवोनि प्रेम देईं मज ॥ ६ ॥

(४८५) हे पंढरीनाथा, 'पतितपावन' अशा कीर्तीचा तुमच्याकडून त्याग करवीन तरच मी तुमचा भक्त खरा ॥ १ ॥ आतांपर्यंत ज्यांचा तुम्ही उद्धार केला आहे ते माझ्यापेक्षां वंद्य होते काय ? तेव्हां माझ्या गुणदोषांचा विचार तुम्ही आपल्या मनावर घेऊं नका ॥ २ ॥ अलौकिक कीर्ती-

वान असे श्रीराम प्रभूराय त्यांच्या वडिलांचें पतन व्हावे आणि जार कर्मीत निपूण अशी गणिका तिला स्वर्गस्थ विमान मिळून तिची कीर्ति व्हावी ॥३॥ अहो स्वामीराय, अशी ही तुमची कृती होय. अजामेळासारख्या पापी पुरुषालाहि तुम्ही वैकुंठाचा अधिकारी केला ना ? आणि माझ्याच प्रारब्धांत असें काय लिहिलें आहे ? ॥ ४ ॥ शिशुपाळानें तुम्हांला भर सभेंत हजार शिव्या दिल्या ना ? मी त्यापेक्षां का अधिक पापी झालों ? ॥ ५ ॥ तुमच्या अशा वर्मा–न्यूनकृतीसंबंधी जास्त भाषण करीत नाहीं. तुम्ही माझ्या अंतःकरणांतील भावनेची प्रत्यक्ष प्रचीत घेऊन तुमचे प्रेम सुख मला द्या असे नामदेवराय म्हणतात ।। ६ ॥

आणिक न मागें हें ब्रीद साजे चातका । भूमीच्या उदका न खालवी माथा ॥ १ ॥ आणिका पुढें न गाय हें ब्रीद साजे कोकिळीचे । वसंतऋतु स्वयें आळवितसे ॥ २ ॥ आणिकापुढें न नाचे ब्रीद साजे मयूरा । वर्षला घन सारा वळोनियां ॥ ३ ॥ एका लक्ष्मीपति वांचुनि न बैसे आणिकापुढें । हे ब्रीद साजे रोकडें गरुडासी ॥ ४ ॥ आणिकाचा पांगिला न करीं गा हेवा । नामा म्हणे केशवा रंक तुझा ॥ ५ ॥

(४८६) पृथ्वीवर पाणी कितीहि असो तें घेण्याकरितां मान खाली न करणें अथवा दुसरे कांहीं न मागणें हे ब्रिदभूषण चातकालाच शोभते ॥१॥ दुसऱ्यापुढें न गाणें हें भूषण जो वसंतऋतूमध्यें स्वयं होऊन गाणारा कोकीळ त्यालाच शोभतें ॥ २ ॥ दुसऱ्यापुढें न नाचणें हें भूषण जो वर्षाऋतुमध्यें घन गर्जना करणाऱ्या–मेघानें नाचणाऱ्या मयूराला शोभतें ॥ ३ ॥ लक्ष्मीचा पती जो विष्णु भगवान त्याच्या शिवाय अन्याच्या सन्मुख न बसणें हे ब्रिद गरुडालाच शोभते ॥ ४ ॥ हे केशवा मी तुझा गरिब दास आहे तेव्हां तुम्ही मला दुसऱ्याचा सेवक करूं नका असें नामदेवराय म्हणतात ॥ ५ ॥

काय देतीळ ते नर । जंव दिलें नाहीं रघुवीरें ॥ १ ॥ आजि दिलें उद्यां नाहीं । ऐसियासी मागों कांहीं ॥ २ ॥ हातें पसरूं ऐसें

धुरे । दिलें कल्पांतीं न सरे ॥ ३ ॥ नामा म्हणे देवाधिदेव । समर्थ दाता पंढरीराव ॥ ४ ॥

(४८७) श्रीराम प्रभूरायानें जोपर्यंत पूर्ण कृपा केली नाहीं तोपर्यंत इतर पामर लोक संसाराचे झालेले पाईक जीव ते तुम्हाला काय देऊं शकतील? ॥१॥ ज्यांच्या आजच्या दिलेल्या दामाचें शिल्लक उद्या रहाणार नाहीं अशा क्षुद्राकडे कोणती मागणी करावी ? ॥ २ ॥ ज्यांच्या दान दिलेल्या वस्तूचा कल्पपर्यंत तुटवडा पडणार नाहीं अशा थोरांपुढें हात पसरणें क्षम्य आहे ॥ ३ ॥ देवाधिदेव जो पंढरीराय हेच समर्थ दातृत्ववान आहेत असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

माझें मागणें तें किती । दाता लक्ष्मीचा पती ॥ १ ॥ मेघ वर्षे शिळा धारी । तेथें चातक चंचुभरी ॥ २ ॥ महाडोह गंगाजळ तृप्त एखादा अंजुळ ॥ ३ ॥ साखरेची साठी । तेथें मुंगीची मुखवटी ॥ ४ ॥ नामा म्हणे मी सेवेसी । तूं तो उदाराचा राशी ॥ ५ ॥

(४८८) माझा दाता जो पंढरीराय ज्याच्या येथें अणिमादि सिद्धी कामासी आहेत असा लक्ष्मीचा पति आणि तेथें माझी याचना ती काय ? ॥ १ ॥ मेघ पहातां मोठमोठ्या शिळेसारख्या धारेचा वर्षाव करणारा आणि तेथे तृषित चातकाला फक्त त्याच्या चोंचीभर पाण्याची आवश्यकता असते ॥ २ ॥ महाडोहासारखी अशी सजल गंगा तेथें मात्र तृषिताला त्याची तृष्णा दूर होण्याकरितां फक्त एक दोन ओंजळभर पाण्याची गरज असते ॥ ३ ॥ साखरेचा सांठा गोण्याच्या गोण्या भरून असोत परंतु मुंगीला फक्त तिच्या मुखापुरती पुष्कळ होते ॥ ४ ॥ हे देवराया, आपण पहातां जणूं काय उदाराच्या राशीच अहांत आणि मी फक्त आपल्या सेवेचा अधिकारी आहे असें नामदेवराय म्हणतात ॥ ५ ॥

माझें व्रत एक चालवी विठ्ठला । सकळां घटीं तुला देखें ऐसें ॥ १ ॥ तेव्हां माझें चित्त पावे समाधानें । नाहीं तरी जिणें काय व्यर्थ ॥ २ ॥ तुझी कास आणि बुडे महापुरीं । ऐसें होतां हरी लाज

कोणा? ॥ ३ ॥ मागितलें फार तुज काय देवा । नको बा केशवा मी-तूंपण ॥ ४ ॥ नामा म्हणे माझा कैवारि सबळ । असोनिया काळ भोगूं कशा ॥ ५ ॥

(४८९) हे विठ्ठल या सर्व भूतमात्रांमध्यें तुला पहावे हा माझा केलेला नियम पूर्णतेस ने ॥ १ ॥ तेव्हांच माझ्या चित्ताला आनंद होणार आहे. त्याशिवाय माझा जन्म व्यर्थ होय असें मला वाटतें ॥२॥ हे हरि, तुझा आश्रय असतांना मी या भवसागरांत कां रत व्हावें ? असा प्रकार होण्यांत कोणाला कमीपणा येईल बरें ? ॥ ३ ॥ हे केशवराया, मी तूं हा भेद माझ्या ठिकाणी शेष ठेवूं नकोस हे देवराया, मी तुम्हांला यापेक्षां अशी कोणती मोठी मागणी केली आहे ? ॥ ४ ॥ तूं माझा पाठीराखा समर्थ असल्यानें मी कां म्हणून दुःख भोगावें ? असें नामदेवराय म्हणतात ॥ ५ ॥

मनुष्य करिसी तरी भक्तीचेनि मिषें । तुझे द्वारीं वसें ऐसें करीं ॥ १ ॥ श्वान करिसी तरी उच्छिष्टाचेनि मिषें । तुझे द्वारीं वसे ऐसें करीं ॥ २ ॥ पक्षि करिसी तरी चारियाचेनि मिषें । तुझे द्वारी वसे ऐसें करीं ॥ ३ ॥ झाड करिसी तरी तुळसीचे नि मिषे । तुझे द्वारी वसें ऐसें करीं ॥ ४ ॥ वृक्ष करसी तरी मंडप मखाचेनि मिषें । तुझे द्वारी वसे ऐसें करीं ॥ ५ ॥ पाषाण करिसी तरी रंग शिळेचेनि मिषें तुझें द्वारीं वसे ऐसें करीं ॥ ६ ॥ उदक करिसी तरी सडियाचेनि मिषें । तुझे द्वारीं वसे ऐसें करीं ॥ ७ ॥ नामा म्हणे विठो कीर्तनाचेनि मिषें । तुझे द्वारीं वसे ऐसें करीं ॥ ८ ॥

(४९०) भक्तीच्या निमित्तानें तुमच्या द्वारांत नित्य वास घडेल असा मनुष्य देह द्या ॥ १ ॥ उच्छिष्ट सेवनाच्या निमित्तानें तुमच्या द्वारांत वास्तव्य होईल असा कुत्र्याचा जन्म द्या ॥ २ ॥ तुमच्या अंगणांतील चारा खाण्याच्या निमित्त अशा पक्षाचा जन्म मला द्या ॥ ३ ॥ तुमच्या अंगणांत नित्य असणाऱ्या अशा तुळशीच्या झाडाचा मला जन्म द्या॥४॥मंडप व मेखला

या रूपानें तुमच्या येथें माझें वास्तव्य होईल अशा वृक्षाचा जन्म द्या ॥ ५ ॥ तुम्हांला मला दगड करणें असेल तर तुमच्या देवळाच्या पायरीच्या निमित्तानें करा त्यायोगें तुमच्या येथें माझें वास्तव्य होईल ॥ ६ ॥ सडासंमार्जन अशा-रुपानें मला पाणी करा. परंतु तुमच्या येथें माझें वास्तव्य करा ॥ ७ ॥ कीर्तनाच्या रूपानें तुमच्या द्वारीं मला उभे करा. परंतु तेथील रहिवासी करा; असें नामदेवराय म्हणतात ॥ ८ ॥

काय मागूं विठ्ठल धुरे । एक तुळशीदळ पुरे ॥ १ ॥ मागूं मुगुट माथाचा । तरी तो आणला इंद्राचा ॥ २ ॥ मागूं कुंडलें कर्णींचीं । तरी तीं आणिलीं कर्णाचीं॥३॥मागूं पितांबर शेला । तरी तो कासेसी कसिला ॥ ४ ॥ मागूं पादुका चरणींच्या । तरी त्या आणिल्या शेषाच्या ॥५॥ मागूं तोडर पायींचा । धाक जाईल असुरांचा ॥६॥ मागूं जातां लक्ष्मीसी । ऋद्धि सिद्धी तिच्या दासी ॥ ७ ॥ मागूं म्हणे शंख जरी । तरी तो मिरवे तुमच्या करीं ॥८॥ मागों सुदर्शन दळ । त्या शस्त्राचें तुम्हां बळ ॥ ९ ॥ मागों वैजयंतीमाळ । तरी शून्य दिसेल वक्षस्थळ ॥ १० ॥ कारण तेंचि मागितलें । नामया केशवाचें प्रेम दिलें ॥ ११ ॥ नामा म्हणे कांहीं न मागों । तुझे चरणीं लक्ष लागो ॥ १२ ॥

(४९१) हे श्रेष्ठ विट्ठला, तुझ्याजवळ कोणत्या अशा बहुमोल वस्तूची मागणी करावी ? तुमच्याकडून फक्त तुळशीचें पान मिळालें असतां त्यामध्यें मला समाधान आहे ॥ १ ॥ तुमच्या मस्तकावर असलेल्या मुकुटाची मागणी करावी ? तो तुम्ही इंद्राकडून मागणी करून आणला ना ? ॥ २ ॥ तुमच्या कानाला भूषणस्पद असलेलीं कुंडलें मागावीं ! परंतु तीं तुम्ही कर्णापासून आणलीं ना ? ॥ ३ ॥ तुमच्या असलेल्या पीतांबर शेल्याची मागणी करावी ! ती तुम्ही आपल्या कमरेला कसली आहांत ॥ ४ ॥ तुमच्या पायाच्या पादुकाची मागणी करावी, ती तुम्ही शेषापासून आणलेली आहे ॥ ५ ॥ तुमच्या पायांतील तोडर–तोडऱ्याची मागणी करावी . व कदाचित तुम्ही प्रसन्न होऊन ती तुम्हीं मला दिली परंतु त्यायोगें दैत्य हे निरां-

कुश होतील त्यांना कोणाचाहि धाक रहाणार नाहीं ।। ६ ।। लक्ष्मीमातेची मागणी करण्यास जावें तों त्या रिद्धीसिद्धीच्या हक्कदारीण होत ।। ७ ।। शंख मागावा तो तुमच्या हाताला शोभा देणारा आहे ।। ८ ।। सुदर्शन-चक्राची मागणी करावी परंतु त्यायोगेंच तुम्ही सामर्थ्यवान झालां आहांत ना ? ।। ९ ।। वैजयंतीमाळेची मागणी करावी तों तिच्याअभावीं तुमचें वक्षस्थळ हें सुनाट दिसेल ।। १० ।। आणि म्हणून मी तुमच्याजवळ मुल्य आणि पवित्र अशा वस्तूची (तुळसीदलाची) मागणी केली म्हणून या केशवरायानें नामयाला आपलें प्रेम दिलें ।। ११ ।। मी आपल्याजवळ दुसऱ्या कोणत्याच वस्तूची मागणी करणार नाहीं. फक्त हे देवराया, तुमच्या पायाकडे सतत लक्ष असावें असें नामदेवराय म्हणतात ।। १२ ।।

देव देवी देवतार्चन । तूंचि माझें पूर्णपण ।। १ ।। न मागे न मागें विठ्ठला । येथूनियां राहें उगला ।। २ ।। तुझी भक्ति हेंचि गोड आणिक आम्हां नाहीं चाड ।। ३ ।। जप तप नेम निष्ठा । तुजचि जाणों गा वैकुंठा ।। ४ ।। यज्ञ याग मंत्र तंत्र । तूंचि आमुचें कुळगोत्र ।। ५ ।। येथूनि पंढरिराय हरी । आम्हांसि तूं अंगिकारी ।। ६ ।। आम्ही करितों कीर्तन । तारावे हे तुवां जन ।। ७ ।। हेंचि मागणें हो देवा । नामा म्हणे घ्यावी सेवा ।। ८ ।।

(४९२) देव देवी आणि त्यांचें पूजासाहित्य या सर्व रूपानें तूंच माझा आहेस ।। १ ।। हे विठ्ठलराया ! तुझ्याकडे मी कोणतीच मागणी करणार नाहीं असें द्विरुक्तीनें सांगतों आतां यापुढें तूं शांत रहा ।। २ ।। भक्ती हीच आम्हाला प्रिय आहे. तिच्याशिवाय आम्हाला कोणतीच अपेक्षा नाहीं ।। ३ ।। हे वैकुंठराया, जपतप नेम व निष्ठा इत्यादि साधन रूपाने तुलाच आम्ही जाणतों ।। ४ ।। तूंच आमचें कुळगोत्र असून यज्ञयाग, मंत्र आणि तंत्र तूंच आहेस ।। ५ ।। हे पंढरीराया हरी; यापुढे तूंच आमचा अंगीकार कर ।। ६ ।। कीर्तन करणें हे आमचें कर्तव्य आहे आणि जगाचा उद्धार करणें हा आपला अधिकार आहे ।। ७ ।। हे देवा आपण आमच्याकडून सेवा करून घ्यावी हीच आमची मागणी आहे असें नामदेवराय म्हणतात ।। ८ ।।

भावें तुझे चरण धरिले विठ्ठला। आतां तूं पांगिला करूं नको ॥ १ ॥ नलगे मज कांहीं ऋद्धि सिद्धी पाहीं। मुक्तिसुख तेंहि नलगे मज॥ २ ॥ नामा म्हणे मज जन्म दे अनंता। भक्तिविरहिता जन्म नको ॥ ३ ॥

(४९३) अहो विठ्ठलराया ! मी अत्यंत विश्वासानें तुमच्या चरणांकित झालो आहे तेव्हां आतां तुम्ही मला निराधार करूं नका ॥ १ ॥ अष्ट महासिद्धी असो अथवा सलोकादिक चतुर्विध मुक्त्या असोत यांची मला किमपिहि चाड नाहीं ॥ २ ॥ वारंवार जन्म घेण्यांत त्यांची मला खंत वाटत नाहीं. मात्र तो जन्म तुमच्या भक्तिविरहित नसावा हीच तुमच्या जवळ माझी मागणी आहे असें नामदेवराय म्हणतात ॥ ३ ॥

मुक्तिपद मी गा अभिलाषीन चित्तीं। ह्मणीं अंतरती पाय तुझे ॥ १ ॥ निर्वासना चित्तें भजन तझें करितां। ह्मणीं सायुज्यता देसी मज ॥ २ ॥ मग मी काय करूं वैकुंठनायका। ऐशा प्रेमसुखा कोठें पाहों ॥ ३ ॥ ध्यान सुखें करूं पाहे हृदयकमळीं। पक्षिणी ऐसी आळी करिशी ह्मणी ॥ ४ ॥ संकल्पें यावें वाटे चरणा जवळी। विकल्प काजळी ह्मणीं देशी ॥ ५ ॥ नामा म्हणे आतां कांहींच मी न करी। मज होत कोटीवरी गर्भवास ॥ ६ ॥

(४९४) तुम्ही समर्थ असल्यानें मुक्तीपदहि आपण मला देऊं शकाल ! परंतु त्याची मी इच्छा केली असतां तुमच्या चरणसेवेमध्यें अंतराय घडेल ॥ १ ॥ निरीच्छ अशा चित्तानें तुमचें भजन केले असतां कदाचित् तुम्ही मला सायुज्यपदाचेहि अधिकारी करूं शकाल ॥ २ ॥ हे वैकुंठनायका ! मी त्या मोक्षसुखाचा कोणता उपयोग करावा ? आणि या प्रेमसुखाला कोठें पहावें ? ॥ ३ ॥ माझ्या हृदयकमळामध्यें असलेल्या तुमच्या मूर्तीचें ध्यान केलें असतां भृंगकीटक न्यायानें तुम्ही मला आपलेसें कराल ? ॥ ४ ॥ तुझ्या पायाजवळ सतत असावें असा संकल्प आहे हें खरें म्हणून

तेथें विकल्पाची काजळी येऊं देऊं नकोस ॥ ५ ॥ हे देवराया मी आतां कांहींच करणार नाहीं आणि अशा कर्तृत्व स्थितींत असतां मला कोटचावधी गर्भवासादिक घडेना कां असें नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

वाणी गांधिपण पाही पसारा । घेवोनि संसारा आलों असे ॥ १ ॥ पसारे करी पसारे करी । वायां उभाराउभारी करीतसें ॥ २ ॥ रस रसायण आणि भाजीपाला । शकुन आम्हां झाला पुरता आहे ॥ ३ ॥ वाटे एक खोटे दांडीचें पां नेटें । कवणें परी न फिटें कुडेंपण ॥ ४ ॥ बोलतां पैं खोटे देतात पैं उणें । वायांच शिणें रात्रंदिवस ॥ ५ ॥ विष्णुदास नामा विनवी केशवा । तेहि परी देवा उद्धरावें ॥ ६ ॥

(४९५) ज्याप्रमाणें गांधी– औषधी द्रव्यें विकणारा आपला पसारा घेऊन या संसारांत दुकान थाटतो ॥ १ ॥ गांधी हा धंद्यावर धदे करून व्यापार करितो ॥ २ ॥ त्याच्या दुकानांत असलेले रस, रसायन आपण भाजीपाला हा आम्हांला जणूं काय उत्तम शकुन झाला ॥ ३ ॥ त्यांची दांडी पहातां उत्तम वाटतें परंतु त्यामध्यें त्याचा खोटेपणा–हातचलाखी असते. कारण त्यांची वाणिज्य संस्कार नष्ट होत नाहीं ॥ ४ ॥ बोलण्यांतहि खोटेपणा आणि त्यांच्या माल देण्यांतहि कमीपणा असतो. तो रात्रंदिवस असा व्यर्थ खटाटोप करितो ॥ ५ ॥ हे केशवा ! गांधीप्रमाणें माझी स्थिती झाली आहे. तरी आपण अशाचाहि उद्धार करावा असें नामदेवराय म्हण तात ॥ ६ ॥

तुझे चरणी सुख अनुपम्य आहे । हे तूं जाणसी काय पांडुरंगा ॥ १ ॥ आम्हां व्हावें तेंचि एकांतें मागावें नकळे जीवें भावें ब्रह्मादिकां ॥ २ ॥ चतुरां शिरोमणी आमुचि जननी । जाणते रुक्मिणी जीवन कळा जी ॥ ३ ॥ चरणींचा प्रताप जाणे गौतमवधु । जे कां श्रापें बद्ध मुक्तशिळा ॥ ४ ॥ चरणींचा प्रताप जाणती वैष्णव । नल कुबेर

मणिग्रीव सखे माझे ॥ ५ ॥ नामा म्हणे तुझे चरणींची त्रिपथा । भूषण उमाकान्ता ऐसें झालें ॥ ६ ॥

(४९६) हे पांडुरंगा, तुमच्या चरणाच्या ठायीं जें उपमारहित सुख आहे त्याची कां तुम्हाला जाणीव आहे? ॥१॥ ज्या वस्तूची आम्हाला आवश्यकता आहे त्याची तुम्हा एकट्याजवळ एकांतांत मागणी करावी, ज्या सुखाचें ज्ञान ब्रम्हादिकांनाहि पूर्णपणें नाहीं ॥ २ ॥ चातुर्यामध्यें निपुण अशी जो श्रेष्ठ आमची रुक्मिणी माता तीच तुमच्या या जीवनकलेला पूर्णपणें जाणते ॥ ३ ॥ गौतम ऋषीच्या शापानें शिळा झालेली जी त्याची स्त्री अहिल्याबाई व जिचा उद्धार तुमच्या पदकमलानें झाला तीच तुमच्या चरणाचें महत्त्व जाणते ॥ ४ ॥ माझे प्रियकर आणि वैष्णवामध्यें अग्रगण्य असे जे नळ कुबेर मणीग्रीवादिक हेच तुमच्या चरणाचा प्रताप जाणतात ॥ ५ ॥ तुमच्या चरणापासून निघालेली आणि जी स्वर्ग मृत्यु पाताळ या त्रयलोकांमध्यें गमन करून सर्वांना पावन करिते व शंकरानें जिला मस्तकावर धारण करून भूषणस्पद झालें अशी जी पवित्र गंगा तिलाच तुमच्या चरणाचें महत्त्व पूर्णपणें उमगलें असें नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

नामदेवरायाचें आत्मनिवेदन आणि ईशकृपादान.

देहाभिमानें पुरविली पाठी । कांहीं जगजेठी नये कृपा ॥ १ ॥
सुखासाठीं स्तुति करी ब्रह्मा । व्याघा निजधामा स्थिरपद ॥ २ ॥
काय करतसे मातृपितृभक्ति । तया जगत्पति नाचतसे ॥ ३ ॥
नाचती वैकुंठीं सर्व ऋषेश्वर । नामा म्हणे पार नाहीं नाहीं ॥ ४ ॥

(४९७) अहो जगजेठी–जगन्नियंत्या देहाभिमानानें माझा पाठपुरावा केला असतां तुम्हाला माझी करुणा अद्याप कां येत नाहीं ॥ १ ॥ तुमच्या नाभीकमळांतून जन्मलेला ब्रम्हदेव हा सुखाकरितां तुमचा स्तुतिपाठक झाला आणि ज्यानी बाणें करून तुमचा वध केला त्यास अचल अशा निजधामास पाठविलें ॥२॥ हे जगत्पति; पुंडलिकराय हा कां तुमची सेवा करित होता? तो पहातां आपल्या माता-पित्याची भक्ति करीत असे. परंतु त्याच्या

करितां तुम्हाला उल्हास वाटून नाचूं लागलां ना ? ।। ३ ।। वैकुंठस्थ सर्व ऋषीश्वर हे आनंदानें नाचतात. तुमच्या लीलेला आदि ना अंत असें नामदेव-राय म्हणतात ।। ४ ।।

पूर्ण कृपा केली देवा । दिधली पादपद्मसेवा ।।१।। पापें पळालीं पळालीं । नामकीर्तन कल्लोळीं ।। २ ।। द्वारीं तुळसी वृंदावन । अखंड नाम संकीर्तन ।। ३ ।। रंगमाळा जागरणीं । तेथे मुक्ति वाहती पाणी ।। ४ ।। जन्म वैष्णवकुळीं व्हावा । घडो संतांचिये सेवा ।। ५ ।। नामदेवाची आवडी । संतचरणीं देतो बुडी ।। ६ ।।

(४९८) अहो देवराया! आपल्या कमलासारख्या पायांच्या सेवेचा मला अधिकारी केलें आहे ही आपली माझ्यावर पूर्ण कृपा होय ।।१।। तुमच्या नामसंकीर्तनानें सर्व पापांनी पलायन केले ।। २ ।। ज्याच्या द्वारापुढे तुळ-सीचें वृंदावन आहे आणि जेथें अखंड नामसंकीर्तन होत आहे ।। ३ ।। ज्यांच्या घरापुढे रांगोळया घातल्या आहेत व जेथें जागर होत आहे तेथें चारी मुक्ति ह्या सतत राबतात ।। ४ ।। वैष्णवांच्या कुळीं जन्म व्हावा आणि सतत संतांची सेवा घडावी ।। ५ ।। नामदेवरायांची सतत ही आवड असल्यानें तो संतचरणीं प्रेमानें समरस झाला आहे ।। ६ ।।

जनार्दन कृपाळुवा हृषीकेशा । पुराणपुरुषा तुज नमों ।। १ ।। अभिज्ञा क्षेत्रज्ञा अचिंत्या कूटस्था । त्रैलोक्याच्या नाथा तुज नमों ।। २ ।। अनंत ब्रह्मांडें तुझिया उदरीं । मेघःश्यामा हरी तुज नमों ।।३।। देवरस्या तुझें कोमळ हृदय । कृपादृष्टी पाहें मजकडे ।। ४ ।। तुझा मी किंकर आहे वसुदेवा । अभय या जीवा देईं आतां ।। ५ ।। नामा म्हणे घालीं चरणासी मिठी । बोले जगजेठी स्वामी माझा ।।६।।

(४९९) जनार्दना, कृपासागरा, हृषीकेशा, पुराणपुरुषा तुम्हांला माझें नमन असो ।। १ ।। सर्वज्ञा, क्षेत्रज्ञा, अचिंत्या-कूटस्थ-आत्मया आणि तिन्ही लोकांचा स्वामी अशा तुम्हाला माझें नमन असो ।। २ ।। ज्याच्या

पोटामध्यें अनंत ब्रम्हांडे स्थित आहेत अशा मेघश्यामा हरि तुम्हांला माझें नमन असो ॥ ३ ॥ हे देवराया, तुमचें हृदय अति मृदु आहेना ? तेव्हां तुम्ही माझ्याकडे कृपादृष्टीनें अवलोकन करा ॥ ४ ॥ हे वासुदेवा, तुझा मी दास आहें तेव्हां आतां मला आपण अभय द्या ॥ ५ ॥ माझ्या पायाला प्रेममिठी घाल असे माझे स्वामी जगजेठी म्हणाले असे नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

तुझ भक्तिसुख द्यावें मज प्रेम । वसो तुझें नाम माझे मुखीं ॥ १ ॥ सद्भक्ति विचार राहो माझे चित्तीं । हेंचि कृपामूर्ति द्यावें मज ॥ २ ॥ तुझा दास जनीं म्हणवितों विख्यात । पसरिला हात फिरवूं नको ॥ ३ ॥ नामा म्हणे देवा इतुकें द्यावें मज । ऐकोनि केशवराज काय बोले ॥ ४ ॥

(५००) हे कृपामूर्ति, तुझें भक्ति प्रेम सुख मला द्या आणि माझ्या मुखामध्यें तुझें नाम सतत वसो ॥ १ ॥ माझ्या चित्तामध्यें सद्भक्तीचा विचार जागृत राहो हेंच मला कृपादान द्या ॥ २ ॥ या जगामध्यें मी तुझा दास आहें अशी माझी प्रसिद्धी आहेना ? तेव्हां मी तुझ्यापुढें माझा पसरलेला हात तो रिक्तपणें मागें होऊं देऊं नका ॥ ३ ॥ हे देवराया, माझी ही येवढीच तुझ्याजवळ मागणी आहे. केशवराजाने ही विनती श्रवण करून काय म्हणाले (तें ऐका) असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

शंख चक्र गदा पद्मेसि अंकित । मी तुम्हां सांगात निरंतर ॥ १ ॥ जिकडे जाल तिकडे मी तुमच्या सांगाति । तुम्हांविण संपत्ति आणिक नाहीं ॥ २ ॥ संसाराचें ओझें पडों नेदीं कोणतें । या वैष्णवा सांगातें निरंतर ॥ ३ ॥ आसनीं शयनीं ध्यानीं मज मनीं ; योगक्षेम दोन्हीं वाहे त्यांचे ॥ ४ ॥ जें मज आवडे तें तुमचिये घरीं म्हणोनि तुमचे द्वारीं तिष्ठतसें ॥ ५ ॥ विठोबा म्हणे नामा न विसंबें मातें । हेंचि वर्म तूतें सांगितलें ॥ ६ ॥

(५०१) मी माझ्या चारी हातामध्यें शंख, चक्र, गदा, आणि पद्म, धारण करून मी तुमच्या संगतीमध्यें सतत असतों ॥ १ ॥ अहो भक्तांनों जेथें तुम्ही संचार करीत असतां तेथें मी तुमच्या बरोबर छायेसारखा सतत असतों. तुमच्याशिवाय माझ्या जवळ कोणतेंच ऐश्वर्य नाहीं ॥ २ ॥ मी या वैष्णवांच्या संगतीमध्यें असल्याने त्यांच्या संसाराचा बोजा कोणावरहि पडूं देत नाहीं ॥ ३ ॥ आसनस्थ असो कां झोंपेंत असो जे भक्त आपल्या मनामध्यें अखंड माझें ध्यान करितात त्यांच्या योगक्षेमाची चिंता मला असते ॥ ४ ॥ ज्या 'प्रेमाची' मला आवड आहे तें प्रेम तुमच्या येथें असल्यानें मी तुमच्या द्वारीं सतत वास्तव्य करितो ॥ ५ ॥ हे नामया, माझा विसर केव्हांहि पडूं देऊं नकोस. माझ्या प्राप्तीचें हें वर्म मी तुला स्पष्ट सांगितलें असें विठ्ठलराय म्हणतात ॥ ६ ॥

घें घें नाम्या दिलें माझें प्रेम । घोकीं माझें नाम सर्वकाळ ॥१॥ शिरावरीं हात ठेवितसे माझ्या अभिमान तुझा गेला म्हणूनि ॥२॥ भक्तिसुख देवें दिलें नामयातें । नामा परमामृतें तृप्त झाला ॥ ३ ॥ नामा म्हणे देवा झालों मी पावन । माझें तुजविण कोण आहे ॥४॥

(५०२) नामदेवरायाच्या प्रेमळ मागणीच्या पूर्ततेकरितां देवराय इतके उतावीळ झाले कीं घे घे-हे नामया ज्या प्रेमाची तूं मागणी केली आहेस त्या संपूर्ण प्रेमाचे तुला वारसदार केलें आहे. आतां माझ्या नामाचा तूं सतत प्रेमाने घोष कर ॥ १ ॥ आतां तुझा अभिमान दग्ध झाल्याचें पाहून माझा हात तुझ्या मस्तकावर ठेवीत आहे ॥ २ ॥ देवरायांनीं नामदेवरायांना भक्ति प्रेम सुखाचा सर्वाधिकारी केल्याने नामदेवराय परमामृतानें अत्यंत संतोषित झाले ॥ ३ ॥ हे देवराया आतां मी कृतकृत्य झालो आहे. तुझ्याशिवाय मला दुसरें कोण आहे बरें असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

अपराधी तरी केला अंगिकार । कासया विचार तुज माजीं ॥ १ ॥ लोहो होतें परि परिस संगति । तैसा तूं श्रीपती जगामाजी ॥ २ ॥ घुसाळिता रवी नेणे लाभ हानि । तैसें चक्रपाणी होऊं नये ॥ ३ ॥ हीन दीन सर्व तुझाच आधार । नामा म्हणे सार हेंचि आतां ॥ ४ ॥

(५०३) मी सर्वस्वी अपराधी आहे. तुम्हाला याची जाणीव असताहि तुम्ही मला अ य दिला ना ! आतां हो कोणता विचार माझ्यासंबंधी तुमच्या ठायीं उद्भवला ॥ १ ॥ लोखंड खरें, परंतु त्याला परिसाची संगती घडावी तद्वत् हे श्रीपति तूं या जगामध्यें परिसासारखा आहेस ॥ २ ॥ हे श्रीपति रवि ही ताक घुसळीत असतां तिला ज्याप्रमाणें लाभ अथवा हानीचा संपर्क नसतो तसें तुम्ही माझ्यासंबंधी उदासीन राहूं नका ॥ ३ ॥ मी हीन व गरीब आहे हें खरें परंतु तुमचाच मला सर्वस्वी आधार आहे आणि हेंच माझें सांगण्याचें रहस्य आहे असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

मायबापां परीस लोभ तुझा हरी ।-आहे मजवरी केशिराजा ॥ १ ॥ आता जाणसी तें कपाळुशा करीं । लाज सर्व आहे हरी तुज ॥ २ ॥ माझे याति कुळ नाहीं त्वां पाहीलें । अन्याय साहिले कोट्यान कोटी ॥ ३ ॥ जन्मोजन्मीं मज घातले पाठिसी । संकटीं राखिसी नारायणा ॥ ४ ॥ देऊनि प्रेम भातें पाळिलें पैं माते । साऊली तळहातें केली देवा ॥ ५ ॥ जे खूण जाणती तेचि माझे सखे । मी तुझें लाडके म्हणवीं देवा ॥ ६ ॥ नामा म्हणे कांहीं होऊनी उतराई । पुढें जन्म नाही ऐसें करी ॥ ७ ॥

(५०४) हे केशिराजा हरि तुमचें माझ्यावरचें प्रेम हे आई–बापापेक्षांहि जास्त आहे ॥ १ ॥ हे हरि तुम्हाला माझी लाज व चिंता असल्यानें कृपाळू होऊन तुमच्या सद्सद्बुद्धीला पटल असें करा ॥ २ ॥ आपण माझ्या जाती अथवा कुळीकडे दुर्लक्ष करून माझे आपण कोट्यवधी अपराध सहन केले-पोटांत घातले ॥ ३ ॥ हे नारायणा, आपण मला जन्मोजन्मी पाठीसी घालून सरक्षण दिले व अनेक संकटांतून मुक्त केलें ॥ ४ ॥ हें देवराया, आपण मला प्रेमाचें खाद्य दिलें आणि जणूं काय आपण आपल्या तळहाताच्या साउलीनें माझें लालन पालन केले ॥ ५ ॥ तुमच्या अविरत असलेल्या प्रेमाची मख्खि–मर्म ज्यांना ज्ञात आहे तेच माझे प्रियकर होत मी तुझा आवडता आहे असे या संताकडून धन्योद्गार येऊं दे ॥ ६ ॥ पुनरपी

मला जन्ममरण होणार नाहीं. तुम्ही उतराई होऊन अशी कांहीं कृपाकरा असे नामदेवराय म्हणतात ॥ ७ ॥

दाही दिशा पाहतां दिसती निर्मळ । स्फुरण वक्षःस्थळ होत असे ॥ १ ॥ येईल माझा विठो देईल आलिंगन । जीवें निंबलोण करीन त्यासी ॥ २ ॥ प्रेमपूर भरतें सुखसिंधु लोटली । माऊली भेटली जिवलग ॥ ३ ॥ धरूनि हनुवटी सांगेल गुज गोष्टी । पाहील कृपादृष्टी माझे म्हणोनि ॥ ४ ॥ प्रीतीचे पडिभरे कुर्वाळील मज । सांगेल निज गुज संसाराचें ॥ ५ ॥ हर्षे निर्भर नामा निघाला निवाडे । नाचे संतांपुढें सांगेन गुज ॥ ६ ॥

(५०५) आज मला दाहि दिशा मंगलप्रद वाटत असून माझी छाती स्फुरण पावत आहे ॥ १ ॥ या शुभ शकुनावरून मला विश्वास वाटतो कीं माझा सखा विठ्ठलराय प्रत्यक्ष येऊन मला आलिंगन देईल आणि मीहि त्याच्यावरून जीवाभावानें निंबलोण करीन जीवभाव ओवाळीन ॥ २ ॥ माझी प्रेमळ माउली मला भेटल्यानें जणूं काय सुखसमुद्राला प्रेमाची भरतीच आली आहे असें प्रतीत होत आहे ॥ ३ ॥ आतां ही माउली प्रेमानें हनुवटी धरून ती माझ्याशीं हितगुजाच्या गोष्टी करील आणि हा माझा आहे असे समजून ती माझ्याकडे कृपादृष्टीनें पाहील ॥ ४ ॥ उत्कट प्रेमानें मला कुर्वाळून संसारातील गुज गोष्टी सांगेल ॥ ५ ॥ या अपेक्षा-इच्छा फलद्रूप होण्यानें नामयाला अत्यानंद होऊन समाधान पावला आणि तो आतां संतांपुढे नाचत नाचत माऊलीशीं झालेल्या प्रेमाच्या गोष्टी उल्हसीत मनानें प्रगट करील ॥ ६ ॥

निर्गुण गुणासी आलें । परब्रह्म ठसविलें । भक्त पुंडलिका लाधलें । गौप्य केलें प्रगट ॥ १ ॥ सेवा सेवा ब्रह्मरस । विठ्ठल पंढरीनिवास ॥ धु० ॥ निर्गुण गुणकार । मूर्ति सांवळी सुंदर । सकळही गुणांचें माहेर । मुक्ति पेठ पंढरी ॥ २ ॥ धन्य धन्य भीमातट । चंद्र-

भागा हे निकट । जेथे विठ्ठल वीर प्रगट । नाम गर्जती हरिदास ॥३॥ धन्य धन्य पद्माळे । सभराभरित आनंद जळे । स्नान केलिया निर्मळें । कोटी कुळें उद्धरलीं ॥ ४ ॥ धन्य धन्य माणदेश । विठ्ठलें केला रहिवास । नामा म्हणे विष्णुदास । देई उल्हास भक्तीचा॥५॥

(५०६.) श्रुति ज्यास निर्गुण असें बोधन करिते तेंच परब्रम्ह सगुण रूपानें अभिव्यक्त होऊन भक्त पुंडलिकरायांना प्राप्त झालें व त्यांनीं हें गुह्य प्रगट केले ॥ १ ॥ श्रीक्षेत्र पंढरपुरांत रहाणारा हा विठ्ठलराय जणूं काय ब्रम्हरसच होय. आवडीनें त्याचा स्वाद घ्या, अनुभव घ्या असें द्विरुक्तीनें सांगतो॥ ध्रु ॥ निर्गुण असलेलें ब्रम्हच श्यामसुंदर अशा मूर्त रूपानें आकारला आलें आहे. श्रीक्षेत्र पंढरी हें सर्व गुणांचें आश्रयस्थान असून ती जणूं काय मुक्तिपेठच होय ॥ २ ॥ धन्यधन्य तो भीमातट जो तीर्थ चंद्रभागेच्या समीप आहे; जेथे वीर विठ्ठलराय प्रगट झाले असून तेथें हरिदास हे नामाचा गजर करीत आहेत ॥ ३ ॥ धन्यधन्य तें पद्मतीर्थ जें आनंदजळानें पूर्ण भरलेलें आहे. तेथें स्नान केलें असतां तो पवित्र होऊन त्याची कोटयांवधी कुळें पावन होतात ॥४॥ धन्यधन्य तो मानदेश ज्या ठिकाणी विठ्ठलरायानें वास्तव्य केलें व जो भक्तीचें पोषण करितो असें विष्णुदास नामदेवराय म्हणतात ॥ ५ ॥

पंढरी माहेर विठ्ठल माऊली । धांवोनि हे बोली सांगावी जी॥१॥ संसार गांवीं लेंकीं असे तुमची । चिंता कां तियेची सांडियेली ॥२॥ सासुरवासिणी पहातसे वाट । सांगावे कष्ट विठोबा माउलीये ॥ ३ ॥ अव्हेर माझा असे अविचारू भावा । आशा तृष्णा लावा वाहिनी कां ॥ ४ ॥ एकलीये माते खेदती बहुतें । एकांतें तुमतें आठवीन ॥५॥ चांडाळी हे सासु तृष्णा पैं पापिणी । कांहीं केल्या धनी पुरों नेदी ॥ ६ ॥ रात्रंदिवस मज नाहीं कामाचा शेवट । जिवित्वाचा वीट येत असे ॥ ७ ॥ सखी सांगातिणी तिसी नाहीं भेटी । अज्ञान हें पोटीं वाढतसे ॥ ८ ॥ सुखाचे डोह दुःख कां नावडे । ऐसे कैंवि घडे तुजवीण ॥ ९ ॥ नवां ठायीं तरळली चोळी असे लेइली । आपुलिये

चांग अंगींची ते ।। १० ।। ती घाडी जों कां रूसलिये ऐसे सांगिजे तिजपाशीं । जेवीना कां भेटी वांचोनिया ।। ११ ।। चहूं पुरुषार्थीं नाहीं मज चाड । सेवेचें खाजें झडकरी मज पाठवावें ।। १२ ।। रखुमाई माता पांडुरंग पिता । मी त्याची दुहिता म्हणे नामा ।। १३ ।।

(५०७) माझें *माहेर पंढरीक्षेत्र तेथें माझी विठ्ठल आई रहाते. तिच्याकडे धांवत जाऊन माझा निरोप सांगा ।। १ ।। संसार गावांमधील मुलीविषयीं तुम्ही कां असे उदासीन झाला अहांत ।। २ ।। ती सासुरवासीण असल्यानें तिनें तुमचा धोसरा घेतला आहे. माझें साग्र दुःख माझ्या विठ्ठल माऊलीला सांगा ।। ३ ।। अविचार हा माझा भाऊ व आशा तृष्णा ह्या दोन बहिणी त्या जणूं काय राक्षसिणीच आहेत. त्या सतत माझा अव्हेर करितात ।। ४ ।। अशी मी एकटीच असल्यानें माझा कोंडमारा झाला आहे व एकांतामध्यें तुमचे चिंतन करित असते ।। ५ ।। तृष्णा ही सासू फार चांडाळीण आहे. ती मला उसंत घेऊं देत नाहीं ।। ६ ।। रात्रंदिवस कामाचा उपस करावा लागतो. त्यानें माझा जीव मेटाकुटीस आला आहे ।। ७ ।। येथें कांही माझ्या मैत्रिणी आहेत, त्यांची तर हे भेट घेऊ देत नाहींत. त्यायोगें माझें अंतःकरण अज्ञानग्रस्त-शून्य झालें आहे ।। ८ ।। पूर्ण सुखाची प्राप्ती आणि दुःखाचा नाश हा तुझ्याशिवाय कसा घडेल? ।।९।। जो आपल्या अंगाची माझ्या आईनें उत्तम चोळी दिली होती ती माझ्या अंगीं घालून जीर्ण झाली आहे ।। १० ।। ती पुनः माझ्याकरितां चोळी वगैरे पाठवून माझी समजूत करील. परंतु मी रुसलें आहे तुमच्या भेटीशिवाय ती अन्नग्रहण करणार नाहीं असें तिला स्पष्ट सांगा ।। ११ ।। मला कांहीं पाठविणे झाल्यास सेवेचे खाद्य त्वरित पाठिव. मला तुझ्या चारी पुरुषार्थांची अपेक्षा नाहीं ।। १२।। रुक्माई ही माझी माता आहे आणि पांडुरंग हा पिता आहे आणि मी त्यांची कन्या आहे असें नामदेवराय म्हणतात ।। १३ ।।

काशिये कनोजा द्वारके गुजरू । काबडा विठ्ठल पंढरीये ।। १ ।। मायबापें माझी विठ्ठल रुक्मिणी । द्वारका पाटणी माहियेर

॥ २ ॥ पर्वत शिखरीं बद्री नारायणा । सोयरा सज्जन पंढरीये ॥ ३ ॥ बारसीं भगवंत तेरसी तिखया । विठ्ठल सोयरीया पाडुरंगा॥४॥ विटेवरीं नीट समचरणी उभा । पुंडलिकाचे लोभा भक्ति लागीं ॥५॥ विष्णुदास नामा चरणी उतावेळु । करावा सांभाळु आपल्याचा ॥६॥

(५०८) पंढरीचा देव जसा कानडा, तसा काशीचा देव कनोजा तसाच द्वारकेचा देव गुर्जर ॥ १ ॥ विठ्ठल रुक्मीणी हें माझें आईबाप असून माझें माहेर द्वारका शहर होय ॥ २ ॥ बदरी नारायण हे पर्वतशिखरावर असून सज्जनांचा जिवलग हा पंढपूर क्षेत्रीं आहे ॥ ३ ॥ भगवंत हे बार्शीस आहेत तर तिखिया (तोरकामठा ज्यांनीं हातांत घेतला आहे) तेरढोकीस आहे. आमचा हा जिवलग पांडुरंग विठ्ठलराय आहेत ॥ ४ ॥ जो पुंडलिकाच्या प्रेमभक्तिस्तव समचरण असा विटेवर नीट उभा आहे ॥ ५ ॥ हे विठ्ठलराया, मी तुमच्या चरणांकित झालों आहे तेव्हां तुम्ही माझा बाळका-प्रमाणें संभाळ करा असें नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

आपल्याचे परी सांभाळितो श्रीहरी । वाट निरंतरीं पाहत असे ॥ १ ॥ संसारांत कष्ट झाले बहू भारी । मज निववी हरी मायबापा ॥ २ ॥ गांव तें पंढरी भिंवरेच्या तीरीं । निरोप माहेरीं सांगे जो कां ॥ ३ ॥ क्षीरसागारा भितरीं पहुडले श्रीहरी । कवण धाक करी कुमारींचा ॥ ४ ॥ पुंडलिकाची भक्ति मांडली चराचरीं । गुडिया निरंतरी उभारिल्या ॥५॥ संत सनकादिक ते माझे सज्जन । द्वारीं असें वाहन गरुडाचें ॥ ६ ॥ रखमाई माता बिठो माझा पिता । नामा म्हणे संतां भेटावया ॥ ७ ॥

(५०९) हा माझा श्रीहरि आमचें पुत्राप्रमाणें रक्षण करितो व नित्यशः आमची वाट पहातो ॥ १ ॥ हे मायबापा श्रीहरि, संसारांत पुष्कळ त्रास झाला आहे तेव्हां तो तुम्ही शांत करा ॥ २ ॥ माझें माहेर हे भिवरेच्या तीरावर असलेलें पंढरपूर होय तेथें हा माझा निरोप पोहचता करा ॥ ३ ॥

माझे श्रीहरि हे क्षीरसागरांमध्यें आनंदानें झोपलें आहेत तेव्हां मी कन्या असल्यानें तिची मुर्वत कोण ठेवणार ? ॥ ४ ॥ या पुंडलिकरायानें भक्तीचा प्रचार अखिल विश्वामध्यें केला व त्याचा झेंडा सतत फडकत आहे ॥ ५ ॥ माझे सज्जन संत सनकादिक हे जणूं काय सहोदरच होत. ज्याच्या द्वारामध्यें गरुड वहान तिष्ठत उभा आहे ॥ ६ ॥ रुक्मीणी ही माझी आई असून विठ्ठलराय हे माझे वडील होत. ते संतांच्या भेटीकरितां उत्सुक आहेत असें नामदेवराय म्हणतात ॥ ७ ॥

स्फुंदतस्फुंदत नामा उभा महाद्वारीं । दृष्टि पायावरी विठोबाच्या ॥ १ ॥ देखोनि केशवें उभारिल्या बाहे । पालवीतु आहे पीतांबरें ॥ २ ॥ संसारावरी रुसलासे नामा । दाटलासे प्रेमा ओसंडत ॥ ३ ॥ येईं नाम्या तुज धरीन पोटाशीं । कोणे गांजिलासि दुराचारें ॥ ४ ॥ ऐके वो रुक्मिणी अंजारूनि तुम्हीं । ओसंगा घेऊनि आळवावा ॥ ५ ॥ जगत्रजननी संभ्रमें करूनि । प्रीतिपान्हा स्तनीं ओसंडला ॥ ६ ॥ ओरसला नामा घेतलासे करीं । मुख पितांबरें पुसीतसे ॥ ७ ॥ कवणें तुझे चित्तीं लावियेला चाळा । न देखतां डोळां स्फुंदतसे ॥ ८ ॥ बुझाविला नामा दाटलासे प्रेमा ॥ हांसे सत्यभामा काय झालें ॥ ९ ॥ कोण कुळीं नामा काय शोभा याचा । तूं स्वामी दीनाचा पांडुरंग ॥ १० ॥

(५१०) नामा हा विठ्ठलरायाच्या पायाकडे लक्ष ठेवून महाद्वारामध्यें स्फुंदन करीत उभा राहिला. आहे ॥ १ ॥ अशा स्थितींत नामदेवरा-

१ टीप– स्फुंदस्फुंदोनी नामा उभा महाद्वारीं । चित्त पायावरी विठोबाच्या ॥ १ ॥ उभा दीनानाथ उभारूनी बाहे । पालवीत आहे पीतांबरें ॥ २ ॥ बारवा येरे नामया धरिला पोटासी । कोणे गांजिलासी दुर्जनानें ॥ ३ ॥ अंतरीचें सांग पढियंतें ते माग । कां करिशी उद्वेग संसारींचे ॥ ४ ॥ नामा म्हणे विठोबा असें मी नेणता आठवीं पंढरीनाथ वेळोवेळां ॥ ५ ॥

भासमान होते आणि तदाकारानें उपलब्ध होते ।। ४ ।। जणूं काय ती करुण रसानें ओतली–घडली असून सप्रेम व प्रकाशमय आहे अशाच स्वरूपानें हे ज्ञानदेवराया, तुम्ही शोभा देत आहांत ।। ५ ।। ज्ञान हेच जल असून विज्ञान ही गंगा होय त्यामध्यें तुम्ही प्रेमभागा प्रेमभावरूपानें स्नान करीत अहांत ।। ६ ।। आणि पूर्ण शांतीच्या घरीं ऐक्यरूपानें आराम करीत अहांत. किंबहुना श्रीहरि तुमचा दास झाला आहे ।। ७ ।। श्रीनिवृत्तीरायासारखे तुम्हाला योग्य गुरु प्राप्त असून त्याचा जयजयकार असो आणि नामदेवरायाना ही भाग्यस्वरूपलक्ष्मी (माताहि) सहज लाभली ।। ८ ।

राजमंदिराभीतरीं रुक्मिणी सेजेवरी । नामा परसांसरी बोळगो आले ।। १ ।। नामया देखोनी झडकरी उठली । आड उभी ठेली जाऊनियां ।। २ ।। अचळ सारिसा करी श्रृंग माथा वरी । पाहे पां निदसुरी होती कैसी ? ।। ३ ।। मी म्हणे नावेक लागेल वेळ यातें । तंव अवचितें देखियेलें ।। ४ ।। कनक परयेळीं घेऊनी आरती करी । ओवाळिलें हरी नामयासहित ।। ५ ।।

(५१३) रुक्मिणी माता ह्या रात्रीं आपल्या मंदिरामध्यें शयनांवर–पलंगावर आनंदानें झोपल्या असतां तेथें नामदेवराय हे मागील बाजूनें (हळुवार पाउलानें) आले ।। १ ।। नामदेवास पहातांच रुक्मीणी माता ह्या आपल्या शयनाहून त्वरित उठल्या आणि एका बाजूस उभ्या राहिल्या ।। २ ।। तिनें आपल्या डोक्यावरील शृंगाकार पदर सावरला. पहा कसें ह्या निद्रेनें मला आवृत केले ।। ३ ।। यांना येण्याकरितां विलंब लागेल असें मला वाटलें होतें परंतु पहा हे दोघे कसे अकस्मात् सन्मुख उभे राहिलेत। ।४।। रुक्मीणीनें हातामध्यें सुवर्णाचे ताट घेतलेले आहे त्यामध्यें फलपुष्प व निरंजनी ठेवलेली आहे व त्यायोगे तिनें नामदेवराय व विठ्ठलराय यांना ओवाळिले ।। ५ ।।

ताहीं भीड चाड बोलसी आगळें । तोंडाचेनि बळें अरे नाम्या ।। १ ।। आपुलिया चाडे करीतसां सेवा । आमास कां

लावा आम्हांलागीं ॥ २ ॥ माझ्या ठायीं काय उणे मज होतें मज देउनी सरतें केलें तुम्हीं ॥ ३ ॥ निर्गुण निराकारी होतों निजानंदें । त्यासि तुम्हीं भेद केला देखा ॥ ४ ॥ संकल्प वासना नाना भजन मतें, । शुद्ध स्वरूपातें भेद झाला ॥५॥ वैकुंठ निजधाम सर्व सुखराशी । ते सांडोनी तुम्हांपासीं येणे झालें ॥ ६ ॥ शेषाच्या आरूवरी निद्रा क्षीर सागरीं । सांडोनी वेषधारी झालों. आम्हीं ॥ ७ ॥ दाहीं अवतारीं युगयुगांतरीं । अनुष्ठान थोरी केलें नाम्या ॥ ८ ॥ अवतारी कष्ट झाले थोर थोर । मारिले असुर तुम्हांलागीं ॥ ९ ॥ नाना योनी दुःखे भोगी अनंत जन्में । निरसलीं नामें माझ्या एका ॥१०॥ विषय भोगितां रवरव वास । मन केलें उदास वैराग्येंसी ॥ ११ ॥ प्रपंच प्रज्वाळ, अग्नीचे कल्लोळ । सुखरूप सीतळ आत्म ज्ञानें ॥ १२ ॥ माया हे दुस्तर नकळे इचा पार ते नदी उतार केली तुम्हां ॥ १३ ॥ कामक्रोधादिक षड्वैरी विकार । महा थोर थोर वश्यकेलें ॥ १४ ॥ परदारा परधन परनिंदा परपीडा । दिधलिया झाडा दयाधर्मा । १५॥ अहंकार अविवेक निरसली भ्रांती । सुखरूप शांती दिधली तुम्हां ॥ १६ ॥ अविश्वास अलोट मेरूहूनी घनवट । देऊनी भावार्थ पीठ केला॥१७॥ देऊनिया ज्ञान निरसिलें अज्ञान । येणे समाधान झालें तुम्हां ॥१८॥ अधर्म अन्याय अनाचार मुळ । देऊनि स्वधर्म तारीयेले ॥ १९ ॥ ऐसें सर्वांपरी त्यां केले गोमटें । परी शद्ब उफराटे न संडीसी ॥२०॥ रात्रंदिवस तुज लागला छंद । आम्हांसी विनोद करों पाहासी॥२१॥ अवघिया परी तूं झालासी धीट । बोलसी वाईट अमर्याद ॥ २२ ॥ भक्तीचिया भीडा म्यां बहु साहिलें । त्वां नाहीं पाहिलें मागें पुढें ॥२३॥ जें आम्हीं पेरिलें त्यांचे फळ आलें । उफराटे झाले तुझिया कृपें॥२४॥

पहिलीच चुकी पडियेली थोरी। तुझे अधिकारी झालों आम्हीं ।।२६।। खांदी बैसलें तें नुतरे खालतें । तैसें हें आमुतें वोढवलें ।।२६।। सलगीं खेळावितां चुंबितां वदन । तें देतां टाकूनि मिठी घाली ।।२७।। तुझा त्याग करितां कोपतील संत । हांसतील समर्थ पिसून लोक।। २८ ।। सृष्ट्यादिका व्यापार राहिला परता। तुजसीं बोलतां न पुरे वेळ।।२९।। कांहीं न मागसी देतांही न घेसी। अखंड जीवेंसी जडोनी ठेला ।। ३० ।। वाढवितां भक्ति तुज नाहीं तृप्ती । काय करिसी अंती न कळे मज ।। ३१ ।। मागें भक्त आम्ही बहुत देखिले । उठोनिय गेले क्षणामाजी ।। ३२ ।। अवतार अवतारीं नव्हेसी परता । संबंध तुटता न दिसे तुझा ।। ३३ ।। नामा म्हणे देवा होई सावधान । परीयेसी वचन एक माझें ।। ३४ ।।

(५१४) हे नामया, तूं असा निर्भीड व बेपर्वाई रे कसा झालास ? मुखामध्यें येईल तसें तूं बडबड करित आहेस ।। १ ।। तूं आपल्या गरजे-करितांच ना सेवा करित आहेस ? असें असतां आमच्यावर रे कां भार टाकीत आहेस ।। २ ।। अरे, माझ्या ठिकाणीं असें कोणतें कमी होतें कीं ज्याची पूर्तता तुझ्याकडून व्हावी ।। ३ ।। वस्तुत: मी माझ्या निर्गुण निरा-कार अशा स्वरूपीं कसा पहा आनंदानें होतो. परंतु तुम्ही आपल्या भक्ती-प्रेमानें फुटीरपणा निर्माण केला ।। ४ ।। तुमचे निरनिराळे संकल्प व वासना आणि अनेक प्रकारच्या भजन मतवैचित्र्यानें माझ्या शुद्ध स्वरूपीं भेदाचे अभ्र निर्माण झाले ।। ६ ।। सर्व सुखरूप असें वैकुंठ तें माझें वास्तव्य स्थान परंतु तुमच्या प्रेमप्रभावानें त्याचा त्याग करून तुम्हापासीं यावें लागलें ना ? ।। ६ ।। मी क्षीरसागरामध्यें शेषावर सुखानें शयन करणारा खरा परंतु तुमच्याकरितां नाना वेश धारण करावे लागले ।। ७ ।। हे नामया, युगा-युगांतील असलेले दहाहि अवतारामध्ये कष्टतर अशीं अनुष्ठानें केलीं ।। ८ ।। अनेक दुष्ट असुरांचा नाश करण्याकरितां मला अनेक कष्ट करावे

लागले ते तुमच्या करितांच ना ? ॥ ९ ॥ तुमच्या अनेक जन्माच्या व अनेक योनीमध्ये तुम्हाला जे कष्ट सहन करावे लागले ते केवळ माझ्या एका नामानें दूर झाले नाहीं काय ? ॥ १० ॥ विषय भोगण्यांत भयंकर असा नर्कवास होण्यानें त्यांतून मुक्त होण्याकरितां वैराग्य साधन निर्माण केलें ॥ ११ ॥ प्रपंच म्हणजे जणूं काय रसरसत्या अग्नीच्या ज्वाळाच होत. परंतु, त्यांतून तुम्हाला मुक्त करून शितळ अशा स्थळी स्थित होण्याकरितां आत्मज्ञान हें साधन तुम्हाला दिले नाहीं काय ? ॥ १२ ॥ माया ही अति दुस्तर असून तिचा अंत लागत नाहीं हे खरें ना ! परंतु तिच्यांतूनहि तुम्हांला सुखरूपपणें पैलतटीं केले ॥ १३ ॥ कामक्रोधादिक हे सहा महा शत्रू ज्यांनीं मोठमोठ्यांनाहि आपल्या बंदिस्त केले ॥ १४ ॥ परस्त्री परधन परनिंदा परपीडा यांचा नाश करून दया धर्म ही सात्त्विक संपत्ती तुम्हाला दिली ॥ १५ ॥ तुमच्या ठिकाणीं असलेला अहंकार, अविवेक आणि भ्रांति यांचा नाश करून तुम्हाला शांती दिली ॥ १६ ॥ अविश्वास हा जणूं काय भरीव असा मेरू पर्वतच होय. परंतु तुम्हांला भावभक्ती देऊन तें एक पवित्र स्थळच निर्माण केले ॥ १७ ॥ तुमच्या ठिकाणीं ज्ञानाचा आविष्कार करून अज्ञानाचे निरसन केले आणि त्यायोगें तुम्हाला समाधान प्राप्त झाले ॥ १८ ॥ तुमच्या ठिकाणीं स्वधर्माची निष्ठा निर्माण करून अनीचाराचें मूळ जो अधर्म आणि अन्याय तो नष्ट केला ॥ १९ ॥ अशा प्रकारें तुमच्या अंतर्बाह्य शत्रूचा नाश करून चिरशांती दिली असतांना त्याविषयीं कृतज्ञता व्यक्त न करितां माझ्यावरच दोषारोप आणीत आहेस. तूं असा रे कसा उलटया काळजाचा भक्त ॥ २० ॥ तुला माझे रात्रंदिवस जणूं काय व्यसनच जडले आहे असें असतां तूं माझो थट्टा करूं पहात आहेस ॥ २१ ॥ माझे पुष्कळ भक्त खरे परंतु त्यांमध्ये तूं फार पुढारलेला असा धीट भक्त होय आणि त्यायोगें तूं अमर्याद असे कठोर भाषण करित आहेस ॥ २२ ॥ मी माझ्या भक्तांच्या भिडेकरितां पुष्कळसे 'कष्ट' सहन केलेत परंतु तूं विसरभोळा असल्यानें त्यासंबंधीचा मागील पुढील कांहींच विचार केला नाहीस ॥ २३ ॥ आमची कृतिच आम्हाला फळली आहे व तीं तुझ्या कृत्याने उलट झाली ॥ २४ ॥ मी तुझ्या संरक्षणाची जी जबाबदारी घेतली हीच प्रथम माझी चूक झाली ॥ २५ ॥ जसें कां कोणी एकाद्याला खांद्यावर बसविलें असतां तो तेथून खालीं उतरत नाहीं तशीच गत आमची झाली २६॥ एकाद्याला प्रेमानें खेळं-

वीत असतां तो लाडिकपणानें मुका घेतो इतकेंच नव्हे तर त्याला दूर करण्याचा प्रयत्न करित असतां तो अधिकच मिठी मारतो । २७॥ आतां तुला आम्ही दूर करावें तों संत रागावतील आणि वेडेचार करणारे संसारिक लोकांच्या हास्याचा विषय होईल ॥ २८ ॥ तुझ्याशीं प्रेमळ भाषणांत मी इतका रंगून जातों कीं मला वेळेचें स्मरण रहात नाहींच परंतु सृष्टयादिकांच्या निर्मितीची जी माझी जबाबदारी तीहि कृति अलग रहाते ॥ २९ ॥ स्वतः कांहीं मागत नाहींस व तुला कांहीं द्यावयास जावें तेंहि घेत नाहींस. असा तूं माझ्याशी सलंग्न झाला आहेस ॥३०॥ भामाचा आविष्कार तुझ्या ठिकाणीं झाला असतांहि अद्याप तुझें चित्त शांत होत नाहीं तेव्हां तू शेवटीं काय करशील हें मला कांहीं समजत नाहीं ॥३१॥ माझे भक्त यापूर्वीं पुष्कळ होऊन गेले व ते मी प्रत्यक्ष पाहिले हें खरें. परंतु ते बिचारे माझी क्षणभर भेट घेऊन त्वरित उठून जात असत ॥ ३२ ॥ तूं मात्र प्रत्येक अवतार-अवतारामध्यें सतत चिकटून राहिला आहेस. तेव्हा यापुढें तुझ्या माझ्या संबंधामध्यें काही बिघाड होणार नाहीं असे प्रचीतीस येते ॥ ३३ ॥ हे देवराया आतां तुम्ही माझे भाषण शांतपणें ऐका बरें | असें नामदेवराय म्हणतात ॥ ३४ ॥

पितियाचें भाग्य पुत्रासि पैं नये । विरळा एकादा होय नांव राखा ॥ १ ॥ मी तंव अज्ञान झालों तुझें पोटीं । तुझेनि आम्हां तुटी संसाराची ॥ २ ॥ होणार तें झालें न चुके कांहीं केलें । विठ्ठलें दुराविलें जीणे मरणें ॥ ३ ॥ माझिये अदृष्टीं ऐसेंचि लिहिलें । जें मज निर्मियलें चतुराननें ॥ ४ ॥ या विठोबाचे पाय हृदयीं धरावे । तेणें हें तरावें भवदुःख ॥ ५ ॥ नेणे पूजाविधि नेणे क्रियासिद्धि । ऐसा मी अपराधी तारी देवा ॥ ६ ॥ अनुपम्य सुख देखिलिया चरणीं । घातली लोळणी माझ्या चित्तें ॥ ७ ॥ बहुत देव माझ्या पाहियेले जीवें । केले सर्व भवें कुटुंबदास्य ॥ ८ ॥ इहीं माझें चित्त केलें तडातोडी । नाहीं सुख घडी देखिलें कांहीं ॥ ९ ॥ मग या पांडुरंगे माझी राखि-

येली लाज । हा माझा पूर्वज प्राणसखा ॥ १० ॥ अंतरीचें गुज सांगितलें मज । दिले प्रेमबीज नाम निधि ॥ ११ ॥ सुख दुःखाची निवारिली बाधा । शरीर संबंधा वेगळें केलें ॥ १२ ॥ आपुले म्हणोनि कृपेनें न्याहाळिलें । आवडी सांभाळिलें मायबापें ॥ १३ ॥ ऐसा मजलागीं न विसंबे जीवें । म्यां काय याचे व्हावे उतराई ॥ १४ ॥ नामा म्हणे मज अनाथालागुनि । न विसंबे निर्वाणीं पंढरीराव ॥ १५ ॥

(५१५) वडिलांची सर्व गुणसंपदा मुलाचे ठायीं आविष्कारली जात नाहीं हें खरें. परंतु त्यांतील एकादाच पुत्र नांव राखणारा असा जन्मतो ॥ १ ॥ मी एक अज्ञान बालक तुझ्या पोटीं आलों आहे आणि म्हणूनच तुझ्या योगानें आमचीं संसारबंधनें नष्ट• झालींत ॥ २ ॥ ज्या घडणाऱ्या गोष्टी आहेत त्या कोणत्याहि प्रयत्नानें रोखू शकत नाहींत हें खरें. मात्र या विठ्ठलाचे संगतीने आम्ही जन्म-मृत्यूंतून मुक्त झालों ॥ ३ ॥ ज्या ब्रम्हदेवानें आम्हाला जन्मात घातले त्यांनीं माझ्या भाग्यांत असेंच लिहिलें आहे कीं ॥ ४ ॥ विठ्ठलाला हृदयीं धारण करून या संसारदुःखांतून मुक्त व्हावें ॥ ५ ॥ हे देवराया, मी पुजाविधी अथवा क्रियाकर्म कांहीच जाणत नाहीं असा मी अपराधी खरा; तरी तुम्ही माझा उद्धार करा ॥ ६ ॥ तुमच्या चरणाचे ठिकाणीं असलेल्या अपूर्व सुखाची प्रतीती होण्यानें माझें मन तेथें लुब्ध झाले ॥ ७ ॥ माझ्या जिवाला पुष्कळ देवतांचें दर्शन घडलें तसेंच कुटुंबाची सेवाहि मनोभावनेनें केली ॥ ८ ॥ परंतु माझें चित्त त्यायोगे समाधानाला किंचितहि प्राप्त झाले नाहीं आणि म्हणून तें चित्त तेथून उपरामाला प्राप्त झाले ॥ ९ ॥ तेव्हां पूर्वजन्मीचा माझा जो सखा पाडुरंग त्यांनीं माझी अब्रू राखली ॥ १० ॥ त्यांनीं अंतरीचे गुज मला सांगितलें आणि प्रेमबीज जो नामनिधि तो मला सुख व दिला ॥ ११ ॥ त्यांनीं मला देहाभिमानांतून मुक्त करून माझ्या ठिकाणचें सुख व दुःख हे विकार निवृत्त केले । । १२ ॥ या माझ्या आईबापानें माझ्याकडे कूर्मदृष्टीनें निरीक्षण करून प्रेमानें माझे रक्षण केलें ॥ १३ ॥ असा हा विठ्ठलराय तो मला क्षणभरहि विसरत नाहीं अशा या सख्यासंबंधीं मी काय उतराई व्हावें बरें ? ॥ १४ ॥ पंढरीराव हा माझ्यासारख्या अनाथाला निर्वाणप्रसंगी केव्हांहि विसरत नाहीं असें नामदेवराय म्हणतात ॥ १५ ॥

पतीत अनेक पावन तूं एक । झालासी सुश्लोक कवणाचेनी ? ॥ १ ॥ पतीत मी भला कीं पावन तूं भला । सांग बा विठ्ठला मायबापा ॥ २ ॥ परिसाचे महिमान कैसेनी वाढतें । निर्माण नसतें लोह जरी ॥ ३ ॥ कल्पतरूची कीर्ति कैसेनी वाढते । जरी कल्पना नसती याचकाची ॥ ४ ॥ प्रजासी पोशिले शोभती राजेश्वर । तैसा हा विचार तुम्हां आम्हां ॥ ५ ॥ नामा म्हणे स्वामी आहे ते आमुचे । तुज देवा कैचे क्रिया कर्म ॥ ६ ॥

(५१६) आम्हां पतितांची संख्या पुष्कळ आहे आणि पावन करणारा तूं एक आहेस हें खरें परंतु तुझ्या ठिकाणीं जो श्रेष्ठपणा आला आहे तो कोणाच्या योगें बरें ? ॥ १ ॥ तेव्हां यामध्यें आम्ही जे पतित ते श्रेष्ठ कीं तूं पावन करणारा श्रेष्ठ ? हे मायबापा विठ्ठला याचा निर्णय तुम्ही सांगा बरें ? ॥२॥ परिस हा बहुमोल खरा परंतु त्यानीं जर लोखंडाचे सोनें केलें नसतें अथवा जगांत जर लोखंड नसतें तर त्याचें काय महत्त्व राहिले असतें ॥ ३ ॥ याचकाच्या ठायीं कोणताच संकल्प नसता तर कल्पवृक्षाचें श्रेष्ठत्व कसें ठरलें असतें ॥ ४ ॥ प्रजेचें संरक्षण करीत आहे म्हणूनच राजेश्वराची शोभा ना ? तसाच तुमचा आमचा संबंध होय ॥ ५ ॥ अहो स्वामीराज जो कांहीं श्रेष्ठपणा आहे तो सर्व आमचा आहे. हे देवराया, तुम्ही आहांत निष्क्रिय तेव्हां तुमच्या ठिकाणीं हो क्रिया कर्म कसे संभवणार ? सहजच आहे असें नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

आपुल्या सुखाचा देईन मी वांटा । जरी येसी वैकुंठा एक वेळ ॥ १ ॥ आपुले निजपदीं तुज बैसवीन । उभा मी राहेन मागें पुढें ॥ २ ॥ पितांबर छाया करीन तुज वरी । जीवें क्षणभरी विसंबेना ॥ ३ ॥ अंबऋषि प्रल्हाद रूक्मांगद । त्याहूनि निजपद देईन तुज ॥ ४ ॥ ऐसा धीर नाम्या होता माझ्या मनीं । परी तूं सर्वांहूनि उदासीन ॥ ५ ॥ नामा म्हणे केशवा नलगे माझ्या चित्तीं । मज आहे विश्रांति तुझ्या नामीं ॥ ६ ॥

(५१७) हे नामदेवा, मांझी राजधानी जें वैकुंठ त्या स्थळीं तूं का एकदां आलास कीं मी तुला माझ्या सर्वस्वसुखाचा भागीदार करीन ॥ १ ॥ इतकेंच नव्हे तर माझ्या निजपदीं तुला स्थापन करीन व मी चोपदार होऊन तुझ्या मागें पुढें उभा राहिन ॥ २ ॥ माझ्या पीतांबराची तुझ्यावर छाया करीन व तुला मी केव्हांहि विसरणार नाहीं ॥ ३ ॥ अंबऋषी, रुक्मागंद व प्रल्हाद हे माझे भक्त खरे, परंतु त्यांच्या पेक्षांहि श्रेष्ठ असें माझें पद देईन ॥ ४ ॥ असे माझ्या मनींमध्यें पुष्कळ मनोरथाची उभारणी होती परंतु तुं या सर्वासंबंधी उदासीन आहेस ॥ ५ ॥ हे देवा, तू माझ्यापुढें तुझी दिव्य खेळणीं मांडलीं खरीं, परंतु त्याविषयी माझें मन किंचितहि लालचावले जात नाहीं. कारण तुझ्या नामामध्यें मला पूर्ण विश्रांती वाटते, असें नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

नेघें भूमंडळ न घाली तुज कोडं । तुजहूनि केवढी जोडी यांची ॥ १ ॥ चरण मी सेवीन गाईन तुझें नाम । हृदयीं धरोनी प्रेम नाचेन सदा ॥ २ ॥ ऋद्धिसिद्धि नेघे कामना न लगती । तुजवीण श्रीपति अवघें व्यर्थ ॥ ३ ॥ रसातळ भूतळ वैकुंठासी नये । तुजवीण न पाहे ठाव कोठें ॥ ४ ॥ विष्णुदास आम्ही भक्तीवीण नेघों । द्वारींच वोळगे तुझ्या देवा ॥ ५ ॥ नामा म्हणे हेचि चाड गा विठ्ठला । पुंडलिकें सांगितला निज ठेवा ॥ ६ ॥

(५१८) हे देवराया, तुला मी कोणतेंच कोडें घालीत नाहीं. किंबहुना तूं मला या भूमंडलाची देणगी सादर केली असतांहि तीं मी तुला साभार परत करीन. कारण तुझ्या चरणसुखापुढें यांची काय योग्यता आहे ॥ १ ॥ मी तुझ्या पायाची सेवा करीन व मुखानें तुझें नाम गाईन आणि अंतःकरणामध्यें तुझ्याविषयींचें प्रेम सांठवून सतत नाचेन ॥ २ ॥ ऋद्धि सिद्धी ह्या श्रेष्ठ खऱ्या. परंतु त्यांच्याविषयीं रुचि नसल्यानें मी त्यांचा इन्कार केला. हे श्रीपती तुझ्या प्रेमाशिवाय हें सर्व व्यर्थ होय ॥ ३ ॥ रसातळ, भूतळ आणि वैकुंठादि इतर लोक असो. तुझ्याशिवाय कोणतेच स्थळ रमणीय वाटत

नाहीं ॥ ४ ॥ आम्ही कट्टर विष्णुदास आहोंत आणि म्हणून तुझ्या भक्ती-शिवाय आम्हाला सर्व तुच्छ आहे. हे देवा, आम्ही तुझ्याच द्वारी याचक म्हणून रहाणार ॥ ५ ॥ हे विठ्ठलराया, हीच माझी जिव्हाळ्याची इच्छा आहे व हाच निज ठेवा आम्हाला पुंडलीकरायानें दाखविला असें नामदेव-राय म्हणतात ॥ ६ ॥

ऐसा नामा बोले आनंदें करोनि । तंव देव विचारूनि बोलि-येले ॥ १ ॥ भला भला नाम्या शहणा झालासी । कां रे हे न वेसी सांग मज ॥ २ ॥ येरू म्हणे देवा अवघेचि नेश्वर । तूंचि एक सार पुरे आम्हां ॥ ३ ॥ अनंत ब्रह्मांडें कोटी वसति रोमरंध्रीं । त्या चरणाचे अग्रीं वसो आम्ही ॥ ४ ॥ पुंडलिक जाणे त्यांचें गुह्य गुज । उम-जोनि तुज काय सांगों ॥ ५ । नामा म्हणे धरूं मुळ सोय चोखडी । ब्रह्मांडा येवढी न लगे पृथ्वी ॥ ६ ॥

(५१९) नामदेवरायानें हर्षित होऊन असें निश्चयात्मक भाषण केलें असतां देवरायानीं विचार करून त्यास उत्तर दिले ॥ १ ॥ हे नामया, तूं फार शहाणा झाला आहेस असें मला वाटतें. अरे, तुला मी होऊन सर्व देत असतां तूं त्याचा कां इन्कार करीत आहेस हें तरी मला एकदां सांग ॥ २ ॥ तेव्हां नामदेव म्हणतात कीं हे देवराया, या विश्वामध्यें तूंच सर्व सार आहेस. तुझ्याहून असलेले सर्व पदार्थ मिथ्या होत आणि म्हणून तुझीच मला आव-श्यकता आहे ॥ ३ ॥ तुमच्या एका एका रोमारोमामध्यें अनंत कोटयवधी ब्रम्हांडें सांठवलेली आहेत अशा या तुझ्या चरणाच्या ठिकाणीं मी वास्तव्य करीन ॥ ४ ॥ तुझ्या चरणामृताच्या माधुरीचें वर्म, तो एक पुंडलिकच जाणत आहे तें तुला मी कसे स्पष्ट करून सांगावें ॥ ५ ॥ तुम्हीं ही ब्रम्हांडा-येवढी पृथ्वी दिली असतांहि माझे मन लाचावणार नाहीं. फक्त शुद्ध जें तुझें मूळ स्वरूप आहे त्याचीच आवश्यकता आहे असें नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

प्रेमपडीभरे देवासी वोसंडे । नामा तयापुढें शोभतसे ॥ १ ॥ प्रेमाचें स्फुंदन न सावरे नामया । पसरोनियां बाह्या क्षेम देत ॥ २ ॥

सावधरे नाम्या आलिंगिला बाहीं । आवडे तें कांहीं सांग मज ॥ ३ ॥
उघडोनियां नयन पाहे दृष्टीभरी । वैकुंठाभीतरीं चाल जाऊं ॥ ४ ॥
ऐकोनियां नामा झालासे सावध । मग देतसे शद्ब नारायणा ॥ ५ ॥
भक्तीवीणसुख न घे पैं वैकुंठ । पंढरी प्रगट परब्रह्म ॥ ६ ॥ हेची गोड
आम्हां आवडे हो हरी । वैकुंठाभीतरीं चाड नाहीं ॥ ७ ॥ सर्वकाळ
सेवा करूं पै कीर्तन । येणें माझें मन संतुष्ट सदा ॥ ८ ॥ संबोखिला
नामा हृदयावरी हस्तक । येरू ठेवी मस्तक चरणावरी ॥ ९ ॥ माग
रे नामया आवडेल जितुलें । त्रिभुवनाइतुलें ब्रह्मसुख ॥ १० ॥ देईन
अखंडीत सर्व काम जाणा । ऋद्धिसिद्धि पूर्ण अखंडीत ॥ ११ ॥
नामा म्हणे पंढरीं कीर्तनं करीन । न सोडीं चरण परी तुझे ॥१२॥

(५२०) नामदेवरायाच्या अशा जिव्हाळयाच्या भाषणानें देवरायाचें अंतःकरण प्रेमानें उचंबळून आलें आहे आणि त्यांच्या सन्मुख नामा हा शोभा देत आहे ॥ १ ॥ नामदेवरायाच्या ठिकाणीं उदभवणारें प्रेमाचें स्फुंदन अनिवार झालें असतां त्यांनीं आपल्या हातांनीं देवरायांना क्षेम दिले. ॥ २ ॥ हे नामया सावध हो असें म्हणून देवरायानीं त्यास आलिंगन दिलें तुला काय आवडतें हें मला सांग ॥ ३ ॥ डोळे उघडून पूर्ण दृष्टीनें तर पाहा. हे नामया, वैकुंठास माझ्याबरोबर चल ॥४॥ असें देवरायांचें मधुर भाषण ऐकतांच नामदेवराय सावध झाले. नंतर ते नारायणाशी भाषण करूं लागले ॥ ५ ॥ भक्तीसुखाशिवाय तुझ्या वैकुंठाची मला गरज नाहीं. कारण या पंढरपुरामध्यें प्रत्यक्ष परब्रम्हच प्रगट आहे ॥ ६ ॥ अहो हरी, आम्हांला तेंच प्रिय आहे. वैकुंठसुखांची मला आवश्यकता नाहीं ॥ ७ ॥ सतत सेवा व कीर्तन करण्यामध्येंच माझ्या मनाला समाधान वाटतें ॥ ८ ॥ नामदेवरायाच्या छातीवर हात ठेवून देवरायांनीं त्याचें समाधान केलें असतां त्यांनीं देवरायाच्या पायावर आपलें मस्तक ठेविलें ॥ ९ ॥ हे नामया, तुला जें कांहीं पाहिजे असेल तें माग तुला त्रिभुवनाएवढें सुख देतों ॥ १० ॥ तुझ्या कार्यार्थ ऋद्धिसिद्धी आदिक सतत तुझ्या येथें बटिक म्हणून ठेवितो ॥ ११ ॥ हे देवराया, तुझे चरण मी केव्हांहि सोडणार नाहीं. या पंढरीमध्यें कीर्तनं करीत राहिल असें नामदेवराय म्हणतात ॥ १२ ॥

घेऊनियां नाम्या बैससील किती । पहाशील स्थिति अंतरींची ॥ १ ॥ कांहींच न होसी विचारी मानसीं । चैतन्य तत्वासि शुद्धबुद्ध ॥ २ ॥ क्रिया कर्म कर्ता नव्हेसी सर्वथा । आहे सर्वगता रूप तुझें ॥ ३ ॥ भजतां भजन पुजिताती पूज्य । हेंही काय तुज अति चिंता ॥ ४ ॥ ज्ञाता ज्ञान ज्ञेय ध्याता ध्यान ध्येय । नाथिले उपाय नाहीं तुज ॥ ५ ॥ नामा म्हणे मज नकळेचि देवा । मज देईं सेवा जन्मोजन्मीं ॥ ६ ॥

(५२१) हे नामया, असा हा सत्याग्रह करून किती वेळ येथें बसणार ? अरे तुझ्या अंतस्थ स्वरूपाकडे लक्ष दे ॥ १ ॥ तूं स्वतःच्या मनाशी विचार केला असतां ' मी ' देहादिक, प्रपंच कांहीच नोहे अशी तुला जाणीव होईल. किंबहुना तत्वमसि महावाक्याच्या बोधानें मी चैतन्य शुद्ध बुद्ध आहें तुला अशी प्रतिति येईल ॥ २ ॥ क्रियाकर्म व कर्ता आदिक ज्या भेदमूलक त्रिपुटया आहेत त्या तूं किंचित नसून सर्वगत सर्वव्यापी जें स्वरूप आहे तेंच तूं आहेस ॥ ३ ॥ भजन करणारा, भजन व पूज्य वस्तु यांची कां तुला काळजी असावी? ॥ ४ ॥ ज्ञाता ज्ञान व ज्ञेय तसेंच ध्येय ध्याता आणि ध्यान इत्यादि त्रिपुटया ह्या मिथ्या असल्यानें या साधनाची तुला कांहींच आवश्यकता नाही ॥ ५ ॥ हे देवराया तुझें हे ब्रम्हज्ञान माझ्या बुद्धीला अगम्य आहे. जन्मोजन्मीं तुझी सेवा, माझ्याकडून घडावी हीच तुझ्याजवळ माझी मागणी आहे असे नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

जन्मजन्मांतरीं घेतलें धरणें । सांग कवण्या गुणें विष्णुदासा ॥ १ ॥ कांहींच न घेसी कांहीं न मागसी । ऋणे किती करिसी सेवारूपें ॥ २ ॥ चतुर्विध मुक्ति अथवा धन संपत्ति । नलगे तुझे चित्तीं काय करूं? ॥ ३ ॥ समुद्रवलयांकित अवघें भूमंडळ । अथवा रसातळ दुर्लभ कांहीं ॥४॥ भेटिलागी ऐसें आहे रे वैकुंठ । पाही तुझी वाट रात्रंदिवस ॥ ५ ॥ नामा म्हणे सर्व ओसंडिलें चित्ते। तुझीया चरणापरतें नलगे कांहीं ॥ ६ ॥

(५२१) हे विष्णुदासा तूं असा जन्मोजन्मीं धरणें धरून कां बसला आहेस ? यासंबधी तुझ्या मनांस काय हेतु आहे हें तरी आम्हाला समजूं दे ॥ १ ॥ आम्ही तुला कांहीं द्यावें तें तूं कांहीं घेत नाहींस व स्वतःहि कांहीं मागत नाहींस. सेवेच्या योगें मला तूं किती ॠणको करून ठेवणार आहेस ॥ २ ॥ परमार्थातील श्रेष्ठ अशा चारी मुक्ती व व्यवहारांतील प्रमुख साधनें धनसंपत्ती हें तुला देण्यास तयार आहे तथापि यासंबंधी तुझें चित्त उदासीन आहे ॥ ३ ॥ समुद्रवलयांकित अशी सर्व भूमंडळ अथवा रसातळादिक जे दुर्लभ सप्तलोक ॥ ४ ॥ तूं वैकुंठाला यावें अशी माझी तीव्र इच्छा आहे व त्याकरितां तुझी रात्रंदिवस मी वाट पहातो ॥ ५ ॥ हे देवा तूं जे मला आमिष दाखविलेस त्या सर्व वस्तूंचा माझ्या मनानेंच त्याग केला आहे मला तुझ्या सेवेशिवाय दुसरें कांहींच प्रिय नाहीं असें नामदेवराय म्हणतात ॥६॥

माझिया मनासी म्या केला विचार। तेणें मज निर्धार सांगितला ॥ १ ॥ मज नलगे मुक्ति नलगे ब्रह्मज्ञान। सांडोवा होईन पंढरीचा ॥ २ ॥ इंद्रिया मारितां येती काकुळती। तुज ओळगूं म्हणती ठायीं ठायीं ॥ ३ ॥ श्रवणीं श्रवण अखंड तुझी कीर्ति। विश्वविठ्ठल मूर्ति देखेन डोळा ॥ ४ ॥ नामामृतें रसना निवाली त्या सुखें नाठवती दुःखें जन्मांतरींचीं ॥ ५ ॥ नामा म्हणे ऐसा कोण भाग्यहीन जो धरी वासना वैकुंठींची ॥ ६ ॥

(५२३) मी माझे मनामध्यें सत्या-सत्याचा विचार केला असतां माझा असा निश्चय झाला ॥ १ ॥ मुक्ती ही अत्यंत अमोलिक खरी तसेंच ब्रम्हज्ञान हें अत्यंत पवित्र खरें परंतु त्याची मनाला किंचितहि अपेक्षा नसल्यानें ती मला नको आहे. फक्त पंढरीचा मी नाला व्हावें असें मला वाटतें ॥ २ ॥ इंद्रियांना ताडण करावें तों तीं दीन होतात आणि तुम्हाला प्रत्येक ठिकाणीं शरण यावे असें म्हणतात ॥ ३ ॥ कानानें नेहमीं तुमचे कीर्ति गुण गावे व अखिल विश्वामध्यें विठ्ठलराय अविष्कृत झालेले पहावे असें नेत्रांना वाटतें ॥ ४ ॥ तुमच्या नामरूपी अमृताच्या सेवनानें जिव्हाहि सुखमय

होण्यानें शांत झाली आणि त्यायोगे जन्म-जन्मांतरीच्या दुःखाचा विसर पडला ॥ ५ ॥ असें असतां असा कोण भाग्यहीन पुरुष आहे कीं जो वैकुंठाची इच्छा करील असें नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

जन्ममरणाच्या खुंटती लहरी । वांया का येरझारी सीणतोसि ॥ १ ॥ सांगेन तें करी मन मुळीं आंवरीं । एकांतीं क्षणभरी चल जाऊं ॥ २ ॥ आकारलें तितुकें आहे नाशिवंत । देव आणि भक्त कैंचे तेथें ॥ ३ ॥ नामा म्हणे केशवा असो तुझें गुज । तुजवाचोनि मज नकळे कांहीं ॥ ४ ॥

(५२४) जन्ममरणाच्या लाटा ज्या अर्थी स्थगित होणाऱ्या असल्यानें व्यर्थ कां भवचक्राच्या योगे शीण पावतोस ॥ १ ॥ एकांतामध्यें क्षणभर आपण बसू या. चल पाहूं माझ्याबरोबर. प्रथम तूं आपले मन स्थिर कर अशी तुला जी माझी आज्ञा आहे ती मान्य कर ॥ २ ॥ जो कांहीं तुला दृश्याकार दिसत आहे तो सर्व नाशवान आहे, तेथें देवभक्त हा भाव कसा रहाणार ? ॥ ३ ॥ हे केशवराया तुझें हे गुपीत ब्रम्ह ज्ञान तुझ्याजवळच ठेव तुझ्याशिवाय मी दुसरें कांहीं जाणत नाहीं असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

माय मेली (नाम्या) पोरटें लहान । कवाड धरून उभे ठेलें ॥१॥ नेणते बापुडे दारवंटा धरी । शेखी आस करी भितरील ॥२॥ राउळीं म्हणती कैचें हें भणंग । जंव तंव आंग चुकावीत ॥३॥ जाति नाहीं त्यासि कायसी पंगती । म्हणोनी एकांतीं बैसविलें ॥ ४ ॥ केशवाचे नामें बाह्यठाकी पूजा । तेथें बऱ्या बोजा बैसविले ॥५॥ देव म्हणे नाम्या पोशीन मी तूंतें । नामामृतशितें देऊनियां ॥ ६ ॥

(५२५) एकाद्या अर्भक बालकाची आई मेली असतां तो अनाधार होतो व कोणाच्याहि द्वारापुढें कवाडे धरून दीनवाणें उभे रहातो ॥ १ ॥ अर्भक हे अजान असल्यानें कोणाच्याहि उंबरठ्याचा आश्रयास राहून मला कांहीं खाद्य मिळेल अशा अशेनें आंतील मानसाची वाट पहातो ॥ २ ॥ ते अर्भक जसजसा आपलें अंग चुकवितो तेव्हां ती घरची मंडळी हा भिकारी म्हणून

त्याची निर्भर्त्सना करितात ।। ३ ।। अरे या अपरीचीत बालकाची जातच माहिती नाहीं त्यास आपले पंगतीत कसे घ्या म्हणून त्यास कोठें तरी एकीकडे बसवितात ।। ४ ।। अशी ही नामदेवरायाची स्थितीं व्यवहारांत खरी परतु केशवाचें ठायीं त्याची निष्ठा असल्यानें प्रत्यक्ष केशवरायानें तो बाहेर असतांना त्याची पुजा केली आणि आदर सत्कारपूर्वक त्यास असनस्थ केलें ।। ५ ।। हे नामया तुला मी नामामृताचे शिते देऊन तुझे पोषण करीन असें देवराय म्हणतात ।। ६ ।।

केशव पुसे नामयासी । तुझी नांदणूक कैसी ।। १ ।। आम्हां काय उणें काय उणे । तुझेनि धर्मे दातारा ।। २ ।। तुम्हां घरीं बोचकें लुगडीं । आम्हां घरीं पोरें उघडीं ।। ३ ।। तुम्हां दुर्ग दारवंटा । आम्हां घरीं बारा वाटा ।। ४ ।। तुम्हां घरीं गाई म्हशी । आम्हां । घरीं उंदीर घुशी ।। ५ ।। तुम्हां घरीं बटकी दासी । आम्हां घरीं आहेत लांसी ।। ६ ।। तुम्हां घरीं शेजा बाजा । आम्हां घरीं तृण शेजा ।। ७ ।। तुम्हां घरीं सुवर्ण मडकीं । आम्हां घरीं खापरें फुटकी ।। ८ ।। तुम्हां घरीं लेंकुरें वाडें । आम्हां घरीं तुळशी झाडें ।। ९ ।। नामा म्हणे तुमचे घरीं सोनें दाम । आमुचे घरीं तुमचें नाम ।।१०।।

(५२६) हे नामया तुझ्या घरची परिस्थिती कशी काय आहे ? असें त्यास केशवराय प्रश्न करितात ।। १ ।। अहो दातारा, तुमची आम्हावर पूर्ण माया असतां आम्हाला काय कमी आहे ।। २ ।। अहो देवराया, तुमच्या येथें लुगड्यांचे ढीग आहेत तर आमच्या घरी आमची मुलें उघडी वागडतात ।। ३ ।। तुमच्या घराला कोटकिल्लेवजा दारवटा आहे आमचे घर म्हणजे त्यास चहुंकडून मोकळेपणा ।। ४ ।। तुमच्या घरीं पहातां गाया व म्हशीचे मीठे व आमच्या येथें उंदीर घुशींचा सुळसुळाट ।। ५ ।। तुमच्या येथें दासदासी ह्या हात जोडन सेवेसी उभ्या आहेत. आमच्या येथें मांजरांचा सुकाळ आहे ।। ६ ।। शेजा, बाजा, पलंग ह्या तुमच्या येथें आहे आणि आमच्या येथें गवताचा बिछाना आहे ।। ७ ।। सुवर्णाचीं भांडीं तुमच्या येथें

तर आमच्या येथें फुटकीं मडकीं आहेत ॥ ८ ॥ तुमच्या घरीं लेंकरांबाळानें घर भरलेलें आहे आमच्या येथें तुळशीचीं झाडें आहेत ॥ ९ ॥ सुवर्ण व पैसा ह्यानें तुमचें घर भरलेलें आहे आणि तुमच्या नामानें आमचें घर दुमदुमलेले आहे असें नामदेवराय म्हणतात ॥ १० ॥

भक्त पुंडलिकें असली उभा केला । त्याचेनि रागें मजसी धरिला अबोला ॥ १ ॥ मी तुझें पोसणें मी तुझें पोसणें । मी तुझें पोसणें पांडुरंगा ॥ २ ॥ तुझी कृपा नाहीं रे हें सत्य । मी तरी प्रत्यक्ष रूप अवलोकितों ॥ ३॥ नामा म्हणे केशवा तूं जाणतोसी मातें । उफराटे पाहोनी गिळतों मी तूंतें ॥ ४ ॥

(५२७) भक्त पुंडलीकरायानें तुला (युगानुयुगें) उभा केला म्हणून कां त्या रागानें तू माझ्याशी मौन धारण केलेस ? ॥ १ ॥ हे पांडुरंगराया, मी तुझ्याकडून पोसलो गेलो आहे असें तुला त्रिवार सांगत आहे ॥ २ ॥ माझ्यावर तुझें खरें प्रेम नाहीं असें तुझ्या कृतीवरून मला प्रत्यक्ष दिसत आहे ॥ ३ ॥ हे केशवराया मी कसा आहे हे तूं जाणत आहेस तुझी-ही उलट क्रिया पाहून मी तुला पूर्णपणें गिळीन-आत्मसात करीन असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

भक्ताचे हृदयींची जाणोनि अवस्था । आल्या शरणागता लोभापरू ॥ १ ॥ संता पुसे माझा दाखवा रे नामा । तुम्हां समागमा खेळे सदा ॥ २ ॥ दृष्टिसी दाटलें कृपेचें भरितें । म्हणे तें आवडतें केउतें गेलें ॥ ३ ॥ वाहे जल नयनीं कोमायिलें वदनीं । आणा रे गवसुनी आळीकरा ॥ ४ ॥ तंव तो वाट पहात होता परलक्षी । भेटी देऊनि सुखी केला देवें ॥ ५ ॥ नामा म्हणे विठो माझा सुखराशी । क्षणीं दूर जासी हृदयींचा ॥ ६ ॥

(५२८) जो भक्त शरणांकित झालेला आहे त्याच्या हृदयाची स्थिती पूर्णपणें जाणणारा असा हा प्रेमळ देव आहे ॥ १ ॥ तुमच्या संहवासांत

अपणारा व तुमच्याशी नित्य खेळणारा हा माझा प्रेमळ नामा कोठें आहे मला प्रत्यक्ष दाखवा हो असें संताना देवराय विचारितात ॥ २ ॥ हा माझा नामा कोठे गेला आहे ! त्याच्या वियोगानें माझ्या दृष्टीच्या ठायीं कृपेचे आविष्करण झाले आहे ॥ ३ ॥ नेत्रांतून जलधारा वहात आहेत. मुखकमल सुकून गेलें आहे. माझ्या लाडीक नामाला कोणीतरी शोधून आणा ॥ ४ ॥ नामदेवराय हा परमात्म्याची सारखी वाट पहात होतां तेव्हां देवरायानी त्याला भेट देऊन आनंदित केलें ॥ ५ ॥ हे माझ्या सुखसागरा विठ्ठलराया, माझ्या हृदयांतून तूं दूर होऊं नकोस असें नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

कां रे विष्णुदासा कोमाईले वदन । गांजिलासी कवणें दुराचारी ॥ १ ॥ क्षण एक जीव नगमे मज वेगळा । मीहि त्या जवळा सदा असे ॥ २ ॥ वैकुंठ भुवन नलगे माझे चित्तीं । म्हणी याची खंति होईल तुज ॥ ३ ॥ लक्ष्मीचे विलासी नलगे माझें मन । म्हणीं याचे प्राण जांचावती ॥४॥ मी हो याचे प्राण हाही माझें मन । जाणती हे खूण भक्त माझे ॥ ५ ॥ म्हणोनि जवळी बोलाविला केशिराजें । नामा धरी वोजे चरण दोन्ही ॥ ६ ॥

(५२९) हे विष्णुदासा तुला कोणारे दुष्टानें दुःख दिले आहे ज्याचे योगे तुझे मुखकमल म्लान झालें आहे ॥ १ ॥ क्षणभरहि तुझा वियोग माझ्या अंतःकरणाला असह्य होतो म्हणून मी तुझ्याजवळ नित्यशः असतो ॥२॥ माझें चित्त वैकुंठभुवनीं क्षणभरहि रमत नाहीं. कदाचित् त्यायोगे तुझ्या मनाला दुःख होईल ॥ ३ ॥ तुझें प्राण माझ्या वियोगानें कासावीस होतील म्हणून लक्ष्मीच्या विलासामध्यें माझें मन रमत नाहीं ॥ ४ ॥ जणूं काय हा माझा प्राण असूनें मीहि त्याचे मन आहें हे मर्म माझें भक्त पूर्णपणें जाणतात ॥ ५ ॥ केशिराजानें नामयास जवळ बोलाविले असतां त्यांनीं देवरायाचे दोन्ही पाय प्रेमानें घट्ट धरिले ॥ ६ ॥

देवा ही विनंती माझी । म्यां सेवा करावी तुझी । आस न करावी दुजी । या अभिलाषाकारणें ॥ १ ॥ तुज म्या जीवें अनु-

सरावें । आणि तुम्हीहि तैसेंचि अपंगावें । परी आणिकाचें न म्हणावें । जन्मोजन्मीं दातारा ॥ २ ॥ तुज न पोसवे दातारा । तरी आयुष्या घाली चिरा । एका या पोटा दुर्भरा । साठीं अव्हेरूं नको गा ॥ ३॥ वदनीं तुजाचि वर्णावे । श्रवणीं गुण नाम ऐकावें । नयनीं चरण न विसंबावे । क्षण एक दातारा ॥ ४ ॥ अगा येऊनियां संसारा । नवजावे आणिकाच्या द्वारा । इष्टमित्र सज्जन सोईरा । बंधु आदी करोनि ॥ ५ ॥ मज न म्हणोत सकळ जन । परि तूं नको गा उदासीन । तुझिया नामावाचून । आणीक नेणें मी दातारा ॥ ६ ॥ नामविक्रय न करावा । दान प्रतिग्रह न घ्यावा । स्वकष्टार्जित मेळवावा । तोचि ग्रास आपुला ॥ ७ ॥ नको दिवटधा छत्र घोडे । जेणें तुजसी अंतर पडे । तुझें नामची आवडे । मज बापुडें म्हणोत कां ॥ ८ ॥ ऐसा अन्यायी अपराधी । अहो मज तारा कृपानिधी ॥ तुझें नामची उच्चारीं आधीं । थोर अट्टाहास्य करूनि ॥ ९ ॥ विष्णुदास नामा म्हणे । आम्हां उपेक्षिसी झणें जन्मोजन्मींचें पोसणें । केशवा उणें येऊं नेदी ॥ १० ॥

(५१०) हे देवराया, मी तुमचा सेवक व्हावा याशिवाय दुसरी कोणतीहि वासना मनामध्यें उद्‌भवू नये हीच माझी तुमच्याजवळ विनंती आहे ॥ १ ॥ मी तुमच्या सर्वस्वी अंकीत व्हावे आणि तुम्हीहि माझे जिव्हाळ्यानें संरक्षण करावें. परंतु जन्मोजन्मीं हे मी परावलंबी होऊं नये ॥ २ ॥ तुझ्याकडून माझे पोषण होत नसल्यास माझे आयुष्य कुंठित कर केवळ या उदरभरणानिमित्त माझा त्याग करूं नकोस ॥ ३ ॥ हे दातारा, मुखानें तुमचे गुणानुवाद गावेत कानानें तुमचे नाम श्रवण करावे आणि नेत्रानें फक्त तुमच्या पायाचें दर्शन घ्यावे ॥ ४ ॥ जन्मास आल्यानंतर दुसऱ्याच्या द्वारीं केव्हांहि जाऊं नये मग ते इष्ट मित्र असो कीं सज्जन सोयरे अथवा बंधु

असो ॥ ५ ॥ हे दातारा, जग माझा त्याग करो तथापि तूं मात्र उदासीन राहूं नकोस. कारण मी तुझ्या नामाशिवाय दुसरें कांहीं जाणत नाहीं ॥ ६ ॥ नामाचा विक्रय करूं नये अन्य कोणाकडून दान घेऊं नये स्वकष्टानें मिळविलेला तो आपला ग्रास होय ॥ ७ ॥ मशाली किंवा छत्र्या व घोडे ह्या वैभवसंपन्न वस्तु त्या तुझ्या प्रेमामध्यें येणाऱ्या अडगळी होत. मला कोणी दीन म्हणोत परंतु फक्त मला तुमचें नामच प्रिय आहे ॥ ८ ॥ मी अन्यायी अपराधी खरा, परंतु हे कृपानिधे, तुम्ही माझें संरक्षण करा. मी केवळ तुमच्या नामाचा उच्चार अट्टाहासानें करीन ॥ ९ ॥ हे केशवा, तूं माझा जन्मोजन्मीचा संरक्षक आहेस ना ! तेव्हां त्यामध्यें किंचित न्यूनता नसावी म्हणून माझा त्याग करूं नकोस असें विष्णुदास नामदेवराय म्हणतात ॥ १० ॥

माझिया भक्तां जे ठेविती दुषण । तुटोनी रसना पडेल त्याची ॥१॥ ऐसे दुराचारी असती जे नर । भोगिती अघोर सत्य जाणा ॥२॥ माझिया भक्ता जे करिती छळण बुद्धि । त्यांची वंशवृद्धि नव्हे कदा ॥ ३ ॥ माझिया भक्ताचा करिती उपहास । त्यांचा समूळ वंश यमलोकीं ॥ ४ ॥ केशव म्हणे नाम्या बोलिलीं सत्यावाणी । लटिकें म्हणेल पतनी पडेल पापी ॥ ५ ॥

(५३१) माझ्या एकनिष्ठ भक्तांची जे कोणी निंदा करतील किंवा दोष लावतील त्यांची जिव्हा तुटून पडेल आणि असे जे कोणी पापी पुरुष असतील ते अघोर अशा नरकामध्यें पडतील ॥ २ ॥ जे कोणी पापी पुरुष माझ्या भक्तांचा छळ करतील त्यांचा वंश छेद होईल ॥ ३ ॥ माझ्या भक्तांचा उपहास करणारे पापी नरांचा सर्व वंश यमलोकी वास्तव्य करील ॥ ४ ॥ हे नामया, मी जे कांहीं प्रतिपादन केलें आहे ती सत्यवाणी होय जो कोणी असत्य म्हणेल तो पतन पावेल असें केशवराज म्हणतात ॥ ५ ॥

देवें चहूं भुजीं दिलें आलिंगन । कुरवाळिलें वदन चहूं करें ॥ १ ॥ धरूनि हनुवटी पाहे कृपादृष्टि । केली सुखवृष्टि करुणाघनें

॥ २ ॥ नामदेव ऐसें नाम त्या ठेविलें । तेणें अनुभविलें प्रेमसुख ॥ ३ ॥ हे संत भागवत माझिये आवडी । माझ्या रूपी बुडि देऊनि ठेले ॥ ४ ॥ परि या सकळांहूनी तुझा भक्तिभावो । अमृत पान्हावो अधिक बोल ॥ ५ ॥ ज्ञान विज्ञानाचे मंडण ज्ञानेश्वरू । वैराग्याचा मेरू निवृत्ति रावो ॥ ६ ॥ स्वात्मसुखबोधाचा सिंधु हा सोपाना सर्वांत भूषण भक्तराज ॥ ७ ॥ परमानंद जोगा जगन्मित्र नागा । वटेश्वर चांगा केशवदास ॥८॥ सांवता बंका चोखा आणि रोहिदास । या सकळाहुनि विशेष महिमा तुझा ॥ ९ ॥ हा दास खेचर नरहरि सोनार । आणि गोरा कुंभार भानुदास ॥ १० ॥ हे माझे आवडते महाभक्तराज । परि तुझेनि तृप्ति मज अधिक होय ॥ ११ ॥उद्धव रुक्मांगद भीष्म आणि नारद । बालकें ध्रुव प्रल्हाद प्रसिद्ध जगीं ॥ १२ ॥ हे विषयीं विरक्त सहज जीवन्मुक्त । परी तुझा अधिक भाग्य महिमा ॥ १३ ॥ हे संत सोइरे जीवलग आमुचे । सांगाती जीवाचे आवडते ॥ १४ ॥ परि तुझा आनंद सर्वांहुनि आगळा । मज असे मानला नामदेवा ॥ १५ ॥

(५३२) देवरायांनीं आपल्या चारी हातानीं नामदेवरायांना आलिंगन दिले आणि चारी हातांनीं त्यांचे मुख कुरवाळले ॥ १ ॥ त्याची हनुवटी धरून देवरायानें त्याचेकडे कृपादृष्टीनें पाहिले आणि करुणारुपी मेघाचा वर्षाव केला ॥ २॥ नामदेव असे ज्याचे नाव ठेविले त्यांनींच प्रेम सुखाचा अनुभव घेतला ॥ ३ ॥ इतर संत भागवत हे माझ्या आवडीचे असून तेही माझ्या स्वरूपामध्यें समरस झाले खरें ॥ ४ ॥ परंतु त्यांच्याहून या नामदेवरायाचा भक्तिभाव अधिक तर असून त्याचे बोल म्हणजे जणूं काय अमृतच पान्हावलेले होत ॥ ५ ॥ ज्ञानेश्वर म्हणजे ज्ञानविज्ञानाचे-भूषण होय निवृत्तिराय हे वैराग्याचे मेरू होत ॥६॥ सोपानराय हे स्वात्मसुखाचा सिंधूच होत

परंतु हा (नामदेव) सर्वांत भूषण होय ॥ ७ ॥ परमानंद जोगा, जनमित्र नागा, वटेश्वर चांगा, केशवदास ॥८॥ सावता, बंका, चोखा आणि रोहिदास हे माझे भक्त खरे परंतु हे नामया, तुझा महिमा यांच्याहून अधिकतर आहे ॥ ९ ॥ हा दास जो खेचर स्वामी व नरहरी सोनार, व गोरा कुंभार आणि भानुदास ॥ १० ॥ हे जे महाभक्तराज ते माझे आवडते खरे; परंतु तुझ्या सहवासामध्यें मला अधिक तृप्ती होते ॥११॥ उद्धव, रुक्मांगद, भीष्म, नारद, बालक ध्रुव व प्रल्हाद हें जगामध्यें भक्त असल्याचें प्रसिद्ध आहे ॥ १२ ॥ हेहि भक्त विषयाचे ठायीं विरक्त असून सहज नित्य जीवन्मुक्त आहेत. परंतु त्यांमध्यें तुझा भाग्यमहिमा श्रेष्ठ आहे ॥ १३ ॥ उपरिनिर्दिष्ट जी संत भक्तऋषींची नामावली दिली आहे तेहि माझे जिवलग प्रिय सखे असून मला ते जिवापासून आवडतात ॥ १४ ॥ परंतु हे नामदेवा, तुझ्या संगतीमध्यें जो आनंद होतो तो अपूर्व असा आहे हें मला सर्वस्वी मान्य आहे ॥ १५ ॥

जन्मोजन्मीं आम्ही बहु पुण्य केलें । तेव्हा या विठ्ठलें कृपा केली ॥ १ ॥ जन्मोनि संसारीं झालों त्याचा दास । माझा तो विश्वास पांडुरंगीं ॥ २ ॥ अनेक देवता नेघे माझें चित्त । गोड गातां गीत विठोबाचें ॥ ३ ॥ भ्रमर सुवासीं. मधावरी मासी । तैसें या देवासीं माझें मन ॥४॥ नामा म्हणे मज पंढरीस न्या रे । हडसोनी घोरे विठोबासी ॥ ५ ॥

(५३३) आम्ही जन्मोजन्मीं पुण्याचा संचय केल्यानेंच विठ्ठलानें आमच्यावर कृपाप्रसाद केला ॥१॥ जन्मल्यापासून माझा पूर्ण विश्वास पांडुरंगरायावर असून त्याचा मी दास झालो आहे ॥ २ ॥ विठ्ठलरायाचें गीत गाण्यांत माधुरी प्राप्त होत असल्यानें अन्य देवतांकडे माझें चित्त वेधलें जात नाहीं ॥ ३ ॥ माझे चित्त देवरायावर असे वेधून गेले कीं जणूं काय

टीप–असेच प्रशस्तिपत्र नामदेवरायांना ज्ञानदेवरायांनीं दिलें तो तीर्थावळींतील १५ वा अभंग. पहा–' ऐसें हो तु कां समाग्य सर्वज्ञ संपन्न । परि तुजविण न मनि मी विष्णुदासा ॥ १०–१५ ॥ ना. सा. गाथा १ ला भाग ॥

फुलांतील मकरंदसेवनामध्यें मधुमक्षिका तल्लीन होते ।। ४ ।। अहो संत-जणहो मला पंढरीस घेऊन चला आणि खडसून विठ्ठलरायाच्या स्वाधीन करा असें नामदेवराय म्हणतात ।। ५ ।।

मी माझा देव मीच माझा भक्त । मी माझा कृतार्थ सहज असें ।। १ ।। बंध आणि मोक्ष मायेची कल्पना । पडली होती मना कसी भ्रांती ।। २ ।। विठ्ठलें विचारें दाखविलें सुख । होतें जें असंख्य हारपलें ।। ३ ।। नामा म्हणे सोय सांपडली निकी । झालों एका-एकीं हरीचा दास ।। ४ ।।

(५३४) आतां माझी स्थिति अशी झाली आहे कीं माझें ध्येय जो पंढरीनाथ तोच मी स्वतः झालों आणि माझा भक्तहि मीच झालो ।। १ ।। बंध आणि मोक्ष ह्या केवळ मायाजन्य कल्पना होत अशा भ्रांतीचें दडपण मनावर कसें पडलें होतें कोण जाणे ? ।।२।। विठ्ठलरायानें कृपा केली म्हणून सत्याचा विचार माझ्या ठिकाणीं आविष्कार झाला व त्यायोगे खरें अपार निजसुख प्राप्त होऊन अनंत दुःखवेदना नष्ट झाल्या ।। ३ ।। आतां मला योग्य मार्ग सांपडला म्हणूनच मी या विठ्ठलरायाचा खरा दास झालों असें नामदेवराय म्हणतात ।। ४ ।।

भीत नाहीं भीत नाहीं । अखंडहि सावध[१] ।।१।। उघड समाधि उघड समाधि । अंतरबुद्धि निर्मळ ।। २ ।। गोंविसी कासया गोंविसी कासया । पंढरीराया सांभाळीं ।।३।। नामा म्हणे जगज्जीवना । नारा-यणा सांभाळीं ।। ४ ।।

(५३५) मी आतां नित्य जागृत होण्यानें भीतीचें संपूर्ण उच्चाटन झालें ।। १ ।। आतां माझी समाधी ही भूमिगत किंवा परिच्छन्न नसून ती स्पष्ट अर्थात पूर्ण साम्यरूपानें आहे आणि त्यायोगें माझी अंतस्थ बुद्धी

टीप-१ अद्वैत स्थिती प्राप्त होणें हेंच अखंड सुखाचें मुख्य मर्म होय. व अशी स्थिति साध्य होणें हेंच देवरायाचें दास होणें होय. भेदबुद्धी विघातक असून अभेदबुद्धी विधायक होय. हेंच सज्जन वैष्णवांचें मत आहे.

निर्मळ झाली आहे ।। २ ।। हे पंढरीराया, व्यर्थ कां मला कृत्रिम क्रियेमध्ये बंदिस्त करीत आहांत ? आतां तुम्हीच माझे संरक्षण करा ।। ३ ।। हे जगज्जीवन नारायणा, माझा तुम्ही पूर्ण सांभाळ करा असें नामदेवराय म्हणतात ।। ४ ।।

सांवळी श्रीमूर्ति हृदयीं बिंबली । तरी पालटली देहबुद्धि ।।१।।
धन्य माझा जन्म धन्य माझा भाव । ध्यानीं केशीराज नांदतसे ।।२।।
आशा तृष्णा कैशा मावळल्या देहीं । बुडोनियां पायीं ठेलें चित्त।।३।।
नामा म्हणे ऐसी विश्रांती पै झाली । हृदयीं न्याहाळी केशीराज ।।४।।

(५३६) सावळी श्री मूर्ति ही माझ्या हृदयामध्यें पूर्णपणें संचरल्यानें माझ्या देहबुद्धीचे परिवर्तन होऊन ती आत्माकार झाली ।। १ ।। माझ्या ध्यानांत केशवरायानें वास्तव्य केल्यानेंच माझा जन्म व भाव धन्य होय ।। २ ।। माझ्या अंत:करणांतील आशा तृष्णा ह्या नष्ट होऊन देवरायाच्या चरणी माझें चित्त लवलीन झालें ।। ३ ।। अशा प्रकारें मला पूर्ण विश्रांती मिळाली आहे. आतां मी माझ्या हृदयीच केशवराजाना डोळे भरून पाहीन असे नामदेवराय म्हणतात ।। ४ ।।

कृपेच्या सागरा भक्तजन करुणाकरा । परियेसी उदारा केशिराजा ।। १ ।। मज घातलें संसारीं. काळाचें आहारीं । करुणा कैसी हरी नये तुज ।। २ ।। माझी सोडवण करी गा कृपानिधी । तोडीं हे उपाधि संसाराची ।।३।। पुत्र कलत्र बंधु सांगाति देहाचे । मज बांधिलें मोहाचे वज्रापाशीं ।। ४ ।। तिहीं माझें चित्तीं केले तडा तोडी । नाहीं एक घडी सुखलेश ।। ५ ।। सकळहि सांगाती संभार कर्माचे । नेदिती नामाचें स्मरण कोणी ।। ६ ।। दु:खाचे डोंगर पडिले मजवरी । धांव वा श्रीहरी पांडुरंगा ।।७।। ऐशा सुखगोष्टी मज न करिती कोणी । झालों चक्रपाणी परदेशी ।। ८ ।। शिणलीया न म्हणती बैस वे विश्रांती । आठवी या श्रीपती पांडुरंगा ।। ९ ।। सकळांचें द्यस्यत्व केला थोर आशा । मानिला भरंवसा मज हे ती म्हणोनी ।। १० ।। तंव त

भजनी आपुलिया हिता। न करिती माझी चिंता परलोकीची ॥११॥ ऐसा दुर्जनांचा धरोनि पातेरा। केला मी मातेरा आयुष्याचा ॥१२॥ कुटुंब काबाडी तुजसी कानकोंडा। झालों या ब्रह्मांडा भूमीभार ॥ १३ ॥ ऐसी करूणेचीं उत्तरें ऐकोनी पंढरीरायें। कटिवरूनी बाहे उभारिली ॥ १४ ॥ नामी नामी नामया भय न धरीं सर्वथा। माझ्या शरणांगता कोण गांजीं ॥ १५ ॥

(५३७) हे केशिराजा, तूं कृपेचा सागर आणि भक्तजनांवर करुणा करणारा व उदार आहेस ना ! तेव्हां तुम्ही माझी विनंती श्रवण करा ॥१॥ हे हरि, मला या संसारांत घालून काळाच्या स्वाधीन करण्यामध्यें तुम्हाला माझी दया कां आली नाहीं ॥ २ ॥ तेव्हां हे कृपानिधी आतां तरी या संसार उपाधीचीं बंधनें नष्ट करून मला मुक्त करा ॥ ३ ॥ देहसंबंधी असलेले जे पुत्र कालत्र आणि बंधु यांचा मोह जणूं काय वज्रसारखा कठोर आहे त्यांच्या योगें मी बांधला गेलों आहे ॥ ४ ॥ त्यायोगे माझ्या चित्ताचे तुकडे तुकडे झाले असून क्षणभरही सुखाचा लेश प्राप्त होत नाहीं ॥५॥ कर्मानें हा सर्व समूहाचा योग आल्यानें त्यांतील एकहि व्यक्ती तुमच्या नामस्मरणाचीं आठवण देत नाहींत ॥ ६ ॥ हे श्रीहरि पांडुरंगा, माझ्यावर जणूं काय दुःखाचे डोंगर आदळले आहेत तेव्हां तूं माझ्याकरितां धांवत ये ॥ ७ ॥ माझ्याशीं कोणीहि सुखासमाधानानें दोन शब्दहि बोलत नाहींत त्यायोगें हे चक्रपाणी मी परदेशासारखा झालो आहे ॥८॥ मी यांच्या उठाठेवीत श्रमलों भागलों असतां मला बसा किंवा विश्रांती घ्या असा कोणी दिलासा देत नाहींत आणि म्हणून हे श्रीपति पांडुरंगा तुमचे मी स्मरण करितो ॥ ९ ॥ हे आप्तवर्ग मला प्रसंगीं साह्य करतील माझें होतील या विश्वासानें मी यांचीं जिवाभावानें सेवा केली ॥ १० ॥ परंतु हा सर्व आप्तवर्ग स्वार्थी निघाला. ते केवळ आपल्याच हिताची काळजी करूं लागले माझ्या कल्याणा संबंधी त्यांच्या हृदयांत कांहींच प्रेमाचा ओलावा आढळला नाहीं ॥ ११ ॥ अशा दुष्ट वर्गाच्या ठिकाणीं विश्वास धरून राहिलो आणि मी माझ्या सर्व आयुष्याचा नाश केला ॥ १२ ॥ कुटुंबाच्या जोपासनेस्तव काबाडकष्ट करीत

असतां तुझ्याकडे माझे दुर्लक्ष झाले आणि त्यायोगें माझें जीवन म्हणजे या ब्रम्हांडामध्यें भूमीभार झाले ॥ १३ ॥ अशी ही नामदेवरायाची हृदयद्रावक करुणा पंढरीनाथानें श्रवण करींतांच त्यांनीं आपल्या कटीवर असलेले हात उंच उभारिले ॥ १४ ॥ हे नामया, तूं किंचित्‌हि घाबरूं नकोस आणि भीतीहि धरूं नकोस. अरे माझ्या शरणांगतांना कोण बरें दुःख देणारा आहे असें पांडुरंगराय नामदेवरायांना आश्वासन देत आहेत ॥ १५ ॥

परियेसी नाम्या सांगतों मी तुज । अंतरींचें गुज भक्तराया ॥ १ ॥ तूं माझें आवडतें कृपेचें पोसणें । चित्ताचें बैसणें करीन तुज ॥ २ ॥ येणें संतसंगें यावें माझ्या गांवा । भोगावें राणिवा वैकुं-ठीच्या ॥ ३ ॥ माझिया कथेची ज्या बहु आवडी । माझी प्रेम गोडी पडीये जया ॥ ४ ॥ त्याची पायधुळी लागावी सर्वांगे । म्हणोनी मागें मागें हिंडतसें ॥ ५ ॥ भक्त त्या यातीचे भलतेनी भावें । भलते एक ध्यावें नाम माझें ॥ ६ ॥ त्याचिया उपकारें दाटे मी सर्वथा । मुगुट करूनी माथां वाहीन त्यासी ॥ ७ ॥ तनु मन प्राण दिधलें जेणें मातें । भजहूनि पठीयंतें नाहीं त्यासी ॥ ८ ॥ चिंता न करीं नाम्या नुपेक्षी सर्वथा । अभय करु माथां ठेविला देवें ॥ ९ ॥

(५३८) हे भक्तराया नामया मी तुला माझ्या अंतःकरणांतील गुह्य सांगत आहे ॥१॥ तूं माझा जिवलग असून माझ्या कृपेनें तुझें पोषण होत आहे. म्हणून मी तुला माझ्या चित्ताचे बैसणें करीन–चित्तांत राखून ठेविन ॥ २ ॥ तूं संतसंगतींत राहून माझ्या गांवाला ये आणि माझ्या वैकुंठ सुखाचा भोग घे ॥ ३ ॥ माझ्या कथेची ज्यांना आत्यंतिक आवड आहे आणि माझे ठायीं ज्यांचे अविरत प्रेम आहे ॥ ४ ॥ अशा प्रेमळाची पायधुळ माझ्या सर्वांगाला लागावी म्हणून मी नित्यशः त्यांच्या मागोमाग फिरत असतों

टीप–ऐसें भजतेनि प्रेमभावें । जया शरीरही पाठीं न पवे । तेणें भलतया व्हावें जातीचिया' ४.१५–९ मग याहीवरी पार्था । माझ्या भजनी आस्था । तरी तयातें मी माथा । मुकुट करी ॥ २१४॥१२ ॥ ज्ञा.

॥ ५ ॥ भक्त हा कोणत्याहि जातीचा असो व कोणत्याहि भावनेनें माझे नांव घेवो ॥ ६ ॥ त्यांच्या अशा उपकारानें मी खचला जातों आणि त्याला मी माझ्या शिरावरील मुकुट करितों ॥ ७ ॥ ज्यांनीं मला आपला देह, प्राण व मन अर्पण केले आहे आणि माझ्याशिवाय ज्याला दुसरें प्रिय नाहीं ॥ ८ ॥ हे नमय . अशा प्रिय भक्तांची मी केव्हांहि उपेक्षा करीत नाहीं. म्हणून तूं सर्व चिंता टाकून दे असें देवरायांनीं अभय देऊन त्याच्या मस्तकावर हात ठेविला.

तुझ्या माझ्या शेता नाहीं पेंडवळा । दावियेला डोळा पांडुरंग ॥ १ ॥ कल्पनेची पेंडी पाप कुंदा काढी । काशा देशघडी लाविेयेल्या ॥ २ ॥ त्रिगुण तिफणी धरोनी सूत्रधारी । वेद बैल चारी जुंपियेले ॥ ३ ॥ अनाथाचें शेत प्रेमाचा ओलावा । शेत राखे देवा पांडुरंगा ॥ ४ ॥ ब्रम्ह नामबीज बांधेनिया ओटी । पेरी दाटोदाटी नामदेव ॥ ५ ॥

(५३९) हे पांडुरंगा, तुझ्या आणि माझ्या शेतांमध्यें अर्थात तुझ्या माझ्या स्वरूपामध्यें किंचितहि भेद नाहीं हा तुम्ही मला प्रत्यक्ष प्रत्यय डोळ्याला आणून दिला ॥ १ ॥ मध्यंतरीं येणारी कल्पनेची पेंडी आणि देहबुद्धीची बुडकें काढून निकामी गवताची तर धुळधाण केली ॥ २ ॥ त्रिगुणरूपी जो तिफणी (नांगर) तो हातीं धरलेला आहेस व त्यास चार वेदरूपी बैल जुंपले आहेस ॥ ३ ॥ माझे अनाथाचे शेताला प्रेमाचा ओलावा लावून या पांडुरंग देवरायानें माझ्या शेताची जोपासना केली ॥ ४ ॥ ब्रम्हनाम हें जें बीज आहे तें आपले पोटाशीं बांधून नामदेवानें त्याची अति खवून पेरणी केली ॥ ५ ॥

देव देव्हारा पाट हृदय संपुष्ट । मनीं कृष्णमूर्ते बसविली ॥ १ ॥ प्रेमाचे पाण्यानें प्रक्षाळीन तुज । आत्मस्वरूप निज पांडुरंगा ॥ २ ॥ भावें केलें गंध भक्तीची अक्षता । वाहिली विठ्ठला देवावरी

॥ ३ ॥ मन केला मोगरा चित्त केलें शेवंती। भक्तीची तुळशी अर्पियेली ॥ ४ ॥ धूप दीप आर्ती ओवाळीन तुज। एक केशवराज सकळ सिद्ध ॥ ५ ॥ त्रिवेणी पक्वान्न केलें ब्रह्मार्पण। वांच्छित भोजन अर्पियेलें ॥ ६ ॥ नामा म्हणे देवा सेवा केली एका। पंचप्राण सखा विटेवरीं ॥ ७ ॥

(५४०) देह हा देव्हारा असून हृदयसंपुष्ट हा पाट होय. त्यावर कृष्णमूर्तिची स्थापना केली ॥ १ ॥ हे निज आत्मस्वरूप पांडुरंगा प्रेमजलानें तुझें प्रक्षाळण केलें ॥ २ ॥ भाव हे गंध व भक्तीरूपी अक्षता त्या मी देवरायाच्या मस्तकीं वाहिल्या ॥ ३ ॥ माझें शुद्ध मन हाच मोगरा असून चित्त ही शेवंती होय आणि भक्ती ही तुळस ती मी देवरायांना अर्पण केली ॥४॥ हे देवराया, तुला मी धूप दीप आणि आरति ओवाळीन. कारण एका केशिराजाच्या योगे सकळ वस्तु सिद्धी हस्तगत होतात ॥५। त्रिवेणीरूपी पक्वान्न तें मी ब्रह्मार्पण केलें व त्यांचें इच्छित भोजन त्यांना दिलें ॥६॥ माझा पंचप्राण असा सखा विठ्ठलराय जो विटेवर उभा आहे त्याची मी या विधीनें सेवा केली असें नामदेवराय म्हणतात ॥ ७ ॥

आषाढी कार्तिकी विसरूं नका मज। सांगतसे गुज पांडुरंगा ॥ १ ॥ पतितपावन मी तो आहे खरा। तुमचेनि बरा दिसतसें ॥२॥ तुम्ही जातां गांवा हुरहुर माझे जीवा। भेटेल केधवां मजलागीं? ॥३॥ धांवोनियां देव गळां घाली मिठी। स्फुंदस्फुंदून गोष्टी बोलतसे ॥४॥ तिहीं त्रिभुवनीं मज नाही कोणी। म्हणे चक्रपाणी नामयासी ॥५॥

(५४१) आषाढी व कार्तिकी या वारीस मला न विसरतां माझ्याकडे या असें हें गुह्य पांडुरंगराय सांगतात ॥ १ ॥ मी पतीतपावन आहे खरा. परंतु तुमच्यायोगेंच मला सुंदरपणा आलेला आहे ॥ २ ॥ जेव्हां तुम्ही आपल्या गांवी जातां तेव्हां तुमच्या वियोगानें मला हुरहुर वाटतें आणि मला तुम्ही पुन्ही केव्हां भेटाल असें माझ्या जिवाला तळमळ लागते. ॥ ३ ॥ देवराय हे भक्ताकडे जाऊन प्रेमानें त्यांच्या गळ्याला मिठी देतात आणि त्यांच्यासंगे स्फुंदत स्फुंदत प्रेमाच्या गोष्टी करितात ॥ ४ ॥ हे

नामया, तुझ्याशिवाय असा प्रेमसखा या त्रिभूवनांत नाहीं असें चक्रपाणी त्यास म्हणतात ॥ ५ ॥

मूर्खाहातीं दिलें रत्न पारखिसी । तयाच्या मोलासी घेऊं नका ॥१॥ आम्हीं तैसें झालों आम्हीं तैसें झालों । आम्हीं तैसे झालो जाणतेची ॥ २ ॥ आंगीं नाहीं बळ होड घाली राया । आम्ही गेलो वायां तेणें न्यायें ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसें केलें तयापरी । आम्ही निरंतर तुम्हांसवें ॥ ४ ॥

(५४२) मूर्खाजवळ परीक्षा करण्याकरितां दिलेल्या रत्नाची किंमत त्याच्या ठरविलेल्या किंमतीवरून घेणें म्हणजे फसगत होय ॥ १ ॥ जाणतेपणानें तशीच आमची स्थिति झाली आहे असे विचार सांगत आहे ॥ २ ॥ अंगात शक्ती नसतांना राजाशी पैज मारणें हे धोक्याचें आहे. तशीच आमची फसगत झाली आहे ॥ ३ ॥ तसाच प्रकार कदाचित् आमचा होणार म्हणून हे देवराया तुमच्या सहवासांत आम्ही नित्य असतो असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

टीपः– आषाढी व कार्तिकीची वारी करणें ही वारकरी यांचे नैमित्तिक कर्म होय व ती करावी अशी विठ्ठलरायाची आज्ञा किंबहुना अंतरीची तळमळ आहे. कार्तिकी शुद्ध एकादशी । पंढरीयात्रा होईल संरसी । दुसरी कृष्ण वद्य निर्धारिसी । तूंज दिधली आहे ॥ ६–३ असें ज्ञानेशाच्या समाधी महिमेमध्यें नामदेवरायांनीं ध्वनित केलें आहे. अद्वैतज्ञान व प्रेमभक्ती हीं वारकरी संप्रदायाचीं मूल्यें होत. आणि वारि आदि नित्यनैमित्यादिक कर्माची जोपासना करणें हे त्यांचे कर्तव्य होय. ' माझ्या मनींचि आवडी । पंढरपुरा नेईन गुढी ' ज्ञानेशानीं या अभंगांतून स्व· हृदगत व्यक्त केले आहे. तैसे स्वामीचिया मनोभावा । न चुकीजे हेचि परम सेवा । येर ते गा पांडवा । वाणिज्य करणें ॥ ५१३–१७ ॥ ८ ॥

तुझा तूं आहेसी एकलारे एकु । वायां कां हा शोकु वाढविसी ॥ १ ॥ आपणा मानसीं विचारोनी पाहीं । सावध नाम्या होई सोय धरी॥२॥ तुझा तूंचि देव तूझा तूंचि भक्त । पाहे पा सिद्धांत गुरुमुखें।।३।। तुझा तूंचि पूज्य तुझा तूं पुजिता । भजन भजता तुझा तूंचि ।।४।।तुझा तूंचि गुरु तुझा तूंचि शिष्य । तुझा उपदेश तुज नाम्या ॥ ५ ॥ नामा म्हणे केशवा हें सर्व माझें । हृदयीं चरण तुझे निरंतर ॥ ६ ॥

(५४३) हे नामया, या विश्वामध्ये तूंच एकाकी रूपाने स्थित आहेस तेव्हां तुला व्यर्थ शोक करण्याचें कारण काय ? ॥ १ ॥ तूं आपल्या ठिकाणी अंतर्मुख होऊन आत्मशोधन कर आणि सावध होऊन खऱ्या मार्गाचें अवलंबन कर ॥ २ ॥ देव काय अथवा भक्त काय ! तूंच अंगानें स्वयं आहेस व असा हा अढळ सिद्धांत गुरुमुखानें अनुभव घे ॥ ३ ॥ पूज्यता आणि पूजन किंवा भजन अथवा भजन करणारा तूच स्वयं आहेस ॥ ४ ॥ तुझा गुरु तूच असून शिष्यहि तूच आहेस. हे नामया, असा हा उपदेशहि तूच आहेस ॥ ५ ॥ हे देवराया, तुम्ही जें काही सांगितलें आहे तें माझेच स्वरूप खरे. परंतु तुमचे पाय मात्र माझे हृदयी नित्यशः आहेत असें नामादेवराय म्हणतात ॥ ६ ॥

केशव म्हणे नामयासी । जै तूं दूर धरिला होतासी । तै तूं काकुळती भाकिसी । मजलागीं हिंडसी दाही दिशा ॥ १ ॥ तुझें गाऱ्हाणें सांगों संतांपाशी । तींहीं तुज सरतें केलें भक्तीसी । मी तंत्र

टीप:–कृतोपासक आणि अकृतोपासक असे उपासकामध्यें द्विविध भाव आहेत.ज्ञान होण्यापूर्वी ज्यांची उपासना प्रखर आहे त्यास ज्ञान झालें असताहि त्याची उपासना अव्याहत होत असते म्हणून ज्ञानाच्या सप्त भूमिका वर्णन केल्या आहेत या दोघामध्यें तत्वज्ञानानें प्राप्त होणाऱ्या मुक्तीमध्यें भेद नसतो मात्र विशेष सुखामध्ये फरक असतो अकृतोपासक हा मुक्तावस्थेस प्राप्त होतो.खरा मात्र कृतोपासक हा इतर बहुजन समाजाला उपकारक होतो.

वंद्य तिहीं लोकांसी । त्वां तंव मजशी प्रजियेलें ।। २ ।। आमुचीं वर्मे कर्मे बोलतोसी । सलगी करूनि फार जातोसी । उंच पदवी दिलिया पायकासी । तरी काय स्वामीसी भिऊं नये? ।। ३ ।। मी विश्वासलों तुझिया भावासी । परि तूं शब्देंहि न पुससी । म्यां तंव अमृतदृष्टी पाहिलासी । अढळपदाशी दावियलें ।।४।। मी तंव वंद्य त्रिभुवनांसी । श्रुति स्मृति आगमासी । न कळें अठरा पुराणांसी । ऐसे त्वां मजसी प्रजियेलें ।।५।। आतां असोत बहु बोलासी । शाहाणे सिणले मानसीं । तप्तलोह उदक ग्रासी।तैसा होऊनि ठेलासी । विष्णुदास नामयारे।।६।।

(५४४) जेव्हां मी तुला दूर केले होतें तेव्हां तूं माझ्याकरितां दीन होऊन दाही दिशा भटकत होतास ना ? असें नामयाला केशवराज म्हणतात ।। १ ।। तुझें गाऱ्हाणें संतास सांगण्यास जावें तों त्यानीं तुझ्या भक्तीला भुलून तुला आपलेंसें केले मी त्रैलोक्यास वंद्य असतांहि तूं माझ्याशीं प्रतारणा केलीस ।। २ ।। इतकेंच नव्हे तर तुझ्याशी मित्रत्व करावे तर तूं आमच्या वर्म छिद्राचा स्फोट करितोस सेवकांना एकादी उच्च पदवी मिळाली असतां त्यांनीं कां स्वामीस भिऊं नये ? ।।३।। तुझ्या प्रेमळ भक्तीला भुलून तुझ्यावर आत्यंतिक विश्वास ठेवला किंबहुना मीं तुझ्यावर अमृतवृष्टी करून तुला अढळ पदाचें मार्गदर्शन केलें परंतु तूं एका शब्दानेंहि आमची विचारपूस करीत नाहींस ।। ४ ।। मी त्रिभुवनाला वंद्य, श्रुति, स्मृति, वेद आणि अठरा पुराणाला अगम्य, अशाहि मला तूं चकविलेंस ।।५।। आतां या संबंधी ज्यास्त काय भाषण करावें ? सुज्ञानानें स्वमनांतच विचारणा करावी. हे नामया, ज्याप्रमाणें तप्तलोहावर पाणी टाकले असतां ते पाण्याचा नाश करते तशीच हे विष्णुदास नामया तुझी ही कृति नव्हे काय ? ।। ६ ।।

योगाने जोडिली सायासें । ते मज बोळली वोरसें ।। १ ।। बरवी कामधेनु गाय । विठाबाई माझी माय । नसतां सरा सांठवण

तृप्त केलें त्रिभुवन ॥ ३ ॥ कोटि कुळें वोरसली । पुरोनि अवधीच उरली ॥ ४ ॥ न साहे अहंकाराचा वारा। आली दीनाचिया घरां । ॥ ५ ॥ नामा म्हणे हें दुभतें । जोडूनि दिधलें असे बापें ॥ ६ ॥

(५४५) योगानें जी स्थिति साध्य होणारी आहे ती आम्हाला सहज साध्य होऊन तिनें आम्हाला पान्हा दिला ॥ १ ॥ अशी ही कामधेनूसारखी माझी विठाईमाता आहे ॥ २ ॥ जिला स्तन नाहीं व जेथें कांसहि नाहीं असें असतांहि तिनें त्रिभुवन तृप्त केलें ॥ ३ ॥ कोटी कुळांना तृप्त करून ती पूर्णत्वानें अवशेष राहिली ॥४॥ जिला अहंकाराचा वारा किंचित् स्पर्श करीत नाहीं ती आमच्यासारख्या गरिबाचे येथें होऊन आली ॥ ५ ॥ हें जें दुभतें आहे तें माझ्या बापाच्या कृपेनें मला प्राप्त झालें असें नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

आत्मज्ञान प्राप्ति

आत्मत्वाच्या योगें पाहूं जातां । नाहीं निरंतर भिन्न दैवतां ॥ १ ॥ वर्णाश्रम याति कुळ गोत्र । भक्ति सदोदित नामापाशीं ॥ २ ॥ नामा म्हणे भय मुळीं कांहीं नाहीं । अखंडित पाहीं भक्तिसार ॥३॥

(५४६) एकच आत्मा आहे. तेथें दृश्यमान भिन्न भिन्न देवतांचा अत्यंताभाव आहे, असा आत्मज्ञानाच्या दृष्टीनें पहातां प्रत्यय येतो ॥ १ ॥ नामाचे ठिकाणीं केवळ प्रेम-भक्ति असते. तेथें वर्णाश्रम, जाति, कुळ व गोत्र यांचा कांहीं संसर्ग नसतो ॥ २ ॥ भक्ति हीच चिरकालिक असल्यानें ती करणाराचे ठिकाणीं भयादिकांचा अत्यंताभाव आहे, असें नामदेवराय म्हणतात ॥ ३ ॥

आम्हासी चिंतन अवश्य श्रीरामा । आवडी आणिक आम्हा नाहीं दुजी ॥ १ ॥ वोळंगलो हरि भूतभावी निर्धारी । दिसे चराचरीं

टीप १. आत्मनिष्ठाचे ठायीं एक आत्मा तर नाम-निष्ठावंताचे ठायीं एक भक्ती-प्रेम असतें.

भावरूप ॥ २ ॥ जें जें पडे दृष्टी आणिक नाहीं सृष्टी । हरिरूपीं भेटी होचि दिसे ॥ ३ ॥ नामा म्हणे विठ्ठल सर्वांभूतीं आहे । आणिक उपाय न लगती ॥ ४ ॥

(५४७) श्रीरामाचें चिंतन हेंच आम्हाला प्रिय आहे. इतरांसंबंधीं आम्हाला यत्किंचितहि गोडी नाहीं ॥ १ ॥ हें सर्व चराचर केवळ एक हरीच आहे असा भाव–निश्चय असल्यानें मी भूतमात्राचे ठिकाणीं प्रेम करितों ॥ २ ॥ आमच्या दृष्टीला जो जो पदार्थ दिसतो तो तो एक हरीच आहे. त्यांवाचून या सृष्टीत अन्य कांही नाही. असें असल्यानें त्यारूपानें आम्हांला तो भेट देत आहे असें वाटतें ॥ ३ ॥ विठ्ठलराय हाच सर्व भूतीं नांदत आहे असा निश्चय होणें याशिवाय विठ्ठल भेटीचें दुसरें साधन नाहीं, असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

धन्य माझा जन्म धन्य माझा वंश । धन्य विष्णुदास स्वामी माझा ॥ १ ॥ कामधाम माझे केशवाचे पायीं । दिननिशी पाहे हारपलीं ॥ २ ॥ शुक सनकादिकां जेणें सुखी केलें । ते सुख राहिलें माझ्या मनीं ॥ ३ ॥ नामा म्हणे जगीं अलभ्य लाभ झाला । हरी सांपडला विटेवरी ॥ ४ ॥

(५४८) धन्य माझा जन्म आणि धन्य माझा वंश. तसेंच विष्णुदासांचा स्वामी जो पांडुरंगराय त्याची धन्य होय ॥ १ ॥ केशवरायाचे पायीं निमग्न असणें हाच माझा कामधंदा असल्यानें माझे ठिकाणचे दिवस व रात्र हे भाव नष्ट झाले आहेत त्यांचें मला भान होत नाहीं ॥ २ ॥ ज्या विठ्ठलरायांनीं शुक, सनकादिकांना सुखी केलें त्यांनींच (सुखमय वस्तूनें) माझ्या हृदयीं वास्तव्य केलें आहे ॥ ३ ॥ विटेवर उभा असलेला हा हरी सांपडला. हाच मला मोठा अलभ्य लाभ झाला आहे, असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

तिर्थीसी जाऊनि काय म्यां करावें ? वाउगें हिंडावें पंथें तेणें ॥ १ ॥ माझें तीर्थ क्षेत्र पंढरी पैं जाण । उघडें निधान दृष्टीपुढें ॥२॥ मागे थोर थोरीं हेंचि पैं साधिलें । नाम्यासी दिधलें खेचर यानें ॥ ३॥

(५४९) तीर्थयात्रादिकांना जाण्यांत कोणता हो माझा पुरुषार्थ आहे ? या मार्गाचें अवलंबन करणें म्हणजे भटकण्याचा व्यर्थ त्रास होय।।१।। पंढरीक्षेत्र हेंच माझें तीर्थ होय. पंढरीराय हे येथें प्रत्यक्ष डोळ्यापुढें उभे आहेत ।। २ ।। पूर्वी मोठमोठ्या भक्तांनीं सेवा करून यांची प्राप्ति करून घेतली व तेच गुरु खेचरस्वामी यांनीं नामयाला दिले--गुरु खेचरस्वामीं-कडून प्राप्त झाले ।। ३ ।।

असो आतां किती हेचि ठेवाठेवि । कृपा विठ्ठल देवीं केली मज ।। १ ।। अंतरिंच्या सुखा नाचतसें भोज । हेचि निजगुज जाणवलें ।। २ ।। नामा म्हणें अंतरींचें निजगुज । सांगितलें मज पाडुरंगें ।। ३ ।।

(५५०) विठ्ठलरायानें माझ्यावर पूर्ण कृपा केली असतां आतां झालेल्या कृतीबद्दल वारंवार उठाठेव चर्वितचरण करण्यांत काय हाशील आहे ? ।। १ ।। अंतःकरणाला सुख झाल्यानें आनंदानें मी नाचत आहे. ह्याच निजगुह्याची प्रचीति मला आली ।। २ ।। अंतरींचें जें निजगुज आहे तें मला पंढरीरायानें सांगितलें, असें नामदेवराय म्हणतात ।। ३ ।।

आम्हां जतन करावया उभा विटेवरीं । तळवटीं पंढरी ओढवली ।। १ ।। तिहीं लोकीं पीकला असे जगजीवन । प्राप्ती पाहून दान देत असे ।। २ ।। चातका चिंतनीं जलधर गगनीं । पुढार देऊनीं पुंडलिका ।। ३ ।। विष्णुदास नामा विनवी वेळोवेळा । विठ्ठली जीवनकळा मुरलिसे ।। ४ ।।

(५५१) आमचें जतन करण्याकरितां म्हणूनच हा विठ्ठलराय विटेवर उभा आहे आणि पंढरीक्षेत्र हें या भूलोकीं प्रकट झालें ।। १ ।। हा जगज्जीवन तिन्ही लोकांमध्यें पिकला आहे--प्रसिद्धीस आला आहे आणि ज्याचा जसा अधिकार असेल त्याप्रमाणें त्यास तो दान देतो ।। २ ।। चातकाच्या तृप्तीकरितां म्हणून ज्याप्रमाणें आकाशांतील सजल मेघ वर्षाव करितो त्याप्रमाणें पुंडलीकाला पुढें करून त्याच्या निमित्तानें हा विठ्ठलराय

जगाचा उद्धार करितो ॥ ३ ॥ माझी जीवनकला विठ्ठलाचे ठिकाणीं सम-रस झाली आहे असें विष्णुदास नामा वारंवार विनंती करीत आहे, नम्र-पणें सांगत आहे ॥ ४ ॥

माझा भाव तुझे चरणीं । तुझें रूप माझे नयनीं ॥१॥ सांपडलों एकमेकां । जन्मोजन्मीं नाहीं सुटिका ॥ २ ॥ त्वां तोडिली माझी माया । मी जडलों तुझ्या पायां ॥ ३ ॥ त्वां मज केलें विदेही । म्यां तुज धरिले हृदयीं ॥ ४ ॥ नामा म्हणे गा सुजाणा । सांग ठकिलें कोणकोणा ॥ ५ ॥

(५५२) माझा भाव तुझ्या चरणीं असून तुझें रूप माझ्या डोळ्यांचा विषय झाला आहे ॥ १ ॥ आपल्या एकमेकांची आपणाला ओळख झाली आहे. ती आतां जन्मोजन्मीं कांहीं सुटावयाची नाहीं—तिचा वियोग जन्मोजन्मीहि होणार नाहीं ॥ २ ॥ तूं माझी माया नष्ट केल्यानेंच तुझ्या पायाशीं मी जडून अभिन्न झालों आहे. ॥३॥ तूं मला विदेही केल्यानेंच तुला मीं माझ्या हृदयीं सांठविलें ॥ ४ ॥ हे, सुजाणा, येथें कोणीं कोणाला फसविलें आहे याचा निर्णय तुम्ही सांगा पाहूं, असें नामदेवराय म्हणतात ॥ ५ ॥

मन झालें उन्मन वासना तल्लीन । देखे हरिचरण सर्वांठायीं ॥ १ ॥ गुरुशिष्य मत हरपला दृष्टांत । प्रत्यक्ष त्वरित हरि झाला ॥ २ ॥ नामा म्हणे पाहे रूप चहूं बाही । दीशाद्रुमित दाही हरि दिसे ॥ ३ ॥

(५५३) माझें मनाला उन्मनी अवस्था प्राप्त झाली आणि वासनाहि स्वस्वरूपी लीन झाली--विराम पावली, यामुळें सर्वत्र हरिचरणांचें दर्शन मला होत आहे. ॥ १ ॥ अशा या साम्यस्थितीमध्यें गुरु व शिष्य हा भाव (दृष्टांत) नाहीसा होऊन मला हरि हा त्वरित प्रत्यक्ष झाला ॥ २ ॥

अठ्ठावीस युगें उभा चंद्रभागे । परी पालटची नेघे पांडुरंग ॥ १ ॥ उभा उगेपणें पुंडलिकाचेनीं सुखें । आहे तेथें लक्षें जैसा

तसा ।। २ ।। प्रेमरससंगें प्रीतीचेनी पांगें । सदा संतसंगें खेळ करी ।। ३ ।। जो नलभे योगें यागें आणि देहत्यागें । तो सांपडला सर्वांगे हृदयीं धरा ।। ४ ।। धुंडाळितां श्रुतिस्मृतीं जो नुमगे । तो भक्ता साहे मार्गे सांभाळित ।। ५ ।। योगियांच्या ध्यानीं क्षणएक न रंगें । तो सुखी गोष्टी सांगे नामयासी ।। ६ ।।

(५५४) हा पांडुरंगराय अठ्ठावीस युगें चंद्रभागा तीर्थाच्या कांठीं सतत उभा असतांहि अद्याप त्याच्यामध्यें कांहींच पालट--बदल झाला नाहीं. ।। १ ।। पुंडलीकाच्या सुखाकरितां हा तेथें मुग्धपणें जसा उभा आहे तसाच तो दिसत आहे ।। २ ।। हा देवराय भक्तीच्या आवडीनें प्रेमरसामध्यें रंगून जाऊन संतांच्या संगतींत नित्य खेळत असतो ।। ३ ।। जो योगक्रियेनें अथवा यागादि कर्मांनीं किंबहुना देहत्याग केला असतांहि जो अवगत होत नाहीं तो आतां सहज प्राप्त झाल्यानें त्यास सर्वांगानें आपल्या हृदयीं सांठवा. ।। ४ ।। श्रुतिस्मृतींना ज्याचा बोध होत नाहीं तो भक्तांना साहयकारी होऊन त्यांचें संरक्षण करितो ।। ५ ।। जो योगी लोकांच्या ध्यानामध्यें क्षणभरहि रंगत नाहीं-स्थित होत नाहीं तो हा विठ्ठलराय नामदेवरायाबरोबर प्रेमाच्या गोष्टी करीत आहे ।। ६ ।।

आम्ही परीट चोखट। शुद्ध केलें खटनट ।। १ ।। बोध साबण लावुनी ठायीं । डाग उडविला पाहीं ।। २ ।। शांती शिळेवरी धुतलें ज्ञानगंगे निर्मळ झालें ।। ३ ।। परब्रम्ह होउनी ठेलों । नामा म्हणे। सुखरुप झालों ।। ४ ।।

(५५५) आम्ही जातिवंत कसे परीट असल्यानें खटनट अज्ञादुष्ट पापी लोकांना आम्ही पवित्र केलें ।। १ ।। या जीवांच्या ठायीं असलेला जो अज्ञानाचा डाग तो आम्हीं बोधरूप साबण लावून धुऊन टाकला ।। २ ।। शांतिरूपी शिळेवर अंतःकरणरूप कपडा धुतला आणि ज्ञानरूपी निर्मळ गंगेमध्यें शुद्ध केला ।। ३ ।। आम्ही प्रत्यक्ष परब्रम्ह झाल्यानें आनंदरूप झालों, असें नामदेवराय म्हणतात ।। ४ ।।

आम्ही देह केलें दुकान । तेथें सांठविलें ब्रह्मज्ञान ।। १ ।। एके खेपे पैं लाभ झाला । आम्हा पंढरीनाथ भेटला ।। २ ।। पुण्य सत्वाची केली सांगडी ।। ब्रह्म तुकून बांधली पुडी ।। ३ ।। तुझा दास मी वाणिया भला । नामा केशवचरणीं विनटला ।। ४ ।।

(५५६) आम्ही आमच्या देहाचें दुकान केलें, असून त्यामध्यें ब्रम्ह-ज्ञानाचा माल सांठवून ठेविला आहे ।। १ ।। एकाच वेळेस आम्हांला जो लाभ झाला त्यायोगे आम्हाला पंढरीनाथाची भेट झाली ।। २ ।। सात्विक पुण्याची सांगडी–तराजू केलो आणि ब्रम्ह तोलून त्याची पुडी केली ।। ३ ।। उत्तम वाणी–व्यापारी असलेला जो मी तुझा दास नामदेव तो केशवाच्या पायीं समरस झाला ।। ४ ।।

कोटी दिवाळ्या दसरे । आम्हां होचि झालें पुरें ।। १ ।। घरो-घरीं ओंवाळणीं । विठ्ठल देखिला नयनीं ।। २ ।। झाला सुखाचा शेजार । करा नामाचा गजर ।। ३ ।। नामयाचा स्वामी आला । ब्रह्मादिक आनंद झाला ।। ४ ।।

(५५७) ज्या सुखामध्यें आम्हीं स्थित आहोंत तें सुख आम्हांला कोटयवधी दिवाळया व दसरे यांच्याइतकें आहे ।। १ ।। विठ्ठलरायांचा पाहण्यांत घरोघरीं केलेल्या ओवाळणीचें सुख प्राप्त होतें ।। २ ।। सुखावस्था प्राप्त झाल्यानें नामाचा गजर करा ।।३।। नामदेवरायाचा स्वामी आल्यानें ब्रम्हादिकांनाहि आनंद झाला आहे ।। ४ ।।

मी म्हणें उरलें मायापोटीं बाळक।पाहे तंव कौतुक तेंहीं नाहीं ।। १ ।। तेथींचें तेथें दंपत्य लोपलें । कळींकाळें मंथिलें नामें थोर ।। २ ।। तेंहि घेऊनि ठेलों. मी येथें लोपलें । ब्रह्मींच गुंतलों ब्रह्म-गाळें ।। ३ ।। नामा म्हणे चैतन्या चैतन्य मिळालें । अरुप रुपें ठेलें आपणांमाजी ।। ४ ।।

(५५८) मायेच्या 'पोटीं मी व माझें' हें बालक उरलें होतें मायेच्या योगानें मी व माझें असा द्वैत भाव दृष्टोत्पत्तीस येत होता. परंतु विचाराअंतीं तें कौतुक-द्वैत नाहींसें झालें. ॥१॥ ज्या प्रभावशाली नामानें कळि-काळाचा नाश केला त्या नामाच्या प्रभावानें तें (मी व माझें हें) जोडपें तेथल्या तेथेंच लोपलें ॥ २ ॥ तेंच नाम घेऊन मी येथें राहिलों असतां माझें मीपण लोपून ब्रम्हमाळेमध्यें ब्रम्हरूपानेंच गुंतून राहिलों ॥ ३ ॥ आतां चैतन्य हेंच चैतन्याशीं समरस झालें आणि स्वस्वरूपीच अरूपरूप होऊन राहिलों ॥ ४ ॥

मज तुज निगदलें निगदलें । राहे कळीकाळा उगलें ॥ १ ॥ अरे खंडलें एके बोलें । समर्थें होतां अंगिकारिलें ॥ २ ॥ नाम्यानें संसारिक जिंकलें । केशव चरणीं मन ठेविलें ॥ ३ ॥

(५५९) तुझी व माझी एकत्र सांगड पडल्याकारणानें कळिकाळाची मात्रा बंद पडली ॥ १ ॥ हे देवराया, समर्थ अशा तूं माझा अंगीकार करून एका शब्दानें माझ्या सर्व संशयांचा निरास केलास ॥ २ ॥ या नामदेवानें केशवरायाच्या चरणीं आपलें मन ठेविल्यानें संसाराला जिंकिलें ॥ ३ ॥

सहस्रनामाचें वाटगें । खांदीं घेतलें नेटगें ॥ १ ॥ देवापातीं तुझी ग देवा पाती तुझी । सरकत माझी भक्तीभावें ॥ २ ॥ पंढरीये गेलों हाटा । दुकान मांडिलें वाळुवंटा ॥ ३ ॥ वैष्णवाची भरली सात । गिऱ्हाईक पातलें बहुत ॥ ४ ॥ विकरा होतसे नामाचा । लाभ झाला त्या विठ्ठलाचा ॥ ५ ॥ नामा देखुनि दुबळा । विठ्ठलें दिधलें मांडवला ॥ ६ ॥

(५६०) सहस्रनाम हीच कोणी जमीन ती मी खादण्याकरितां करारानें घेतली ॥ १ ॥ हे देवराया, यामध्यें तुझी जशी पाति म्हणजे भागीदारी तद्वत भक्तिभाव ही माझी भागिदारी ॥ २ ॥ मी पंढरीच्या बाजारांत गेलो आणि तेथील वाळवंटामध्यें दुकान थाटले ॥ ३ ॥ त्या बाजारांत वैष्णवांची अति गर्दी होण्यानें गिऱ्हाईकहि फार मिळाले ॥ ४ ॥

त्यायोगें नामाचा पुष्कळ विक्रय होण्यानें विठ्ठल स्वरूपाचा लाभ झाला ॥५॥ नामा हा गरिब आहे हे पाहून विठ्ठलानें नामाचे भांडवल दिले ॥६॥

चितनीका–वाटगे या ठिकाणीं वाडगें असा पाठ घेऊन खांद्यावर कावड असा अर्थ करितात.

कोटी सूर्य प्रभादीप्ती । गगनीं झळकली अवचितीं ॥ १ ॥ संत नामया सांगती । पैल आला कमलापती ॥२॥ वत्सालागीं जैसी धेनु । तैसा धावे जगज्जीवनु ॥ ३ ॥ गरुडाचे पक्षवाती । दाही दिशा आक्रंदती ॥ ४ ॥ हरिकंठींची सुमनमाळा । सुटूनि आली भूमंडळा ॥५॥ उचलोनि दोहीं बाहीं । नामा धरिला हृदयीं ॥६॥

(५६१) कोटयावधी सूर्यांच्या प्रकाशाचें तेज एकाएकीं आकाशामध्यें झळकले ॥१॥ संत नामदेवाला म्हणाले कीं पलीकडे हा कमलापति (विष्णु) आला आहे. ॥२॥ वासराकरितां जशी गाय धांव घेते तसाच हा जगज्जीवन धांव घेत आहे. ॥३॥ गरुडाच्या पंखांच्या आवाजानें दाही दिशा दणाणून गेल्या आहेत. ॥४॥ हरीच्या कंठांतील पुष्पमाला त्याच्या कठातून सुटून या भू मंडलावर आली–पडली ॥५॥ अशा त्वरेनें येऊन श्रीहरीनीं आपल्या दोन्हीं हातांनीं नामदेवास उचलून हृदयीं धरिलें ॥६॥

झणीं दृष्टि लागो तुझ्या सगुणपणा । तेणें माझ्या मना बोध केला ॥ १ ॥ अनंता जन्मींचें विसरलों दुःख । पाहतां तुझें मुख पांडुरंगा ॥ २ ॥ योगीयांच्या ध्यानीं ध्यांता नातुडसी । तो तूं अम्हांपाशी मागें पुढें ॥ ३ ॥ नामा म्हणे जीवें करीन निंबलोण । विटेसहित चरण वोवाळीन ॥ ४ ॥

(५६२) ज्या सगुण स्वरुपानें तूं मला बोध केलास त्याला दृष्टी लागेल हो!–दृष्टि लागूं देऊं नकोस ॥१॥ हे पांडुरंगा, तुझें मुख दृष्टीनें पहातांच मी अनंत जन्ममरणांचें दुख विसरून गेलों. ॥ २ ॥ योग्यांना ध्याना नें जो तूं प्राप्त होत नाहीस तो तूं आमच्या' मागें पुढें' (सर्वत्र) उभा आहेस. ॥३॥ माझ्या जिवाभावानें तुला निंबलोण करीन आणि तुला विटेसहित चरणांवरून ओवाळीन, असें नामदेवराय म्हणतात. ॥४॥

श्रीराम जन्म माहात्म्य



अयोनि संभव । प्रगटला हा राघव ॥ ७ ॥

श्रीराम महात्म्य

श्रीराम जन्म

कुळगुरु वसिष्ठ सांगे नृपवरा। असती गरोदरा तुझ्या कांता॥ १॥
धर्मशास्त्र ऐसें डोहळे पुसावे। त्यांचे पुरवावे मनोरथ ॥ २ ॥
ऐकोनियां ऐसें आनंद मानसीं। कैकई सदनासी जाता झाला ॥ ३ ॥
मंचकीं बैसली होती ते पापिणी। देखतां नयनीं पहुडली ॥ ४ ॥
सुंदरपणाचा अभिमान मनीं। त्यावरि गार्भिणी नामा म्हणे ॥ ५ ॥

(१) हे राजन, तुमच्या कांता गरोदर आहेत असें वसिष्ठ त्यास सांगतात ॥१॥ तुमच्या स्त्रीला कोणते डोहाळे होतात हे विचारा त्यांची पूर्तता करावी, असें धर्मशास्त्र सांगतें ॥२॥ ही वसिष्ठांनी दिलेली बातमी ऐकून राजाला अति आनंद झाला. व तो कैकईच्या मंदिरीं गेला ॥३॥ दुष्ट कैकयी ही आपल्या पलंगावर बसली होती. परंतु राजाला पहातांच तिनें आपलें अंग पलंगावर टाकलें व झोपेचें सोंग आणलें. ॥४॥ तिला आपल्या सौन्दर्याचा जाज्वल्य अभिमान होता आणि त्यामध्ये तिचें गर्भारपणानें अधिक सौन्दर्य खुललें असें नामदेवराय म्हणतात. ॥५॥

राजा म्हणे इच्छा तुझिये मानसीं। डोहळे मजसी सांग आतां ॥ १ ॥
वैरी म्हणे ऐसें वाटतसे जीवा। कनिष्ठासी द्यावा राज्यपट ॥ २ ॥
ज्येष्ठासी धाडावें दुरी दिगंतरा। नये समाचार त्याचा आम्हां ॥ ३ ॥
जनांत हें निंद्य वेदबाह्य कर्म। करितां अधर्म पाप बहु ॥ ४ ॥
माझिये मस्तकीं ठेवावा हा दोष। तुम्हांकडे लेश नाहीं कांहीं ॥ ५ ॥
निंदितील जन मज वाटे सुख। ऐकतांची दुःख राया झालें ॥ ६ ॥
वृश्चिकाचे पेंवीं तक्षक पडत। घालिताती घृत अग्निमुखीं ॥ ७ ॥
ऐशी व्यथा होय नामा म्हणे त्यासी। उठिला त्वरेसी तेथूनियां ॥ ८ ॥

(२) हे राणी, तुला सध्या कोणते डोहाळे होतात, तुझ्या मनामध्यें काय इच्छा आहे ती मोकळया मनानें मला सांग व माझ्याकडून त्याची मागणी कर असें राजानें तिला विचारलें. ॥१॥ अहो राजन, धाकटयाला

राज्यपद द्यावे अशी माझी उत्कट इच्छा आहे असें राणीनें उत्तर दिले. आणि जो मोठा मुलगा आहे त्याला अशा दूर प्रांतीं पाठवावें कीं त्याची वार्ताही माझ्या श्रवणपटलावर येणार नाहीं, ॥३॥ माझी ही मागणी जनापवादात्मक आणि वेदाज्ञा विरुद्ध असें असून आणि त्याची अंमलबजावणी केली असतां पापाचा डोंगर उभा रहाणार आहे हे खरें ॥४॥ परंतु हा सर्व दोष मी माझ्या डोक्यावर घेण्याला तत्पर आहें तुम्हांला यापासून किंचीतही उपसर्ग पोहोंचणार नाहीं. ॥५॥ माझ्या अशा कृतीनें जनताही माझी निंदा करील हें खरें परंतु मला त्यायोगे आनंद होणार आहे. ॥६॥ विचवाच्या पेव्यामध्ये जसा सर्प पडावा किंवा अग्निमध्ये तूप घालावे. ॥७॥ राजाला असें हे भाषण ऐकून त्याच्या अंतकरणांत दु:खाचा डोंब उफाळला आणि तो त्वरित तेथून निघाला असें नामदेवराय म्हणतात. ॥८॥

येतसे दशरथ सुमित्रामंदिरीं। देखतां सामोरी गेली झाली॥ १ ॥
न माये आनंद तियेचे मानसीं। ठेवी मस्तकासी चरणांवरी ॥ २ ॥
घालोनी आसन प्रक्षाळी चरण। सर्वांगी लेपन तीर्थोदकें ॥ ३ ॥
गंध धूप दीप पुष्पांचिया माळा। अर्पूनी तांबुला उभी राहे ॥ ४ ॥
कैकयीचें दु:ख विसरला राव। पाहोनिया भाव सुमित्रेचा ॥ ५ ॥
होती जे डोहळे तुझिये मानसी। सांग मजपाशीं पतिव्रते ॥ ६ ॥
प्राणनाथा ऐसें वाटतसे जीवा। वडिलांची सेवा अहर्निशीं ॥ ७ ॥
आवडे हें एक नावडे आणिक। द्यावें मज एक हेंचि आतां ॥ ८ ॥
ऐकतांचि ऐसें कांतेचें वचन। आनंदें निमग्न मन होय ॥ ९ ॥
घेऊनिया हातीं रत्नाचें भूषण। टाकी ओंवाळून नामा म्हणे.॥ १० ॥

(५६५) राजा हा सुमित्रेच्या राजमहालांत आला असतां ती राजाच्या सामोरी गेली ॥१॥ आणि राजाला पाहून तिला हर्ष होऊन ती त्यांच्या चरणावर विनम्र झाली. ॥२॥ राजाकरितां तिनें उत्तम आसन घातलें त्यावर त्यांना बसवून त्यांचे पाय धुतले आणि त्यांच्या चरणोदक तीर्थानें तिनें

आपलें सर्वांग प्रक्षाळण केलें ॥३॥ गंध, धूप, दीप व पुष्पाच्या माला राणीनें राजाला अर्पण केल्या. त्यांच्या हातीं विडा दिल्यावर त्यांच्या सन्मुख विनम्र होऊन उभी राहिली ॥४॥ सुमित्रेचा असा हा प्रेमभाव पाहून राजाला कैकईच्या भाषणाचा विसर झाला. ॥५॥ हे पतिव्रते, तुझ्या मनामध्यें कोणतें डोहाळे होत आहेत ते मला सांग ॥ ६ ॥ अहो प्राणनाथ, वडिलांची सेवा सतत घडावी असें मला वाटतें. असें सुमित्रेनें आपले मनोगत राजास व्यक्त केलें ॥ ७ ॥ हेंच मला प्रिय आहे. या पेक्षां मला दुसऱ्या कोणत्याही वस्तूची आवश्यकता नाहीं आणि म्हणून मी जो तुमच्याजवळ मागणी केली आहे त्याची आपण पूर्तता करावी ॥ ८ ॥ ही राणीची अपेक्षा श्रवण करीतांच राजाला अतिशय आनंद झाला ॥ ९ ॥ राजानें आपल्याजवळचें बहुमोल अलंकार ओवाळून तिच्या ताटांत टाकलें असें नामदेवराय म्हणतात ॥ १० ॥

दशरथ राजा उठिला तेथुनी। कौसल्येचे सदनीं जाता झाला ॥ १ ॥
प्रहातसे दृष्टी तेव्हां श्रावणारी । न माये अंतरीं तेज तिचें ॥ २ ॥
तुझिये मानसीं होती जे डोहाळे । सांग वो वेल्हाळे मजपाशीं ॥ ३ ॥
उदरांत असे भक्तांचा कैवारी । तेथें कैंची उरी देहभावा ॥ ४ ॥
सदा समाधिस्थ रामरूप झाली । कौसल्या माऊली नामा म्हणे ॥ ५ ॥

(४) दशरथ राजा हा तेथून निघून कौसल्याच्या राजमहालांत गेला ॥१॥ दशरथानें तिला पाहिलें असतां तिचें तेज इतकें प्रभावशाली होतें की तें आंत बाहेर मावेनासें झाले. ॥२॥ अशा तिच्या सौन्दर्याला लुब्ध झाला व हे प्रिय राणी, तुला कोणते डोहाळे होत आहेत ते मनमोकळेपणानें मला सांग अशी तिला विनंती केली. ॥३॥ भक्तांचा कैवारी हा तिच्या पोटीं असल्यामुळे तेथे तिला कसा देहभाव राहणार ? ॥४॥ कौसल्या माता सतत समाधीस्थ असत, असें नामदेवराय म्हणतात. ॥५॥

न बोलेची कांहीं। ऐसी काय झालें । भूतें झडपिलें निश्चयेंसी ॥ १ ॥ माझिये अदृष्टीं नाहीं हा नंदन । म्हणोनियां विघ्न ओढवलें ॥ २ ॥ निवारीं हें दुःख वैकुंठनायका । रक्षीं या बाळका

सुदर्शनें ॥ ३ ॥ तुझा मी किंकर आजी अंबुजाक्षा । द्यावी मज भिक्षा हेचि आतां ॥४ ॥ नामाचा उच्चार ऐकतांचि कानीं । नेत्र उघडोनि पाहती झाली ॥ ५ ॥ राजा म्हणे कां हो ऐसी हे अवस्था । कां हो भ्रम चित्ता झाला असे ॥ ६ ॥ विश्वाचा मी आत्मा स्वयें असे राम मजमाजी भ्रम कैंचा असे ॥ ७ ॥ अवतार महिमा वाणी वेद माझा । सुरवरांच्या काजा नामा म्हणे ॥ ८ ॥

(५) राजानें जेव्हां कौसल्येचे मौन धारण केलेलें पाहिले तेव्हां हिला खरोखर भुतानें झडपलें असावें असें त्याला वाटले ॥१॥ हिच्या पोटी येणारा बालक हा मला लाभणार नसावा म्हणून कीं काय, असें हे विघ्न मध्यंतरीं उपस्थित झाले. ॥२॥ हे वैकुंठनायका, तुझ्या सुदर्शनानें या मुलाचें रक्षण कर आणि आलेलें विघ्न दूर कर अशी त्यांनी प्रार्थना केली. ॥३॥ वैकुंठनायक अशा पवित्र नामाचा उच्चार कर्णपटलावर येतांच कौसल्येनें आपले नेत्र उघडले ॥४॥ हे अंबुजाक्षा ! आज मी तुझा दास झालो आहे मी तुझी जी प्रार्थना केली ती भिक्षा मला घाला. ॥५॥ काय हिला हा भ्रम झाला आहे कीं त्यायोगे हिची अवस्था अशी व्हावी असें राजानें भाषण केले ॥६॥ तेव्हा कौसल्या म्हणाली हे राजा, मी विश्वाचा आत्मा आहे, किंबहुना स्वयं रामरूप आहे. माझ्या ठिकाणीं भ्रमाला कसें हो अस्तित्व असणार ? ॥ ७ ॥ देवादिकांना सुख देण्याकरितां मी अवतार धारण करितों असे वेद माझें महात्म्य वर्णन करितात असें नामदेवराय म्हणतात. ॥८॥

रावणें हें केलें लग्नामाजी विघ्न । असे कीं स्मरण तुजलागीं ॥ १ ॥ आणी रे धनुष्य मारीन रावणा । लंका बिभीषणा देईन मी ॥ २ ॥ अंगद सुग्रीव जांबुवंत वीरा । हनुमंत पाचारा लवकरी ॥३॥ टाकोनी पर्वत बुजवारे सागरा । पायवाट करा जावयासी ॥४॥ लंके पुढें मोठें माजवीन रण । तोडीन बंधन सुरवरांचें ॥ ५ ॥ विश्वामित्र

याग नेईन मी सिद्धि । मारीन कुबुद्धि दोघांजणां ॥ ५ ॥ खर दूष-
णांचा घेईन मी प्राण । धनुष्य मोडीन भुजाबळें ॥ ७ ॥ ध्याती मज
त्याची बहुत आवडी । न विसंबे घडी त्यासी एक ॥ ८॥ बोलिला
वाल्मिक तैसेंचि करीन । वर्तोनि दावीन नामा म्हणे ॥९॥

(५६८) अहो राजन माझ्या लग्नामध्यें रावणानें विघ्न आणले याचें स्मरण तुम्हांला नाहीं काय ? ॥१॥ अहो राजन, धनुष्य आणा पाहू त्या धनुष्यानें रावणाचा वध करून बिभीषणाला मी लंकाधिपती करीन. ॥२॥ अंगद, जांबुवंत आणि हनुमंत अशा वीर पुरुषांना त्वरित आग्रहानें पाचारण करा. ॥३॥ या भव्य सागरामध्यें मोठमोठे पर्वत टाका आणि सैन्य जाण्याकरिता तेथें पायवाट करा. ॥४॥ आतां मी लंकेमध्यें भयंकर युद्ध पेटवीन आणि देवादिकांचें बंधन तोडून त्यांना मुक्त करीन. ॥५॥ विश्वामित्रांनें ! आरंभलेला यज्ञ पूर्ण करिन आणि दुष्ट बुद्धीचें असलेल्या दोघाजनांचा नाश करिन ॥६॥ हे दुष्ट खर व दुष्याषण यांचा प्राण घेईन आणि माझ्या बाहूबलाने त्यांच्या धनुष्याचा भंग करिन. ॥७॥ जें भक्त माझे ध्यान करितांत त्यांच्या विषयीं " मला अधिक तर प्रेम असून त्यांचा मला क्षणभरहि विसर होत नाहीं. ॥८॥ वाल्मीक ऋषीनें ज्या प्रमाणें माझें भविश्य वर्तविले, तेच मी खरे करून दाखविन असें नामदेवरायं म्हणतात. ॥ ९ ॥

परब्रह्म पूर्ण आलें माझे घरीं। न कळे अंतरीं नृपाचिया ॥१॥
करीति वडवड होती भुतचेष्टा । पाचारा वसिष्ठा त्वंकरी ॥ २ ॥
येऊनि वासिष्ठ पाहे कौसल्येसी । नावरती तियेसी अष्टभाव ॥ ३ ॥
राजा म्हणे कैसें विपरीत झालें। वसिष्ठा झडपिलें महाभूतें ॥ ४ ॥
श्रावण वधाचें अघ नाहीं जळालें । दुजें हें निर्मिलें प्रारब्धासी ॥५॥
ऐकतांचि हांसे सावध होऊनि । बोलतसे मणीं नामा म्हणे ॥६॥

(७) प्रत्यक्ष परब्रम्ह हे आले येथें अवतारले आहेत हा बोध हे बुद्धीवाच राजाला उमगला नाहीं ॥ १ ॥ कौसल्येच्या भाषणानें हिला

भुतानें झडपले आहे असा त्याला भ्रम झाला आणि त्यांनीं वसिष्टाला बोलवा, अशी सेवकांना आज्ञा केली ॥ २ ॥ वसिष्ट ऋषीनें कौसल्येला पहातांच तिचें ठिकाणीं झालेल्या अष्ट सात्विक भावाचा अविष्कार त्यांच्या पाहाण्यांत आला ॥ ३ ॥ वसिष्टही महाभूतानें झडपले गेले काय ? कसा हो हा विपरीत प्रकार घडला ? ॥ ४ ॥ माझ्याकडून श्रावण बालकाच्या झालेल्या वधाचें पाप अद्याप नष्ट झाले नाहीं म्हणून का हे विपरीत प्रारब्ध कर्म निर्माण झालें ॥ ५ ॥ असे हे राजाचें भाषण श्रवणकरितांच कौसल्या माता हर्षीत होऊन भाषण करूं लागल्या असें नामदेवराय म्हणतात ॥६॥

विरंचीचा बाप क्षीरसागरवासी। ध्याती योगी त्यासी निरंतर ॥ १॥ परेहूनि पर वैखरीहूनि दुरी । कौसल्येचे उदरीं तोचि असे ॥ २ ॥ बोलियेलें जें जें नव्हे असत्य वाणी । न येऊं दे मनीं शंका कांहीं ॥ ३ ॥ माझें हें संचित धन्य धन्य आतां । पाहीन मी कांता लक्ष्मीच्या ॥ ४ ॥ धन्य धन्य धन्य अयोध्येचे लोक । वैकुंठनायक पहातील ॥५॥ धन्य पशुपक्षी श्वापदें तरुवर। राजा रघुवीर पाहतील ॥ ६॥ त्रैलोक्यांत धन्य तूंचि एक नृपा । नामयाच्या बापा पाहशील ॥७॥

(८) क्षीरसागरामध्यें रहाणारा जो ब्रम्हदेवाचा बाप ज्याचें सतत ध्यान योगीं पुरुष करितात. ॥ १ ॥ जो परावाणीहून पलीकडचा आणि वैखरी वाचेहून दूर असलेला तोच कौसल्येच्या उदरीं आहे ॥ २ ॥ कौसल्येनें जें भाषण केले आहे ते सत्य आहे. या संबंधीं हे राजन तूं आपल्या मनामध्यें किंचीतही संशय येऊं देऊं नकोस. ॥ ३ ॥ मला आतां लक्ष्मीच्या पतीचें दर्शन होणार आहे तेव्हां माझे प्रारब्ध धन्य धन्य होय ॥ ४ ॥ धन्य हे अयोध्यावासी जनहो तुम्ही आतां वैकुंठ नायकाला पहाल ॥ ५ ॥ हे राजन, या आयोध्यानिवासातील पशु, पक्षी, जनावरें आणि वृक्षादिक याना रघुविराचें दर्शन घडेल ॥ ६ ॥ हे राजन, तूं धन्य आहेस तुलाही ह्या रघुविराचें दर्शन घडेल. असे नामदेवराय म्हणतात. ॥ ७ ॥

उत्तम हा चैत्रामास । ऋतु वसंताचा दिवस ॥ १ ॥ शुक्लपक्षीं ही नवमी । उभे सुरवर ते व्योमीं ॥२॥ मध्यान्हासी दीनकर ।

पळभरी होय स्थिर ॥ ३ ॥ धन्य मीच त्रिभुवनीं । माझे वंशीं चक्र-पाणी ॥ ४ ॥ सुशोभित दाही दिशा । आनंद नरनारी शेषा ॥५॥ नाहीं कौसल्येसी भान । गर्भी आले नारायण ॥ ६ ॥ अयोनि संभव। प्रगटला हा राघव ॥ ७ ॥ नामा म्हणे डोळां । पाहीन भुवनत्रय-पाळा ॥ ८ ॥

(९) उत्तमांत उत्तम चैत्र महिना होय तो वसंत ऋतुचा दिवस होय ॥ १ ॥ शुक्ल पक्षाच्या नवमीला सुरवरादिक देवता हे अकाशांतून पहात आहेत. ॥ २ ॥ सूर्य हा माध्यान काळीं आला असतां तो पळभर स्थिर रहातो ॥ ३ ॥ माझ्या वंशामध्यें चक्रपाणी याने अवतार घेतल्यानें ह्या त्रिभूवनामध्यें माझी धन्यता आहे ॥ ४ ॥ दाही दिशा ह्या सुशोभित झाल्या आहेत आणि स्त्री-पुरुष व शेष हर्षोल्लहासीत झाले आहे ॥ ५ ॥ नारायण हे गर्भात आले असल्यानें कौसल्येला देहभान राहीले नाहीं ॥ ६ । रघुनाथ हे अयोनि रूपानें जन्मास आले॥७॥त्रिभूवनाला पालण करणारा जो राम त्याला मी माझ्या डोळयानीं पाहिन असें नामदेवराय म्हणतात. ॥८॥

सुवर्णाचा शोभे मस्तकीं मुगुट । हीरे घनदाट तयावरी ॥१॥ विस्तीर्ण कपाळ व्यंकटा भ्रकुटी । टिळक ललाटी केशराचा ॥ २ ॥ कमळाकार नेत्र आकर्ण शोभती । कुंडलें झळकती कर्णी ज्याच्या ॥३॥ सरळ नासिक लावण्य मुखचंद्र । हनुवटी सुंदर राघवाची ॥ ४ ॥ कंठाचा आकार कंबुग्रीवा ऐसा । हृदयावरी ठसा द्विजपद॥ ५ ॥ सुकुमार सुरेख जयाचें उदर । ब्रह्मांडें अपार वसती जेथें ॥ ६ ॥ नाभींकमळींचा ब्रह्मा नेणे अंत । कडदोरा शोभत कटीं ज्याच्या ॥ ७ ॥ दंडीं वेट्या करीं जाडित मुद्रिका । पिंवळा नेटका पीतांबर ॥ ८ ॥ केशराची उटी सरळ बाहूदंड । चिमणा कोदंड हातीं ज्याच्या ॥ ९ ॥ गर्जती नेपुरे कोमळ चरणीं । वज्रांकुश चिन्ही-

विराजीत ॥ १० ॥ कौस्तुभ मुक्तमाळा रुळे वैजयंती । भ्रमर भूलती नामा म्हणे ॥ ११ ॥

(१०) ज्याला सुशोभित घनदाट असे हिरे जडलेले आहेत असा मुकुट ज्यांच्या मस्तकाला शोभा देत आहे ॥ १ ॥ ज्याचें कपाळ विस्तृत मोठें असून भ्रकुटीही वक्राकार आहे आणि ज्यांच्या कपाळाला केशराचा गंध लावलेला आहे ॥ २ ॥ ज्यांचे नेत्र कमलाकार आकर्ण रुपानें शोभा देत आहेत आणि ज्यांच्या कानामध्यें कुंडले आहेत ॥३॥ सरळ नाक असून मुख हे चंद्रासारखे आहे. या राघवाची हनुवटी ही सुंदर आहे ॥ ४ ॥ ज्यांच्या कंठाचा आकार हा तीनरेघा युक्त अशा शंखासारखा आहे आणि हृदयावर दोन पाद उमटलेले आहेत ॥५॥ जेथें अनंत ब्रम्हांडें रहातील असे सुकुमार सुंदर ज्याचें पोट आहे॥६॥नाभिकमलापासून जन्मलेला ब्रम्हदेव ज्याचा शोध घेऊं शकत नाही त्याच्या कटीला कडदोरा आहे ॥ ७ ॥ सोन्याच्या पेटया ज्याच्या दंडावर असून हाताच्या बोटामध्यें हिरेजडित आंगठ्या आहेत. जो पिवळा पितांबर नेसलेला आहे. ॥ ८ ॥ बाहुदंड सरळ असून केशराची उटी लावलेली आहे व ज्यानें लहानसा धनुष्य हातीं घेतलेला आहे. ॥ ९ ॥ मृदु पायाला असलेली नुपुरें झणत्कार करीत आहेत आणि ते वज्रांकित चिन्हानें शोभा देत आहेत ॥ १० ॥ ज्याला पाहून भ्रमर भुलतात अशी वैजयंतीमाला ज्याच्या वक्षस्थलावर रुळत आहे असें नामदेवराय म्हणतात. ॥ ११ ॥

सांगताती दाया । तुम्हां पुत्र झाला राया ॥ १ ॥ ऐकतांचि ऐसें कानीं । हर्ष न समाये मनीं ॥ २ ॥ उठा उठा हो त्वरेंसी । पाचारावें वसिष्ठासी ॥ ३ ॥ ब्राह्मणांसी पाचारा । सांगा सर्व नारी-नरा ॥ ४ ॥ फोडा फोडारे भांडारें । आणवा गाईंचीं खिल्लारें ॥ ५ ॥ उभवा उभवारे गुढी । सोडा वस्त्रांचीं गांठोडीं ॥६॥ झाडोनियां टाका खडे । घाला केशराचे सडे ॥ ७ ॥ नामा म्हणे भूमंडळा । स्वामी माझा पहा डोळा ॥ ८ ॥

(११) हे राजन तुम्हाला मुलगा झाला असें दासी सांगूं लागल्या ।।१।। अशी ही शुभ वार्ता कानांनीं ऐकतांच त्यास अति आनंद झाला ।।२।। जलदी उठा व वसिष्ठ ऋषींकडे लवकर जाऊन त्यांना त्वरित बोलवा. ।।३।। ब्राम्हणांना पाचारण करा आणि ही शुभवार्ता सर्व स्त्रीपुरुषांना सांगा. ।।४।। सर्व भांडारखाना उघडा करा आणि सर्व गाईचीं खिल्लारें आणा ।।५।। सर्वत्र गुढ्या उभारा आणि सर्व वस्त्राच्या गांठी मोकळ्या करा ।।६।। सडका सर्व झाडून साफ करा आणि त्यावर केशराचे सडे शिंपा ।।७।। सर्व लोकांनीं माझ्या ह्या स्वामीला पहा असें नामदेवराय म्हणतात. ।।८।।

अनंत ब्रह्मांडें जयाचे उदरीं । ध्यातसे त्रिपुरारी अहर्निशीं ।। १।।
पाहतसे मुख दशरथ त्याचें । भाग्य मी तयाचें काय वर्णूं ।। २ ।।
गंध पुष्प वस्त्रें अर्पोनिया द्विजां । समभावें पूजा सकळांसी ।। ३ ।।
साखरेच्या गोण्या घाला हत्तीवरी । धाडीं घरोघरीं नामा म्हणे ।।४।।

(१२) ज्यांच्या पोटामध्यें अनंत ब्रम्हांडें सांठविलीं आहेत आणि शंकर ज्याचें सतत ध्यान करितो ।। १ ।। अशा देवरायाचें मुखकमल दशरथराजे पहात आहेत. त्याच्या भाग्याचें काय वर्णन करावें ।। २ ।। उपस्थित सर्व ब्राम्हणांना गंधाक्षता व वस्त्रें वाहिलेलीं आहेत आणि साम्य भावनेनें सर्वांची पूजा केली ।। ३ ।। साखरेच्या गोण्या हत्तीवर घाला आणि त्या घरोघरीं वाटा असें नामदेवराय म्हणतात ।। ४ ।।

करितसे स्नान अजाचा बाळक । वस्त्रें अमोलिक परिधान ।। १ ।। लावोनिया भाळीं कस्तुरी केशर । करी नमस्कार वसिष्ठासी ।। २ ।। पुण्याहवाचनीं बैसे दशरथ । त्रिभुवनीं समर्थ तूंचि एक ।। ३ ।। वेदमंत्र घोष करिती ऋषेश्वर । पुष्पें सुरवर वरुषती ।। ४ ।। आणिती बाहेर अयोध्येचे जन । करिती गायन गायक जे ।।५।। नाचती अप्सरा वाजती नगारे । वाजंत्री तुतारे भोंवारे ही ।। ६ ।। गुलालाची धूम्र.रंग धस्त्रांवरी । बंदीजन द्वारीं गर्जताती ।। ७ ।। नामा म्हणे इंद्रें पाहोनियां सभा । नाहीं ऐसी शोभा चित्तीं म्हणे ।। ८ ।।

(१३) अजाच्या बाळकाला स्नान घातलेलें आहे व त्यास अमोलिक वस्त्रें घातलीं ॥ १ ॥ त्याच्या कपाळाला कस्तुरीचें गंध लावलें व त्यांस वसिष्ठाच्या चरणावर घातले ॥ २ ॥ राजा दशरथ पुण्याहवाचन करण्याकरितां बसलेले आहेत. या त्रिभुवनामध्यें तूंच एक समर्थ आहेस ॥ ३ ॥ ऋषीश्वर हे वेदमंत्रांचा घोष करितात आणि इंद्रादिक देव फुलांचा वर्षाव करितात ॥ ४ ॥ सर्व अयोध्यावासी जनानें देवरायांना बाहेर आणलें आणि गवई गायन करूं लागले ॥५॥ अप्सरा नाचतात, नगारे, तुतारे, भोंवारे आदि वाद्ये वाजताहेत ॥ ६ ॥ गुलालादिकांचा रंगावर रंग उडवीत आहेत आणि बंदीजन गर्जना करीत आहेत ॥ ७ ॥ अशी ही अपूर्व शोभा इतरत्र आढळणार नाहीं असें इंद्र आपल्या मनामध्यें म्हणूं लागला असें नामदेवराय म्हणतात ॥ ८ ॥

बाई कशाच्या नवबता । पुत्र झाला दशरथा ॥ १ ॥ चला-चला तेथें जाऊं । कौसल्येचें बाळ पाहूं ॥ २ ॥ नवसें बहुत । तिशीं पावला भगवंत ॥ ३ ॥ घ्याग घ्याग त्वरें वाण । झगा फडकीं पेहरण ॥ ४ ॥ करूनि शृंगारा । येती राजयाच्या घरा ॥ ५ ॥ पाहतां सुकुमार सांवळा ॥ लवूं विसरला डोळा ॥ ६ ॥ सार्थक जन्माचें । नामा म्हणे झालें त्यांचें ॥ ७ ॥

(१४) अहो बाई, कशाकरितां हे मोठे नगारे राजदरबारामध्यें वाजत आहे हो ! अहो बाई, दशरथ राजाना पुत्ररत्न झालं आहे ॥ १ ॥ अहो बाईयानो आपण सर्वजण जाऊं या आणि कौसल्येच्या बाळाला पाहूं या ॥ २ ॥ भगवंत हा बहुत नवस सायासानें तिला प्रसन्न झाला आहे ॥३॥ झगा, वस्त्रें आणि पैरणी इत्यादिक वाणें बरोबर घेऊन चला ॥४॥ स्त्रियांनीं उत्तम शृन्गार केला व त्या राजवाड्यांत आल्या ॥५॥ बालकाचें गोंडस स्वरूप पाहून त्यांच्या नेत्रपाती तटस्थ राहिल्या ॥ ६ ॥ अयोध्यावासी स्त्रियांचा जन्म सफल झाला असें नामदेवराय म्हणतात. ॥ ७ ॥

भांडोरी येऊनि करिती प्रार्थना । द्विजांसी दक्षणा काय द्यावी ? ॥ १ ॥ जया लागे जितुकें तितुकें त्यानें घ्यावें । तुम्ही न रहावें उभें तेथें ॥ २ ॥ धांवताती तेव्हां विप्र सकळिक । एकावरी

एक पडताती ।।३।। करूं नका घाई सर्वांसी पुरेल । न राहे दुर्बळ यांत कोणी ।। ४ ।। नामा म्हणे ऐसें धन वाटी राजा । सुखी केल्या प्रजा सकळीक ।। ५ ।।

(१५) अहो राजन, या अखिल ब्राम्हणांना किती दक्षिणा द्यावी अशी विचारणा, राजाचे भांडारी खजीनदार करीत आहेत ।। १ ।। अहो खजीनदार,खजीना खुला करा आणि ज्यांना जितकें पाहिजे आहे तितकें द्रव्य ब्राम्हणांना घेऊन जाण्यास सूचना करा. तुम्ही मात्र तेथें उभे राहूं नका ।।२।। राजानें खजीना मोकळा केला आहे आणि मुक्तद्वार केलें असें श्रवण होतांच प्रत्येक ब्राम्हणानें तेथे धांव घेतली आणि द्रव्य हस्तगत होण्याकरितां ते एकमेकावर पडत आहेत. ।। ३ ।। अहो ब्रम्हवृन्द हो अशी झुंम्मड करूं नका बरें. हा खजीना इतका अमाप आहे कीं कोणी कितीही द्रव्य नेलें तरी तो रिकामा होणार नाहीं आणि कोणीहि निष्कांचन रहाणार नाहीं ।। ४ ।। राजानें सर्व धन लुटून प्रजेला सुखी केलें असें नामदेवराय म्हणतात. ।।५।।

ब्राह्मणांची इच्छा पूर्ण झाली जेव्हां । आशीर्वाद तेव्हां वदताती । १ ।। कल्पकोटी यासी नाहीं नाहीं भय । सकळांचें ध्येय हेंचि असे।।२।। तपाचिया राशी जाहल्या बहुत । म्हणोनियां सुत झाला तुज ।। ३ ।। तथास्तु म्हणोनि जोडीत अंजुळ । पायांवरी भाळ नामा म्हणे ।। ४ ।।

(१६) ब्रम्हवृन्दाना पाहिजे तें धन मिळाल्यानें त्यांना समाधान झालें आणि त्यांनीं राजेसाहेबांना शुभाशिर्वाद दिला ।। १ ।। कोटयवधी कल्पापर्यन्त त्यास भय नाहीं व हाच सर्वांचे ध्येय होईल ।। २ ।। हे राजन, तुम्हीं अनंत जन्मामध्यें कष्टतर तपाचें आचरण केलें आणि त्याच्या होणाऱ्या अमाप पुण्याईनें हे पुत्ररत्न प्राप्त झालें ।। ३ ।। तथास्तु म्हणून त्यांनीं हात जोडले व ब्राम्हणांच्या पायावर राजानें आपलें मस्तक ठेविलें असें नामदेवराय म्हणतात ।। ४ ।।

बाई कौसल्येचा पुत्र । दिसे सर्वांही विचित्र ।। १ ।। ऐसें वाटे माझ्या चित्तीं । प्रगटली विष्णुमूर्ति ।। २ ।। झणीं होईल पु-

दृष्ट । मोडताती कानीं बोट ।।३।। तिच्या भाग्यें असो सुखीं । नामा म्हणे सर्वांमुखीं ।। ४ ।।

(१७) अहो बाईयानो, हा कौसल्येचा मुलगा सर्वांहून आगळा दिसत आहे ।। १ ।। आम्हाला असें वाटतें कीं प्रत्यक्ष विष्णुमूर्ती हीच जणू काय येथें प्रगट झाली ।। २ ।। या बालकाला कदाचित् दृष्ट लागेल म्हणून त्यांनीं आपलीं बोटें त्याच्यावर ओवाळून आपल्या कानावर ठेवून कडकड मोडलीं ।। ३ ।। हिच्या पुण्यप्रभावानें बालक सुखी असो अशीच सद्भावना सर्वांच्या मुखांतून निघाली असें नामदेवराय म्हणतात. ।। ४ ।।

धन्य ते संसारीं पवित्र ते वाणी।। अखंड उच्चारणीं रामनाम।। १।। तयांचीच एक सरली येरझार । उतरले पार भवनदी।।२।।वधोनी ताटीका सुबाहुहि देख। सिद्धि नेला मख कौशिकाचा ।। ३ ।। पहावया यावें स्वयंवर सीतेचें । आलें जनकाचें पत्र तेथें ।। ४ ।। मारगीं चालतां ब्रह्मयाची बाळा । उद्धरली शिळा पदरजें ।। ५ ।। मोडील धनुष्य तया हें देईन । केला होता पण जनकानें ।। ६ ।। रावणादि राजे आले थोर थोर । त्यांचा उतरला नूर पाहतांची।। ७ ।। अहर्निशीं जया ध्यानीं ध्याय भोळा । तो उठला सांवळा बाप माझा ।।८ ।। सुरां असुरा असाध्य ऐसें तें प्रचंड । तें ती ठायीं कोदंड मोडियेलें ।।९।। पाहोनीय ऐसें नामा म्हणे बळ । सीता घाली माळ रघुवीरा ।। १० ।।

(१८) जे भक्त रामनामाचा उच्चार अखंड करितात त्यांची वाणी पवित्र असून ते संसारांत धन्य होत. ।।१।। त्यांची जन्ममृत्यूची परंपरा नष्ट झाली व ते भवसागरांतून मुक्त झाले. ।। २ ।। ताटीका आणि सुबाहू यांचा वध करून विश्वामित्राचा यज्ञ त्यांनीं यशस्वी-सफल केला. ।।३।। सीतेचें स्वयंवर पाहाण्यास यावें अशी जनक राजाची त्यांना आमंत्रणपत्रिका आली. ।।४।। मार्गानें चालत असतां या देवरायानें आपल्या पायाच्या धुळीनें शिळेचा उद्धार केला. ।।५।। जो कोणी धनुष्यभंग करील त्याला माझी मुलगी

अर्पण करीन अशी जनकराजानें प्रतिज्ञा केली होती. ।।६।। सीता प्राप्त व्हावी म्हणून रावणादिक असे मोठमोठे राजे तेथें आले होते खरे. परंतु राघवाला पहातांच त्यांचें तेज लुप्तप्राय झालें ।।७।। शंकर ज्याचें सतत ध्यान करतो अशा माझ्या सर्वांगसुंदर सांवळ्या बापानें उत्थापन केले ।।८।। ज्या धनुष्याचा भंग करण्याकरितां देव दैत्यादिक हतवीर्य झाले होते, राघवानें तें धनुष्य सहज लीलेनें तोडलें-भंग केलें. ।।९।। रामचंद्रजींचें असें अफाट सामर्थ्य पाहून सीतामाईनें त्यांच्या गळ्यांत माळ घातली असें नामदेवराय म्हणतात. ।।१०।।

संत समागम चाले दळभारु । आशा तृष्णा देशघडी अहंकारु ।। १ ।। दुम दुम दुम दुम भेरी वाजे । आले अयोध्येसी श्रीरघुनाथ राजे ।।२ ।। भक्तभद्र जाती दोन्ही बाहीं चालत । विष्णुदास नामा कीर्ति वाखाणित ।। ३ ।।

(१९) आशा, तृष्णा आणि अहंकार ज्यांनीं देशोधडीस लावल्या आहेत असा संतसमूह त्याच्या बरोबर चालूं लागला ।। १ ।। भेरी, तुताऱ्या ह्या दुमदुम वाजत आहेत. रघुनाथराजे हे अयोध्येस आले आहेत. ।।२।। भक्त हे दोन्ही बाजूला चालत आहेत आणि विष्णुदास नामा हे त्याची कीर्ति वाखाणीत आहेत. ।।३।।

पैल आला रामराणा । लंका दिधली बिभीषणा ।। १ ।। नळनीळ जांबुवंत । मध्यें चाले रघुनाथ ।। २ ।। मागें वानरांचे थाट । पुढें गर्जताती भाट ।।३।। केला अयोध्या प्रवेश । म्हणे नामा विष्णुदास ।।४।।

(२०) रामराणा हे पलीकडे आले आहेत आणि बिभीषणाला लंकाधिपती केलें ।।१।। नळ, निळ ह्यांच्या मध्यें स्थित होऊन रघुनाथ राजे चालूं लागले. ।।२।। वानरगण मागोमाग जात असून भाट हे पुढें होऊन गर्जना करीत आहेत. ।।३।। त्यांनीं अयोध्येमध्यें प्रवेश केला असें विष्णुदास नामदेवराय म्हणतात. ।।४।।

राम पिता सीता माता । लक्ष्मण सोयरा चुलता ।।१।। तयासी

भेटों जाऊं आतां। चित्रकूटींच्या पर्वता ॥२॥ नामा म्हणे माझें गोत। चित्रकूटीं असे नांदत ॥ ३ ॥

(२१) राघवन, हे आमचे वडील आणि सीतामाई ह्या आमच्या आई आणि लक्ष्मण हा आमचा चुलत सोयरा ॥१॥ अशा ह्या त्रयमूर्तींना चित्रकुटाच्या पर्वतावर भेटण्यास जाऊं. ॥२॥ असे हे माझे सोयरे संबधी चित्रकुटावर रहातात असें नामदेवराय म्हणतात. ॥३॥

गोरे सांवळे धनव्रटे। एक चालती एकापुढें ॥ १॥ राम निळिय पुढारी। कनकदंड चौरेवरी ॥ २ ॥ राम लक्ष्मण विजयी झाले। आनंदें अयोध्ये आले ॥ ३ ॥ चंद्रगिरीचे तळवटी राम सीतेसी झाली भेटी ॥ ४ । चंद्रगिरी चला जाऊ। राम दाशरथी पाहूं ॥५॥ चंद्रगिरीं केला वास। म्हणे नामा विष्णुदास ॥ ६ ॥

(२२) गोरे, सांवळे धनुर्वाडे (धनुष्य धारण करणारे) असे हे रामराय पुढें चालत आहेत. ॥१॥ निळाच्या झाडाखालीं असलेल्या झोपडींत श्रीरामजी राहतात. ज्याचे दंड सोन्याचे आहेत अशा चवऱ्या त्यांच्यावर फिरत आहेत. ॥२। राम लक्ष्मण हे विजयी होऊन आनंदानें अयोध्येस आले ॥३॥ श्रीराम व सीतेची भेट ही चद्रगिरीच्या पायथ्याशीं झाली. ॥४॥ आतां आपण चंद्रगिरीला जाऊं आणि तेथें दाशरथी रामाला पाहूं ॥५॥ चंद्रगिरीला वास्तव्य केलें असें विष्णुदास नामदेवराय म्हणतात. ॥६॥

टीप—काळे गोरे धनुर्वाडे। ते चालताती रामापुढें ॥१॥ राम निळिये गुढारी। कनक दंड चवरे वरीं ॥२॥ चला चित्रकुटीं जाऊं। राम दशरथाचा पाहूं ॥३॥ अयोध्ये केला अवतारू। राम नामया दातारू ॥४॥

म्हणसी बिभिषण शाहणा। परि तो महामूर्ख जाणा ॥१ ॥ काय तो रामासी भेटला। भेटून रामचि नाहीं झाला ॥२॥ राम दृष्टी देखतांची। पदवी न घेववेचि त्याची ॥ ३ ॥ कोण हित केलें तेणें। राम नाकळी चिंतनें ॥ ४ ॥ जरी तो झाला लंकापती। नाश पावेल कल्पांतीं ॥५॥ नामया स्वामी तें जाणोन। अवघा रामचि होईन ॥६॥

(२३) बिभीषण हा शहाणा आहे असें तुमचें म्हणणें असल्यास तें मला मान्य नाहीं. कारण त्याच्यासारखा महामूर्ख कोणीच नाहीं ॥१॥ बिभीषण रामाला भेटला खरा परंतु त्याला रामरूप होतां आलें नाहीं. ॥२॥ श्रीरामाला सन्मुख प्रत्यक्ष पाहिलें असतांहि रामरायाची पदवी हस्तगत करतां आली नाहीं. ॥३॥ श्रीरामाला जर चिंतनानें प्राप्त करतां आले नाहीं तर त्यांनीं कोणतें हो हीत साधलें ? ॥४॥ तो लंकाधिपती झाला खरा परंतु कल्पांतीं त्याचा नाश होणार आहे ॥५॥ नामयाच्या स्वामीला ओळखून मी प्रत्यक्ष रामरूप होईन. ॥६॥

गुंडाळिल्या जटा तोचि माथां फेटा॥गोजिरा गोमटा रामचंद्र॥१॥
वैकुंठींचा राजा म्हणवितो योगी । दावावया जगीं योग करी ॥२॥
अकर्ण लोचन हातीं चाप बाण । वल्कलें भूषणें नेसोनियां ॥ ३ ॥
पितृवचनालागीं मानोनि साचारी । झाला पादचारी वनीं हिंडे ॥४॥
देवाचिया काजी ठेवोनियां निज । सर्वां परी सज्ज झाला अंगें ॥५॥
नामा म्हणे त्याचें न कळे कौतुक । आपुलीया सुख वाढावया ॥६॥

(२४) सर्वांगसुंदर श्रीरामरायानें आपल्या गुंडाळलेल्या जटेचाच फेटा केला आहे. ॥१॥ हा वैकुंठाचा राजा स्वतः आपल्याला योगी म्हणवितो. आणि जगाला मार्गदर्शनाचें स्वतः कार्य करितो॥२॥' ज्याचे नेत्र कानापर्यंन्त सपाट आहेत ', हातामध्यें धनुष्य आहे आणि त्याच्या अंगावर वल्कलाचें भूषण शोभा देत आहेत. ॥३॥ पित्याची आज्ञा मान्य होण्याकरितां जो रानावनामध्यें पायदळ यात्रा करीत आहे॥४॥देवाच्या कार्यार्थ सर्वस्व अर्पण करून तें यशस्वी करण्याकरितां जो स्वतः सिद्ध झाला. ॥५॥ आपल्या सुखविकासाकरितां त्यांनीं जें कौतुक केलें तें अगम्य आहे असें नामदेवराय म्हणतात ।६॥

श्रीराम सोयरा आला माझ्या घरा । दिधला म्यां थारा हृदयीं माझ्या ॥ १ ॥ पावलों विश्रांति धालें माझें मन । न लगे आतां ध्यान शिकावया ॥ २ ॥ ज्यासाठीं हिंडणें जटामौन नग्न । धरलें तेणें ठाणें हृदयीं माझ्या ॥ ३ ॥ योग याग तप करावें साधन । तोहि जाण ओंठीं सदा वसे ॥४॥ तीर्थयात्रा देव ज्यासाठीं करावें । तें ब्रह्म

बरवें नांदे देहीं ॥ ५ ॥ ब्रह्मचर्यादिक आश्रम साधावे । केली तया देवें देहीं वस्ती ॥ ६ ॥ वेदशास्त्र पुराण ज्यासाठीं पठण । तो नांदे परिपूर्ण हृदयीं माझ्या ॥ ७ ॥ ऐसा तो सज्जन जिवलग सांगाती । दिधली मज विश्रांति नामसंगें ॥ ८ ॥ तैसें नव्हे ज्ञान फुटक्या हांडोरयाचें । धरूनियां साचे खोखो वाजे ॥ ९ ॥ स्वधर्मी विचार वेंचाचे अन्वयें । लाधले हे पाय गुरुकृपें ॥ १० ॥ अभंग भंगेना फोडितां फुटेना । गुरुकृपें जाणा प्राप्त जालें ॥ ११ ॥ चावळी वटवट बोलणें बासर । हे तंव अवघे चार मर्कटाचे ॥ १२ ॥ परनिंदा परद्रोहो करणें या संतांचा । जाळावी ते वाचा ज्ञान त्याचें ॥ १३ ॥ नलगे सोंग धरणें देह ताप करणें । ऐसें निजध्यान हातां आलें ॥ १४ ॥ नाम घेतां रूप हृदयीं बिंबलें । सर्वत्र देखिलें तेंचि डोळां ॥ १५ ॥ नाम मंत्र बीज नाही जंववरी । केशव तंववरि प्राप्त नाहीं ॥ १६ ॥ नामाचे धारक ते केशवरूप । वैकुंठींचे सुख रुळे पायीं ॥ १७ ॥ नामेंविण ज्ञान नपुंसक ऐसें । नातळती कैसे साधुसंत ॥ १८ ॥ नाम तेंचि रूप रूप तेंचि नाम । नामरूपा भिन्न नाहीं नाहीं ॥ १९ ॥ आकारला देव नामरूपा आलें । म्हणोनि स्थापिलें नाम देवें ॥ २० ॥ नामापरता मंत्र नाहीं वो आणिक । सांगती ते मूर्ख ज्ञानहीन ॥ २१ ॥ नामा म्हणे ज्ञान केशव केवळ । जाणती प्रेमळ भले भले ॥ २२ ॥

(२५) श्रीराम सोयरा माझ्या घरीं आले आहेत. त्यांना मी माझ्या हृदयांत वसतिस्थान दिलें. ॥१॥ आतां माझें मन तृप्त झालें असून मला पूर्ण विश्रांती प्राप्त झाली. आतां मला ध्यान शिकण्याची आवश्यकता राहिली नाहीं. ॥२॥ ज्याच्या करितां पदयात्रा करावी लागते, व जटा धारण कराव्या लागतात, मौन धारण करावें लागतें दिगंबर रहावें लागतें. असा हा देव माझ्या हृदयामध्यें ठाण मांडून राहिला आहे. ॥ ३ ॥ ज्याच्याकरितां

याग तपादि साधन करावें लागतें त्यांनीं आतां माझ्या ओठामध्यें सतत वास केला आहे ॥ ४ ॥ ज्याच्या करितां तीर्थयात्रा, देवदर्शन घ्यावें लागतें असें हें ब्रम्हस्वरूप माझ्या देहांत आनंदानें वास करितें. ॥ ५ ॥ ज्याच्या करितां ब्रम्हचर्यादिक आश्रम स्वीकारावे लागतात अशा देवरायानें माझ्यादेहांत वास्तव्य केलें ॥६॥ ज्याच्या करितां वेदशास्त्र व पुराणाचें पठण करावें लागतें तो माझ्या हृदयांत पूर्णत्वानें स्थित झाला आहे. ॥७॥ असा संत जनाचा जिवलग सांगाती अशा या देवरायानें आपल्या नामाच्या संगीतानें मला विश्रांति दिली. ॥ ८ ॥ हें ज्ञान कांहीं फुटक्या मडक्यासारखें नव्हे ज्याला धरलें असतां बद्‌बद् वाजते ॥९॥ आपल्या स्वधर्माचा पूर्ण विचार करावा व त्याप्रमाणें आचरण करावें अशा या वृत्तीनें श्रीगुरुरायाच्या पायाचा आश्रय मिळाला. ॥ १० ॥ जें अभंग होण्यानें केव्हांही भंग पावत नाहीं. ज्याला फोडण्याचा प्रयत्न केला असतां फुटत नाहीं अशी ही वस्तु गुरुकृपेनें प्राप्त झाली. ॥ ११ ॥ व्यर्थ भाषण आणि वायफळ वाग्विलास करणें हां केवळ मर्कटचेष्टा होय. ॥१२॥ ज्याच्या योगें संतांचा द्रोह व निंदा होत आहे अशाच्या वाणीला व ज्ञानाला अग्नि लागो. ॥१३॥ कोणतेंही सोंग घेणें अथवा देहाला ताप देण्याचें कार्य करावें लागत नाहीं असें स्वयंध्यान हस्तगत झालें. ॥१४॥ ज्याचें नांव घेतांच त्यांचा आविष्कार हृदयांत होतो आणि डोळ्याला सर्वत्र त्याची प्रचिती होते. ॥१५॥ नाममंत्राचें बीज जोंपर्यंत हस्तगत होत नाहीं. तोंपर्यंत केशवरायाची प्राप्ति होत नाहीं. ॥१६॥ नामाचे जे धारक आहेत तें प्रत्यक्ष केशवस्वरुप होत. त्यांच्या चरणावर वैकुंठाचें सुख लोळण घेतें ॥१७॥ नामासि विन्मुख असलेलें ज्ञान हें नपुंसक होय आणि म्हणून अशा विकृत भावांत संतं आकर्षिले जात नाहींत॥१८॥ नाम तेंच रुप होय व रुप तेच नाम होय नाम आणि रूपामध्यें किंचितही भेद नाहीं॥१९॥देव हा आकाराला आल्यानें त्यास नामरुप प्राप्त झालें आणि म्हणून नामदेवानें त्यांची स्थापना केली. ॥२०॥ नामाशिवाय दुसरा तारक मंत्र नाहीं असें असतांही कोणी या नामाशिवाय दुसरा मंत्र आहे असें म्हणत असतील ते मूर्ख होत असें समजावें. ॥२१॥ ज्ञान म्हणजे केवळ केशवस्वरूपच होय असें जे पूर्णपणें जाणतात तेच प्रेमळ आणि उत्तमांत उत्तम होत असें नामदेवराय म्हणतात. ॥ २२ ॥

सीताशुद्धि

हनुमंत गेला सीताशुद्धिलागीं । लंकामध्यभागीं वेऊनियां ॥१॥ माता जानकीच्या करीत शुद्धीसी । हिंडे गृहदेशीं राक्षसांच्या ॥ २ ॥ न देखे तो सती सीतादेवी माया । अकस्मात तया वनामाजी ॥३॥ शिंसीवावृक्षाचे असे तळवटी । समीप निकटी राक्षसीचे ॥ ४ ॥ नचले उपाय कांहीं तो बोलाया । स्मरे रामराया तये काळीं ॥ ५ ॥ श्रीरामें मुद्रिका दिली होती संगें । तयासी अभ्यंग सोडावया ॥६॥ वृक्षा चिया माथां बैसोनियां बळी । देत करकमळीं सोडूनियां ॥ ७ ॥ जानकी अवलोकी श्रीरामाची मुद्रा । कोठोनी कपींद्रा आणलीसे ॥ ८ ॥ सुखी रामराणा कवणिये वना । माझिया तूं प्राणा बोलें वेगीं ॥ ९ ॥ ऐकोनी कपींद्र चरणासी वंदी । म्हणे रामचंद्र सुखी असे ॥ १०॥ सहित सौमित्र वनामाजी आहे । शुद्धीलागीं पाहे पाठविलें ॥ ११ ॥ तुझेनि वियोगें रामराजा दुःखी । यालागीं तुज देखीं पाठविलें ॥१२॥ ऐकतांची वाणी करीत आक्रोश । म्हणे राम कैसा सोडियेला ॥ १२ ॥ नानापरी खेद आलाप करूनी हा हा रामवाणी बोलतसे ॥ १४ ॥ समपि जे होते रक्षपाळ बळी । ऐकोनी आरोळी दूर झाले ॥ १५ ॥ तये संधीमध्यें हनुमंत खालौता । येवोनियां माता वंदितसे ॥ १६ ॥ क्षुधाक्रांत भारी म्हणे काय खाऊं । सांगसी उपाऊं तरी येथें ॥ १७ ॥ वनामाजी मेवा घेऊनियां कांहीं । क्षुधेसी ते पाही शांतवावी ॥ १८ ॥ म्हणे सीता दूता रक्षपाळ होती । निरोध करिती तुजलागीं ॥ १९ ॥ म्हणोनियां पाहीं भूमीगत कांहीं । घेऊनि स्वदेहीं विश्रांतीसी ॥ २० ॥ पडलें तें घेई ऐसी आज्ञा पाही । वंदोनियां पायीं संतोषला ॥ २१ ॥ करोनी उड्डाण वृक्षमाथां बैसे । उपडोनी झाडासी हालवीत ॥ २२ ॥ खालीं पाडी

फळें तयांचें भोजन । करूनियां वन विध्वंसिलें ।। २३ ।। रक्षपाळ सारे मिळोनी कपींद्रा । धरावया सारा यत्न केला ।। २४ ।। न चढे हातासी बहुबळ त्यासी । राक्षसां विध्वंसी हातपायीं ।। २५ ।। वृक्षाचेनि घायें मारिले उपाये । ऐसी बळ सोय दाखवीत ।। २६ ।। जंबुमाळी बागीं तया अधिकार । धांवोनी सत्वर रायापाशीं ।।२७।। मात ते घेउनि आला तो धांवूनि । कपीराज वनीं आला एक ।। २८ ।। त्यानें सर्व वन पाडिलें उपडोन । कोणाचा तो कोण कळेना हो ।। २९ ।। राजा करी आज्ञा धरा बांधा त्याला । मारा वानराला वेगीं जा रे ।।३०।। ऐकतांचि वाणी भूपामुखींची ही । उठिले लवलाही राक्षस गण ।। ३१ ।। जावोनी वेढिला कपीराज राणा । धनुष्यासी बाणा लावूनियां ।। ३२ ।। मारितां बाणासी न लागे कपिसी । तेव्हां युक्ति कैसी आरंभिली ।। ३३ ।। करूनि फांसासी धरूं म्हणती त्यासी । नये तो फांसासी आटोपितां ।। ३४ ।। धरिती जरी बाहीं निघोनियां जातां । न चढे हातां कवणाच्या ।। ३५ ।। थोर जरी फांसा होत तो लहान । जाय तो निघोन फाशांतुनी ।। ३६ ।। लहान जरी केला तरी होतो थोर । फांशाचा विचार व्यर्थ करीती ।। ३७ ।। ऐशापरी झाले श्रमातुर भारी । कपि तो विचारी कार्य पुढें ।। ३८ ।। म्हणोनि फांशांत पडे तो तेधवां । धरोनी वानरा नेती दूत ।।३९।। सन्मुख रावणें देखुनि कपीसी । करी कौतुकासी अपूर्व हो ।। ४० ।। कधीं नाहीं ऐसें स्वरूप देखिलें । येणें फार केलें नाशालागीं ।। ४१ ।। पुसत तूं कोण कवण कार्यालागीं । पातलासी वेगीं याच ठायीं ।। ४२।। वानर म्हणे अरे मूर्खा रावणा रे । रामदूत खरें सीताशुद्धि ।।४३ ।। ऐकोनि रावणं म्हणे यासी ज्ञाला । शेंपूट गुंडाळा अग्नि लावा ।। ४४ ।। कंपीसी पुसिलें मरण कोणे ठायीं । येरू पुच्छ दावी म्हणोनियां ।।४५।।

समग्र लंकेचीं आणोनियां वस्त्रें । कपीपुच्छ पुरें न होयची ।। ४६ ।।
तेव्हां राजधानीं आणोनी वेष्टितां । परी तो पुरतां न होयची ।।४७।।
तेव्हां तेल घाला म्हणे तो रावण । दूत ते धावोनि टाकिताती ।।४८।।
लावूनि अग्निसी केला मोठा ज्वाळ । वानर तत्काळ उडाला हो।।४९।।
लंकेची ते केली सारी तेणें होळी । सहित मंडळी राजघरें ।। ५० ।।
भुभुःकार केला वानर उडाला । लंकेमाजी झाला प्रळय हो ।। ५१ ।।
अग्नीचा उबाळा धुरानें दाटला । देखे कपि त्याला सुखरूप ।। ५२ ।।
मुखासी लागला पाहतांची डोळां । म्हणोनि तो झाला शामवर्ण।।५३।।
येवोनि लवलाही श्रीरामातें पाही । नमूनि सर्वही सांगितलें ।। ५४।।
तेव्हां नामा म्हणे होतों मी जवळा । चरणकमळां ध्यात तेथें ।।५५।।

(२६) हनुमंतराय सीताशुद्धी (शोधा) करिता लंकेच्या मध्यभागीं गेले ।।१।। माता जानकीच्या शोधार्थ राक्षसाच्या गृहामध्यें फिरूं लागले ।।२।। सती सीता देवी तेथें न आढळल्यानें ते अकस्मात वनामध्यें शोधार्थ गेले ।।३।। त्यांना शिसवाच्या झाडाखालीं राक्षसीच्या पहाऱ्यांत त्या दिसल्या. ।।४।। अशा ह्या बिकटावस्थेमध्यें सीता मातेबरोबर भाषण करण्यास अवसर न मिळाल्यामुळें त्या काळीं त्यांनीं रामरायाचें स्मरण केलें. ।।५।। श्रीरामरायानी स्वचिन्ह म्हणून हनुमंतरायाजवळ जी आंगठी दिली होती ती सीतामातेला पूर्णपणें मिळावी म्हणून ।।६।। हनुमंतराय हे वृक्षाच्या उंच फांदीवर बसले आणि तेथून त्यांनीं सीतामातेच्या हातीं पडेल अशा युक्तानें तो आंगठी खाली टाकली।।७।।जेव्हां सीतामातेनें श्रीराममुद्रा पाहिली तेव्हां हे कपींद्रा, कोठून ही मुद्रिका आणली आहेस ? ।।८।। हे प्राणसख्या, माझा राम कोणत्या वनामध्यें सुखी असेल ? हें मला त्वरित सांग ।।९।। असें सीतामातेचें भाषण श्रवण करितांच हनुमंतानें सीतामातेच्या चरणांचें वंदन केलें आणि रामचंद्रजी सुखी आहेत असें त्यांनीं सांगितलें ।।१०।। रामचंद्रजी हे लक्ष्मणासहीत वनामध्यें आहेत आणि त्यांनीं तुमच्या शोधार्थ मला पाठविलें आहे. ।।११।। तुमच्या वियोगानें श्रीरामचंद्रजी अतिकष्टी झाले आहेत आणि म्हणून तुमच्या शोधार्थ मला पाठविलें आहे. ।।१२।

असें हें हनुमंताचें भाषण ऐकतांच सीतामातेनें आकांत केला. अरे हनु ंता, तूं रामाला कां सोडलेंस ? ।।१३।। हे रामा, हे रामा, अशा दुःखित अंत:करणानें ती आलाप करूं लागली. ।।१४।। सीतामातेचे समीप जे राक्षसगण होते ते हनुमंताचा भु,भुःकार ध्वनी श्रवण करिताच दूर पळून गेले. ।।१५।। अशा ह्या संधीचा फायदा घेऊन हनुमंतराय झाडावरून खालीं उतरले आणि त्यांनीं सीतामातेच्या चरणाला नमन केलें. ।। १६ ।। भुकेनें अति व्याकूळ झालों आहें तेव्हां काय बरें खावें ? याविषयीं येथें कांहीं उपाय असल्यास सांगा ? असें हनुमतानें विचारलें ।।१७।। अरण्यांतील कांही मिठाई खाऊन भुकेची शांती करावी असें सीतामाता म्हणाल्या. ।।१८।। रक्षपाळ जे राक्षस ते तुला प्रतिकार करतील असें दूताला सीतामातेनें सांगितलें. ।।१९।। आणि म्हणून भूमिगत (भूमीवर पडलेलें) जें असेल त्याचा शोध घे व तें खा आणि स्व देहाला विश्रांती दे ।।२०।। जमिनोवर पडलेलें जें असेल ते घे ही सीतामातेची आज्ञा होतांच हनुमानरायास अत्यानद झाला व त्याने सितामातेला वंदन केलें. ।।२१।। हनुमंतरायानें तेथून उड्डाण केलें व झाडाच्या शिखरावर जाऊन बसले आणि झाडाला उखडून हालवूं लागले. ।।२२।। जीं जीं फळें खालीं पडलीं होतीं तीं खाऊन तृप्त झाले व वनाचा विध्वंस केला. ।।२३।। हनुमान असा हा वनाचा विध्वंस करीत आहे हें पाहून त्याला पकडण्याकरितां रक्षपाळ प्रयत्न करूं लागले. ।। २४ ।। हनुमतापुढे त्यांचें बळ काही चालेना–मात्र हनुमंतानें त्यांना आपल्या हातापायानें चांगलेच तुडविलें ।।२५।। खरोखरी वृक्षाचेच तडाखे बसत आहेत असें सामर्थ्य त्याना त्यानी दाखविलें ।।२६।। जंबू हा त्या वनाचा मुख्य रक्षपाल होता. तो राजाकडे त्वरोत धांवत गेला. ।।२७।। अहो राजन, वनामध्यें कोणी वानर आलेले आहे असें वृत्त त्यानें त्यानीं सांगितलें. ।।२८।। त्या वानरानें सर्व वनाचा नाश केला. तो कोणाचा कोण आहे. कोठून आला हें कांहींच समजत नाहीं. ।।२९।। त्वरित जा व त्या वानराला धरा, बांधा व चांगलें ठोका असें राजानें आपल्या सेवकांना आज्ञा केली. ।।३०।। अशी ही राजाची आज्ञा होतांच सर्व राक्षसगण त्वरित उठले. ।।३१।। आणि प्रत्येकानें आपलें धनुष्य सज्ज करून वानराला वेढा दिला. ।।३२।। बाणाच्या योगें वानर कांहीं घायाळ होत नाहीं असें पाहून राक्षस गणानें दुसऱ्या युक्तीची योजना केली. ।।३३।। वानराला फांसाच्या

योगे पकडूं म्हणून त्यांनीं फांसा वानराच्या अंगावर टाकला खरा, परंतु वानर कांहीं त्या फांसामध्यें सांपडलें नाहीं ॥३४॥ वानराला हातानें पकडावें म्हणून प्रयत्न केला परंतु तो कांहीं कोणाच्या हातीं सांपडेना ॥३५॥ मोठा फांसा टाकला असतां तो वानर लहान होई व त्या फांश्यामधून निघून जाई ॥३६॥ त्यास पकडण्यासाठीं लहान फांसा टाकला असतां तो वानर मोठा होई. म्हणून फांसानें त्यास पकडावें ह्या युक्तीचा बोजवारा झाला. ॥३७॥ राजदूत जे राक्षस त्यांनी अनेक प्रयत्न करून जेव्हां ते थकून गेले तेव्हां वानरानें पुढील कार्याची रुपरेषा योजली ॥३८॥ वानर हे स्वत: त्या फांसामध्यें पडलें तेव्हां राक्षसानें त्यास पकडलें आणि रावणाच्या सन्मुख नेलें ॥३९॥ जेव्हां रावणानें त्या वानराला पाहिलें तेव्हां त्यांनी त्याचें अपूर्व कौतुक केलें ॥४०॥ असें हें स्वरूप मी पूर्वी, केव्हांही पाहिलें नाहीं यांनीं वनाचा अति विध्वस केला आहे? ॥ ४१ ॥ हे वानरा, तूं कोण आहेस आणि कोणत्या कार्याकरिता यथें वेगानें आला आहेस असें रावणानें विचारले. ॥ ४२ ॥ अरे मूर्खा रावणा, मी रामाचा दूत आहें व सीतामातेच्या शोधार्थ आलों आहे असें हनुमंतरायानें उत्तर दिलें. ॥४३॥ हनुमंतरायाचें असें हे सडेतोड भाषण श्रवण करितांच रावण क्रोधीष्ट झाला व याच्या शेपटीला कपडे गुंडाळून त्याला अग्नी लावून जाळा अशी त्यांनीं आपल्या दूताला आज्ञा केली ॥४४॥ " हे माकडा, तुझे मरण कशांत आहे" असें रावणानें विचारलें तेव्हा "माझ्या शेपटामध्यें मरण आहे" असें हनुमंतरायानें उत्तर दिलें॥४५॥ तेव्हां लंकेंतील सर्व कपडे आणले व शेपटास गुंडाळूं लागले. परतु कपडे अपुरे पडले. ॥४६॥ तेव्हां त्यास राजधानीस आणला असतां तेथीलही कपडे अपुरे पडले. ॥४७॥ या कपड्यावर तेल घाला अशी रावणानें आज्ञा करितांच सर्व दूतानीं त्याच्या शेपटावर तेल ओतण्याचा सपाटा चालविला. ॥४८॥ त्याला भडक अग्नि दिला असतां जेव्हां त्याच्या ज्वाळा भडकल्या तेव्हां वानरानें तेथून उड्डाण केलें।४९।आणि राजाच्या घरासहित सर्व लंका व मंडळी दग्ध केली ॥५०॥भु:भू:कार करून तेथून वानरानें उड्डाण केलें.लंकेमध्यें जणू काय महाप्रलयच झाला असें प्रतीत होऊं लागलें,॥५१॥ अग्नि आणि धूर यायोगे सर्व लंका आच्छादित झाली.मात्र हनुमंतराय सुखरुप होते ॥५२॥ तेथील ज्वाला हनुमंताच्या मुखाला लागल्याचें त्यांनीं पाहिले तेव्हां ते श्यामरंगी दिसले. ॥५३॥ तेथून त्यानें उड्डाण केलें आणि श्रीरामांची भेट घेतली व त्यांना नमन करून झालेली साग्र हकीगत त्यांना सांगितली ॥५४॥ तुमच्या चरणकमलाचें ध्यान करीत मी तुमच्याजवळ तेथें होतों असें नामदेवराय म्हणतात. ॥५५॥

शिवरात्र माहात्म्य



शिवरात्रीं आजी उपवास केला । शंकर तोषला बिल्वदळीं ॥ ४ ॥

कैलासींचा देव भोळा चक्रवर्ती । पार्वतीचा पति योगिराज ॥ १ ॥
तयाचिया पाया माझे दंडवत । घडो आणि प्रीत जडो नामीं ॥ २ ॥
जटाजूट गंगा अर्धचंद्र भाळीं । तिजा नेत्रज्वाळी जातवेद ॥ ३ ॥
कंठीं काळकूट डौर त्रिशूळ हातीं । सर्वांगीं विभूति शोभतसे ॥ ४ ॥
गळां रुंडमाळा खापर हस्तकीं । रामनाम मुखीं सर्वकाळ ॥ ५ ॥
व्याघ्रचर्मधारी स्मशानीं राहिला । संगें भूतमेळा विराजित ॥ ६ ॥
नामा म्हणे नामें नासोनियां पाप । करीं सुखरूप भक्तांलागीं ॥ ७ ॥

(२७) कैलासनिवासी देवराय हे भोळे खरे परंतु ते चक्रवर्ती व योगी-असून पार्वतीचे पती होत. ॥१॥ त्यांच्या चरणीं माझें नमन असो, आणि त्यांच्या नामीं माझें प्रेम जडो. ॥२॥ ज्यांच्या जटेंतून गंगा वहात आहे, कपाळावर अर्धचंद्र आहे आणि नेत्रांतून भिन्नभिन्न अग्नीज्वाला उफाळत आहेत. ॥३॥ ज्यांच्या कंठामध्यें विष आहे व हातामधें डमरू व त्रिशूळ आहे. सर्वांगाला विभूती लावलेली आहे. ॥४॥ गळ्यामधें रुद्रमाळा आहे व हातामधें खापर आहे आणि मुखांतून नित्यशः रामनामाचा उच्चार आहे. ॥५॥ ज्यांनीं वाघाचें कातडें पांघरलेलें आहे. त्यांनीं स्मशाननिवास केला असूनि सभोवती भूतगण आहेत. ॥६॥ अशा देवरायाचें नाम घेतलें असतां त्याचीं सर्व पापें दग्ध होतात आणि तो भक्तांना सुख देतो असें नामदेवराय म्हणतात. ॥७॥

डवरला गिरी कैलास ढवळा । सिंहासन ज्याला ढवळेंची ॥ १ ॥
पाहतां पाहतां निवाले लोचन । भव्य ज्याचें ध्यान एकरूप ॥ २ ॥
ढवळा सर्वांगीं देव तो आपण । लेइला भूषण तेंहि तैसें ॥ ३ ॥ पर्वताची बाळा पार्वती ढवळी । अर्धांगीं शोभली एकरूप ॥४॥ सर्वांगीं लाविली ढवळी विभूती । माळा विराजती स्फटिकाच्या ॥ ५ ॥ पांढरिया जटेमध्यें गंगा आहे श्वेत । गळ्यांत शोभत श्वेत सर्प ॥६॥ शंखपाळ श्रवणें कुंडलें ढवळीं । देखतां भूतळीं दुजा नाहीं ॥ ७ ॥ नामा म्हणे ऐसें दाऊनियां ध्यान । भाविकाचें मन तोषवित ॥ ८ ॥

(२८) कैलास पर्वत हा शुभ्र रंगाचा असून ज्याचें सिंहासनही पांढरें आहे. ।।१।। ज्याला पाहिलें असतां डोळे प्रसन्न होतात, ज्याचें ध्यान भव्य व एकाग्र आहे. ।।२।। जो देवराय, स्वत: सर्वांगानें शुभ्र आहे आणि ज्यानें सर्वांगावर शुभ्र अलंकार धारण केले आहेत ।।३।। पर्वताची कन्या जी पार्वती तीहि शुभ्र असून ती त्यांची अर्धांगी एकरुपानें शोभा देत आहे. ।।४।। शुभ्र विभूती ज्यांनी आपल्या सर्वांगाला लावली असून ज्याच्या गळ्या-मध्यें शुभ्र स्फटिकाच्या माळा शोभा देत आहेत.।।५।। ज्याच्या जटेमधें अस-लेली गंगा ही पण शुभ्र असून गळ्याभोंवती असलेला सर्प देखील शुभ्र आहे. ।।६।। कानांतील कुंडलेंही शुभ्र आहेत अशा ह्या देवाची बरोबरी कर-णारा देव त्रिभुवनांत शोध केला असतांहि पहाण्यांत येणार नाहीं ।।७।। अशा स्वरूपाचें ध्यान दाखवून-व्यक्त करून हा देवराय भाविकांच्या मनाला आनंद देत आहे असें नामदेवराय म्हणतात. ।।८।।

एके दिनीं रत्नसिंहासनावरी । कैसा त्रिपुरारी शोभतसे ।। १ ।।
सांगों जातां चारही वाचा विसांवती । तेथें माझी मति काय सांगों।।२।।
वाममार्गी साजे सुंदरी भवानी । सिद्धिऋषि मुनि करिती सेवा ।। ३ ।।
नारद तुंबर गर्जती गायन । तेथें कर जोडोन उभे देव ।।४।।
गणेश षण्मुख ढाळिती चामरें । रिद्धिसिद्धि द्वार राखिताती ।। ५ ।।
नामाचा गजर मृदंगाची घाई । पाहाती नवाई ब्रह्मादिक ।। ६ ।।
नामा म्हणे करीं देतसे विडिया । लागोनिया पायां वारंवार ।। ७ ।।

(२९) हा त्रिपुरारी शंकरराय, हे एकदा सिंहासनावर बसले होते. ।।१।। त्यावेळचें त्याचें सौन्दर्य इतकें सुशोभित होतें की त्याचें वर्णन करण्यांत जेथें चारी वाचा कुंठित होतात तेथें माझ्या अल्प बुद्धीचा काय प्रवेश होणार आहे?।।२।। पार्वतीही ज्यांच्या डाव्या अंगास शोभा देत आहे आणि सिद्ध-ऋषी मुनी हे सेवा करीत आहेत. ।।३।। नारद तुंबर हे गायन गात: आहेत. त्याठिकाणी देवता हात जोडून उभ्या आहेत. ।।४।। गणेश हा त्यांच्या सन्मुख उभा राहून चवऱ्या ढाळीत आहे. रिद्धीसिद्धी ह्या त्याच्या द्वाराचें रक्षण करीत आहेत. ।।५।। नामाचा गजर होत आहे, मृदंग झणत्कार करीत आहे.

असें हें कौतुक ब्रम्हदेवादिक पहात आहेत. ।।६।। अशा शंकराचे हातीं विडा देऊन त्याच्या पायाला बारंवार नमस्कार करीत आहेत असें नामदेराय म्हणतात. ।।७।।

तेंव्हां प्रश्न करी पार्वती आदरें। शिवाप्रती कर जोडोनियां।।१।।
सांगावा जी स्वामि ऐसा इतिहास। गातां जोडे वास तुमचे पायीं ।।२।।
जाळोनियां पापें सुखाची उन्नती । विश्व सुखी होती जेणें योगें ।।३।।
नामा म्हणे सुटे काळासी दरारा । विश्वासिया नरा मुक्ति जोडे ।।४।।

(३०) पार्वती ही हात जोडून प्रेमानें शंकराला प्रश्न करीत आहे. ।।१।। अहो स्वामी, तुम्ही असा इतिहास सांगा कीं त्याचें गायन केलें असतां तुमच्या चरणाची प्राप्ति होईल. ।।२।। सर्व पापें भस्म होऊन सुख वृद्धि होईल आणि अखिल विश्वामध्यें आनंदाचा संचार होईल. ।।३।। जे विश्वासी पुरुष आहेत त्यांना मुक्ती मिळेल व काळाला दरारा वाटेल असें नामदेवराय म्हणतात. ।।४।।

ऐकोनिया वाणी । संतोषला शूळपाणी ।। १ ।। देवी चांगलें पुसिलें । तुझ्या बोलें चित्त धालें ।।२।। बोल नव्हती साचार । जड जीवांचा उद्धार ।। ३ ।। बोल तुझे गोडावले । जगीं सुदिन पाहाले ।। ४ ।। शिवरात्रीचें महिमान । नामा म्हणे ऐका जन ।। ५ ।।

(३१) असें हें पार्वतीचें भाषण ऐकतांच शंकराला अति आनंद झाला. ।।१।।हे पार्वती, तुझा प्रश्न फार उत्तम आहे त्यायोगें माझ्या मनाला अति समाधान झालें।।२।। तुझा हा प्रश्न सामान्य नव्हे अखिल जड जीवाला उद्धार होण्याचा मार्गदर्शक आहे.।।३।। तुझ्या मधुर भाषणानें जगाला सुदिन प्राप्त झाला ।।४।। अहो जनहो, शिवरात्रीचें किती महत्म्य आहे, हें तुम्ही श्रवण करा असें नामदेवराय म्हणतात ।।५।।

ऐका सावधान कथा शिवरात्र । पावन पवित्र तिहीं लोकीं।।१।।
भाव धरोनियां आचरती जरी । वास शिवपुरीं घडे त्यासी ।।२।।
उपवास आणि शिवाचें पूजन । रात्रीं जागरण विधि त्याचा ।। ३ ।।

एक पसा पाणी एक बिल्वदळ । पूजन केवळ सोपें बहु ।। ४ ।। नामा म्हणे करा नामाचा गजर । मुखीं हरहर शब्दमात्रें ।। ५ ।।

(३२) तिन्ही लोकांना पावन करणारी अशी शिवरात्र कथा सावधान चित्तानें श्रवण करा ।।१।। जो कोणी या कथेचें श्रवण करून प्रेमानें त्याचें आचरण करील तो शिवलोकांत वास्तव्य करील.।।२।। उपवास करून शिवाचें पूजन अशा विधीनें जो जाग्रण करील ।।३।। फक्त एक ओंजळ पाणी व एक बिल्वपत्र हा शिवाच्या पूजेचा सुलभ मार्ग आहे।।४।। मुखानें हरहर या नामाचा उच्चार करा असें नामदेवराय म्हणतात.।।५।।

शिव ऐसा शब्द कल्याणदायक । जाणती भाविक साधुजन ।। १ ।। तारक हें नाम भोळ्या भाविकांसी । नेणत्या जाणत्यांसी लाभ एक ।। २ ।। उपमन्यु बालक दूध मागों गेला । क्षीराब्धि दिधला उचितासी ।। ३ ।। दुष्ट दुराचारी पतित तारिले । नाहीं आव्हेरिलें दीनानाथें ।। ४ ।। नामा म्हणे शिव विष्णु एकरूप । ताराया अमूप अवतारला ।। ५ ।।

(३३) शिवशब्द हा कल्याणकारक आहे. भाविक साधुजनांना याची प्रतीति आहे।।१।। हें तारक नाम भाविकांना ते जाणते असोत, अथवा नेणते असोत त्यांना हे लाभदायक आहे।।२।। उपमन्यु हा बालक खरा, परंतु या देवरायाला प्रेमानें दुधाची मागणी करितांच त्यांनीं त्याला क्षिराब्धी दिला नाहीं काय?।।३।। या दीनानाथानें दुष्ट, दुराचारी आणि पतित अशा ह्या जिवांचा इन्कार न करिता त्याचा उद्धार केला. शिव व विष्णु हे एकच आहेत आणि त्यांनीं जिवाच्या कल्याणार्थ अनेक अवतार धारण केले असें नामदेवराय म्हणतात.।।५।।

भेदवादी जन वदतसे भिन्न। नव्हे तें लक्षण भजनाचें ।।१।। विश्वीं विश्वंभर कोंदलासे एक । भेदाचें कौतुक कैसें सांगा ।। २ ।। अहीं नाहीं ठाव एकपणाचाही । तेथें दुजें कांहीं समावणें ।। ३ ।। आदि मध्यें अंती खेळूनियां खेळ । उरलें तें निखळ अविनाश ।।४।।

हेमीं जैसे केले तैसे होती नग । तरी ते अव्यंग सोनेपणीं ।। ५ ।।
केली जैसी भक्ति शैव कां वैष्णव । पाहतां तो देव नाहीं दुजा ।।६।।
शिवविष्णु दोघे एकचि अवतार । वेदांनीं निर्धार हाचि केला ।।७।।
नामा म्हणे येथें दुजा नको भाव । विष्णु तोचि शिव शिव विष्णु ।।८।।

(३४) विष्णु व शिवामध्यें फुटीर वृत्ति धारण करून जे कोणी देवरायाची पूजा करीत असतील ते त्यांचें भजन विडंबनात्मक होय।।१।। विश्वंभर हा सर्वत्र व्याप्त होण्याने तेथें भेदाचें अस्तित्व कसें रहाणार?।।२।। ज्या स्वरूपी एकपणाला उरी-जागा नाही तेथें द्वैत कसें असणार बरें?।।३।।अनेक द्वैत विलास करीत असतांही जे स्वरूप आदि अन्त्य आणि मध्य याठिकाणी केवळ अविनाश रूपानें शेष रहातें।।४।। शिवाची पूजा करा कीं विष्णची भक्ती करा; वास्तविक पहातां देवामध्यें भेद नसतो।।६।। सुवर्णाचे अनेक अलंकार केले असतांहि त्यामध्यें सुवर्ण मात्र एकरूपानें व्याप्त असतें।।५।। शिव व विष्णु हे एकाच देवाचे अवतार होत असें वेदानें स्पष्ट कथन केलें आहे।।७।। विष्णु तोच शिव व शिव तोच विष्णू होय, असे यांच्यामध्यें अभिन्नत्व होण्यानें त्यांच्यामध्यें भेदबुद्धी निर्माण करू नका असें नामदेवराय म्हणतात.।।८।।

कांतीपुरी राजा नामें सोमदत्ती । तयाचे संपत्ती पार नाहीं ।। १ ।।
पूर्वपुण्यबळें लाधलें तयासी । देतां उपमेसी उणा शक्र ।। २ ।।
पांचशतें तया कामिनी सुंदरा । करितां नाहीं पुरा झाला काम ।। ३ ।।
रिद्धि सिद्धि घरीं कामारि हिंडती । धैर्य शौर्य कीर्ति ज्याची जगीं ।। ४ ।।
नामा म्हणे जेथें उणें कांहीं नाहीं । ऐसें असोनिही न सुटे भोग ।।५।।

(३५) सोमदत्त नामक राजा कांतीपुरीं रहात आहे. त्याची संपत्ती अगणित होती।।१।। त्याच्या पुण्यप्रभावानें त्यास सर्व कांही प्राप्त झालें होतें. इंद्राचीही बरोबरी त्याच्या ऐश्वर्यास अपुरी होय।।२।। त्याला पांचशें स्त्रिया होत्या. तरी सुद्धां त्याचा काम पूर्ण झाला नाही।।३।। रिद्धी, सिद्धी इत्यादिक त्याच्या येथें सेवा करीत असतां त्याच्या धैर्याची जगामध्यें कीर्ति पसरली होती।।४।। अशी सर्व प्रकारे त्यास अनुकूलता असताहि कर्मभोगानें त्यास सोडले नाहीं.।।५।।

भोगाची नव्हाळी न सुटे कोणे काळीं । वासना वोंगळी तेंचि करी ॥१॥ वासनेचि थोरी सांगवेना कांहीं । न सुटिजे कांहीं कोण्या काळीं ॥ २ ॥ तारुण्याच्या भरें आवडी स्त्रियांची । वृद्धपण तेंचि पुढें होय ॥ ३ ॥ म्हणतसे पोरें वाचतलि कैसी । हाचि अहर्निशीं ध्यास करीं ॥ ४ ॥ मेलियाही पुढें तेंचि उभे राहे । जन्मोजन्मीं पाहे लागलेंसे ॥ ५ ॥ मृगाचिया ध्यासें मरतां मृगपण । जन्मल्यावांचून सोडीना तें ॥ ६ ॥ नामा म्हणे जया जैसी जे वासना । जन्मकर्में जाणा तैसीं होतीं ॥ ७ ॥

(३६) कर्मभोगाची गती अद्‌भुत आहे. ती कोणाला सुटत नाहीं. वासना ही दुष्ट असल्यानें ती त्याला अकर्मामध्यें प्रवृत्त करते॥१॥ वासनेचा प्रभाव अति प्रखर आहे. ती कोणत्याही काळीं सुटत नाहीं॥२॥ स्त्रियांची आवड तारुण्यामध्यें असतें तीच आवड वृद्धापकाळीं मुलाबद्दल होते. ॥३॥ मुलाचें रक्षण कोणत्या प्रकारें होईल असाच ध्यास वृद्धकाळीं सतत असतो॥४॥ मेल्यावर तीच वासना पुढें उभी रहाते असा हा क्रम जन्मोजन्मीं सुरू असतो॥५॥ मरणकाळी मृगाच्या ध्यासा मृग व्हावें लागतें तो जन्म घेतल्याशिवाय कांहीं सुटत नाहीं. ॥६॥ मरणकाळीं ज्याची जशी वासना असेल तसा त्यांना जन्म घ्यावा लागतो असें नामदेवराय म्हणतात.॥७॥

पंचशतामाजी दोघी पतिव्रता ।जारणी सर्वथा सर्व कांहीं ॥१॥ करूनियां ऐसीं जाती नरकासीं । नाडिलें पतीसी त्यांच्या पापें ॥२॥ करिती एकवेळ झांकिती लोचन । शेवटीं बंधून यमाहातीं ॥ ३ ॥ नामा म्हणे बरें नव्हे हें कोणासी । घडेल तयासी जाच बहू ॥४॥

(३७) या सोमदत्त राजाला ज्या पांचशे स्त्रिया होत्या, त्यांमध्यें दोन पतिव्रता होत्या. बाकी सर्व स्त्रिया जारकर्मांत निपुण होत्या॥१॥अशा कुकर्मी स्त्रिया ह्या नरकांत जातातच परंतु त्यांच्या पापानें पतिलाही नरकवास भोगावा लागतो॥२॥ डोळे झांकून यांनीं एक वेळ जरी पापकर्म केलें तरी

त्याचा परिणाम म्हणजे यमबंधन होय।।३।। अशी कृति करणें हें कोणालाही श्लाघ्य नाहीं. अशा कुकर्मीयांना शेवटीं दुःखें प्राप्त होतात असें नामदेवराय म्हणतात.।।४।।

राष्ट्र करी पाप राजानें भोगावें । राजियाचें तें सर्व पुरोहितां ।। १ ।। बोले धर्मशास्त्र जाणती सर्वही । परी तें कोणाही न कळे वर्म ।। २ ।। शिष्यें केलें पाप भोगावें गुरूनें । स्त्रीनें केलें घेणें पुरुषासी ।।३।। नामा म्हणे जन मायेंत गुंतले । सेखी खाती झोले संसाराचे ।। ४ ।।

(३८) प्रजेनें केलेलीं पापाचीं फळें राजाला भोगावीं लागतात. आणि राजानें केलेली पापाची फळें पुरोहिताला भोगावीं लागतात ।।१।। अश धर्मशास्त्रमताला सर्व जाणतात खरें परंतु याचें वर्म त्यांना कळत नाहीं. व कोणाकडून तशी कृति घडतहि नाही ।। २ ।। शिष्यानें केलेल्या पापाची गुरुजीनें, पापाचीफळें भोगावी आणि स्त्रियानीं केलेल्या पापाचो फळे पुरुषांनीं भोगावीं लागतात ।।३।। जनताही मायेचे अंकित होण्यानें त्यांना संसाराचे चक्रांत फिरावें लागतें असे नामदेवराय म्हणतात. ।।४।।

ऐसें बहुत काळ लोटालियावरी।पुण्याची सामोग्री हारपली।।१।। मरोनियां जन्म हरणाचा पावला । पतिव्रता झाल्या कुरंगिणी ।। २ ।। प्रारब्धाचा भोग सुटेना कोणासी। केली जैसी तैसी घ्यावीं फळें।।३।। नामा म्हणे देव कृपा करील जरी। सुटेना तोंवरी भोग खरा ।। ४ ।।

(३९) राजाचा अस क्रम बहुत काळ चालू असतां त्याच्या पुण्याचा संचय खलास झाला।।१।। आणि तो मेल्यावर त्यास मृगाचा जन्म झाला आणि त्याच्या ज्या दोन पतिव्रता स्त्रिया होत्या त्या कुरंगीणी (हरणी) झाल्या।।२।। प्रारब्ध भोग कोणालाच सुटत नाहीं ज्यांनी जसें कार्य केलें असेल त्याप्रमाणें त्याला भोग घडतो ।।३।। जोपर्यंत देवरायांनीं कृपा केली नाहीं तोंपर्यंत भोगदशा कांहीं सुटत नाहीं असें नामदेवराय म्हणतात.।।४।।

होऊनि हरण राहिला तो वनीं । दोघी त्या हरिणी स्त्रिया झाल्या ।। १ ।। जातीच्या स्वभावें करिती विहार । चित्त झालें स्थिर एकमेकां ।।२।। धाकुटीला दोन्हीं पाडसें गोजिरीं । दुजी गरोदरी पूर्ण मास ।। ३ ।। नामा म्हणे पुढें काय झाली गती । कथेची संगति ऐका बरी ।। ४ ।।

(४०) राजा मेल्यानंतर तो हरण होऊन वनामध्यें राहू लागला आणि त्याच्या पूर्व जन्मीच्या पतिव्रता स्त्रिया त्या हरीणी होऊन त्याच्या स्त्रिया झाल्या।।१।। त्या आपल्या स्वभावाप्रमाणें वनांत आनंदानें बागडू खेळू लागल्या आणि परस्परावर प्रेम करू लागल्या त्याच्यामध्ये प्रेमाचा अविष्कार झाला।।२।। जी धाकटी होती तिला दोन सुंदर पिले झालीं आणि दुसरी जी वडील होती ती गरोदर राहून तिचें पूर्ण मास भरलें होते।।३।। पुढें काय कथा घडली ती सागतों असे नामदेवराय म्हणतात.।।४।।

देवलोकीं इंद्र सेवेसी सादर । भूतसेन चाकर होता तेथें ।।१।। सेवेसी चुकतां होय तूं किरात । ऐसें इंद्रें त्यातें शापियेलें ।। २ ।। सेज सज्ज करितां अंतर पडिलें । म्हणोनि घडले भोग त्यासी ।।३।। नामा म्हणे सेवा करणें हें कठीण । त्यानें व्हावें जाण सावधान ।।४।।

(४१) देवलोकामध्यें इंद्राच्या सेवेकरितां भूतसेन नामक एक सेवक होता।।१।। इंद्राची सेवा करित असतां या भूतसेन सेवकांकडून चूक घडल्यानें तू किरात होशील असा इंद्रानें त्यास शाप दिला।।२।। इंद्राचा बिछाना करण्यामध्ये त्याची चुक झाल्याने या सेवकाला शाप भोगावा लागला।।३।। सेवा करणें हें कठीण काम आहे. ज्यांना सेवा करून मालकाचें अंतःकरण वश करणें असेल त्यांनी अति दक्ष असावें असें नामदेवराय म्हणतात ।।४।।

ऐकतांचि शब्द होऊनि किरात । राहिला निवांत एके ग्रामीं ।।१।।पाळणपोषण विषयांची वोढी । करीतसे जोडी पातकाची ।।२।। चण्ड भिल्ल नाम घेतलें ठेवूनि । दुष्टभाव मनीं वाढविला ।। ३ ।।

कांसेसी वाघुरा हातीं शूळ दंड । सामोग्री उदंड मेळविली ॥४॥ हिंडे नाना वन पर्वतशिखरें । मारीतसे फार जीव जतूं ॥ ५ ॥ जातीचा स्वभाव लागला तयासी । कष्टे अहर्निशीं म्हणे नामा ॥ ६ ॥

(४२) असा हा इंद्राचा श्राप होताच तो सेवक किरात होऊन एका गांवीं राहूं लागला॥१॥ शरिराची सेवा, व विषयाच्या भोगामध्यें तो स्वच्छंदानें राहुं लागला आणि पापाचा घडा भरवूं लागला ॥२॥ चंण्ड भिल्ल असा तो स्वतःला म्हणवूं लागला आणि मनामध्यें अनेक दुष्ट विचार करूं लागला॥३॥ तो आपल्या कमरेला जाळे गुंडाळीत असें आणि हातामध्यें शूल दंडादिक आयुधे संग्रही ठेवित असे॥४॥ अनेक दऱ्या खोऱ्यांत व वन पर्वतावर भटकत असे आणि अनेक जीव जंतुंची हत्या करीत असे॥५॥ त्याला आपल्या स्वभावाचें वळण पडलें आणि कष्टी होऊं लागला.असें नामदेवराय म्हणतात॥६॥

ऐसें असतां तो सरूं आला काळ । प्रारब्धाचें बळ कैसें पाहा? ॥१॥ हिंडतां हिंडतां फार कष्टी झाला । दृष्टीस तयाला न पडे कांहीं ॥ २ ॥ कडे दरी मोठ्या पर्वताचे वरी । रिघोनियां करी नाना युक्ती ॥ ३ ॥ झाली सांजवेळ न मिळे आमीष । होऊनि उदास राहिलांसे ॥ ४ ॥ नामा म्हणे मग काय त्यानें केलें । ऐकावें निश्चळें साधूंजनीं ॥ ५ ॥

(४३) अशी कृती करित असतां त्याचा भोग संपत आला. पहा प्रारब्धाची शक्ती कशी आहे? ॥१॥नित्य नियमाप्रमाणें सावज पकडण्याच्या शोधांत फिरत असतां त्याला कोणी सावज न मिळाल्यानें तो अति कष्टी झाला॥२॥ अनेक दऱ्या, खोरे, पर्वत भटकला आणि अनेक युक्त्या योजूं लागला॥३॥ अशा या खटपटीत असतां संध्याकाळची वेळ झाली तरी त्याला कोणी सावज मिळाले नाही तेंव्हा तो अति उदासिन होऊन स्तब्ध राहीला ॥४॥ अहो साधुजनहो पुढें त्यांनीं काय केलें हे तुम्ही शांत चित्तानें श्रवण करा असें नामदेवराय म्हणतात.॥५॥

मार्गही राहिला जाऊं कोणीकडे । आमीष न जोडे काय कीजे ॥ १ ॥ चिंताज्वरें फार तापलें अंतर । क्षुधेचा आडसर पोटामध्यें ॥ २ ॥ रिक्त जाऊं तरी नाहीं कांहीं घरीं । वाट पाहे घरीं दारापुत्र ॥ ३ ॥ पाहूं जातां कांहीं नाठवे विचार । तेणें स्थिर स्थिर पाय टाकी ॥ ४ ॥ नामा म्हणे तेव्हां देखे सरोवर । कांहींसा विचार करूं लागे ॥ ५ ॥

(४४) सावज मिळण्याचा जो मार्ग आहे तो सर्व कुंठीत झाला तेव्हां आतां पुढें काय करावें अशी त्याला चिंता उत्पन्न झाली ॥१॥ चिंतेच्या तापानें तो अति तप्त झाला आणि त्याच्या पोटामध्यें जठराग्नी भडकला ॥२॥ रिकामें परत जावें तो घरामध्यें कांहींच अन्न शिल्लक नाहीं व बायका व मुले घरी वाट पहात असतील ॥३॥ पुढील मार्गाविषयीं त्याला कांहींच विचार न सुचल्यानें तो हळू हळू पुढे चालू लागला ॥ ४ ॥ तोंच त्याला पुढें सरोवर दिसले तेंव्हा त्याला उल्हास वाटला व विचार चक्र सुरू झाले असें नामदेवराय म्हणतात.॥५॥

भोंवतालें जाळें घाली नेटें पाटें । हस्तकीं तिखट बाण धरी ॥ १ ॥ येतील उदकपानासी सावजें।पाहे त्याचे व्याजें रोखोनियां॥२॥ तेथें एक बिल्ववृक्ष महाथोर । वेंघोनियां वर बैसलासे ॥ ३ ॥ डोळ्याआड आलीं म्हणोनियां तोडी । अंतरी आवडी आमीषाची ॥४॥ बकाचिये परी ध्यानस्थ राहिला । जीविंचा जिव्हाळा वेगळाची ॥५॥ नामा म्हणे ऐसी दैवाची नव्हाळी । न करितां झाली देवपूजा ॥६॥

(४५) तलावाच्या सभोंवती त्यांनी आपलें जवळचें जाळे पसरलें व हाता मध्यें तीक्ष्ण बाण घेऊन सज्ज झाला. ॥१॥ कदाचित एखादे सावज पाणी पिण्याकरतां या तलावावर येत आहे काय ? म्हणून त्याकडे तो रोखून पाहूं लागला. ॥२॥ त्या तलावा जवळ एक मोठ बेलाचें झाड होते त्यावर तो बसला. ॥३॥ डोळ्या समोर जी जी फांदी येई, तिला लागून असलेली पानें

तो तोडून खाली टाकूं लागला मात्र मनांमध्यें सावजाचा वेध लांगलेला होता. ।।४।। तो ध्यानस्त होता खरा पण ते ध्यान बकाच्या—बगळ्याच्या ध्याना सारखे होते कारण अंतरथ त्याचें चित्त सावजाकडे होते. ।।५ ।। पूजा करण्याचा संकल्प नसताही त्याच्या कडून सहजच शंकराची पूजा घडली अशी ही विचित्र दैवलिला होय असे नामदेवराय म्हणतात, ।।६।।

लक्षवरी बिल्वदळें माथां वाहे । आनंद न समाये महादेवा ।। १ ।।
बहुता काळाचें तेथें एक लिंग । होतें भूमिभाग होऊनियां ।। २ ।।
भोळा महादेव तेणें संतोषला । म्हणे करी मला कोण पूजा ।। ३ ।।
नामा म्हणे पाहे निमित्याची वाट । पुराणीं बोभाट असे त्याचा ।।४।।

(४६) अशा प्रकारे त्यांनी लक्ष बेल वाहिल्यानें महादेव प्रसन्न झाले. महादेवाला अति आनंद झाला. ।।१।। त्या ठिकाणी अति जुनें असे महादेवाचें लिंग होते. ।।२।। लिंगावर बिल्वदल पडल्याने भोळा शंकर अतिशय प्रसन्न झाला. कोण हा माझी पूजा करित आहे ? ।।३।। देवराय हा कोणत्या तरी निमीत्ताची वाट पहात असतो, असे या देवरायाबद्दल सर्व पुराणेंही कठ्शोष करितांत असे नामदेवराय म्हणतात. ।।४।।

पुराणीं पवाडे जयाचे अपार । ऐकतांचि फार सुख वाटे ।। १ ।।
भोळा महादेव पाहे भोळा भाव । एकसरें जीव उद्धराया ।।२।। रावण मागों गेला पार्वतीकारणें । देते वेळे नेणें कैसें द्यावें ।।३।। जातीची चांडाळी गोकर्णासी गेली। दरुशनें ते नेली कैलासासी । ४।। नामा म्हणे कैसें दैव या भिल्लाचें । आलें पूजनाचें फळ हातां. ।। ५ ।।

(४७) ज्याची कीर्ति पुराणामध्यें विस्तृत सागितली आहे त्याच्या श्रवणानें मनाला अति आनद वाटतो. ।।१।। हा भोळा महादेव केवळ भाव असला म्हणजे सर्व जीवांना सारखी स्थिती देतो. सर्व जिवाचा उद्धार करितो. ।।२।। शंकराला पार्वती मागण्या करितां रावण गेला असतां ती त्यांची मागणी किती योग्यतेची आहे याचा त्यांनी काहींच विचार केला नाहीं. ।।३।। जातीची चांडाळीण खरी परंतु ती सहज गोकर्णाच्या दर्शनास

गेली असता या भोळया शंकरानें तिला कैलासास नेले ॥४॥ या भिल्लाचें दैव ही पहा कसें? त्यांनी सहज लिलेनें टाकलेल्या बिल्वदळाच्या पूजेनें कसें अपूर्व फळ आले, असें नामदेवराय म्हणतात ॥५॥

माथां पडतां पाला। सांब तेणें संतोषला ॥१॥ होता प्राचिनाचा ठेवा। बहु दुर्लभ मानवा ॥ २ ॥ काय भक्तीचा जीव्हाळा। काय त्याचें अंगीं कळा ॥ ३ ॥ बहु केली दुष्ट कर्म। सेखीं तोचि झाला धर्म ॥४॥ नामा म्हणे भोळा देव। सांगायाचा हाचि भाव॥५॥

(४८) शंकराच्या डोक्यावर बिल्वदल पडतांच तो अति प्रसन्न झाला. ॥१॥ अति दुर्लभ असा मानवाचा तो पूर्व संचिताचा मोठा ठेवा होता ॥२॥ त्याच्या जवळ कां भक्तिचा जिव्हाळा होता ? किंवा त्याच्या अंगी कांहीं नाना कळा होत्या ?॥३॥वास्तविक या किरातांनी आपल्या पूर्व आयुष्यामध्य अनंत अशी दुष्टाचरणें केली परंतु तीच या पुजेनें धर्म रुप झाली. ॥४॥ महादेव हा भोळा देव आहे हेंच मला सांगावयाचें आहे असें नामदेवराय म्हणतात. ॥५॥

इतुकियासाठीं। बहु तुष्टला धुर्जटी ॥ १ ॥ काय सांगावा विचार। दैव पारध्याचें थोर ॥ २ ॥ झाली तीन प्रहर निशी। पूजा पावली देवासी ॥३॥ धाडियेलें यमाला। सुखी कराया तयाला ॥४॥ आला तो धांवत। माग म्हणे अपेक्षित ॥५॥ त्याची विषयक भक्ती पुढती झाली तया गती ॥ ६ ॥ जें जें याचकें मागावें। तें तें दातयानें द्यावें ॥७॥ काय मागितलें तेणें। तेंचि नामा ऐका म्हणे ॥८॥

(४९) किरातानें केवळ अनपेक्षित पूजा करण्यानें हा भोला शंकर प्रसन्न झाला. ॥१॥ या पारध्याचें दैवच मोठे या पेक्षां अधिक काय सांगावें? ॥२॥ तीन प्रहर पर्यंन्त अशा प्रकारें पूजा केल्यानें ती देवरायांना मान्य झाली॥३॥ या किराताला संतोष व्हावा म्हणून शंकराने त्याच्याकडे यमाला पाठविले. ॥४॥ अशी ही शंकराची आज्ञा होतांच तो यम धावतच किरताकडे आला हे किराता तुझी काय इच्छा आहे त्याची मागणी कर. ॥५॥ किराताचे

मन केवळ विषयाकडे होण्यानें त्या प्रमाणें त्यांची गती झाली ॥ ६ ॥ याचकानें ज्या ज्या वस्तूची मागणी करावी ती ती दात्यानें पूर्ण करावी असा नियम आहे. ॥७॥ यमाजवळ त्यांनी कोणती मागणी केली ती सादर सांगतो त्याचें श्रवण करा असें नामदेवराय म्हणतात. ॥८॥

येऊनिया यम ठाकला पुढारीं । पाहे दुराचारी दुरोनियां ॥ १ ॥ घाबरला मनीं कोण असे नेणे । विचारितां मनीं भांबावला ॥ २ ॥ पुसो लागे त्याला कोण तूं आलासी । आणिक म्हणसी माग कांहीं ? ॥ ३ ॥ देव किंवा यक्ष राक्षस किन्नर । करिता निर्धार न पडे ठांयीं ॥ ४ ॥ नामा म्हणे मूर्ख पारधी तो खरा । दैव त्याच्या घरा आलें जाण ॥ ५ ॥

(५०) जेंव्हां यमराज किराताच्या पुढें येऊन उभे राहिले तेंव्हा तो दुष्टाचरणी त्यांना दूर राहून पाहूं लागला. ॥१॥ आपणा पुढें कोण हा अवचित उभा राहिला आहे हे समजत नाहीं म्हणून तो आपल्या मनांत घाबरला. ॥२॥ अरे भल्या माणसा तूं कोण आहेस ? व कोठून आला आहेस ? आणि पुन्हा वर माग असें म्हणत आहेस ? ॥३॥ तूं का देव आहेस किंवा यक्ष, राक्षस अथवा किन्नर आहेस ? या पैकी तूं कोण आहेस याचा निर्णय मला लागत नाहीं असे किरातानें यमाला म्हटलें ॥४॥ दैव त्याच्या घरी चालून आले आहे हें त्या मूर्ख किराताला उमगले नाही असे नामदेवराय म्हणतात. ॥५॥

जाणोनियां यम संतोषला मनीं । मंजुळ वचनीं काय बोले ॥१॥ केली देवें कृपा पाठविलें मज । वरदान तुज द्यावयासी ॥२॥ सर्वही जीवाचा नियंता मी यम । इच्छिसी तो काम पूर्ण करूं ॥ ३ ॥ शिवरात्री आजी उपवास केला । शंकर तोषला बिल्वदळीं ॥ ४ ॥ नामा म्हणे ऐसें ऐकतां वचन । पारध्याचें मनें सुखावलें ॥ ५ ॥

(५१) किराताची अशी झालेली अवस्था जाणून यमराज मनामध्यें संतोषीत झाले आणि मधुर भाषणानें बोलू लागले ॥१॥ तुला वरदान देण्याकरितां देवाने माझ्यावर कृपा करून तुझ्याकडे पाठविलें.॥२॥ सर्व विश्वाचा नियता मी यम आहे तू जी इच्छा करशील ती मी पूर्ण करिन. ॥३॥ आज शिवरात्र आहे या दिवशी तूं उपवास करुन, बिल्वदलानें पूजा केलीस म्हणून शंकर तुझ्यावर प्रसन्न झाले. ॥४॥ असें हे यमराजाचें भाषण ऐकून किराताला फार आनंद झाला असें नामदेवराय म्हणतात. ॥५॥

जोडोनियां हात वंदिला कृतांत। म्हणे माझा हेत इतुकाची॥१॥ सर्व सुखा हूनि हेंचि वाटे गोड। संसाराची ओढ मोडवेना॥२॥ मृग पक्षी यांचे कळावें बेलणें। सर्व कांहीं येणें कार्यसिद्धि॥३॥ इतुकी आहे हो माझी हीं वासना। पुरवूनि स्वस्थाना जावें तुम्ही॥४॥ नामा म्हणे ज्याची जे कांहीं वासना। तेचि पुढें जाणा उभीं ठाके॥५॥

(५२) यमराजाच्या सन्मुख हात जोडून त्यांनी त्यास वंदन केले. माझी येवढीच इच्छा आहे की ॥ १ ॥ सध्यांचा माझा व्यवसाय हा सर्व सुखाहून अतिश्रेष्ठ वाटत असल्याने ससाराची भीड मला सुटत नाही आणि तेच मला प्रिय वाटते ॥ २ ॥ हरणे व इतर पशु पक्षाच्या भाषा मला अवगत व्हाव्या त्यायोगे माझे सर्व हेतू पूर्ण होतील ॥ ३ ॥ येवढीच माझी इच्छा आहे ती पूर्ण करून तुम्ही आपल्या स्थळाकडे जावे ॥ ४ ॥ ज्याची जी वासना असेल तीचाच आविर्भाव त्याच्या ठिकाणीं होतो असें नामदेवराय म्हणतात ॥ ५ ॥

देऊनियां वर दंडपाणी गेला। ध्यास पारध्याला मृगाचाची॥१॥ लाऊनियां चित्त ऐके चळवळ। दृष्टीची तळमळ लक्ष तेथें॥२॥ उगवला दीन जाहला प्रकाश। मृग पक्षीयास दृष्टी झाली॥३॥ तोचि मृग पाहा आला उदकासी। उड्डाणि गगनासी सांवतसे॥४॥ तृषाक्रांत मोठा चालीला निःसंग। प्रारब्धाचा भोग ओढवला॥५॥ उदकाचिये हावें दृष्टी झाली दुरी। पाश तो समोरी देखेचिना॥६॥ येऊनियां पडे जाळीयामाझारी। लोळे पृथ्वीवरी एकसरा॥७॥ नामा म्हणे भिल्ले पहतां लोचनीं। ओढोनियां गुणीं बाण लावीं॥८॥

(५३) पारध्यानें केलेल्या मागणीची पूर्तता करून यमराज स्वस्थानीं रवाना झाले मात्र पारध्याला हरणाचा ध्यास लागला होता ॥१॥ तलावाकडील होणाऱ्या हालचालीकडे त्याच्या चित्ताचा वेध होता. तेथें कोणी पाणी पिण्यास येतो काय ? व दृष्टीस पडतो काय ? अशी त्याच्या डोळयास आतुरता लागल्यानें त्याचें सारे लक्ष तिकडे होते ॥ २ ॥ सूर्योदय होण्यानें प्रकाश झाला तेव्हां त्याला मृग दिसला ॥४॥ पाणी पिण्याकरितां हरण हे आकाशाला पोहोचेल अशा वेगानें धांवत आला ॥ ४ ॥ हरण हे तृषेनें अति व्याकूळ होण्यानें निर्भयपणें तेथें आला असतां प्रारब्धाचा भोग आडवा आला ॥ ५ ॥ आपणापुढे पाश आहे हें पाण्याच्या वेधामुळें त्याला दिसलें नाहीं ॥ ६ ॥ तो धांवत असतां जाळयांत अडकला आणि जमिनीवर पडला ॥ ७ ॥ मृगाची अशी अवस्था झालेली पाहून पारध्यानें आपला बाण धनुष्याला लावला असें नामदेवराय म्हणतात ॥ ८ ॥

घाव घालूं जातां देखिलें नवल।पाहातसे खळ दुष्टभावें ॥१॥
परी तें होणार कदापि चुकेना । तैसीच वासना धांव घाली ॥२॥
धाकुटी हरणी पाडसें धाकुटीं । सांडी उठाउठी आली तेथें ॥३॥
पाहे जातां पाशीं गुंतला तो मृग । तेव्हां काय मग केलें तिनें॥३॥
मुखाप्रती मुख लाउनि चुंबिलें । हृदय फुटलें देखताचि ॥५॥ सुख-
दुःख बोल बोलती ते वेळीं। म्हणती कपाळी भोग होता ॥६॥ सोड-
विता कोणी न दिसे ये काळीं । काळाची पडली उडी आतां॥ ७ ॥
नामा म्हणे खळा कळे त्याची वाणी। ऐकाया लागुनि स्थिर झाला॥८॥

(५४) बाण मारण्याकरितां प्रवृत्त झाला असतां तो त्याला अपूर्व दिसले. ते दृश्य तो खल दुष्ट भावनेनें पाहूं लागला॥१॥ जें कांहीं घडणार आहे ते केव्हांही चुकणार नाहीं आणि त्याप्रमाणें वासना होते ॥ २ ॥ लहान हरिणी व तिचे दोन्ही लहान पिल्लें पाठोपाठ धांवतच तेथें आलीं ॥ ३ ॥ हरण हां पाशामध्यें गुंतला आहे असें पाहिले असतां तिनें असे केले कीं ॥ ४ ॥ आपले मुख हरणाच्या मुखाला लावलें हें करुणास्पद दृश्य पहातांच हृदय

दुभंगले ॥ ५ ॥ नंतर ते परस्परांमध्यें सुखदुःखाच्या गोष्टी बोलूं लागले. प्रारब्ध भोगाप्रमाणें हे सर्व घडून आले ॥ ६ ॥ आतां या संकटी आपणाला कोणी मुक्त करणारा नाहीं कारण ही जणूं काय काळाचीच उडी आहे ॥७॥ त्या दुष्टाला हरणाची भाषा समजत होती म्हणून त्याचे भाषण तो शांत चित्तानें ऐकूं लागला असे नामदेवराय म्हणतात.॥८॥

धर्मशील ऐसें बोलताती बोलें। तेणें चोजवलें चित्त त्याचें ॥१॥
आश्चर्याच्या डोहीं बुडाला पारधी। म्हणे कैसी बुद्धि याची पाहा ॥२॥
रानींचीं रानवटें तया एवढें ज्ञान। प्रेमाचें जीवन वोसंडत ॥३॥
चाकाटली वृत्ति चित्त केलें स्थिर। दोघांची उत्तरें ऐकतसे ॥४॥
नामा म्हणे हरणी हरणाचा संवाद। ऐकतां भवबंध तुटतसे ॥५॥

(५५) हरण हरीणीच्यामध्यें होणारे भाषण धर्मशास्त्र युक्त होते॥१॥ किरातानें ते भाषण ऐकताच आश्चर्य वाटले. काय हो यांची भाषा किती संयुक्तिक आहे असे तो म्हणू लागला॥२॥अरण्यामध्यें रहाणाऱ्या जनावरामध्ये असें हे अद्‌भुत ज्ञान कसे हो प्राप्त झाले आणि काय हो यांच्यामध्यें प्रेम ओसंडत आहे॥३॥ तो चकीत होऊन त्यानें आपले चित्त स्थिर केले आणि शांत मनानें त्यांच्या परस्परामध्यें होणारे भाषण पुन्हा ऐकू लागला ॥४॥ या हरण हरीणीचा संवाद जो कोणी ऐकेल त्यांची भवबंधनें नष्ट होतील असें नामदेवराय म्हणतात॥५॥

बंधनीं गुंतला देखोनियां पती। उडालीसे वृत्ति हरणीची ॥१॥
देहाची ते आस सांडोनि लवलाहीं। पडे रडे कांहीं बोल बोले॥२॥
म्हणे तुम्हीं आतां नव्हे जावें एकलें। सँगे आम्हां नेलें पाहिजे जी ॥ ३ ॥ बहुतां जन्मांची तुम्हां आम्हां गांठी। आतां कैसी तुटी पाडितसां ॥ ४ ॥ भोग जे भोगिले स्वप्नप्राय झाली। नाहीं ते पुरली वासना हे ॥ ५ ॥ नामा म्हणे विषय वासना ओंगळ। तेणें कोण्या काळे सुटिजेना ॥६॥

(५६) हरणाला बंदिस्त पाहून हरीणीचा वृत्तीभाव नष्ट झाला।।१।।तिनें आपल्या देहाची आशा सोडली आणि लोळण घेऊन रडत भाषण करूं लागली।।२।। तुम्ही एकटे जाऊं नका. तुमच्या बरोबर आम्हाला घेऊन गेले पाहिजे।।३।।अनंत जन्मापासून तुमचा आमचा ऋणानुबंध झाला आहे. आतां त्यामध्यें कशी फूट पाडीत अहांत।।४।। आपण जो आतांपर्यंत विषयविलास केला, तो जणूं काय स्वप्नवत् झाला. अद्याप माझी कामना पूर्ण झाली नाहीं।।५।। खरोखर पहातां वासना अति दुष्ट आहे ती कांहीं केल्या सुटत नाहीं असें नामदेवराय म्हणतात।।६।।

देखतांचि कांता दुःखी झाली फार । डोंगर तिजवर कोसळला ।। १ ।। बोलतां तियेशी न निघती बोल । कुरंग म्हणे बोल अवधारीं ।। २ ।। नको आतां पडूं मायेचिये भरीं । जाये वो सुंदरी स्वस्थळासी ।। ३ ।। माझी गति मज तुझी गति तुज । काय काज व्यर्थ प्राण द्यावा? ।। ४ ।। घरीं तुझीं बाळें गोजिरे गोमटीं । जाऊनिया पोटीं धरीं त्यासी ।। ५ ।। न लावी उशीर जाई वो माघारी । जंव तो दुराचारी न देखतां ।। ६ ।। बाळा पाळण हाचि स्त्रियांचा धर्म । सांगतसे वर्म जाई आतां ।। ७ ।। माझिया प्रारब्धीं होतें तैसें झालें । तूं कां येथें बळें प्राण देसी ।।८ ।। नामा म्हणे ऐसें सांगे तिच्या हिता । परी तें नाइकतां कष्टी होय ।। ९ ।।

(५७) अशी ही हरिणीची अवस्था पाहून जणूं काय हरणावर डोंगरच कोसळला आहे काय असें हरणाला झालें।।१।। तिच्याशीं भाषण करण्याची इच्छा होती खरी; परंतु त्याच्या मुखांतून दुःखवेगानें एक शब्दही उच्चारला जात नव्हता तेव्हां तो हरण बळ करून बोलू लागला कीं हे हरिणी, तूं माझें ऐक ।।२।। हे हरिणी, तूं प्रेमपाशांत गुंतू नकोस, हे सुंदरी तूं परत आपल्या घराकडे जा।।३।। तुझे कर्म तुझ्या बरोबर, माझा कर्मभोग माझ्या बरोबर. तूं आपला प्राण येथें व्यर्थ खर्ची घालण्याचे कारण काय ? ।।४।। तुझीं सुंदर बाळें घरीं

आहेत. तेव्हा त्यांना तु आपल्या जवळ घे ।।५।। येथें तू आपला वेळ गमवूं नकोस. त्या दुष्टानें जोंपर्यंत तुला पाहिले नाहीं, त्या आधीं तूं येथून परत पलायन कर. ।।६।। मुलाचें भरणपोषण करणें हाच स्त्रियांचा धर्म आहे हे वर्म तुला मी स्पष्ट सांगतो ।।७।। माझ्या प्रारब्धाप्रमाणें होणारें आहे तें झालें. तेव्हा तूं आपला प्राण येथें व्यर्थ कां खर्ची घालीत आहेस।।८।। हरणानें तिच्या हितं:चा मार्ग स्पष्ट केला खरा. परंतु ते श्रवण करून ती अति दु:खी झाली असें नामदेवराय म्हणतात.।।९।।

नेत्रीं अश्रुधारा पडती अपार । तेणें पृथ्वीवर पूर वाहे ।।१।।
म्हणे तुम्हांविण कैसा प्राण धरूं । वांचुनियां करूं काय आतां ।।२।।
माझिया भारानें दाटेल मेदिनी । तुम्हां आव्हेरूनि गेल्यें जरी ।।३।।
सुखाचे सांगाती होतों दोघीजणी । दु:ख म्हणवूनि सांडी केली ।।४।।
सांडिलिया तुम्हां देवा न मानेल । वेदशास्त्र बोल हाकारिती ।। ५ ।।
तुजविण क्षण कंठवेना काळ । मीना जैसें जळ तैसें आम्हां ।।६।।
तुजविण जिणें व्यर्थ या संसारीं । नामा म्हणे खरी गोष्ट बोले ।।७।।

(५८) हरिणीला दुख:वेगानें रडूं कोसळलें आणि तिच्या नेत्राच्या धारेनें जणूं काय पूर वाहूं लागला. ।।१।। अहो पतिराज, तुमच्या शिवाय माझा प्राण कसा राहणार ? आणि तुमच्याशिवाय मी जगून तरी काय करणार ? ।।२।। मी तुमचा त्याग करून येथून परत गेले असतां माझ्या अशा या कृतीच्या पापानें पृथ्वी दुभंग होईल. ।।३।। सुखकाळामध्यें आपण बरोबर होतो आणि दु:ख येतांच आम्हीं तुमचा त्याग करावा कां ? ।।४।। जर तुमचा मी त्याग केला तर ही माझी कृती देवाला मान्य होणार नाहीं असें वेदशास्त्रामध्यें सांगितले आहे ।।५।। पाण्यावाचून जसा तळमळतो तसें तुमच्या वियोगानें माझें अंतकरण दु:खी होत आहे ।।६।। या संसारामध्यें तुमच्याशिवाय रहाणें व्यर्थ होय. अशी हा [illegible] आपली खरी स्थिति सांगितली असें नामदेवराय म्हणतात. ।।७।।

चंडभिल्ल [illegible] ऐकिलें बोलणें । सावधान मनें करोनिया।।१।।
[illegible]ती चित्तीं वासना जे खोटी । जिरऊनि पोटीं चाकाटला।।२।।

...तिल यालागीं वृक्षाआड झाला । ऐको जों लागला शब्द त्यांचे ॥३॥ ...मा म्हणे ऐसा राहिला पारधी । ऐकावें ते संधि काय झालें ॥४॥

(५९) असा हा हरण व हरणीचा संवाद त्या दुष्ट पारध्यानें शांत चित्तानें ऐकला ॥१॥ त्याच्या वृत्तीमध्यें परिवर्तन झालें. अर्थात त्याची दुष्ट बुद्धी नष्ट झाली व चित्तांत प्रकाश पडला. ॥२॥ कदाचित् मला पाहून हे भित्तील म्हणून तो झाडाआड झाला आणि त्यांच्या मध्यें होणारा संवाद ऐकूं लागला. ॥३॥ अशा प्रकारे तो पारधी झाडाआड स्वस्थ बसला असतां पुढें काय प्रकार झाला तो श्रवण करा असें नामदेवराय म्हणतात. ॥४॥

दुसरी जे होती गर्भिण कुरंगी । तेही लागवेगी आली तेथें ॥ १ ॥ आहा ऐसें काय केलें वो साजणी । नयेसी अझुनी कोंपटासी ॥ २ ॥ ल्हान पाडसें आक्रंदती भुकें । कैसी येथें सुखें राहिलिसी ॥ ३ ॥ जाईं लवलाही त्यासीं स्तन देईं । सांगूं आतां कांहीं बोलवेना ॥ ४ ॥ नामा म्हणे धन्य तयाचें सौजन्य । नाहीं भावभिन्न कोणामाजी ॥ ५ ॥

(६०) हरणाची दुसरी जी गरोदर बायको होती ती त्वरित तेथें आली. ॥१॥ अगे प्रियकरणी, एवढा वेळ तूं कां लावलास गे ? अद्यापपर्यंत तूं कां झोपडींत आली नाहींस ? ॥२॥ अगे, तुझीं दोन बालकें भुकेनें व्याकुळ होऊन ओरडूं लागलीं आहेत आणि तूं मात्र येथें आनंदानें राहिलीस. ॥३॥ तूं त्वरित परत जा आणि बालकांना स्तनपान दे. यापेक्षां ज्यास्त मला तुला सांगतां येत नाहीं असें धाकट्या बहिणीस ती म्हणाली. ॥४॥ धन्य त्यांच्या ...प्रेमाचें. त्यांच्या दोघींमध्ये किंचितही भेदभाव नाहीं असें नामदेवराय म्हणतात. ॥५॥

...रा म्हणे काय करूं वो सुंदरी । आतां आहे घरीं काय माझें ॥ १ ॥ प्राणनाथ पेणें केलें स्वर्गलोका । जाईन मी देखा तयासंगें ॥ २ ॥ वडिलपणें तुम्हीं लोभ असों द्यावा । सांभाळ

करावा बाळकांचा ॥ ३ ॥ वागुरे माझारी गुंतलासे कांत । कायसें जीवित विचारी पां ॥४॥ न लावी उशीर जाई येच क्षणीं । अससी गर्भिणी पूर्ण दिवस ॥ ५ ॥ जरी देसी प्राण पतन गर्भासी । होय ते दोषासी पात्र होसी ॥ ६ ॥ पोसोनियां बाळें वाढवी वंशाला । द्यावें चित्त बोला माझ्या आतां ॥ ७ ॥ पळावया तुज नाहीं अंगीं बळ । न देखतां खळ जाई वेगीं ॥ ८ ॥ नामा म्हणे ऐसीं उत्तरें ऐकिलीं । तेही घाबरली तये वेळे ॥ ९ ॥

(६१) हे सुंदरी, आतां मी घरीं जाऊन काय करूं? तेथें आतां माझे कोण आहे बरें? असें ती आपल्या थोरल्या बहिणीस म्हणाली॥१॥ प्राणनाथानें स्वर्गांत मुक्काम केला आहे; त्यांच्या बरोबर मी जाणार आहे ॥२॥ तेव्हां वडिलांप्रमाणें तुम्ही माझ्यावर प्रेम ठेवा आणि मुलांचा सांभाळ करा॥३॥ पतिराज तर जाळ्यामध्यें अडकले आहेत. त्यांचें अस्तित्व आतां कसें रहाणार?॥४॥ तूं गर्भिणी असून तुझे दिवस पूर्ण भरले आहेत. तेव्हां येथें किंचितहि वेळ दवडूं नकोस. त्वरित परत घरीं जा ॥५॥ कदाचित् तूं येथें प्राण दिल्यास गर्भपात होईल आणि बालहत्येच्या दोषास पात्र होशील॥६॥ बालकाचें पालन कर आणि वंशाची वाढ कर. या माझ्या भाषणाला मान्यता दे॥७॥ तुझ्या अंगीं पळण्याचें सामर्थ्य नाहीं. तेव्हा त्या दुष्टानें तुला पाहिलें नाहीं त्याआधींच तूं तेथून पलायन कर ॥८॥ अशा प्रकारचें संभाषण ऐकलें असतांना ती भयभीत झाली असें नामदेवराय म्हणतात. ॥९॥

ऐकतांचि जीव झाला कासावीस । म्हणे झालें कैसें अकस्मात ॥ १ ॥ आहा कपाळींचा भोग वोढवला । कांत तो निघाला सांडोनियां ॥ २ ॥ कैंचीं बाळें कोण कोणाची सांगाती । पाहातां हे भ्रांति वाउगीची ॥३॥ ठायींची हे काया [illegible]ची जाईल । वांचलिया फोल पतिविण ॥ ४ ॥ पतीविण सुख काय या संसारीं । दुःख कल्पवरी भोगावें कां ॥ ५ ॥ नामा म्हणे ऐसें चिंतोनिया मनीं । आली ती तत्क्षणीं हरणापाशीं ॥ ६ ॥

(६२) असें हें भाषण ऐकतांच तिचा जीव कासावीस झाला. हा असा अकस्मात् प्रकार कसा घडला॥१॥ अहाहा हा जणूं काय कपाळाचा कर्मभोग कसा प्राप्त झाला ? पतिराज हे आपणाला सोडून जात आहेत ॥२॥ हे पुत्र कोणाचे? आणि कोण सोबती? ही सर्व व्यर्थ भ्रांती आहे ॥३॥ हें जें शरीर दिसत आहे तें मृगजलवत् मिथ्या असून नष्ट होणारें आहे. पतीशिवाय हे जीवन फोल होय ॥४॥ या विश्वामध्यें पतीशिवाय काय सुख आहे बरें ? कल्पपर्यंत तो दुःखभोगच होय ॥५॥ तिनें असा मनामध्यें विचार केला आणि ती आपल्या नवऱ्याजवळ आली असें नामदेवराय म्हणतात.॥६॥

कपाळीं कपाळ लावी चुंबी रडे । आक्रंदोनी पडे पृथ्वीवरी ॥ १ ॥ आवडीचें चिन्ह सांगवेना वाचे । जाणावें जयांचें त्यांचें त्यांनीं ॥२॥ मानेवरी मान टाकूनि राहिली । वाचाही खुंटली बोलवेना ॥३॥ आम्हीं तुजविण न राहूं क्षणभरी । उदास न करीं चित्त आतां ॥ ४ ॥ नामा म्हणे मृग जन्म त्यांचा खरा । लक्षितां विचारा ज्ञानी बहू ॥ ५ ॥

(६३) तिनें आपलें कपाळ नवऱ्याच्या कपाळाला लावलें आणि चुंबन घेऊन मोठमोठ्यानें रडूं लागली आणि जमिनीवर पडली. ॥१॥ प्रेमाचें स्वरूप अनिर्वचनीय आहे तें कसें सांगतां येईल ? ज्याच्या त्याच्या मनानेंच जाणावें ॥२॥ त्यांनी आपली मान परस्पराच्या मानेवर टाकली आणि तिची वाणीही मुग्ध झाली. ॥३॥ हे प्राणनाथा, तुमच्याशिवाय आम्ही एक क्षणभरही रहाणार नाहीं. आपलें चित्त उदासीन करूं नका.॥४॥ त्यांचा जन्म हरणाचा होता हें खरें परंतु त्यांच्या ठिकाणचें ज्ञान मात्र श्रेष्ठ दर्जाचें होतें असें नामदेवराय म्हणतात. ॥५॥

पट्टाची मी राणी दे ढील मानाची । जे गति मृगाची तेंचि मज॥१॥ जाईन सांगातें न सोडी संगती । निश्चय हा चित्तीं दृढ केला ॥२॥तुझीं बाळें धरीं कष्टती क्षुधेनें । जाई वेगीं स्तन पाजी त्यासी ॥ ३ ॥ बाळाकडे जाईं पाहें कंठीं काळ । न करीं उतावीळ मन आतां ॥ ४ ॥ नामा म्हणे ऐसे संवादले फार । तिघांचे अंतर एकविध ॥ ५ ॥

(६४) मी त्यांची पट्टराणी असल्यानें मला मोठेपणाचा मान आहे. तेव्हां जी मृगाची गती तीच माझी असणार ॥१॥ मी त्यांना न सोडतां त्यांच्या बरोबर जाईन असा माझा पक्का निश्चय झाला आहे. ॥२॥ तुझीं पिलें तुझ्याशिवाय अति व्याकूळ झाली आहेत तेव्हा तू परत जा आणि तुझ्या मुलांना दूध पाज ॥३॥ तू आपल्या बालकाकडे पाहून तू आपला काल आक्रमण कर. आतां व्यर्थ मनाची उचल करूं नकोस ॥४॥ असें त्यांनीं परस्परामध्ये पुष्कळ भाषण केलें. कारण त्यांच्या तिघांमध्यें एकमेकांविषयीं प्रेम होतें असें नामदेवराय म्हणतात. ॥५॥

ऐशा दोघीजणी एकविध भावें । द्यावयासी जीव उभ्या ठेल्या ॥ १ ॥ धन्य धन्य त्यांचा संसार सुफळ । सत्वाचेंचि बळ अंगामध्यें ॥ २ ॥ पाजूनियां येईं बाळकासी स्तन । आम्ही दोघेजण येथें असों ॥ ३ ॥ न टाका मजला सांगोनि निघाली । बिर्‍हाडासी आली लागवेगें ॥ ४ ॥ घेऊनियां अंकीं पाडसें तीं दोन्हीं । लावूनियां स्तनीं शोक करी ॥ ५ ॥ एकमेकें सुखें राहावें अनन्य । तुटलें सौजन्य तुम्हां आम्हां ॥ ६ ॥ पति पडिलासे फांसीं सांडिलसे प्राण । आम्हालागीं जाणे त्याच्या संगें ॥ ७ ॥ हृदयीं धरोनी दिधलें चुंबन । तीं म्हणती कोण पोशी आम्हां ॥ ८ ॥ येऊं तुझ्या सवें देऊं आधीं प्राण । पुढील कारण तुम्हीं पाहा ॥ ९ ॥ नामा म्हणे ऐसा तयांचा विवेक । देखोनि कौतुक वाटतसे ॥ १० ॥

(६५) ह्या दोघीही एकविध भावनेनें आपला जीव देण्याकरितां उभ्या ठाकल्या ॥१॥ त्यांच्या अंतःकरणामध्यें सत्वाचा आविष्कार होण्यानें त्यांचा संसार सफळ होय. त्या धन्य, धन्य होत. ॥२॥ तूं आपल्या मुलांना स्तनपान करून ये; आम्ही दोघेही या ठिकाणीं स्थित राहूं ॥३॥ पहा, मला टाकून तुम्हीं दोघे जण जाऊं नका असें त्यांना बजावून ती परत त्वरित बिर्‍हाडीं आली ॥४॥ तिनें आपल्या दोन्ही पिलांना मांडीवर घेऊन त्यांना दूध पाजलें.

आणि शोक करूं लागली.।।५।।मुलांनो, तुम्ही दोघें परस्पर प्रेमानें रहा बरें. आतां यापुढें तुमचा व माझा ऋणानुबंध सुटला ।।६।। माझा पती फासांमध्ये पडला असून त्यांचा प्राण जाऊं पहात आहे आणि त्यांच्याबरोबर आम्हांलाही जाणें भाग आहे. ।।७।। त्यांना आपल्या हृदयाशीं धरलें आणि आलिंगन दिलें असतां आमचें पोषण कोण करील असा प्रश्न पिलांनीं आपल्या मातेस केला ? ।।८।। आम्ही तुझ्याबरोबर येऊन तुमच्या आधीं आम्ही आपला प्राण अर्पण करूं. पुढील विचार तुम्ही करा ।।९।। त्यांचा असा हा विवेक पाहून कौतुक वाटतें असें नामदेवराय म्हणतात. ।।१०।।

निघोनियां देखा आली त्या तटाका । झाली एकमेकां भेटी तेथें ।। १ ।। परस्परें दुःख देखतां वाढलें । धैर्याचें तें बळ केलें त्यांनीं ।। २ ।। देवभाव कांहीं नाठवे तयांसी । गुंतोनी मोहासी जीव देती ।। ३ ।। नामा म्हणे देवें सोडवावें त्यांसी । हे तो अनेकांसी आटोपेना ।। ४ ।।

(६६) ती आपल्या बिन्हाडांतून निघाली आणि तलावाच्या किनारीं आली असतां तेथें सर्वांच्या भेटी झाल्या ।।१।। परस्परांना पहातांच दुःखाचा स्फोट झाला खरा परंतु त्यांनीं आपल्या ठिकाणीं धैर्य दृढ केलें. ।।२।। त्यांना आपल्या देहाचें विस्मरण झालें व मोहानें तीं आपला प्राण देण्यास तयार झालीं. ।।३।। हे देवराया, तुझ्याशिवाय दुसरा कोणी ह्यांना साह्यकर्ता नाहीं. तूच यांना या संकटांतून मुक्त कर असें नामदेवराय म्हणतात. ।।४।।

पारधी तो झड घालोनी पातला । घालावया घाला एकसरें ।।१।। भयाभीत झालीं पांचही ते काळीं । वासना गुंतली एकमेकां ।। २ ।। वडील कुरंगी येऊन त्यापाशीं । लागोनी पायांसी काय बोले ।।३।। नको मारूं पति तृषेनें पीडिला । मारी तूं मजला तयां आधीं ।।४।। अहेवपणानें धाडी स्वर्गलोका । येतुल्यानें सुखपात्र होऊं ।।५।। कुकीयामाजी दुसरीही आली । ती म्हणे उगली थांब आतां ।। ६ ।।

तृषेनें पीडिलों पाजी आधीं पाणी । मग जैसे मनीं तैसें करीं ॥७॥ नामा म्हणे भिल्ल विसरला घात । राहिला निवांत त्यांच्या बोलें॥८॥

(६७) पारध्यानें त्यांना मारण्याकरितां एकदम झडप घातली. ॥१॥ ही स्थिति पाहून पांचही जण भयकंपित झाले आणि प्रेमानें एकमेकांकडे पाहू लागले. कारण त्यांच्यामध्ये एकमेकासंबंधी वासना गुंतून राहिली होती. ॥२॥ थोरली हरीण पारध्याच्या पायापाशीं येऊन भाषण करूं लागली.॥३॥ माझा पती तहानेनें अति व्याकुळ झाला आहे तेव्हां त्यास न मारतांना मला त्याच्या आधीं मार. ॥४॥ त्याच्या आधी मी आहे व पणानें स्वर्गांत मेले असतां तेवढ्या सुखाला पात्र होऊं॥५॥ तोंच दुसरी हरीण त्याच्या जवळ आली. तूं थोडा वेळ थाब असें ती त्याला म्हणाली॥६॥आम्ही तृषेनें व्याकुळ झालों आहोंत तेव्हा प्रथम आम्हांला पाणी पिऊं दे नंतर तुझ्या मनामध्ये जसें येईल तसें कर ॥७॥ ही त्यांची अवस्था पाहून पारधी हा त्यांचा घात करण्याचें विसरला आणि त्यांच्या संभाषणानें तो शांत राहिला असें नामदेवराय म्हणतात. ॥८॥

वडील कुरंगी काय बोले त्यासी । सांगते धर्मासी पूर्वींलीया ॥ १ ॥ बांधोनी मारितां घडे महादोष । पाजी उदकास सोडोनियां ॥ २ ॥ पिउनियां जळ येऊं तुजपाशीं । मग सावकासी करीं काज ॥ ३ ॥ आमुचा विश्वास नाहीं तुज जरी । मागशी त्यापरी भाक देऊं ॥ ४ ॥ पर उपकारीं पडतसे देह । लाभ आतां काय वांचूनियां ॥ ५ ॥ भुकेलिया अन्न तान्हेल्या जीवन । पुण्यासी कारण इतुकेंची ॥ ६ ॥ पांचजणीं तुज वोपीयेले देह । यालागीं संदेह नें धरावा ॥ ७ ॥ नामा म्हणे ऐसा प्रार्थिता किरात । द्रवला मनांत काय बोले ॥ ८ ॥

(६८) पूर्वींच्या धर्मग्रंथांत काय सांगितलें आहे तें तुला मी सांगतें असें मोठी हरीण पारध्यास म्हणाली. ॥१॥ तृषित झालेल्या प्राण्यास बांधून

मारिलें असतां महादोष घडतो म्हणून तूं त्यांना प्रथम सोड व पाणी पाज ॥२॥ आम्ही पोटभर पाणी पिऊन तुझ्याजवळ परत येतों. नंतर शांतपणानें तूं आपलें कार्य कर; अर्थात् आमचा घात कर॥३॥कदाचित् आमच्या शब्दा-वर तुझा विश्वास नसेल तर तूं जी शपथ घेण्यास सांगशील ती घेण्यास आम्ही तयार आहोंत. ॥४॥ जर आमचा देह परोपकाराकरिता खर्च होत असल्यास पश्चात् जगून तरी कोणता लाभ आहे? ॥५॥ क्षुधिताला अन्न आणि तृषिताला पाणी दिलें असतां महापुण्य घडतें. ॥६॥ आम्ही पांचही जणांनी तुला आमचा देह अर्पण केला आहे. याविषयीं तूं आपल्या मनामध्यें संशय आणूं नकोस.॥७॥अशी ही प्रार्थना हरिणीनें किरातास करितांच त्याच्या मनांत दया येऊन तो भाषण करूं लागला असें नामदेवराय म्हणतात ॥८॥

होऊनियां तुम्ही वनींचीं वनचरें । बोलतसा सार धर्मा-धर्म ॥ १ ॥ येणें कांहीं कांहीं द्रव आला मना । तुमच्या भावना कोण जाणे ॥ २ ॥ सोडिल्या पाण्यासी ठकवूनि आम्हासी । गेलिया तुम्हांसी काय कीजे? ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसें बोलोनि किरात । करा-वया घात शस्त्र काढी ॥ ४ ॥

(६९) अरे हरणींनो तुम्हीं वनांत रहाणारे असतांही धर्म काय व अधर्म काय याविषयींच्या वर्माची चर्चा करीत आहांत ॥ १ ॥ तुमच्या अशा या भाषणानें माझ्या मनामध्यें तुमच्या विषयीं दया आली आहे. तुमच्या कोणत्या भावना आहेत हें मी जाणूं शकत नाहीं ॥ २ ॥ पाणी पिण्याकरितां मी तुम्हांला सोडलें आणि तुम्ही मला फसवून पळून गेलांत तर मी तुमचे काय करावें?॥३॥किरातानें असें भाषण करून त्यांनीं आपल्या भात्यांतून त्यांना मारण्याकरितां बाण लावले असें नामदेवराय म्हणतात॥४॥

देखती तीं दोन्हीं पाडसें त्या काळीं । भिल्लापुढें आलीं लागवेगें ॥ १ ॥ जोडोनियां हात ऐकावी विनंती । धरीं कृपा चित्ता आमुचिते ॥ २ ॥ अतिता लागोनि चिलिमा वोपी देहे । तृप्तीचें तो लाहे परमधाम ॥ ३ ॥ मातापितरांसी न करावा घात । माराचें

आमुतें आधीं आतां ॥ ४ ॥ कोंवळें शरीर गोड बहु मांस । लागो सार्थकास तुझे काजीं ॥ ५ ॥ नामा म्हणे सत्त्व मोठे त्या पांचांचें । होती कैलासींचे अधिकारी ॥ ६ ॥

(७०) किरातानें आपलें शस्त्र सज्ज केलेलें आहे असें पहातांच दोन्ही लहान पिल्लें त्याच्या सन्मुख त्वरित उभीं राहिलीं ॥ १ ॥ त्यांनीं आपले दोन्ही हात जोडले आणि आमच्या संबंधीं तुझ्या मनामध्यें कृपा निर्माण व्हावी अशी विनंती केली ॥ २ ॥ आपल्या येथें आलेल्या अतिथीच्या सत्कारार्थ निलीया बालकांनीं देह अर्पण केला असतां त्यास परमधाम प्राप्त झालें ना? ॥३॥ तेव्हां माझ्या मातापितरांचा घात न करितां प्रथम आम्हांला मार ॥ ४ ॥ आमचें शरीर कोवळें असल्यानें तें तुला फार गोड लागेल. तुझ्या हितार्थ आमचा देह खर्ची पडो ॥ ५ ॥ या पांचही जणांचे ठायीं सत्वाचें बल अधिक होतें म्हणूनच ते कैलासाचे अधिकारी झाले असें नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

हरणी सांगे कांहीं कर्मविपाकासी । ऐशा ऐशा दोषी ऐसे होती ॥ १ ॥ ठकवूनियां आम्हीं तुज जाऊं जरी । अंधतमाभितरीं वास पावों ॥ २ ॥ गुरुस्वामीद्रोही विश्वासघातकी । तयास तो नरकीं वास सदा ॥ ३ ॥ परद्रोही परनिंदेसी रतला । तो होय कावळा जन्मोजन्मीं ॥ ४ ॥ पंक्तिभेदकेचीं मरतील पोरें । किंवा पती मरे बाळपणीं ॥ ५ ॥ सदासर्वकाळ दुष्ट कर्मीं रत । शूकरादि होत नीच योनी ॥ ६ ॥ अतीत अभ्यागत पूजा नाहीं ज्याला । घूस सर्प बिळामाजी होती ॥ ७ ॥ नामा म्हणे केलें तैसें तें भोगावें । सावधान व्हावें जाणत्यांनीं ॥ ८ ॥

(७१) कोणत्या कोणत्या कर्मापासून काय काय दोष घडतात याचा तपशील कर्मशास्त्राधारें हरीण सांगत आहे ॥ १ ॥ जर आम्ही तुला फसवून पळून जाऊं तर त्यापासून आम्हांला अंधतम नांवाचा नरक

मिळेल ॥२॥ ज्यांच्याकडून गुरु स्वामीचा द्रोह होतो व जे विश्वासघातकी आहेत त्यांचें अशा या नरकांत वास्तव्य होतें॥३॥ दुसऱ्याचा द्रोह करणारा आणि परनिंदा करणारा आहे त्यास जन्मोजन्मी कावळयाचा जन्म होतो ॥४॥ जो पंक्तिप्रपंच करतो त्यांचीं पोरें बाळपणांतच मरतात ॥५॥ नित्यशः जो दुष्टाचरण करतो त्यास डुकरासारख्या हीन योनीची प्राप्ति होते॥६॥ ज्याच्या येथें अतिथी अभ्यागत यांचा सत्कार होत नाहीं त्याचा जन्म बिळांत रहाणाऱ्या घुशीचा होतो॥७॥ म्हणून जसें कर्म करावें तसा भोग घडतो. हें वर्म जाणत्यानें समजून सावध असावें असें नामदेवराय म्हणतात ॥८॥

पापिष्टाचें जिणें काय तें जियालें । गळां स्तन झाले शेळियेचे ॥ १ ॥ येथेंचि जो खोटा तेथें तो करंटा । व्यर्थ आला पोटा माउलीच्या ॥ २ ॥ तप्त ताम्रभूमि लोळविती नरा । लोटिती अघोरा नरकामाजी ॥ ३ ॥ लोहोचंचुकाग टोंचिति येवोनि । मारिताती घणीं माथां घाव ॥ ४ ॥ बांधोनियां गळां टांगिती उफराटें । हाणतानी सोटे वरिच्यावरी ॥ ५ ॥ आसीपत्रावरी वोढिती धरोनी । लोटिती नेउनी कुंभपाकीं ॥ ६ ॥ जळातियां खांबा भेटविती बळें । खैराच्या इंगळें नाहाविती ॥ ७ ॥ प्रळय क्रूर सर्प झोंबविती कंठासी । ओढोनि जिव्हेसी खंडे करिती ॥ ८ ॥ नामा म्हणे ऐसी पापिष्टाची गती । जन्म लक्ष शतीं हेंचि फळ ॥ ९ ॥

(७२) पापी पुरुषाचें जगणें म्हणजे शेळीच्या गळयाला असलेल्या स्तनासारखें होय॥१॥ जो या लोकीं मिथ्यावादी आहे तो परलोकीं दरिद्री म्हणून समजावा. अशा मानुष्यानें आईच्या पोटीं व्यर्थजन्म घेतला ॥२॥ अशा पुरुषाला तप्त लोहामध्यें लोळवितात व अघोर कर्मभूमिमध्यें ढकलतात ॥३॥ लोखंडासारख्या चोंचीनें कावळे त्यास टोचतात आणि त्याच्या डोक्यावर सोटयानें मोठे घाव मारतात॥४॥ अशा पुरुषाला उलटें टांगतात आणि

वारंवार त्याला काठीनें मारतात॥५॥ तरवारीच्या धारेवरून त्यास ओढ-तात आणि कुंभपाकामध्यें नेऊन टाकतात ॥६॥ ज्वलंत खांबाला त्यास बळेंच बांधतात आणि खैराच्या अग्नीनें त्यास स्नान घालतात॥७॥ त्याच्या कंठाला प्रलयप्रखर विषारी साप बांधतात आणि जिव्हेला बाहेर काढून तिचे शतशः तुकडे करितात ॥८॥ पापी पुरुषाला अशी गती मिळते आणि लक्षावधी जन्मांमध्यें असेंच फळ त्यास भोगावें लागतें असें नामदेवराय म्हणतात.॥९॥

न करूं आम्हीं तैसें घेईं आतां भाक । अंतरीं निःशंक झालों सर्व ॥ १ ॥ तुम्हां आम्हां साक्षी असे सदाशिव । येथें दुजा भाव धरूं नको ॥ २ ॥ पिऊनियां पाणी न येऊं तुजपाशीं । तरी घडे आम्हांसी सर्व पापें ॥ ३ ॥ जातीचा ब्राह्मण न करी ब्रह्मकर्म । तो जैसा अधम तैसे आम्ही ॥ ४ ॥ स्वामिद्रोही आणि विश्वासघातकी । तो पडे ज्या नरकीं तेथें पडो ॥ ५ ॥ नामा म्हणे ऐसी वाहोनियां आण । धरीले चरण पारध्याचे ॥ ६ ॥

(७३) आम्ही मनानें निःशंक झालों असल्यानें आमच्याकडून अशी अन्यथा कृति होणार नाहीं. तूं आम्हाला जी शपथ घेण्यास सांगशील ती घेण्यास आम्ही तयार आहोंत॥१॥ तुमच्या आमच्या या व्यवहारास शंकर देव साक्षी आहेत. या ठिकाणी किंचितही भेदभाव करूं नको॥२॥ आम्ही पाणी पिऊन परत तुझ्यापाशीं न आलों तर वरील सर्व पातकें आम्हाला जडोत॥३॥ ब्राम्हण ज्ञातीचा असूनहि त्यांनीं आपलें ब्रम्हकर्म न केल्यास तो जसा अधम आहे तसे आम्ही होऊं ॥४॥ स्वामीचा द्रोह करणारा आणि जो विश्वास-घातकी आहे तो ज्या नरकामध्यें पडतो तें स्थळ आम्हाला मिळेल ॥५॥ त्यांनीं अशा प्रकारची शपथ घेतली आणि पारध्याचे पाय धरले असें नाम-देवराय म्हणतात ॥६॥

पारधियासी तेव्हां दाटला गहींवर । लोटलें अपार प्रेमाश्रु त्या ॥ १ ॥ जीवदान दिल्हें जावें तुम्हीं आतां । न करावी चिंता

कांहीं येथें ।। २ ।। इंद्राचा मी दूत चुकलों सेवेसी । यालागीं जन्मासी आलों जाणा ।। ३ ।। तुमचिया बोलें निवालें अंतर । घात इतःपर न करीं कांहीं ।। ४ ।। नामा म्हणे शुभकाळ त्याचा आला । म्हणवोनि झाला पश्चात्ताप ।। ५ ।।

(७४) हरणाचें असें भाषण श्रवण करितांच पारध्याला गहिंवर आला आणि त्याच्या नेत्रांतून प्रेमाश्रू वाहूं लागले ।।१।। मी तुम्हांला जीवदान दिलें आहे. तुम्ही कोणत्याही प्रकारें चिंता करूं नका।।२।। मी इंद्राचा सेवक होतो परंतु त्यांच्या सेवेमध्यें माझ्याकडून अपराध होण्यानें मला हा पारध्याचा जन्म घ्यावा लागला ।।३।। तुमच्या भाषणानें माझें मन शांत झालें आहे. मी पुनश्च अशी पातकी क्रिया करणार नाही ।।४।। पारध्याचा उदयकाल आल्यानें त्याला असा पश्चात्ताप झाला असें नामदेवराय म्हणतात. ।।५।।

सोडोनियां गळा मुक्त केलें त्यांसी । पिऊनि उदकासी आलीं पुढती ।। १ ।। क्षुधेलासी फार न लावीं उशीर । घेऊनिया शस्त्र हाणीं वेगें ।। २ ।। घर तुझें दूर वाहावेना भार । आम्हीं तेथवर येत असों ।। ३ ।। सत्यत्व देखोनि म्हणतसे पारधी । तुम्हांसी न वधीं जावें आतां ।। ४ ।। पाठोपाठीं त्याच्या घरालागीं आलीं । चरणीं घातली मिठी त्यांनी ।। ५ ।। नामा म्हणे सत्व आगळें तयांचें । वर्णावया वाचे नये शेषा ।। ६ ।।

(७५) पारध्यानें त्यांचा गळा मुक्त केला असतां तीं हरणें सहकुटुंब पाणी पिऊन पुनश्च त्याच्याजवळ आलीं ।।१।। अरे पारध्या, तूं फार भुकेला आहेस तेव्हां बाणानें आमचा त्वरित प्राण घे।।२।। कदाचित् तुझें घर फार दूर असल्यास आम्ही होऊन तुझ्या घरापर्यंत येतो।।३।। अशी ही हरणाची सत्ववृत्ति पाहून यापुढें तुमचा वध मी करणार नाहीं असें पारधी म्हणाला ।।४।। सर्वही त्याच्या मागोमाग त्याच्या घराला आलीं आणि त्याच्या पायाला त्यांनीं मिठी दिली।।५।। त्यांचें सत्व अपूर्व होतें. तें कोणालाही वर्णन करतां येणार नाहीं असें नामदेवराय म्हणतात. ।।६।।

हरिश्चंद्र राजा सत्वानिष्ठ मोठा । स्त्रीपुत्र चोहोटामाजी विकी ॥ १ ॥ तैसेंचि येथें मृगाअंगीं सत्व । वोपियेला जीव पारध्यासी ॥ २ ॥ शिबीराजा अंग कापी नेटेपाटें । सत्वासी पालट होऊं नेदी ॥ ३ ॥ ताम्रध्वजा शिरीं कर्वत घातला । नाहीं पालटला मनोधर्मा ॥ ४ ॥ नामा म्हणे मागें बहुतीं केली कीर्ति । तयां ऐसी रीति येथें दिसे ॥ ५ ॥

(७६) राजा हरिश्चंद्र हाही मोठा सत्त्वाचा होता. त्यांनीं आपल्या स्त्री-मलांची भर बाजारांत विक्री केली. ॥१॥ त्याचप्रमाणें ह्या हरणांच्या ठिकाणीं सत्व मोठें होण्यानें त्यांनीं आपला जीव पारध्याला अर्पण केला॥२॥ सत्वांतून पदच्युत न व्हावें म्हणून शिबी राजानें आपलें सर्व अंग कापून टाकलें. ॥३॥ ताम्रध्वज राजाचें मस्तक कर्वतानें कापीत असतांहि तो आपल्या सत्वांतून ढळला नाहीं ॥४॥ पूर्वीच्या थोर पुरुषांनीं अशीच कृति करून ते कीर्तिवान झाले तसाच हा प्रसंग होय असें नामदेवराय म्हणतात ॥५॥

आधींच कृपाळू भोळा महादेव । जाणितला भाव कुरंगांचा ॥ १ ॥ कृपा केली देवें मांडिला सन्मान । धाडिलें विमान दूताहातीं ॥ २ ॥ लखलखित टकें पताका डोलती । तयामाजी होती गीत नृत्य ॥ ३ ॥ नाना सुमनांची शय्या आरुवर । करिती उपचार आष्ट सिद्धि ॥ ४ ॥ आले अकस्मात तयाचियेपासी । पाहतां सर्वांसी नवल वाटे ॥ ५ ॥ दिव्य देह झाले पांचांचे ते काळीं विमानीं बैसली लागवेगें ॥ ६ ॥ पारधी देखोनी तटस्थ राहिला । दूतीं तया केला उपदेश ॥ ७ ॥ शिवरात्री आजी जागरण उपवास । केला तेणें दोष सर्व गेला ॥ ८ ॥ करोनी पारणें होई शिवभक्त । आशापाशीं चित्त गोवूं नको ॥ ९ ॥ अखंड कीर्तन शिवनामाचें

करीं । तेणें मोक्षपुरी पावसील ।। १० ।। पुढल्या शिवरात्री नेऊं कैलासासी । सांगोनियां त्यासी गेले वेगीं ।। ११ ।। नामा म्हणे मोक्ष झाला त्या पांचासी । वस्ति चंद्रापाशीं केली त्यांनीं ।। १२ ।।

(७७) कृपाळूपणा हा भोळचा शंकराचा नैसर्गिक स्वभावच होय. त्यांनीं ह्या हरणांचें प्रेम पाहिलें. ।।१।। देवरायानीं त्यांच्यावर कृपा केली व त्यांनीं दूताच्या हस्तें त्यांच्याकरितां विमान पाठविलें. ।।२।। लखलखीत प्रकाशानें युक्त अशा गरुडध्वज पताका फडकत आहेत आणि त्यामध्ये मंजुळ गायन व नृत्य होत आहे. ।।३।। भिन्न प्रकारच्या फुलानें सज्ज अशा शय्या हळूवारपणें घातल्या आहेत. अष्ट महासिद्धी सेवेस हजर आहेत. ।।४।। असें हे अमूल्य विमान हरणाजवळ आले असतां सर्वजण आश्चर्यमग्न झालीं ।।५।। त्या काळी या पांचही हरणांचें दिव्य शरीर झालें आणि ते त्वरित विमानामध्यें बसले ।।६।। हा अद्‌भुत चमत्कार पाहून पारधी मुग्ध झाला असतां दूताने त्यास उपदेश केला. ।।७।। आज शिवरात्र आहे. तूं या पवित्र दिवशीं जागरण आणि उपवास केल्यानें तुझे सर्व दोष नष्ट झाले. ।।८।। आतां तू पारणें कर. उपवास सोड आणि शिवभक्त हो. पुनश्च ह्या संसाराच्या आशेमध्यें बद्ध होऊं नकोस. ।।९।। तूं आतां सतत शिवनामाचें कीर्तन कर त्यायोगें तुला मुक्ति मिळेल. ।।१०।। अशा प्रकारें तूं कृति केली असता पुढील शिवरात्रीला तुला कैलासास घेऊन जाऊं असें त्यास अभिवचन देऊन शंकर दूत हे तेथून त्वरित निघून गेले. ।।११।। या पाचांनाही मोक्ष झाला व त्यांचें चंद्रलोकामध्यें वास्तव्य झालें असें नामदेवराय म्हणतात. ।।१२।।

तेणें उपदेशें पारध्यासी ज्ञान।करी तो कीर्तन नामघोषें।।१।। संचिताचा नाश क्रियमाण बुडविलें । त्या सहज जोडलें मोक्षसुख ।। २ ।। दुसऱ्या शिवरात्री पूजिले शंकरा । करोनियां बरा भाव शुद्ध ।। ३ ।। विमानीं वाहोनी स्वस्थानीं स्थापिला । येथूनि संपला कथाभाग ।। ४ ।। नामा म्हणे शिव विष्णु एकरूप । जाणोनियां जप करा त्यांचा ।। ५ ।।

(७८) दूताच्या ह्या उपदेशानें पारध्याला बोध झाला आणि तो कीर्तन व नामघोष करूं लागला. ॥१॥ त्यायोगें त्याच्या संचित कर्माचा नाश झाला व क्रियमाण कर्मही संपलें आणि त्यायोगें त्यास मोक्षसुखाची प्राप्ति झाली ॥२॥ पुढील शिवरात्रीस त्यानें शुद्ध प्रेमानें शंकराची पूजा केली ॥३॥ तेव्हा त्याच्याकरितां विमान पाठवून कैलासाचें अधिराज्य दिले. अशा प्रकारें ह्या शिवरात्र महात्म्य कथेची पूर्तता झाली ॥४॥ शिव व विष्णू हे एकच आहेत. त्यांच्या मध्यें अभिन्नत्व आहे असा शुद्ध भाव ठेवून त्यांचे पूजन करा, जप करा असें नामदेवराय म्हणतात. ॥५॥

शिवरात्री कथा धन्य जे ऐकती । इच्छिलें पावती सर्व कांहीं ॥ १ ॥ पातकांचा नाश पुण्य वाढे फार । शेवटीं विश्वंभर कृपा करी ॥ २ ॥ भोग भोग्य ज्ञान वाढेल संतान । काळ करी चरण सेवा त्यांची ॥ ३ ॥ नामा म्हणे शिव अक्षरें हीं दोन्हीं । जपावीं सज्जनीं वारंवार ॥ ४ ॥

(७९) शिवरात्र महात्म्य जे कोणी ऐकतील ते धन्य होत. त्यांच्या सर्व कामना पूर्ण होतील ॥१॥ त्यांच्या पातकांचा नाश होईल, पुण्याचा उत्कर्ष होईल आणि त्यांचेवर विश्वंभर हा अंतीं कृपा करील ॥२॥ त्यांना ऐहिक सौख्य, ज्ञान आणि संतति प्राप्त होईल. किंबहुना काळही त्यांची सेवा करील ॥३॥ आणि म्हणून सज्जनांनीं शिव या दोनें अक्षरांचा वारंवार जप करावा असें नामदेवराय म्हणतात.॥४॥

नामाचा महिमा कोण जाणे सीमा । चतुर्मुख ब्रह्मा नेणे कांहीं ॥ १ ॥ संसारा आलिया हेचि आहे जोडी । अखंड ध्यावी गोडी हरिनामें ॥ २ ॥ सहस्रमुखें शेष वाखाणितां कीर्ती । नाहीं तया तृप्ति आजीवरी ॥ ३ ॥ पशु पक्षी तृण कीटक अपार । नामें गेले पार उतरोनि ॥ ४ ॥ कापुराचे राशी पडे अग्निकण । तैसें नाम जाण पातकासी ॥ ५ ॥ नामाग्नीनें दोष जळती एकसरा । कैवल्या ये घरा बसल्या ठायीं ॥ ६ ॥ नामा म्हणे धन्य नामाचा प्रताप । ध्याती एकरूप देवभक्त ॥ ७ ॥

(८०) नामाचें माहात्म्य श्रेष्ठ आहे याची जाणीव चारमुखी जो ब्रम्हदेव त्यासही अगम्य आहे॥१॥ हरिनामाविषयीं प्रेम होणें हेंच जन्मास आल्याचें साफल्य होय॥२॥ शेष हा सहस्त्र मुखांनीं नामाची कीर्ति वर्णन करितो खरा परंतु अद्यापीही तो अतृप्तच आहे॥३॥ नामाच्या योगें पशु, पक्षी व कीटक यांचाही उद्धार झाला॥४॥ कापसाच्या ढिगामध्यें अग्नीची अल्पशी ठिणगी पडली तरी तो भस्म होतो. तसेंच नामाच्या योगें पातकांचे डोंगर भस्म होतात॥५॥ नामाग्नीनें सर्व दोष एकाक्षणीं भस्म होतात आणि स्वस्थानीं त्यास कैवल्यसुख मिळतें॥६॥ नामाच्या प्रतापाची धन्यता आहे. देव व भक्त हे दोघेही त्याचें ध्यान करितात, असें नामदेवराय म्हणतात॥७॥

लिंगपुराणीं हा बोलिला इतिहास । तोचि म्यां तुम्हांस निवेदिला ॥ १ ॥ अनेक पुराणीं अनेक प्रकार । तारावया नर नारी लोक ॥ २ ॥ मुख्य हेचि कथा शिवरात्रीची जाणा । कैलासींचा राणा तोष पावे ॥ ३ ॥ नामा म्हणे मन करोनि निश्चळ । करा गदारोळ नामघोष ॥ ४ ॥

(८१) हें नाममाहात्म्य लिंगपुराणामध्यें वर्णन केलें आहे. तेथें जसें लिखित केलें त्याबरहुकूम मीं तुम्हाला निवेदन केलें ॥१॥ स्त्रीपुरुषांचा उद्धार होण्याकरिता अनेक पुराणांमध्ये भिन्न भिन्न प्रकारें नाममाहात्म्य वर्णन केलें आहे. ॥२॥ येथें जी शिवरात्रीची कथा निवेदन केली आहे तीच मुख्य होय. ज्यायोगें कैलासराणा श्रीशंकर संतुष्ट होईल ॥३॥ तुम्ही आपलें मन निश्चळ करा आणि नामाचा गजर करा असें नामदेवराय म्हणतात. ॥४॥

अहो सदाशिवा । देसी भुक्ति मुक्ति भावा ॥ १ ॥ करावी ते तुझी सेवा । ऐसें घरावें या जीवा ॥ २ ॥ नामा म्हणे महादेवा । चुकवीं चौऱ्यांशींचा हेवा ॥ ३ ॥

(८२) हे सदाशिवा, तं भक्तांना त्यांच्या भावाप्रमाणें भुक्ति मुक्ति देणारा आहेस ॥१॥ तुझी सेवा घडावी असें माझ्या मनांत वाटतें ॥२॥ हे महादेवा आमची जन्ममृत्युपरंपरा नष्ट करा असें नामदेवराय म्हणतात ॥३॥

बरवें गा शंकरा नाम तुझें । हरहर बरवें गा देवा नाम तुझें ।। १ ।। गाईल्या ऐकिल्या होय वैष्णव गती ! रामनामें तरले नेणों किती ।। २ ।। ऐसा सदा आनंद राउळीं । विष्णुदास नामा पंढरपुरीं ।। ३ ।।

(८३)हे शंकरा, तुझें नाम उत्तम आहे.हे हरहरा, तुझ नाम उत्तमांत उत्तम आहे ।।१।। जो कोणी वैष्णव या नामाचें गायन अथवा श्रवण करील त्याला उत्तम गति मिळेल. रामनामाच्या योगें अगणित जीवांचा उद्धार झाला.।।२।। देवळामध्यें असा हा प्रेमानंद सदोदित आहे अशा या पंढरपूरक्षेत्रीं विष्णुदास नामदेवराय नामानंदामध्यें मग्न आहेत. ।।३।।

साठीं सहस्र विघ्नांवरी । शिवनाम पंचाक्षरी ।। १ ।। तो राजा देखेन । पर्वतु जेथें असे मल्लिकार्जुन ।। २ ।। भक्तिभावाचें अंजन । साधावया निधान ।। ३ ।। मन मारूनि देईन बळी । साधावया चंद्रमौळी ।। ४ ।। भ्रांति पाटा फिटला । शिव मार्ग देखिला ।। ५ ।। विष्णुदास नामा पायाळ भला । तेणें मलयानिळ देखिला ।। ६ ।।

(८४) शिवनामाचा पंचाक्षरी मंत्र हा साठ सहस्र विघ्नांचें निवारण करणारा महामंत्र आहे।।१।। ज्या ठिकाणीं मल्लिकार्जुन आहे असा पर्वतराज मी पाहीन ।२।। आपला ठेवा हस्तगत करण्याचें भक्तिभाव हें अंजन आहे ।।३।। हा शंकर प्रसन्न होण्याकरितां मनाला मारून त्याचा बळी देईन।।४।। भ्रांतीचा पडदा फिटल्यानें मोक्ष मार्ग स्पष्ट प्रतीत झाला. ।।५।। विष्णुदास नामा हा खरा पायाळू होय. त्यानें मलयानिळ प्रत्यक्ष पाहिला.।।६।।

सदा सोमवारीं विभूति लावुनि शिरीं । तुमच्या मंदिरीं आलाप करीं ।। १ ।। शंकर त्रिपुरारी हरि उच्चारी । म्हणती पंचाक्षरी पावें मज ।।२।। ॐनमः शिवाय हर हर जय जय । नाहीं भवभय तुझे निनामें ।। ३ ।। करिती शिवरात्री वाहाती बेलपत्री । प्रगट होऊनि गाती भक्तिभावें ।। ४ ।। बोलती सत्कीर्ति जितिलें पवित्रीं । हर हर नाम मंत्री तुज पूजिती ।। ५ ।। रुद्राक्षाच्या माळा घालूनियां गळां । तो

तुम्हां जवळा सर्वमान्य ॥ ६ ॥ शिवशंभु भोळा बहुतां पुण्यें जोडला। पावे जाश्वनीळा म्हणे नामा ॥ ७ ॥

(८५) प्रत्येक सोमवारीं मी माझ्या मस्तकास विभूति लावून तुमच्या नामाचें गायन करीन॥१॥ शंकर त्रिपुरारि हरि असा उच्चार करितात आणि हे षडाक्षरी, मला प्राप्त हो अशी विनंति करितात॥२॥ ॐनमः शिवाय, हे हर हर जय जय, अशा या तुझ्या पवित्र नामाचा उच्चार केला असतां संसाराची भीति नष्ट होते. ॥३॥ जे कोणी शिवरात्रीचें व्रत करून बिल्वपत्र शंकराला अर्पण करितात आणि भक्तिभावानें तेथें उपस्थित होऊन गायन करितात॥४॥ तुझ्या सत्कीर्तिचें (पवाडे) गातात, जे पावित्र्याचें रक्षण करून हर हर नाममंत्रानें तुझी पूजा करितात॥५॥ जे कोणी रुद्राक्षांच्या माळा गळ्यांत घालतात ते तुमच्या नित्य संनिध असतात व सर्वमान्य होतात॥६॥ पुष्कळशा पुण्यानें भोळा शिव शंकर प्राप्त झाला हे शंकरा मजवर प्रसन्न हो असें नामदेवराय म्हणतात. ॥७॥

श्री विठ्ठल महात्म्य

निर्गुणींचें वैभव आलें भक्तिमिषें । तें हे विठ्ठलवेषें ठसावलें ॥ १ ॥ बरविया बरवें पाहतां नित्य नवें । हृदयीं ध्यातां निवे त्रिविधताप ॥ २ ॥ चोविसांवेगळें सहस्रां आगळें । निर्गुणा निराळे शुद्धबुद्ध ॥ ३ ॥ वेदां मौन पडे श्रुतीसी कानडे । वर्णितां कुवाडें पुराणासी ॥ ४ ॥ भावाचे आळुक भुलले भक्तिसुखें । दिधलें पुंडलीकें साधूनियां ॥ ५ ॥ नामा म्हणे आम्हा अनाथां लागूनि । निडारले नयनीं वाट पाहें ॥ ६ ॥

(८६) निर्गुण साम्राज्याचें ऐश्वर्यच भक्तीच्या निमित्तानें विठ्ठलरायाच्या आकारानें स्थित झालें॥१॥ सौंदर्यांत सौन्दर्य पहात असतांही सगुण स्वरूप मूर्ती जशी काय नित्यनूतन अशी असून तिच्या दर्शनानें, तिच्या ध्यानानें त्रिविध ताप निवृत्त होतात॥२॥ जी सगुणमूर्ती चोवीस तत्त्वांहून अलग असून सहस्र नामांहून वेगळी आहे किंबहुना ही मूर्ती निर्गुण स्वरूपाहून

विशेष अशी शुद्ध बुद्ध आहे।।३ ज्या मूर्तीचें वर्णन करितांना वेद मुग्ध होतो, व जे श्रुतीला अगम्य आहे या मूर्तीचें वर्णन करितांना पुराणालाहि कोडें पडते।।४।। जे भक्तीसुखाला भुलले जाणारे असून प्रेमाकरता भुकेलेले आहे अशी ही मूर्ती पुंडलीकरायांनीं आपल्या प्रेमप्रभावानें प्राप्त करून दिली. ।।५।। ही मूर्ती आम्हा अनाथाकडे डोळे भरून पहात आहे असें नामदेवराय म्हणतात.।।६।।

निर्विकल्प निराकारू । निःशून्य निराधारू । निर्गुण अपरंपारू । चिदानंद सांवळें ।। १ ।। तया पुंडलिकासाठीं । येऊनि उभें वाळवंटीं । दोन्हीं कर ठेवूनि कटीं । प्रसन्न दृष्टि पहातसे ।। २ ।। म्हणऊनि उठा ध्यारे वाट । ठाका पंढरी वैकुंठ । येर वाउगे काय रे कष्ट । ब्रह्मीं भेट पंढरीये ।। ३ ।। मूळग्राम मायापूर । पडिले भूत ग्रामाचार । म्हणऊनि कर जघनावर । उभा राहुनि दावितसे ।।४।। विठ्ठलनाम हृदयीं धरा । हाचि उतार पैलतीरा । मग नाहीं येरझारा । शंभू कुमार सांगतसे ।। ५ ।। भेटी चौवे मुरडले । अठरा धांवतां भागले । पंथीं साहि भांडले । ते अद्यापि बुझले नाहीं ।।६।। जो सहस्रामाजीं न दिसे । चोविसांत न भासे । दो सहस्र अनारिसे पाहतां अरे न दिसेचि ।। ७ ।। लयलक्ष लावूनि समाधि । योगियां हेचि उपाधि । उघडा डोळा प्रेमपदीं । रे विठोजी न्याहाळा ।। ८ ।। येर वाउगि खटपट । ठाका पंढरी वाळवंट । हरूनि मनुष्यपण दृष्ट । चतुर्भुज करील ।।९।। जना ऐहिक पाहारे हित । हें पंढरीचें कुळदैवत । येर वाउगे खेचर भूत । रे रंगित चित्रींचें ।। १० ।। पूर्वज उद्धरावयाचि चाड । तरी वेणुनादीं जेवण करा गोड । कोटीकुळें उद्धरती पुरवाडू । तुम्ही रे पावाल कैवल्य ।। ११ ।। धन्य धन्य तो संसारी । जेणें देखिली पंढरी । जेणें सप्रेम होऊनि महाद्वारीं । लोटांगण घातलें

॥ १२ ॥ केलें चंद्रभागे स्नान । आणि संतचरणीं दर्शन । नाम घोषें निवे मन । समाधान जीवासी ॥ १३ ॥ पंढरी हें वैकुंठभुवन ॥ म्हणऊनि करी कारे दरूशन । मग नाहीं आया गमन । रे सुरगण वंदिती ॥ १४ ॥ भुक्ति मुक्तिचा दातारू । तो हा ओळंगा सारंगधरु । नामया स्वामीचा दातारू । रुक्मादेवीवरू पंढरीये ॥ १५ ॥

(८७) जें निर्विकल्प-कल्पनेला अविषय, आकाररहित, शून्यरहित, आधाररहित, गुणरहित अमर्याद चिदानंदरूप असून सांवळें आहे॥१॥ अशी ही सर्वांगसुंदर मूर्ती दोन्ही कटींवर हात ठेवून पुंडलिकाकरितां वाळवंटावर तिष्ठत उभी राहून प्रसन्न मुद्रेनें पहात आहे॥२॥ आणि म्हणून तयार व्हा आणि चालू लागा व वैकुंठपेठ गाठा. उघडें परब्रह्म हें पंढरीक्षेत्री भेटत असल्यानें इतर साधनाचे काबाडकष्ट कां करितां? ॥३॥ मायापूर, ही याची जन्मभूमी होय. तेथून पंचभूतांची उत्पत्ति झाली आणि म्हणून हा देवराय आपले हात जघनावर ठेवून उभा राहून मार्गदर्शन करीत आहे॥४॥ विठ्ठलनाम हेंच पैलतीराला पोहोचविणारें असल्यानें तें हृदयीं धारण करा म्हणजे तुम्हाला जन्ममृत्यूच्या चक्रांत यावें लागणार नाहीं असे शंकराचा पुत्र जो गणेश तो सांगत आहे॥५॥ ज्याच्या भेटीकरितां गेलेले चारी वेद हे तेथून मागें परतले. अठरा पुराणांनीं केलेल्या धावपळीनें तें थकून गेले. सहा शास्त्रानें आपल्यामध्यें केलेल्या वितंडवादानें त्यांच्यामध्यें अद्याप समझोता झाला नाहीं ॥६॥ हजारामध्येंही त्याचा प्रत्यय होत नाहीं. चोवीस तत्त्वांमध्यें जो दिसत नाहीं. दोन सहस्राहून वेगळें पहातांही ज्याचा प्रत्यय होत नाहीं ॥७॥ योगीजन त्या परमात्म्याला पहाण्याकरितां लक्ष व समाधी लावतात खरे परंतु ही त्यांची कृति उपाधिरूप आहे–अडगळ आहे. आमचा विठ्ठलराय हा प्रेमाच्या योगानें उघडया डोळयांना दिसतो.॥८॥ इतर साधनांचा असहकार करून पंढरीच्या वाळवंटावर जा म्हणजे तुमचा देहभाव-मनुष्यपणा पालटून प्रत्यक्ष चतुर्भुज देवस्वरूप व्हाल॥९॥ पांडुरंगराय हे खरोखर कुलदैवत होय तद्‌भिन्न देवता ह्या चित्रांतील रंगील अशा खेचर भूतें-चित्रासारखे होय आणि म्हणून अहो जनहो, तुम्ही आपलें खरें हित कशांत आहे याचा शोध

या॥१०॥ तुमच्या पूर्वजांचा उद्धार व्हावा अशी तुमची प्रकट इच्छा असल्यास वेणूनादीं जाऊन मीष्टान्नाचें भोजन करा त्यायोगें तुमच्या कोटयावधी कुळांचा उद्धार होईल, व कल्याण होऊन मोक्षास प्राप्त व्हाल॥११॥ ज्यांनीं प्रत्यक्ष पंढरी पाहिली व प्रेमानें महाद्वारांत जाऊन साष्टांग नमन केलें त्यांचा जन्म सफल होय. ते या संसारामध्यें धन्य धन्य होत॥१२॥ चंद्रभागेचें स्नान, संतचरणाचें दर्शन आणि नामोच्चार केला असतां जीवाच्या मनाला समाधान होतें॥१३॥ पंढरीक्षेत्र हें प्रत्यक्ष वैकुंठ होय म्हणून त्याचे दर्शन करा म्हणजे तुम्ही जन्ममृत्यूंतून मुक्त व्हाल व देवतादिक हीं तुमचें वंदन करतील॥१४॥ सारंगधर हा भुक्ती व मुक्ती देणारा, व जो पंढरीनिवासी आणि रुक्मीणीचा वर हा नामदेवरायाचा दाता आहे ॥१५॥

अनिर्वाच्य ब्रह्म निगम म्हणती । शिणले वेदांतीं अठरा साही ॥ १॥ तें हें पुंडलिकें चोहाटा उभें केलें । भावें भुलविलें पंढरीये ॥ २ ॥ घ्यारे घ्यारे तुम्ही कैवल्याचें पीक । देतो पुंडलिक सकल जीवां ॥ ३ ॥ उपनिषदांचें मथितार्थ जें साराचें यथार्थ । तो हा पंढरीनाथ प्रगट जगीं ॥ ४ ॥ हरिहर विरंची त्रिमूर्ती हाची । माउली दीनांची लोभापर ॥ ५ ॥ जो श्रवणांचा श्रवण नयनांचा नयन । ज्ञानाचा दर्पण दृष्ट होय ॥ ६ ॥ आदिमध्यें अंतीं व्यापक सर्वांभूतीं तो हा झाला व्यक्ति भक्तिभावें ॥ ७ ॥ सद चित्तदा आनंदघन परिपूर्ण । कारणे महाकारण प्रभा हेचि ॥ ८ ॥ चित्ता चेतविता बुद्धीतें पाळिता । मनादि चाळितां इंद्रियासी ॥ ९ ॥ तो या चराचरीं जीवलग सोईरा । म्हणोनि अनुसरा पांडुरंगा ॥१०॥ नामा म्हणे काया वाचा मनें त्याचें । नाम जपा कैचें जन्ममरण ॥११॥

(८८) हे अनिर्वाच्य आहे असें वेदप्रतिपादन करितो आणि ज्याचे वर्णन करण्यास प्रवृत्त झालेले अठरा पुराणे व सहा शास्त्रे ही स्थंगीत झालीत॥१॥ अशा या ब्रह्म वस्तुला पुंडलीकरायानीं प्रेमानें भूलवून चौरस्त्यावर उभे

केलें।।२।। जें कैवल्याचें पीक उफळून आलें आहे. त्याचे वाटप पुंडलीकराय सर्व जीवांना करित आहेत त्याचा तुम्हीं आदरानें स्वीकार करा।।३।।जो उपनिषदांचा मथितार्थ आणि सारांत सार असा हा पंढरीनाथ तो सर्व विश्वांत असा प्रगट आहे।।४।। सुप्रसिद्ध त्रयमूर्ती जी ब्रम्हा, विष्णु, महेश या रूपानें हाच उपलब्ध झाला असून दुःखीतांची तर प्रेमळमाता होय।।५।। जो श्रवणाचे श्रवण व जो डोळ्याचा डोळा असून ज्ञानाचा हा आरसाच होय।।६।।जो आदि मध्य व अंतीं स्थित असून सर्व भूतामध्यें व्यापक आहे तोच प्रेमभक्तीनें साकार रूपानें व्यक्त झाला।।७।। जो सत्, चिद् व आनंदरूप आणि परिपूर्ण असा असून कारण व महाकारण आणि प्रकाशरूपानें हाच आहे।।८।। चित्ताला चेतविणारा, बुद्धीचे पालन करणारा, मनेंद्रियाला चालना देणारा हाच होय ।।९।। चराचरांचा सखा मित्र हाच असल्यानें तुम्हीं या पांडुरंगरायांना शरण जा ।।१०।। तुम्ही काया वाणी आणि मनानें या देवरायाचा नामोच्चार करा म्हणजे तुम्हाला जन्ममृत्यूची दरकार रहाणार नाहीं असें नामदेवराय म्हणतात. ।।११।।

ज्ञानियांचें ज्ञेय ध्यानियांचें ध्येय । पुंडलिकाचें प्रिय सुखवस्तु ।। १ ।। तें हें समचरण उभें विटेवरी । पहा भीमातीरीं विठ्ठलरूप ।। २ ।। जें तपस्वियांचें तप जें जपकाचें जाप्य । योगियांचें गोप्य परम धाम ।।। ३ ।। जें तेजकांचें तेज जें गुरुमंत्राचें गुज । जें पूजकांचें पूज्य कुळदैवत ।। ४ ।। जें जीवनातें जीवविते पवनातें नित्रवीतें । जें भक्तांचें उगवितें मायाजाळ ।। ५ ।। नामा म्हणे तें सुखचीं आयतें ।। जोडलें पुंडलिकातें भाग्ययोगें ।। ६ ।।

(८९.) पुंडलीकरायाची जी सुखरूप वस्तु तीच ज्ञानींयाचें ज्ञेय आणि ध्येयनिष्ठांचें ध्येय होय ।। १ ।। तेच विठ्ठलरूप भिमेकाठीं सन्मुख असलेल्या विटेवर समचरणानें उभें आहे, त्यास डोळे भरून पहा ।।२।। तेंच तपनिष्ठांचे तप आणि जपी पुरुषाचें जाप्य तसेंच योगी पुरुषाचें गुप्त असे परमधाम श्रेष्ठ स्थळ होय।।३।।प्रकाशाचा प्रकाश,गुरुमंत्राचें गुह्य व पुजाऱ्याचें पूज्य असे कुळ-

दैवत होय।।४।।जें जलाला तृप्त करणारें,वायूला शांत करणारेंआणि जें भक्तांना मायाजाळांतून मुक्त करणारें ।।५।। अशी ही परम सुखरूप वस्तु ती पुंड-लिकरायांना मोठ्या भाग्यानें प्राप्त झाली असें नामदेवराय म्हणतात ।।६।।

वेदासी अगोचर परब्रह्म कारण । योगिया हृदयींचें ममत्व निर्वाण । आकाळूं न कळेचि शेखीं धरियेलें मौन । तें रूप पंढरिये विटे समचरण।।१।।कानडा विठ्ठल घो उभा भिवरे तीरीं।भक्तांचें आर्तवो जीवा लागलें भारी ।। धृ० ।। भूवैकुंठ पंढरी हे देवें रचियली पैगा । शिर्वे ती वंदियेली विठो समचरणांची गंगा । सदाचा नामघोषु कलिमल जाय भंगा । काय वानूं सुख ,तेथिंचें भेटलिया पांडुरंगा ।। २ ।। विठ्ठल नाम वाचे जना हाचि उपचारू । म्हणवूनि दावी तुझे कटीं ठेवूनियां करू । येरासी मायानदी काम क्रोध मगरू । ठेवा हा नामयाचा स्वामी विठ्ठलविरू ।। ३ ।।

(९०) जें जगाला कारण व वेदाशीं अगोचर असें परब्रम्ह जे योगी पुरुषाच्या हृदयांतील आनंद प्रेमळ ठेवाजें कळण्याला अगम्य व ज्यांनीं शेवटीं मौन धारण केलें असें हें रूप पंढरीमध्यें समचरणानें उभे राहिलेलें आहे ।।१।। हा कानडा विठ्ठल भिवरेच्या तिरीं-कांठीं उभा असून त्याच्या संबंधीचें अमर्याद प्रेम भक्ताला जडलें आहे ।। धृ. ।। देवरायानें ही पंढरी मृत्युलोकांत स्थापन केली. विठ्ठलरायाच्या समचरणापासुन उत्पन्न झालेली गंगा ती शंकरानें मस्तकीं धारण केली. तेथील नामाच्या घोषणेनें सर्व पापें नष्ट होतात. तेथील पूज्य दैवत जो पंडुरंगराय त्याची भेट झाली असतां होणाऱ्या अनुपम्य सुखाचें वर्णन अनिर्वाच्य होय ।।२।। जनाला स्वोद्धार होण्याकरितां विठ्ठल नामोच्चार हेंच मुख्य साधन होय म्हणून त्यांनीं कटी-वर हात ठेवून मार्गदर्शन केलें. इतरांना मात्र मायानदी आणि त्यांतील काम क्रोध मगरीप्रमाणें होय. शूरस्वामी विठ्ठलराय हा नामदेवरायाचा 'निज ठेवा होय ।।३।।

वेडावली वाचा वेदाची बोलतां । देवा पाहूं जातां अनि-र्वाच्य ॥ १ ॥ अनिर्वाच्य वाचा बोलावया गेली । जिव्हा हे चिरली भूधराची ॥ २ ॥ भूधराची जिव्हा झालिसे कुंठित । नामा म्हणे अंत नलगे त्याचा ॥ ३ ॥

(९१) देवरायाचें स्वरूप अनिर्वाच्य होण्यानें त्याचें वर्णन करण्या-करितां प्रवृत्त झालेला वेद त्याची वाणी वेडावली-मुग्ध झाली ॥१॥ अनिर्वाच्य जी परमात्म वस्तु त्याचें वर्णन वाणीनें करण्यास प्रवृत्त झालेला शेष त्याची वाचा दुभंगली गेली ॥२॥ विठ्ठलरायाचा शोध न लागल्यानें शेषाची वाणी मुग्ध झाली असें नामदेवराय म्हणतात ॥३॥

हवा हवा म्हणतांती श्रुति । परि त्या नेणती भुललीया ॥१॥ तुझिया रूपा नेणती अगा कमळापती । तुज बाळ म्हणती गौळि-यांचें ॥ २ ॥ विष्णुदास नामयानें दावियेल्या खुणा । पंढरीचा राणा श्री विठ्ठल ॥ ३ ॥

(९२) हा देवराय हवा असें श्रुती म्हणते खरी परंतु त्यांना तो ज्ञात न होण्यानें त्या वेड्या झाल्या ॥१॥ हे कमलापती, तुमच्या स्वरुपाला योग्य प्रकारें न जाणल्यानें जनता हे तुला गवळीयाचा पुत्र म्हणतात ॥२॥ पंढरीचा राजा जो विठ्ठलराय यांचे मर्म मात्र नामदेवरायानीं दाखविलें॥३॥

पुष्पासी परिमळु दुध घृत मेळु । ऊंस तो रसाळु बीज नाहीं ॥ १ ॥ तैसें परब्रह्म आहे तें निर्वाण । वार्णीतां पुराण न पडे ठायीं ॥ २ ॥ दीपाचीही दीप्ति दर्पणाची कांति । तैसी ब्रह्ममति कवण जाणे ॥३॥ नामा म्हणे जैसें सर्वां घटीं आकाश । केशव परमहंस तैसा जाणे ॥ ४ ॥

(९३) फुलाच्या ठायीं सुगंधी किंवा दुधामध्यें तुप असावें किंवा उसाच्या ठिकाणीं मधुरता आहे खरी पण त्याला बीज नसतें ॥१॥ तद्वत् परमात्म वस्तूचें स्वरूप निर्वाण होण्यानें तें पुराणाला वर्णन करण्यास अगम्य

आहे ।।२।। प्रकाशाचा प्रकाश, आरश्यामध्यें तेज तसा हा परमात्मा होण्यानें त्याला कोण जाणील बरें ।।३।। आकाश हें जसें सर्व घटांमध्यें व्याप्त आहे तसा हा परमहंस केशवराय व्यापक आहे असें नामदेवराय म्हणतात ।।४।।

निर्गुण सगुण नाहीं ज्या आकार । होऊनि साकार तोचि ठेला ।।१।। जळीं जळगार दिसे जैशा परी । तैसा निराकारी साकार हा ।।२।। सुवर्ण कीं घन घन कीं सुवर्ण । निर्गुणी सगुण ययापरी ।।३।। ऐसा पूर्णपणें सहजीं सहज । सखा केशिराज प्रगटला ।।४।। पांडुरंगीं अंगें सर्व झालें जग । निववी सर्वांग नामा म्हणे ।। ५।।

(९४) ज्याच्या ठिकाणीं निर्गुण, सगुण आणि आकार नाहीं तोंच साकार रूपानें उपलब्ध झाला ।।१।। जलापासून जसा बर्फ होतो तद्वत् निराकार जो पांडुरंगराय तो साकार झाला ।।२।। सुवर्ण असो कीं घन असो घन असो की सुवर्ण असो ही दोन्हीं साम्य आहेत. तद्वत् निर्गुण आणि सगुण ही एकच आहेत ।।३।। प्रियकर केशीराज हा अशा प्रकारे सहज उपलब्ध झाला ।।४।। सर्व जग हें पांडुरंगाच्या अंगानें उपलब्ध झाले असून तो सर्वांगाला शांत करितो असें नामदेवराय म्हणतात ।। ५ ।।

आपणची कर्ता आपणची मित्र । आपण सर्वत्र हरी झाला ।। १ ।। साधन साधितां हरि दिसे पूर्ण । प्रपंच हे भान न देखें डोळां ।।२।। किमर्थ हे टवाळ मायामोहजाळ । वांयांच पाल्हाळ कोरडे करा ।। ३ ।। नामा म्हणे सखोल विठ्ठल पूर्ण बोल । उच्चारितां मोल नलगे कांहीं ।। ४ ।।

(९५) कर्ता असो कीं मित्र असो या सर्व रूपानें तो स्वतः प्रगट झाला ।।१।। साधन करीत असतां हरी हा पूर्ण रूपानें प्रतीत होतो त्या ठिकाणीं प्रपंचाचें भान डोळ्याला होत नाहीं ।।२।। त्या ठिकाणीं मिथ्या, माया मोहादिकांचा कचरा कसा संभवेल ? आणि म्हणून हा व्यर्थ पसारा नष्ट करा ।।३।। विठ्ठलाचें सखोल असें पूर्ण बोल उच्चारण्याकरितां कांहींच किंमत लागत नांहीं असें नामदेवराय म्हणतात ।। ४ ।।

एक तत्त्व एकाकार सर्वदेशीं । एक तो नेमेसी सकळ जनीं ॥ १ ॥ ऐसें ब्रह्म पहा आहे सर्व एक । नलगे विवेक करणें कांहीं ॥ २ ॥ मिथ्या हे डंबर माया मथितार्थ । हरि हाचि स्वार्थ वेगीं करीं ॥ ३ ॥ नामा म्हणे समर्थ बोलिला तो वेद । नाहीं भेदाभेद ब्रह्मपणीं ॥ ४ ॥

(९६) एकच तत्त्व एकाकार रुपानें सर्वत्र उपलब्ध असून तोच एकटा या सर्व जगाचें नियमन करितो ॥ १ ॥ अशा ऐक्य रूपानें असलेल्या ब्रम्हा प्रतिती घ्या. यापेक्षां विशेष विवेक करण्याची आवश्यकता नाहीं ॥ २ ॥ मायादिक प्रपंच पसारा हा मिथ्या आहे व हरि हा सत्य आहे म्हणून त्यास आत्मसात् करा ॥ ३ ॥ ब्रम्हस्वरुपी भेदाभेदाचें अस्तित्व नाहीं असें सर्व समर्थ वेदाचें प्रामाण्य आहे ॥ ४ ॥

ज्ञान सत्य मुक्त शुद्ध बुद्ध युक्त । कारण रहित निरंजन ॥१॥ तें आम्ही देखिलें चर्मचक्षु दृष्टी । उभा वाळवंटी पंढरीये ॥ २ ॥ वेदां अगोचर तयां सहस्रमुखा । तें झालें पुंडलिका लोभापर ॥ ३ ॥ परतल्या श्रुति म्हणती नेती नेती : आम्हां गातां गीती सांपडलें ॥४॥ स्वरूपाचा निर्धार बोलती पुराणें । शिणली दरूशनें वेवादती ॥ ५ ॥ नामा म्हणे यांसी भावची कारण । पावावया चरण केशवाचे ॥ ६ ॥

(९७) ज्ञान, सत्य, मुक्त, शुद्ध, बुद्ध या रुपानें वस्तु असून तीच कारणरहित अशी शुद्ध आहे ॥ १ ॥ अशा प्रकारचा पांडुरंग हा वाळवंटावर उभा असलेला आम्ही प्रत्यक्ष पाहिला ॥ २ ॥ जो वेदाला अगम्य आणि ज्याचे वर्णन करीत असतां शेषास हजार मुखें झालीं असें जें सर्वांगसुंदर स्वरुप तें पुंडलीकरायाच्या प्रेमास्तव त्यांच्या सन्मूख उभें राहिले ॥ ३ ॥ त्याला पहाण्याकरितां प्रवृत्त झालेल्या श्रुत्या त्या नेति नेति म्हणून पाठमोऱ्या झाल्या खऱ्या परंतु आम्हाला मात्र तो गीत गात हस्तगत झाला ॥४॥

स्वरुपाचा विचार करीत असतां पुराणें हीं थकीत झालीं आणि शास्त्रें हींही वादविवाद करितांना थकलीं. केशवाच्या चरणाची प्राप्ती होण्याकरितां केशवप्रेम हें समर्थ आहे असें नामदेवराय म्हणतात ॥५॥

ब्रह्मीं ब्रह्म एक मुळीं नाहीं जग । सर्व माया योग कल्प जाणा॥१॥ स्थावर जंगम सर्व मायोपाधि।जाण पा त्रिशुद्धी आत्मज्ञानें ॥२॥ रविच्या किरणें जैसें मृगनीर। तैसे ब्रह्मी कीर विश्व झालें॥३॥ नामा म्हणे याची ऐका निज खूण । स्वरूपीं तल्लिन होऊनि राहें ॥ ४ ॥

(९८) विश्व हे स्वरुपतः झालेच नसून केवळ एकच ब्रम्ह ब्रम्हरूपानें स्फुरत आहे. हें सर्व दृश्य पदार्थ मायाकृत आहेत ॥ १ ॥ स्थावर जंगमादिक हे सर्व पदार्थ मायाकृत मिथ्या आहेत, असें आत्मज्ञानानें निश्चय करून प्रतिति करून घ्या ॥ २ ॥ सूर्यकिरणावर ज्याप्रमाणें मृगजळाचा भास होतो त्याप्रमाणें ब्रम्ह वस्तूवर मिथ्या जगभास प्रतीत होतो ॥ ३ ॥ असे याचें निजवर्म जाणून त्या स्वरुपाच्या ठिकाणी समरस होऊन रहा असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

वंदावें तें काय निंदावें तें काय। सर्वांठायीं मोहे हें कोंदाटलें॥१॥ आहे कवणाठायी नाहीं कवणाठायीं । ठायींच्या पैं ठायीं कोंदाटलें॥२। रविरश्मीचे तेज सर्वांठायीं असे । त्यापरि अनायासें बुजतु जाय ॥३॥ भाव तोचि ब्रम्ह ब्रम्हतेचि कर्म । जाणोनिया वर्म म्हणे नामा ॥४॥

(९९) स्वरुप हें सर्वत्र व्याप्त होण्यानें तेथें कोणी कोणाची निंदा व स्तुति करावी ॥ १ ॥ वस्तु ही सर्वत्र व्याप्त होण्यानें ती कोणत्या ठिकाणीं आहे व ती कोणत्या ठिकाणीं नाहीं असें म्हणावें बरें ? ॥२॥ सूर्यकिरणें हीं जशीं सर्वत्र पूर्ण व्याप्त आहे; तद्वत परमात्म वस्तूही सर्वत्र आविष्कृत झालेली आहे अशी प्रतिती करून घ्या ॥ ३ ॥ ब्रम्ह हेंच प्रेम आणि कर्मरूपानें आविष्कृत झालें आहे, असें हें वर्म प्रतीत करून घ्या असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

हात पाय सर्व मिळोनिया मेळा । चला पाहूं डोळा म्हणताती ॥१॥ 'देखणें तें नव्हे 'देखतील कैसें । देखणाची असे सर्व डोळा ॥ २ ॥

चंचु भूत अंश अंशांत मिळाली । निर्गुणाची खोली देवजाणे ॥ ३ ॥
नामा म्हणे तेव्हां तुज पाहों आला । पाहोनि तो ठेला सर्वांभूतीं ॥४॥

(१००) हस्तपादादिक सर्व अवयवे ही एकवटून श्रीकृष्णास डोळे करून पाहूं या चला असे म्हणूं लागली ॥ १ ॥ परंतु ज्यांना पहाण्याचे सामर्थ्य नाहीं अशीं हस्तपादादिक कर्मेंद्रियें तीं श्रीकृष्णाचें स्वरुप कशीं पाहूं शकतील ? डोळे हेच पहाण्याला समर्थ होत ॥ २ ॥ म्हणून तीं सर्व कर्मेंद्रियें सूक्ष्म अंशरुप होऊन नेत्रांत गोळा झालीं, परंतु निर्गुण स्वरुपाचा अंत कोणाला ज्ञात होणार? एक देवच जाणें ॥ ३ ॥ हे देवराया, तुला पहाण्याकरितां प्रवृत्त झालेला इंद्रियांचा समूह 'तूं सर्वत्र व्याप्त आहेस' असें पाहून तटस्थ राहिला असें नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥'

चिंतनिका:—' अडोळीया डोळा ' अशी ही वस्तु होण्यानें तीं इंद्रियांना कशी विषय होणार ? आणि जीव हा ईश्वरांश होण्यानें त्यांत तो समरस होण्यानें निर्गुण तत्वच अवशिष्ट असणार ! तेव्हां तो कोणाला विषय होणार !

' ऐसी या निरुपा परी । आपुलीये विलासवरी ।
आत्मा राणीव करी । आपुले ठायीं ॥ २६८-७५ अनुभ.

देख देख देख पैल पैल । पैल उभा असे विटेवरी ॥ १ ॥
खोळे बुंथीचा आकारू झळके पीतांबरु । सौभाग्य सुंदर विठ्ठलदेव ॥२॥
दान दीक्षा गुरू नामया दातारू । धरावया नागरू केशिराज ॥ ३ ॥

(१०१) पहा पहा पहा थोडे पलीकडे पहा तर खरे तो पांडुरंगराय हा विटेवर उभा आहे ॥ १ ॥ ज्याच्या अंगावर पितांबर झळकत आहे व त्यायोगें हा विठ्ठल देवराय सौभाग्य रुपानें सुंदर प्रतीत होत आहे ॥ २ ॥ चतुर अशा केशवरायाची प्रतिती होण्याकरितां दान दीक्षा देण्यांत तत्पर असे नामदेवरायाचे गुरु आहेत ॥ ३ ॥

काष्ठी अग्नी असे प्रगटे नयनीं । काष्ठींही असोनी वेगळाची ॥ १ ॥
तैसें निर्धारितां असे:पै सकळां । दावितां निराळा पांडुरंग ॥ २ ॥

तरू बीजीं जैसें सर्व व्यापक असे। जळाविण नसे फळ पाहा कीं ।।३।।
नामा म्हणे बीज नासिलें तें भोग। तूंचि पांडुरंग आम्हांसाठीं ।। ४ ।।

(१०२) काष्ठगत अग्नी आहे खरा परंतु तो घर्षण केले असतां डोळ्यांना स्पष्ट दिसतो तो अग्नी काष्ठांत असून काष्टाहून वेगळा आहे।। १।। तद्वत् पांडुरंगरायाचा निश्चय करीत असतां तो सर्वांना प्रतीत होत असतांही सर्वांहून निराळा आहे ।। २ ।। वृक्ष हा जसा बियांत संपूर्ण रुपानें आहे. जळाशिवाय फळाचें अस्तित्व असतें काय ? ।। ३ ।। बीजभाव नष्ट होऊन तो वृक्ष रुपानें आकाराला येतें. तद्वत् हे पांडुरंगराया तूंच निराकार असताही आमच्यासाठीं साकाराला येतोस असें नामदेवराय म्हणतात।। ४ ।।

वैकुंठी पाहें तंव चतुर्भुज दिसे। परि सुंदर रूप तेथें नाहीं ।। १ ।।
क्षीरसागरीं पाहें तों तेथें निद्रिस्थ। परि सुंदर रूप तेथें नाहीं ।।२ ।।
द्वारके पाहें तव पाताळीं चरण। परि सुंदर रूप तेथें नाहीं।। ३ ।।
हृदयीं पाहें तंव अव्यक्तचि दिसे। परि सुंदर रूप तेथें नाहीं ।।४।।
नामा म्हणे ऐसा सर्वगुण संपूर्ण। पंढरीये उभा शोभतसे ।। ५ ।।

(१०३) वैकुंठात चतुर्भुज मूर्ति दिसते खरी परंतु तेथील मूर्ति तुझ्या सारखी सौन्दर्ययुक्त नाहीं ।। १ ।। क्षीरसागरामध्यें देवराय आहेत खरे परंतु ते तेथें झोपलेले आहेत परंतु ती मूर्ती तुझ्यासारखी सुंदर नाहीं ।। २ ।। द्वारकेमध्यें देवराय आहेत खरे परंतु तेथील त्यांच्या चरणानें पाताळामध्यें प्रवेश केला आहे आणि म्हणून तुझ्यासारखें तें स्वरुप नाहीं ।। ३ ।। हृदया-मध्यें देवराय आहे खरा परंतु तो अव्यक्त आहे म्हणून तो देव तुझ्यासारखा सुंदर नाहीं ।। ४ ।। अशाप्रकारें सर्वांगसुंदररूप देवराय हे पंढरपुरामध्ये शोभा देत आहेत असें नामदेवराय म्हणतात ।। ५ ।।

निर्गुण सगुण नव्हे तें समान। तैसे तेंही जाण योगाभ्यासीं ।।१।।
प्रल्हादासी हरि शंख चक्र गदा। सगुण गोविंदा शोभतसे ।। २.।।
अर्जुनासी देव उभा पाचारासी। सद्‌या उद्धवासी साक्ष दावी ।।३।।
नामा म्हणे माझा केशिराज भोळा। दाविसी गोपाळां बाळलीला।।४।।

(१०४) सगुण आणि निर्गुण हीं परमात्म्याचीं स्वरूपें अशी साम्यरूप, नाहींत तद्वत योगाभ्यासी समजावे ।।१।। हा हरी प्रल्हादाकरितां शंख, चक्र गदा धारण करणारा असा सर्वांगसुंदर शोभायमान रूपानें अभिव्यक्त झाला ।।२।। हा देवराय अर्जुनाकरितां रथावर उभा राहिला आणि प्रियकर जो उद्धव त्यास यांनीं प्रत्यक्ष दर्शन दिलें ।।३।। केशीराज हा माझा भोळा आहे व तो गोपाळासी बाळक्रिडा करीत आहे असें नामदेवराय म्हणतात ।।४।।

धन्य गोकुळ महीतळीं मंडळ । सुखावलें ब्रम्ह जेथें झालें सगुण।।१।।
कां ग न कळे आवडी त्याचा भाव। सुख नेलें रे गोवळी म्हणती देव।।२।।
आले वैकुंठ भुवनी विकृति । ते हे पाहावी गोकुळीची विश्रांति ।।३।।
योगियांचे ध्यानीं उबगलें । ते गौळियांचे अनुरागीं रंगलें ।। ४ ।।
वेद श्रुतीसी पारू न कळे । कोण सुख सर्वांहुनि आगळें ।। ५ ।।
नामयाचा स्वामी आमुचें कुलदैवत । शरण जाऊनि गौळिया मागूं उचित ।। ६ ।।

(१०५) या भूतलावर उभारलेलें गोकुळ धन्य होय. ज्या ठिकाणीं प्रत्यक्ष ब्रम्ह हें आनंदानें सगुण रुपानें अवतीर्ण झालें ।।१।। या गौळीयानें सर्व सुख हरण केलें असें देव म्हणतात त्याच्या प्रेमाचा भाव आपणांस कां ज्ञात होत नाहीं ? ।।२।। वैकुंठाहून आलेलें हें विष्णु स्वरुप तो गोकुळाचें विश्रांति स्थळ झालें असल्यानें त्याला तेथें पहावे ।।३।। योग्याच्या ध्यानाला उबगलेलें कृष्ण स्वरूप तें गौळीयाच्या प्रेमानें रंगून गेलें ।।४।। वेदश्रुतीला ज्याचा अंत लागत नाहीं, व ज्याच्या सुखाहून दुसरें अधिक सुख नाहीं ।।५।। असा हा श्रीकृष्ण तो नामदेवरायाचें कुलदैवत आहे. गौळीयांना शरण जाऊन त्याच्या प्राप्तीची योग्य मागणी करूं ।। ६ ।।

उपाधि निर्मळ शोभती चरण । नागबंद पूर्ण मध्यभागीं ।। १ ।।
कदंबावरती चढे वनमाळी । शोभती निढळी उर्ध्वपुंड ।। २ ।।
श्रवणीं कुंडलें शोभती नक्षत्र । श्रीमुख पवित्र दिसों येत ।। ३ ।।
नामा म्हणे मज ढांपवेना डोळे । करुणा कल्लोळें देखोनियां ।। ४ ।।

(१०६) श्रीकृष्णाचें उपाधिरहित चरणकमल शोभत होते. त्याच्या कमरेस नागबंध–म्हणजे नागाचें मुख असलेला करगोटा शोभत होता ।।१।। त्याच्या कपाळावर वरल्या भागी पुंड्र म्हणजे टिळे शोभत होते; कानामध्यें नक्षत्रासारखी कुंडलें शोभत होतीं आणि त्याचें शोभायमान मुख मोठें पवित्र दिसत होतें असा तो वनमाळी कदंब वृक्षावर चढला होता ।।२–३।। तेव्हां त्या दयाघन प्रभूस पाहून माझे डोळे निश्चल राहिले. त्याची उघडझांप थांबली असें नामदेवराय म्हणतात.

पाठभेद–उपाधि-उदधि-उपापि; नागबंध--नागबिंदू

चिंतनिका--उपापि--पूर्वकाळीं ॐ अशा आकाराचा लिहिला जात असे. ॐकाराचे चिंतन केलें असतां नादध्वनी हृदयांतून निर्माण होतो. म्हणून नागबंद याच्या ऐवजी नादबिंदू असा पाठ आहे.

यमुने पाबळी देखियेली मूर्ति । तळपती दीप्ति तेजोमय ।। १।।
सांवळें सुंदर ओंकार वर्तुळ । मध्यें घननीळ पाचारितो ।। २ ।। सुरंग
ओतिली प्रेमतनु छाया । तेणें तुझी माया. काय वानूं ।। ३ ।।
नामा म्हणे विठो चातुर्य करुणा । गुणागुणी किरणा प्रभा दिसे ।। ४ ।।

(१०७) प्रकाशानें युक्त अशा तेजानें तळपणाऱ्या मूर्तीस आम्ही यमुनेच्या तीरावर पाहिली ।। १ ।। जी सांवली सुंदर असून ॐकार चिन्हयुक्त गोल आहे आणि मध्यवर्ती घननीळ असून ती बोलवित आहे ।। २ ।। ज्याची प्रेम तनु छाया ही सौन्दर्यानें आविष्कारलेली आहे अशा या तुझ्या मायेचें वर्णन कसें करावें ? ।। ३ ।। विठ्ठलराय हे करुणास्वरूप व चातुर्ययुक्त आहेत. ज्याची प्रभा गुणागुणी या किरणरूपानें उपलब्ध झाली आहे असें नामदेवराय म्हणतात ।। ४ ।।

विटेवरी समचरण सुंदर । बाळ सकुमार यशोदेचें ।। १ ।।
वाळेवाकीं गर्जती तोडर चरणीं । नाद झणझणी वाजताती ।। २ ।।
देवाचिया कांसे कसियेला पीत पीतांबर । लोपला दिनकर तेणें प्रभा।। ३।।
नामा म्हणे नाहीं तुझ्या रूपा पार । तेथें मी किंकर काय वानूं ।।४।।

(१०८) विटेवर समचरण ठेऊन उभे असलेले (ते) यशोदेचे गोंडस असें सुंदर बाळ होय ॥ १ ॥ ज्याच्या पायामध्यें वाळे, वांकी, तोडर, असून त्याचा झणझण असा मंजूळ आवाज होत आहे ॥२॥ या देवरायाच्या कमरेला पितांबर कसलेला असून त्याच्या तेजानें सूर्य हा लुप्त होतो ॥३॥ हें देवराया तुझे स्वरूप अमर्यादित होण्यानें तेथें माझ्या सारख्या दासानें तुझें वर्णन कसें करावे ? असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

कमळ गर्भा मनी थोर चिंता करी । पद्म ठसेवरी उमटताती ॥१॥
नीलोत्पल जैसे चरण वानूं कैसें । सकुमार राजस विठ्ठलाचे ॥२॥
लावण्य सागरु रूप पाहो ठेली । दृष्टी पै खुंटली रुक्मिणीची ॥३॥
नामा म्हणे विठोचे चरण सकुमार । तेथें वाहे धार गंगादेवी ॥४॥

(१०९) ब्रह्मदेव हा आपल्या मनांत चिन्ता करीत आहे कीं ज्याचे ठसे पद्माकार उमटतात ॥१॥ ज्याचे पाय कमळासारखे आहेत अशा सुकुमार राजस विठ्ठलाचे वर्णन कसे करावे ? ॥२॥ ज्याच्या लावण्य अशा सुंदर स्वरुपाच्या दर्शनाकरितां प्रवृत्त झालेल्या रुक्मिणीची दृष्टिहि कुंठित होते ॥३॥ विठ्ठलरायाचे पाय हे सुंदर असून तेथून गंगा वहात आहे, असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

काळा गे दादुला पाहतां आकळु । तो झाला गोवळू नंदाचा गे ॥१॥
काळा गे दादुला काळा गे दादुला । पंढरी पहा चला विठ्ठला गे ॥२॥
काळा म्हणोनी पाहों गेलों जवळां । सुनीळु सांवळा दिसतसे ॥३॥
नामा म्हणे सर्व भक्षितो हा काळु । भक्तांचा कृपाळु श्री विठ्ठलु ।४

(११०) ज्या शुद्ध दादुल्याचा शोध घेतां जो अगम्य आहे असा हा गोकुळामध्यें यशोदेचा नंद म्हणून गोळीया झाला ॥१॥ हा दादुला काळागे-शुद्ध असा आहे. असे द्विरुक्तीनें सांगतो अशा विठ्ठलरायास पंढरीला पाहूं या ॥२॥ हा काळा-शुद्ध कसा आहे. हे जवळून पहाण्यास गेलो असतां जणूं काय तो सांवळा सुनिळ असा दिसूं लागला ॥३॥ हा विठ्ठलराय सर्वांचा भक्षण करणारा असा काळ आहे खरा परन्तु भक्तांना कृपाळू पणानें रक्षण करणारा आहे असे नामदेवराय म्हणतात.

सहस्त्र दळांत आकाशाच्या परी । राहोनी शरीरी शोभा दावी ।१
तेंचि नटे थाटे उभा विटेवरी । कर कटावरीं ठेऊनियां ॥२॥
जयाचिये नाभी जन्मला विधाता । तेथोनी वाढता लोक झाला ३
श्रुतींचिये वाचे नोहे गोचर । जेथें अवतार तिही देवा ॥४॥
नामा म्हणे विश्वंभरू आणिक । अंगुळ दशक आहे जें कां ॥५॥

(१११) हा सहस्त्रदलांत राहून आकाशाप्रमाणें शरिराला शोभा देत आहे ॥१॥ थाटमाटाने कटिवर हात ठेवून विटेवर उभा राहिला आहे ॥२॥ ब्रह्मदेवानें ज्याच्या नाभीं कमळांतून जन्म घेतला. तेथून अखिल विश्वाची उत्पत्ती झाली ॥३॥ जो श्रुतीच्या वाणीला आगोचर असून तेथून तिन्ही देवतांची निर्मिती झाली ॥४॥ आणि जो सर्व विश्वांत व्यापून दशांगुळें शेष राहिला आहे. असे नामदेवराय म्हणतात ॥५॥

परब्रह्म मूर्ति सांवळे सगुण । पंढरी निधान वाळुवंटीं ॥१॥
आनंद अमृत वोळला दरुशनें । तुटेल बंधन हेळामात्रें ॥२॥
नामा म्हणे राहो[1] नामीं सदामन । उभा नारायण भेटी पुरे ॥३॥

(११२) पंढरीतील परब्रह्ममूर्ति ही सांवली आणि सगुण असून तो वाळवंटींचा ठेवा होय ॥१॥ याच्या केवळ दर्शनानें आनंद रूपी अमृताचा वर्षाव होऊन सर्व बंधनें नष्ट होतात ॥२॥ ज्याच्या उभ्या उभ्या भेटीमध्यें समाधान होतें अशाच्या नामामध्यें मन नित्य रमो असें नामदेवराय म्हणतात ॥३॥

१ :— पा. भे. नको.

कस्तुरी कुंकुम् रेखे लाल टिळा । केशराची उटि सर्वांगासी ॥१॥
पाहिला पाहिला माझा पांडुरंग । जीवीं जिवलग डोळे भरी ॥२॥
हार शोभे गळां मंजुरीचा तुरा । कर्ण रत्नकिळा झळाळित ॥३॥
विटेवरी नीट गोमटी पाउलें । त्यावरी ठेविलें मस्तक म्यां ॥४॥
नामयाची धणी भुकेली ते धाली । आनंद दिवाळी आजि झाली ।५।

(११३) ज्याच्या कपाळाला कुंकवाचा लाल टिळा असून सर्वांगाला चंदनाची उटा लावलेली आहे ॥१॥ अशा या माझ्या जिवलग पांडुरंगाला डोळे भरून पाहिला ॥२॥ तुळशीच्या मंजुरीचा हार ज्याच्या गळ्याला शोभा देत आहे, कानामध्यें हिऱ्याची कुंडलें प्रकाश देत आहेत, ॥३॥ विटेवर उभे असलेल्या सुंदर पायावर मी माझे मस्तक विनम्र भावानें ठेविलें ॥४॥ देवरायाच्या भेटी करितां नामयाला लागलेली खमंग भूक ती त्यांच्या दर्शनानें तृप्त होण्यानें आजचि दिवाळी खरोखर आनंदाची झाली ॥५॥

सुखांचें हें सुख श्रीहरि मुख । पाहतांही भूक ताहान गेली ॥१॥
भेटली भेटली विठाई माउली । वासना निवाली जिवांतील ॥२॥
चंद्रासी चकोर मेघासी मयूर । वाटे तैसा भर आनंदाचा ॥३॥
नामा म्हणे पाप आणि ताप दुःख । गेलें झालें सुख बोलवेना ॥४

(११४) श्रीहरिचे मुख पहातां वास्तविक सुखाचे सुख असून त्याच्या दर्शनांत माझी तहान भूक हरपून गेली ॥१॥ माझी विठाई माऊली भेटल्यानें माझ्या अंतःकरणातील सर्व वासना निवृत्त झाल्या ॥२॥ जसा चकोराला चंद्र किंवा मयुराला मेघ प्रिय असतो तद्वत माझ्या आनंदाच्या आविष्करणाला विठुलराय होय ॥३॥ याच्या दर्शनाने माझ्या पापतापाचा नाश होऊन अनिर्वाच्य सुखाची मला प्राप्ती झाली असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

शांति भीमातीरीं भक्ति पंढरपुरीं । प्रेम विटेवरी देखियलें ॥१॥
देखिला गे माये देखिला गे माये । देखिला गे माय पंढरीये ॥२॥
नाम रूपातीत नित्य सदोदित । जेथें विरे चित्त योगियांचे ॥३॥
दुरी ना जवळी त्रिपुटी वेगळा । केशव भेटला- नामा म्हणे ॥४॥

(११५) श्री क्षेत्र भिमेचा किनारा म्हणजे जणूं काय शांति असून पंढरपूर क्षेत्र म्हणजे भक्तीचे स्वरूप होय आणि उज्वल प्रेमाचा प्रत्यय विटेवर होतो ॥१॥ असा हा पांडुरंगराय मी पंढरपुरास पाहिला असे त्रिवार सांगतो ॥२॥ जो नामरूपातीत असा नित्य अखंड असून जेथें योगी याचे चित्त समरस होते ॥३॥ जो दूर अथवा जवळ नाहीं आणि जो त्रिपुटी विरहीत आहे असा या केशवरायांनीं मला भेट दिली असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

योगियांचें ब्रह्म शुन्य व्योमाकार । आमुचे साकार बिटेवरी ॥१॥
दाटुगें नागर कटीं ठेऊनि कर । सर्वस्वें उदार भक्तां लागी ॥२॥
ज्ञानीया सिद्धांती लक्षा परी नये । आमुची वाट पाहे अनाथाची ३
पुंडलिंका भावें वोळलें वोरसें । नेणों काय कैसें प्रेम त्याचें ॥४॥
जाप्यकाचें जाप्य नाम मंत्रमय । आमुचें भक्ती प्रिय संसारीं कां ५
नामा म्हणे जीवें करीन ओवाळणी । झणी चक्रपाणी दिठावसी ३

(११६) योगीयाचे ध्येय जे ब्रम्ह ते आकाशासारखें शून्य होय मात्र आमचा पांडुरंगराय विटेवर साकार रूपानें उभा आहे ॥ १ ॥ कमरेवर ज्याचे हात असून तो सर्वांग सुंदर आहे आणि भक्ताकरितां सर्वस्वी उदार आहे ॥ २ ॥ ज्ञानी व सिद्धांती यांना तो अविषय आहे खरा परंतु हा पांडुरंगराय कृपाळू होण्यानें आम्हां दीनांची तो वाट पहात आहे ॥ ३ ॥ जो पुंडलीकराच्या प्रेमाने आकर्षित झाला त्याच्या प्रेमाविषयीं आम्ही अनभिज्ञ आहोत ॥ ४ ॥ जपी पुरुषाचा जप हा मंत्रमय होय परंतु आम्हां संसारीयांना हा भक्तिप्रिय होय ॥ ५ ॥ अशा या चक्रपाणी याला दृष्ट लागेल म्हणून त्याच्यावरून मी माझ्या जीवभावाची ओवाळणी करीन असे नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

चाळक माझें मन पांगुळ पैं झालें । साक्षात्कारें मन हारपोनी गेलें १
मन हारपलें करूं आतां काय । पहावया गेलें तंव परतोनी कांही नये २
भक्ति ज्ञान वैराग्य नोहे । अवघेंचि आहे अवघें तो आहे ॥३॥ नामा
म्हणे जनाबाई आहे वो कैसा । बाबा उदकीं घट वुडोनी ठेला जैसा ४

टिप.– पंढरी ज्ञानिया ध्यानां लक्षा नये । आम्हां बाट पाहे अनाथांची ॥१॥ जपकांचे जाप्य नानामंत्र मय । आम्हां भक्ति प्रिय भावें सांरी ॥२॥ पुंडलिकासाठी बोळला वोरसें । नेणों काय कैसे प्रेम त्याचें ॥३॥ नामा म्हणे जीवें करूं निंबलोण । झणीं नारायणा दिठावसी ॥४॥

(११७) माझे मन चंचल खरे परंतु ते पांडुरंगरायाच्या दर्शनानें निश्चळ झाले इतकेच नव्हे तर त्याच्या साक्षात्कारानें मनाचा मनपणा नष्ट

झाला ॥ १ ॥ माझ्या मनाचा मनपणा निवृत्त होण्याने आतां मी काय करावे बरे ? मी त्याला पाहण्याकरितां गेले खरे परंतु तेथून कांहीं मी परत आले नाहीं, अर्थात त्याच्याशीं रुपरस झाले ॥ २ ॥ ज्या ठिकाणीं भक्ती ज्ञान आणि वैराग्यादि साधनें शेष राहिली नाहींत किंतु सर्व कांहीं तोंच अविष्कृत झाला आहे ॥ ३ ॥ हे जनें, असा हा पांडुरंग कसा आहे बरें ? असा प्रश्न नामदेवरायांनी केला असतां, अहो बाबा, जसा पाण्यामध्यें घट बुडवावा तसाच हा प्रकार आहे असे जनाबाई म्हणते ॥ ४ ॥

केशवाच्या नामीं लागलेसें ध्यान । देखे त्रिभुवन तदाकार ॥१॥
जया तया म्हणे माझा चक्रपाणी । जाय लोटांगणीं सर्व भावें ॥२
प्रेम ओसंडत नामाचेनि छंदे । हृदय प्रेमानंदें वोसंडत ॥३॥
धांवूनि येऊनि चरणा जवळीं । वंदी पायधुळी सर्व भावें ॥४॥
घनःशाम मूर्ति सुंदर सांवळी । ध्यान हृदय कमळी नित्य राहो ५
भाग्यवंत नामा भक्तां शिरोमणी । अखंड उन्मनी भोगितसे ॥६॥

(११८) मनाला केशवरायाच्या नामाचा वेध लागल्यानें ते तद्रुप झाले आणि त्या मनाला अखिल त्रिभुवन पांडुरंगमय दिसूं लागले ॥ १ ॥ आतां तो ज्याला त्याला माझा पांडुरंगरायच आहे असे समजूं लागला आणि त्याला तो साष्टांग दंडवत घालूं लागला ॥ २ ॥ नामाच्या छंदानें प्रेम उफळूं लागले आणि अंतःकरणाला प्रेमानंदाचें भरतें आले ॥ ३ ॥ पांडुरंगरायाच्या पायाजवळ धांवत धांवत जाऊन प्रेमानें त्याच्या चरणाची धूळ मस्तकी धारण केली ॥ ४ ॥ मेघश्याम अशा सांवळया सुंदर मूर्तिचे ध्यान हृदयकमळामध्यें नित्य वसो ॥ ५ ॥ हा भाग्यवंत नामा भक्तांमध्यें श्रेष्ठ असून तो नित्यशा उन्मनी सुखाचा अनुभव घेतो ॥ ६ ॥

वेणू वाहूनि चित्त दुहिलें । रूप देऊनि मज मनें मोहियलें ॥१॥
वेणु वेधकू गोपाळु लाघवी । जीवा लावियेली आवडी नित्य नवी २
दृष्टीपुढें माझें ध्यान ठेवियलें । वृत्ति सहित मन तेथें माझें गोंविलें ३
शुद्ध शामकमळदळ लोचन । पावा वाजवितसे देहुडा रुणझुणु ।४

तया प्रभा दिसती दिशा निर्मळ । कृष्ण पाहतां मन झालें व्याकुळ ।५
नामया स्वामीचें अनुपम्य रूपडें । पाहतां मन फिरलें माघारें ॥६॥

(११९) वेणूच्या मजूळ ध्वनीनें माझे चित्त आकर्षित केले आणि ह्या विठ्ठलरायानें आपल्या रूपानें माझे मन मोहित केले ॥ १ ॥ हा गोपाळ प्रेमळ असून तो वेध लावणारा असा आहे माझ्या जिवाला त्याचें प्रेम नित्य नुतन असे लागले आहे ॥ २ ॥ दृष्टी पुढील मूर्तिकडे ध्यान ठेवल्यानें माझे मन तेथें रंगून गेले ॥ ३ ॥ ज्याचें नेत्र हे निळ्या कमळाच्या पाकळी प्रमाणें असून तो दिडक्या पायावर उभा राहून पावा वाजवित आहे ॥ ४ ॥ कृष्णाला पाहतांच माझें मन व्याकूळ झाले व त्याच्या प्रकाशानें सर्व दिशा उजाळल्या गेल्या ॥ ५ ॥ नामदेवरायाच्या स्वामीचें स्वरूप अनुपम्य असे असून त्याला पहातांच माझ्या मनानें माघार घेतली ॥ ६ ॥

जीव विठ्ठल आत्मा विठ्ठल । परमात्मा विठ्ठल विठ्ठल ॥१॥
जनक विठ्ठल जननी विठ्ठल । सोयरा विठ्ठल सांगाती ॥२॥
अहिक्य विठ्ठल परत्र विठ्ठल । निरंतर विठ्ठल तारीता ॥३॥
नाम विठ्ठल रूप विठ्ठल । पतित पावन विठ्ठल विठ्ठल नामा ॥४॥

(१२०) जीव हा विठ्ठल होय विठ्ठल हा आत्मा असून परमात्मा हा तर विठ्ठल, विठ्ठल स्वरूप होय ॥ १ ॥ विठ्ठल हा माझा पिता असून माता ही विठ्ठल होय. प्रियकर विठ्ठल हा माझा सहचारी होय ॥ २ ॥ इहलोक अथवा परलोक रुपानें हा विठ्ठलच होय. हा विठ्ठराय सतत रक्षण करणारा होय ॥ ३ ॥ नामरुपानें हाच विठ्ठल होय. विठ्ठराय हा पतित पावन रूपानें असून तोच विठ्ठल नामा होय ॥ ४ ॥.

तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल । देव विठ्ठल देवपूजा विठ्ठल ॥१॥
माता विठ्ठल पिता विठ्ठल । बंधु विठ्ठल गोत्र विठ्ठल ॥२॥
गुरु विठ्ठल गुरुदेवता विठ्ठल । निधान विठ्ठल निरंतर विठ्ठल ॥३॥
नामा म्हणे मज विठ्ठल सांपडला । म्हणोनी कळिकाळां पाड नाहीं ।४

(१२१) विठ्ठलराय हाच आमचें तीर्थ क्षेत्र असून देव व देवपूजा ही विठ्ठलच आहे ॥ १ ॥ माता व पिता ह्या रुपानें हाच विठठलराय असून बंधु व गोत्र रूपानेंही हाच विठठल आहे ॥ २ ॥ विठठलराय हाच गुरु व गुरुदेवता असून आमुचा नित्य ठेवा विठठलराय होय ॥ ३ ॥ विठठलराय आमच्या हस्तगत होण्यानें आतां आम्हास कळी काळाची भिती नाहीं असे नामदेवराय म्हणतात ॥ ४ ॥

माता पिता बंधु भगिनी इष्ट मित्र विठ्ठला तूं रे ॥ धृ ॥ बापा यावे भेटावें विसांवा माझा गा तूं । माझा कुळाचार माहेर रे जिव्हार विठ्ठला तूं ॥१॥ माझें विद्याधन आयुष्य आरोग्यता विठ्ठला तूं गा । माझें तप व्रत तीर्थ दान पुण्य विठोबा तूं गा ॥२॥ माझा गुरु मंत्र दैवत आगम निगम विठ्ठला तूं गा । भूपति सुर पति ब्रह्म मूर्ति विठोबा तूं गा ॥३॥ माझा आचार विचार सत्यवाद धीर धर्म विठोबा तूं गा । यशकीर्ति निवृत्ति आतां माझी तृप्ति विठोबा तूं गा ॥४॥ माझे यम नियम प्राणायाम प्रत्याहार विठोबा तूं गा । नामा म्हणे विठोबा केशव परमात्मा माझा तूं गा ॥५॥

(१२२) हे विठ्ठलराया तूंच आमची आई, बाप, बहिण आणि इष्टमित्र होय. हे बापा विठ्ठलराया तूंच आमुचें विश्रांती स्थळ होण्यानें धांवत ये व भेट दे. हे विठ्ठलराया तूंच आमचें कुलाचार आणि माहेरचें असे जिव्हाळ्याचें स्थान होय ॥ १ ॥ हे विठ्ठलराया तूंच माझें विद्याधन, आयुष्य, आरोग्य आहेस. हे विठ्ठलराया तूंच आमचें तप, व्रत, तीर्थ, दान आणि पुण्य होय ॥ २ ॥ हे विठ्ठलराया तूंच आमचा गुरु मंत्र दैवत, आत्मनिश्चय (शास्त्र व वेद) आहेस. हे विठठलराया तूंच आमुचा भूपती-राजा, इंद्र व ब्रम्हमूर्ति आहेस ॥३॥ हे विठ्ठलराया आमचा आचार, विचार, सत्य भाषण, धीर, धर्म तूंच आहेस हे विठ्ठलराया तूंच माझे यश, कीर्ती निवृत्ती आणि शांती आहेस ॥ ४ ॥ हे विठ्ठलराया, यम, नियम, प्राणायाम आणि प्रत्यहार हि तूंच आहेस. हे विठ्ठलराया केशव परमात्मा रुपानें तूंच आहेस असे नामदेवराय म्हणतात ॥ ५ ॥

बरवे पणें बरवा बाप मदनाचा । तो स्वामि आमुचा पंढरीराव ॥१॥ उदारपणें उदार दाता त्रैलोक्याचा । तो स्वामि आमुचा पंढरिराव ॥२॥ झुंझार आणि शूर अरी त्या दैत्यांचा । तो स्वामि आमुचा पंढरिराव ॥३॥ चतुरपणें चतुर बाप ब्रह्मयाचा । तो स्वामि आमुचा पंढरिराव ॥४॥ पवित्रपणें पवित्र उद्धार तीर्थांचा । तो स्वामि आमुचा पंढरिराव ॥५॥ नामा म्हणे आधार सकळां जीवांचा । तो स्वामि आमुचा पंढरिराव ॥६॥

(१२३) मदनाचा बाप हा उत्तमोत्तम असून तोंच आमचा स्वामी पंढरीराय होय ॥ १ ॥ तो औदार्यानें श्रेष्ठ असून त्रैलोक्यांचा दाता आहे. तोंच आमचा स्वामी पंढरीराय होय । २ ॥ तो शूर असून लढवय्या आहे आणि दैत्याचा शत्रु आहे असा हा ब्रम्हदेवाचा बाप असून तोच स्वामी आमचा पंढरीराय आहे ॥ ३ ॥ जो चातुर्यामध्यें तज्ञ आणि ब्रम्हदेवाचा बाप असा हा पंढरीचा राजा आमचा स्वामी आहे ॥ ४ ॥ तिर्थांना पावन करणारा असा पवित्रोत्तम असून तोंच पंढरीराय हा आमचा स्वामी आहे ॥ ५ ॥ जों सर्व जीवांना आधार असा पंढरीराय तों आमचा स्वामी आहे असे नामदेवराय म्हणतात ॥ ६ ॥

दीनाची माउली । आजि म्यां देखिली ॥१॥
कटीं ठेवुनियां कर । उभी राहे विटेवर ॥२॥
मुगुट रत्नांचा साजिरा । वरी मोतियांचा तुरा ॥३॥
रूप लावण्य गोजिरें । हृदयीं पदक साजिरें ॥४॥
कासे पिवळा पीतांबर । चरणीं ब्रिदाचा तोडर ॥५॥
भक्तां कृपेची सावली । नामा वंदी पायधुळीं ॥६॥

(१२४) दुःखिताची जी माता तिला मी आज डोळेभरून पाहिले ॥१॥ जी कमरेवर हात ठेऊन विटेवर उभी राहिली आहे ॥२॥ ज्याला मोत्याचा तुरा आहे असा रत्नाचा मुकूट ज्याच्या मस्तकी शोभा देत आहे ॥३॥ पिवळा पितांबर ज्यांनी आपल्या कमरेला कसलेला आहे,

.ज्याच्या पायामध्यें ब्रिदाचा तोडा आहे ।।४।। ज्याचें लावण्य रूप हे सौंदर्य-युक्त असून छातीवर पदक शोभा देत आहे ।।५।। जो भक्तांना कृपेची छाया आहे अशा देवरायाच्या चरणाच्या धुळीचें वंदन नामदेवराय करितात ।।६।।

आषाढी कार्तिकी हेचि आम्हां सुगी । शोभा पांडुरंगीं घनवट ।।१
संतांचीं दर्शने हेंचि पीक जाण । देतां आलिंगन देह निवे ।।२।।
देह निवे किती नवल सांगावें । जीवासी दुणावें ब्रह्मानंद ।।३।।
नामा म्हणे यासी मूळ पांडुरंग । त्याचेनि अव्यंग सुख आम्हां ।४

(१२५) आषाढी कार्तीकी यात्रा ही भक्तांना हंगामाचें दिवस होत. आशावेळीं पांडुरंगराय हें सौंदर्यांने पूर्ण अविष्कारले जातात ।।१।। संतांचें दर्शन हेच आमचें सोळा आणे पीक होय. त्यांना अलिंगन देण्यात अंतःकरण (देह) समाधानाला प्राप्त होते ।।२।। अंतःकरण शांत होते यांत विशेष काय नवल आहे ? जिवाच्या ठिकाणी ब्रम्हानंदाचा विकास होतो ।।३।। पांडुरंगराय हेच याला कारण होण्याने निर्दोष सुखाची आम्हाला प्राप्ती होते असे नामदेवराय म्हणतात ।।४।।

आवडे जें जीवा तें पंढरिये उभें । पुंडलिके लोभें राहविलें ।।१।
जोडूनिया पाऊलें ठेवियेलीं विटे । कर द्वय गोमटें कटावरीं ।।२।।
कान मुख डोळे न म्हणती पुरे । सेवितां न पुरे धणी मना ।।३।।
गोड लागे पोट न भरे न धाय । भुकेलीच राहे भूक सदा ।।४।।
नामा म्हणे संत संगती विश्वास । घेऊं अनुभवास फार फार ।।५।।

(१२६) ज्यांची आम्हाला आवड आहे तेंच पुंडलीकरायाच्या प्रेमाने पंढरी क्षेत्रीं विटेवर उभे राहिले आहेत ।।१।। जो विटेवर आपले दोन्हीं पाय जोडून उभा आहे आणि कटीवर ज्यांनीं आपले दोन्हीं सुंदर हात ठेविले आहेत ।।२।। त्याच्या दर्शना विषयी कान, मुख व डोळें हे तर अतृप्त रहातातच किंबहुना याचा सुखरसाचा स्वाद घेतांना त्याची भूक शांत होत नाहीं ।।३।। याच्या दर्शनानें प्रेमाचा अविष्कार होतो खरा परंतु पोट भरून तृप्ती मात्र होत नाहीं ।।४।। सत्संगती विषयी माझा ठाम विश्वास होण्यानें त्याची प्रतिती घेऊं असे नामदेवराय म्हणतात ।।५।।

जया लागीं हृदय उले । तें म्यां जीवेंसि धरिलें ॥१॥
विठ्ठलाची पाऊलें । म्यां मस्तकीं वाहिलीं ॥२॥
नामा म्हणे मुनि रंगले । तें म्यां जीवेसीं धरिले ॥३॥

(१२७) ज्याच्या करिता अंत:करण दुभंगले जातें त्याला मी पूर्णपणें हृदयांत सांठविले ॥१॥ या विठ्ठलरायाचे दोन्हीं पाय मी माझ्या मस्तकी धारण केलें ॥२॥ मुनीजन हे ज्याच्या प्रेमामध्यें समरस होतात त्यास्वरूपाला मी माझ्या अंत:करणांत स्थित केले असे नामदेवराय म्हणतात ॥३॥

आमुचा विठ्ठल प्रचंड । इतरा देवांचे न पाहूं तोंड ॥१॥
एका विठ्ठला वांचून । न करूं आणिक भजन ॥२॥
आम्हां एक विध भाव । कदा न म्हणूं इतरां देव ॥३॥
नित्य करूं हा अभ्यास । म्हणे नामा विष्णुदास ॥४॥

(१२८) आमचा विट्ठलराय हाच श्रेष्ठ होण्यानें इतर देवाचें आम्ही तोंड पहाणार नाही ॥१॥ एका विट्ठलराया वांचून इतराचें आम्ही भजन करणार नाही ॥२॥ असा आमचा ज्वलंत एकविध भाव होण्यानें इतरांना आम्ही कधी देव समजणार नाहीं ॥३॥ असा हा आम्हीं एक विधतेचा नित्यशा अभ्यास करूं असे विष्णुदास नामदेवराय म्हणतात ॥४॥

भजूं एका विठोबास । आणिक न करूं अभ्यास ॥१॥
येथें साधन आहे एक । पाहों विठोबाचें मुख ॥२॥
वर्णूं हरीचे पवाडे । काळे लावूं देश धडे ॥३॥
नामा विष्णुदास म्हणे । ऐसे करूं हरी कीर्तन ॥४॥

(१२९) आम्ही इतर अभ्यासाकडे दुर्लक्ष करून फक्त विठ्ठलरायाचेच भजन करूं ॥१॥ विठ्ठलरायाचें मुखदर्शन घेणें हेंच येथें मुख्य साधन होय ॥२॥ विठ्ठलरायाच्या गुणवर्णनानें आम्हीं काळाला हद्दपार करूं ॥३॥ अशा या शुद्ध प्रेमानें हरिकिर्तन करूं असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

जीव प्राणें एक विठ्ठलचि व्हावा । ऐसिया मी भावा रातलिया १
आवडे पंढरी आवडे चंद्रभागा । येती यमुना गंगा प्रतिदिनीं ॥२॥

आवडे पद्मतीर्थ आवडे गरुडपार । राउळीं माहेर पांडुरंग ॥३॥
नामा म्हणे अहा विठाई रुक्माई । आणिका पाशीं नाहीं चित्त माझें ४

(१३०) विठ्ठलराय हाच एकजीव भावानें प्रिय व्हावा अशा शुद्ध भावनेनें त्यासी संलग्न झालो ॥१॥ मला एका पंढरीक्षेत्राचें प्रेम असून एका चंद्रभागेचीच आवड आहे. ज्या ठिकाणीं यमुना गंगा दररोज-भेट घेण्यास येतात ॥२॥ पद्म तिर्थाबद्दल लळा असून गरुडपारावर माझें अत्यंत प्रेम आहे आणि माझें माहेर हे देवळांत रहाणारे पांडुरंगराय होय ॥३॥ विठ्ठलराय व रुक्मीणीमाता ही कितीतरी आल्हादकारक आहेत बरें! त्यांच्या ठिकाणीं माझें चित्त समरस होण्यानें इतर ठिकाणीं रममाण होत नाहीं असे नामदेवराय म्हणतात ॥४॥

न पाहें गे माय विठाईविण डोळां । सर्वस्वें कंटाळा आणिकांचा ।१
विठोबाविण कांहीं नायकें मी कानीं । जडली चरणीं चित्तवृत्ती २
आणिकांचे मार्गीं न चालोत पाय । जीव वोढे सये पांडुरंग ॥३॥
नामा म्हणे करीं आणिकांची पूजा । न करीं गरुडध्वजा वांचूनिया ४

(१३१) हे माय. विठ्ठलरायाशिवाय इतरांना डोळ्यांनीं पहावें अशी भावना होत नाहीं. कारण इतरांना पाहण्याचा अति कंटाळा वाटतो ॥१॥ माझी चित्तवृत्ति विठ्ठल चरणीं समरस होण्यानें कानानें त्याचें गुणमहात्म्य श्रवण करण्याविषयींच मला आवड आहे. इतरांविषयी नावड आहे ॥२॥ पांडुरंगरायाकडे चित्त आकर्षित झल्यानें आणिकाकडे जाण्यास पाय पंगु होतात ॥३॥ गरुडध्वज पांडुरंगरायाशिवाय इतरांचा पूजा करण्यास हात पंगु होतात. असेंच व्यसन जडलें आहे, असें नामदेवराय म्हणतात ॥४॥

विठ्ठल कानडे बोलूं जाणें । त्याची भाषा पुंडलिक नेणें ॥१॥
युगें अठ्ठावीस झालीं । दोघां नाहीं बोला बोली ॥२॥
कर ठेवूनि कटावरीं । उभा भिवरेच्या तिरीं ॥३॥
नामा म्हणे स्वामी माझा । उभा भक्तांचिया काजा ॥४॥

(१५२) विठ्ठलराय हे कानडी भाषेत बोलतात खरे. परंतु ती भाषा पुंडलीकरायांना अवगत नाहीं ।।१।। पुंडलीकराय व विठ्ठलराय हे अठ्ठावीस युगें संमुख उभे असतांहि अद्यार दोघांमध्यें संवाद झाला नाहीं ।।२।। हा विठ्ठलराय कटीवर हात ठेऊन भिवरेच्या कांठीं विटेवर उभा राहिला आहे ।।३।। हा माझा स्वामी भक्तांच्या कार्यार्थ उभा राहिला आहे. असें नामदेवराय म्हणतात ।।४।।

मान तोडावया कर शस्त्रांचें । कठिण बहुतांचें उभारिले ।।१।। तरी न वदे न वदे जाण । आन कांहीं या विठोबा वांचून ।।२।। विठोबा परते दैवत आहे म्हणती । ऐसें श्रुती स्मृती जरी बोलती।।३।। तरी ते अपशब्द कानीं पडों न द्यावें । पाखंडी म्हणती उगेंचि असावें ।४ ब्रह्म देवेसी जालिया भेटी । तोहि जरी वदेल ऐसिया गोष्टी ।५ या विठोबा परतें दैवत म्हणेल सृष्टी । चळला पोटीं निभ्रांत जाणा ६ कोटी कोटी ब्रह्मांडे एक एक रोमीं । व्यापूनियां व्योमीं वर्ततसे ७ तो हा माझा विठोबा सर्वां घटीं सम । न सांडावें वर्म म्हणे नामा ।८

(१३३) जरी एखाद्यानें तीक्ष्ण शस्त्रें हातांत घेऊन माझी मान तोडण्यास तयार झाला ।।१।। तरी मी विठ्ठलाशिवाय अन्य देवतेचा केव्हांहि उच्चार करणार नाहीं ।।२।। विठ्ठलरायाशिवाय दुसरेहि कोणी देव आहेत असें श्रुतिस्मृति म्हणतात खरे ।।३।। (परंतु) असे हे अपशब्द कानांनीं किंचितहि श्रवण करूं नये आणि लोकांनीं आपणाला पाखंडी म्हटलें असतां शांतता धारण करावी ।।४।। विठ्ठलरायाशिवाय दुसरा कोणी मोठा देव आहे असें

१ टीप:– या विठोबा परतें आन दैवत म्हणती । ते शब्द नायकावती कानीं माझ्या ।।१।। पाखंडी म्हणती उगेंचि असावें । हा ब्रह्म कटाह करूं शके न अतारिसा ।।२।। तो हि जरि म्हणेल अहं ब्रह्मास । तरी न पहावी वास ये ही नयनीं ।।३।। कोटी कोटी ब्रह्मांडे एक एक्या रोमीं । व्यापोनियां व्योमीं वर्ततसे ।।४।। ऐसा माझा विठो सर्वांघटीं सम । संडावें वर्म नामा ह्मणे ।।५।।

असे प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें भेटून सांगितलें असतांहि त्याला बुद्धिभ्रंश झाला असें निःसंशय समजावें ॥१-६॥ ज्याच्या रोमरंध्रामध्यें कोटयावधि ब्रह्मांडें वसत आहेत असा हा देवराय आकाशासारखा व्यापक आहे ॥७॥ असा हा माझा विठ्ठलराय सर्व घटीं समरूपानें व्याप्त आहे या वर्माकडे दुर्लक्ष करूं नका, असें नामदेवराय म्हणतात ॥८॥

बांधिलें राहीना वैरलें खाईना । दवडिलें जाईना जाणतें हो ॥१॥
तया खुंटा नां दावें स्वैर बांधावें । कशानें करावें वोढाळे वो ॥२॥
तया नेत्र ना पाय तिन्हीं लोक पाहें । न देखावें ते ठाय देखताहे ३
नामा म्हणे श्रोता विचारावें ज्ञानीं । केशवाचे वचनीं उतरला ।४

(१३४) ज्याला बांधले असतां ते स्थिर रहात नाहीं ज्याच्या पुढे खाद्य पदार्थ ठेविले असतां ते भक्षण करित नाहीं व ज्याला हुसकून दिले असतां ते जागेवरून हालत नाहीं ॥१॥ ते स्वैराचारी होण्यानें व ज्याला बांधण्या करितां दावे (दोरी) अथवा खुंटा नाहीं अशा ओढाळ मनाला स्थीर होण्याकरितां कोणता प्रयत्न करावा ? ॥२॥ ज्याला पाय अथवा नेत्र नाहीं हे खरे परंतु ते तिन्हीं लोकाला पाहतें व तेथें गमन करिते ॥३॥ अहो ज्ञानी श्रोतेहो माझें हे प्रतिपादन केशवाचे वचनानुकूल होण्यानें त्याचा तुम्ही विचार करा असे नामदेवराय ह्मणतात ॥४॥

चितनिका:—'चंचलहि मनः कृष्ण' या गीतेतील श्लोकाचा अनुवादपर हा अभंग असावा असे वाटते आणि ह्मणून पुढील प्रमाणें पाठभेद संग्रह केला आहे.

स्वैर सोरसें, तीन्हि लोक-तिन्हीं एक, केशव वचनी-केशव नयनी.

ध्यान धारणा नलगे टाळीं । विठो पाहावा उघडें डोळीं ॥१॥
विठो समाधीचें सुख । पाहतां हरे तहान भूक ॥२॥
नामा म्हणे न करीं कांहीं । चित्त रंगले हरीचे पायीं ॥३॥

(१३५) हा विठ्ठलराय प्रकट असल्यानें त्याला खुल्या-उघड्या डोळ्यांनीं पहा. त्याला पाहण्यास तुम्हाला ध्यान करण्याची अथवा टाळ्या

वाजविण्याची कांहींच आवश्यकता नाहीं ॥१॥ विठ्ठलराय हेच समाधीचें सुख असल्यानें त्याला पाहण्यांत तहान भूक हरपून जाते ॥२॥ माझें चित्त श्रीहरिचरणीं रममाण होण्यानें मी आतां दुसरी कांहींच उठाठेव करणार नाहीं, असें नामदेवराय म्हणतात.

येतियां पुसें जातियां धाडी निरोप । पंढरपुरी आहे माझा माय बाप ॥१
येई विठाबाई आई माउलीये । निढळावरी कर ठेऊनि पालवीये ।२
पिंवळा पीतांबर गगनीं झळकला । गरुडावरी बैसोनि माझा कैवारी आला ॥३॥ डोळ्यांतील बाहुली माझी विठाई झाली । घनानंद मूर्ति माझ्या ध्यानासी आली ॥४॥ विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिवाळी । विष्णुदास नामा जीवेंभावें ओंवाळी ॥५॥

(१३६) माझे आईबाप हे पंढरीक्षेत्रीं वास करितात. मी त्यांना माझ्याकडे यावे ह्मणून येणाऱ्या जाणाऱ्या जवळ निरोप पाठविन ॥१॥ हे प्रेमळ आई विठाबाई, तुझ्या भेटी करितां मी कपाळावर हात ठेऊन बोलावीत आहे. तेव्हां तूं त्वरित ये ॥२॥ आकाश मध्यें ज्याअर्थी पिवळा पीतांबर चकाकत आहे त्या अर्थी माझे रक्षक जे श्री विठ्ठलराय हे गरुडावर बसून धांवत आले ॥३॥ माझ्या डोळ्यांतील बाहुली होच जणुं काय विठाई आविष्कृत झाली. अशी ही पूर्णानंदांत असलेली मूर्ति ही ध्यानाचा विषय झाली ॥४॥ विठ्ठल रायाचें राज्य म्हणजे आम्हांला नित्यच दिवाळी सारखें होय. अशा या मूर्तीला विष्णुदास नामा हा जिवाभावानें ओंवाळीत आहे ॥५॥

विठ्ठलेंविण जया न गमे एक घडी । सर्वस्व आवडी विठ्ठलाची ।१
विठ्ठलचि माता विठ्ठलचि पिता । भगिनी आणि भ्राता विठ्ठलचि २
विठ्ठलचि क्रिया विठ्ठलचि कर्म । विठ्ठल सकळ धर्म कुळदैवत ।३
गुज गोप्य जीवींचें विठ्ठला सांगावें । विठ्ठलें पुरवावें कोड त्याचें ४
सर्वकाळ करणें विठ्ठलाची कथा । विठ्ठल जडला चित्तीं जयाचिया ।५
विठ्ठल जागृति स्वप्न आणि सुषुप्ति । अखंड वदती विठ्ठल विठ्ठल ।६
ऐसें सर्वस्वेसीं विठ्ठल भजतां । सुख आलें हातां विठ्ठलाचें ॥७॥
नामा म्हणे त्याचे चरण रज होऊन । जाहलोंसे पावन म्हणे आतां ।८

(१३७) विठ्ठलरायाचे ठिकाणीं प्रेम जडल्यानें त्याचेशिवाय ज्यांना क्षणभरही करमत नाहीं ॥१॥ त्याची माता, पिता, बहीण व भाऊ विठ्ठलराय हेच होत ॥२॥ त्याची क्रिया, कर्म, सर्व धर्म व कुळदैवत विठ्ठलच होय ॥३। त्यांनीं विठ्ठलरायांना हृदयातील गुह्य गोष्टी उघड करावयात आणि विठ्ठल रायांनीं त्यांचें कोड कौतुक पुरवावें ॥४॥ जे विठ्ठलरायाचे सदासर्वकाळ गुणानुवाद करितातात व ज्याचें चित्त विठ्ठलाचे ठिकाणीं रममाण झालें आहे ॥५॥ विठ्ठलराय हाच ज्यांच्या जागृति स्वप्न व सुषुप्तीचा विषय झाला आहे व जे आपल्या मुखानें सतत विठ्ठलनामोच्चार करितात ॥६॥ अशा सर्व प्रकारानें जे विठ्ठलरायाचें भजन करितात त्यांना विठ्ठलरायाचें सुख हस्तगत होतें ॥७॥ अशा थोर भगवद्भक्तांच्या चरणाची धूळ होण्यानें (प्राप्त झाल्यानें) मी आतां कृतकार्य झालो असें नामदेवराय म्हणतात ॥८॥

विठ्ठल त्रिमात्रा सकळिकां । विठ्ठल आधार तिहीं लोकां ।
विठ्ठल न कळे ब्रह्मादिका । विठ्ठल देखा पंढरीये ॥१॥
विठ्ठल डोळस सांवळा । विठ्ठल पाहाती अवला बाळा ।
विठ्ठल ध्यावा वेळोवेळां । विठ्ठल कमळा वल्लभ ॥२॥
विठ्ठल धरारे मानसीं । विठ्ठल सोडवील अहर्निशीं ।
विठ्ठलावीण मुक्ति कैची । कुंटणी गणिकेसी उद्धरिले ॥३॥
विठ्ठल उभा भीमातिरीं । कर ठेवूनि कटावरी ।
विठ्ठल भक्त काज कैवारी । विठ्ठल अनाथ कोवंसा ॥४॥
विठ्ठल नुपेक्षी भरंवसा । विठ्ठलें विण शुन्य दाही दिशा ।
विठ्ठल हारे महादोषा । विठ्ठलाविण नाहीं हे अनेक ॥५॥
श्री विठ्ठल धन्य दिवस । श्री विठ्ठल भक्ति रस ।
श्री विठ्ठल परम पुरुष । विष्णुदास म्हणे नामा ॥६॥

(१३८) विठ्ठलराय हेंच सर्वांचें विश्रांति स्थळ होय. तिन्ही लोकांना आधारभूत विठ्ठलराय असून तो ब्रम्हादि देवानाहि न कळणारा आहे असा हा विठ्ठलराय पंढरपुरास प्रत्यक्ष पहा ॥१॥ विठ्ठलराय हा डोळस, सांवळा असल्यानें त्याला आबालवृद्ध हे आपल्या चर्मचक्षूंनीं पाहतात.

सतत बिठ्ठलरायालाच ध्यावें. कमलावल्लभ म्हणजेच हा बिठ्ठलराय होय ॥२॥ बिठ्ठलरायालाच तुम्ही आपल्या मनामध्यें स्थिर करा. तोच तुम्हांला अडचणीतून मुक्त करील. तुम्हांला या विठ्ठलाशिवाय कोण स्वतंत्र करील बरे ! पहा त्यांनीं कुंटणी गणिकेचा उद्धार केला ॥३॥ हा विठ्ठलराय भीमेच्या किनारीं कटीवर हात ठेऊन उभा आहे. हा विठ्ठलराय भक्तांचा कैवारी-पाठीराखा असून तो महापातकांचें निवारण करणारा आहे ॥४॥ हा विठ्ठलराय अनाथाचा रक्षक असून तो भक्तांची उपेक्षा केव्हाहि करणारा नाहीं असा भरंवसा आहे. विठ्ठलाशिवाय या दाही दिशा भक्तास शून्य वाटतात. ही बहुविध विश्वरचना विठ्ठलाशिवाय अन्य नाहीं ॥५॥ विठ्ठलराय हाच धन्य दिवस होय. भक्तिरस म्हणजेच विठ्ठलराय होय व तोच परमपुरुष होय असें विष्णुदास नामदेवराय म्हणतात ॥६॥

दोन्हीं हात ठेवूनि कटा । उभा भिवरेच्या तटा ॥१॥
हरि बरवया बरवया । विठोबा पंढरीच्या राया ॥२॥
नामा म्हणे वेगी धांवा । देव आले याची गांवा ॥३॥

(१३९) ज्याने आपले दोन्ही हात कमरेवर ठेविलें आहेत आणि जो भिवरा नदीच्या किनारी उभा आहे ॥१॥ असा हा हरि सुंदरांत सुंदर आहे व तोच पंढरी क्षेत्राचा राजा आहे ॥२॥ अहो देवराया, तुम्ही त्वरित धांवत या असा धांवा करिताच ते यांच्या गांवी धांवत आले, असें नामदेवराय म्हणतात ॥३॥

अवघें तीर्थ तीर्थरूप । परि तें विठ्ठल चरणींचें स्वरूप ।
विठ्ठल देखलिया निःपाप । जीव जंतु होताती ॥१॥
एवढें क्षेत्र पांडुरंग । सर्वा तीर्थांमाजीं अभंग ।
धरिलिया संत संग । महादोष हरताती ॥२॥
हरि कीर्तन करीं वेगीं । हेंचि उद्धरील जगा लागीं ।
जें जें अनुसरलें पांडुरंगीं । ते ते गेलें वैकुंठा ॥३॥
नामा जपे सदा काळीं । रामकृष्ण नामावळी ।
विठ्ठल विठ्ठल हृदय कमळीं । जपतसे सर्वदा. ॥४॥